१८६९
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ७३९९

# भारतीय विवाह शास्त्र

**
* * *
*****
* * *
**

REFBK-0011561

—अप्रबुद्ध

# भारतीय विवाहशास्त्र

## भाग १

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ले. अग्रबुद्ध

"शतकानुशतकें आपल्या स्त्री-जातीसमोर सीता सावित्री यांचे आदर्श आहेत; जिजाबाई, अहिल्याबाई यांचे आदर्श आहेत. हे आदर्श सोडून आज आपल्या भगिनी काडीमोड करणाऱ्या होणार काय? त्यांना फुलपांखरें बनवावयाचीं काय? **हिंदुस्थानांतील पद्मिनी जाऊन तिच्या जागीं ग्रीक हेलन येणार काय?"**

—भगिनी निवेदिता (अनुवादक—साने गुरुजी)

REFBK-0011561

मूल्य ४ रु. ५० नवे पैसे

प्रकाशक :

विष्णु केशव पाळेकर

यमुना निवास

महाल, नागपूर-२.

★

सर्वहक्क लेखकाचे स्वाधीन

★

मुद्रक :

महाराष्ट्र मुद्रण,

चि. द. सहस्त्रबुद्धे

महाल, नागपूर-२.

# ।। अर्पणपत्रिका ।।

-:◡:◡:-

।। श्री ।।

समाधींत त्या जगत्पित्याची दुभंग झाली तनु ।
वामभाग हो शतरूपा तो दक्षिण झाला मनु ।।

अणू अणूही दुभंग झाला, झाली सृष्टी द्विधा ।
वामभाग 'ती' पुरुष सव्य 'तो' क्रम हा चाले सदा ।।

म्हणून व्हाया पुन्हां एक ते सहजच तळमळती ।
गूढ तयाचा तोच हेतु गे प्रेम तया म्हणती ।।

या कारण दुसरें तिसरें कांहीं नसे ।
या प्रतिकाराया समर्थ कुणि कां असे ? ।
हें जाणुन मनुनें संस्था ही रचिलिसे ।
जगन्मंगला संपादाया मंगल ही योजना ।
लहरींचा हा खेळ नव्हे ही उन्नतिचि रचना ।।

अशा रीतीनें, या ब्रह्मगोलाच्या कणांकणांतही आविर्भूत होणाऱ्या मधुर रसमय जगदात्म्याच्या अनादिसिद्ध अशा दांपत्यस्वरूपास या भागासुद्धां हा संपूर्ण ग्रंथ समर्पण असो !

—अप्रबुद्ध

॥ श्री ॥

# अनुक्रमणिका


अर्पणपत्रिका

प्रस्तावना

| | पान |
|---|---|
| प्रकरण–१ ले | १ |
| प्रकरण–२ रे | १६ |
| प्रकरण–३ रे | ३२ |
| प्रकरण–४ थे | ५१ |
| प्रकरण–५ वे | ५८ |
| प्रकरण–६ वे | ७७ |
| प्रकरण–७ वे | १०२ |
| प्रकरण–८ वे | १२२ |
| प्रकरण–९ वे | १४५ |

# भारतीय विवाहशास्त्र

## प्रस्तावना

ज्या विषयाचा मला खरोखर अनुभव नाहीं त्या विषयावर लिहिण्याचा मला कांहीं अधिकारही नाहीं. हें पटत असल्यामुळें या विषयावर लिहिण्याची कल्पना माझ्या डोक्यांत येण्याचें कांहीं कारणच नव्हतें. परंतु, सुमारें दहा वर्षांपूर्वी घडलेल्या एका प्रसंगामुळें या विषयाचा विचार करण्याची मला आवश्यकता भासूं लागली. त्या सुमारास मी माझ्या एका स्नेह्याच्या येथें पाहुणा म्हणून गेलों होतों. मी गाडींतून उतरलों तेव्हां घरांत कांहीं तरी वाद चालला आहे असें माझ्या लक्षांत आलें. मला पाहतांच माझ्या मित्राची पत्नी जरा आवेशानेंच म्हणाली ‘बरें आलांत मामा, ही तुमची भाची पहा कशी ऐकत नाहीं तें !’ माझा मित्र व त्याची पत्नी हीं उभयतां सनातनी वळणाचीं आहेत व विशेषतः त्याची पत्नी तर या नवीन युगांतही अजून जनाबाई-मुक्ताबाईच्या वातावरणांतच वावरणारी आहे. नवीन लग्न झालेल्या तिच्या मुलीला अर्थातच थोडेसें नवीन वातावरणांत राहण्याची हौस असणें साहजिक होतें. त्यामुळें माय–लेकींचे असे खटके मधूनमधून केव्हांकेव्हां होत असत. त्यांतलाच हाही एक प्रसंग होता. आणि मूळ वाद पोषाखाच्या कांही तरी पद्धती-वरून उत्पन्न झाला होता. माझ्याकडे खटला आल्याबरोबर माझ्या पद्धतीप्रमाणें मी त्यांना म्हटलें ‘न ऐकायला काय झालें ?

तुम्ही त्यांना नीट समजावून सांगितलें नाहीं. नीट समजावून न सांगता नुसताच मनाईहुकूम काढला तर या सुधारलेल्या युगांतील मुलें त्याच्याविरुद्ध बंड केल्याखेरीज कशी राहतील ? हें पहा, मी आतां तंटा तोडतों,' असें म्हणून मी तेथेंच झोंपाळ्यावर बसलों आणि पोषाखाच्या शास्त्रासंबंधीं 'नारीणां सुरतोपयोग्यवयवः स्पष्टीकृतिर्दोष इ–। त्युक्तं चेत् अधरापिधानमपि किं न स्यात् सदा वाससि ।।' "जर सुरतप्रसंगांत विशेष उपयोगी असणाऱ्या अवयवांना उघडे टाकणें हा दोष समजला गेला तर ओठ देखील नेहमी वस्त्रानें आच्छादावे लागतील." या व्यंकटाध्वरीच्या उपहासवचनाच्या साह्यानें आमच्या संस्कृतीप्रमाणें पोषाखाचें शास्त्र काय असलें पाहिजे हें त्या मुलीला थोडक्यांत समजावून सागितलें. त्यावरोबर तिची एवढी समजूत पटली कीं, त्या घरांत आजतागायत तसा वाद झाला नाहीं. सरतेशेवटीं त्या मुली मला म्हणाल्या 'अशा रीतीनें कोणी आम्हांला समजावून सांगतच नाहीं. मामा तुम्ही पुरुषां करतां पुस्तकें लिहिता तशीं आमच्या-करतां कां लिहीत नाहीं ?" त्यावेळेस, 'तुमच्याकरतां एक स्वतंत्र पुस्तक लिहीन' असें मी त्यांना अभिवचन दिलें. भारतीय विवाहशास्त्राचा पहिला भाग ही ईश्वरी कृपेनें घडलेली. त्या अभिवचनाची थोडीशी पूर्तता आहे.

पुस्तकाच्या अंतरंगासंबंधीं आजच मला कांहीं जास्त लिहावयाचें नाहीं. विषय विचाराकरतां जनतेच्या पुढे मांडला आहे. विद्वान लोक त्याचें योग्य ते चीज करतील अशी मला आशा आहे. या पहिल्या भागांत विशेषतः (१) भारतीयांच्या विवाहसंस्थेला ऐहिकापलीकडे कांहीं जास्त व्यापक ध्येय आहे;

(२) आपल्या सर्व सामाजिक संस्थांप्रमाणें विवाहसंस्था ही त्यांनीं मध्यम-मनांत बसविण्याची मुद्दाम खबरदारी घेतली आहे आणि म्हणून (३) अलीकडे ज्याला आपण प्रेमविवाह म्हणतों तशा तऱ्हेचें प्रेम हें त्यांच्या विवाहाचें प्रारंभ-सूत्र नसून ती त्याची फलनिष्पत्ति आहे आणि (४) ही फलनिष्पत्ति बहुजनांच्या पदरांत पडण्याकरतां स्त्री आणि पुरुष यांची प्रथमापासूनच वाढ थोडी वेगवेगळाल्या दिशेनें झाली पाहिजे; कारण, नुसत्या शरीराच्या दृष्टीनेंच नव्हे तर जीवदृष्टीनेंच मुळीं तीं दोन भिन्न तत्त्वें आहेत व त्यांचें कार्य एकमेकांची स्पर्धा करण्यांत नसून पूर्तता करण्यांत आहे, हेचार सिद्धांत मुख्यतः मांडले आहेत. भारतीय वाङ्मयाचा अभ्यास केला असतां या गोष्टी त्यांत आढळून येतात असें माझें म्हणणें आहे. आणि विद्वानांनींही, या गोष्टी आजच्या स्थितींत त्यांना कितपत पटतात यापेक्षां भारतीय वाङ्मयावरून विवाहसंस्थेचें तसें स्वरूप दिसतें किंवा नाहीं याच दृष्टीनें त्यांचा विचार करावा अशी माझी नम्र विनंति अःहे.

पुस्तकाच्या रचनेसंबंधीं दोन शब्द लिहिणें भाग आहे. या विषयाचा विचार जरी गेलीं कित्येक वर्षें मी करीत आहे तरी माझे विचार पुस्तकरूपानें इतक्यांतच मांडण्याची माझी तयारी नव्हती. परंतु येथील 'वधूवरसूचक मंडळानें' विवाह या विषयाशीं संबंध असलेल्या कित्येक प्रश्नांवर छोटे छोटे लिहून देण्याचीं कामगिरी मजकडे दिली. त्या प्रयत्नांतूनच ग्रंथाला हल्लींचें स्वरूप आलें आहे. प्रथमतः एक ग्रंथच लिहावयाचा अशी कल्पना नसल्यामुळें पहिले पहिले लेखांक स्वतंत्र पृष्ठें देऊन छापले आहेत. परंतु पुढें 'वाढतां वाढतां वाढे' असें या विषयाचें स्वरूप वाढल्यामुळें ग्रंथरूपांतच तो लोकांपुढें मांडण्याची कल्पना निश्चित

झाली. आणि म्हणून आठव्या लोकांपासून मागची सर्व पृष्ठ-संख्या मोजून तिच्यापुढें पृष्ठांक घातले आहेत व त्यांचाच क्रम पुढील भागांत चालविला जाईल.

हे नऊ लेखांकच एक भाग म्हणून प्रसिद्ध करण्याचें कारण असें आहे कीं, प्रसिद्ध झालेले लेखांक माझ्या मित्रमंडळीस फार आवडले. कित्येक मुद्यांसंबंधीं माझ्याशीं सहमत नसलेल्या वाचकांनीं देखील अनेक रीतींनीं त्यांचें कौतुकच केलें. आणि असे फुटकळ लेखांक एकत्रित वाचण्यास त्रास पडतो तेव्हां त्यांचें बांधीव पुस्तक हातांत द्यावें असा आग्रह केला. तेवढ्याकरतां सुमारें दीडशें पानांचा हा पहिला भाग आज प्रसिद्ध करीत आहे; आणि तो घेण्यास सुलभ जावें. म्हणून हल्लीच्या परिस्थितीच्या मानानें त्याची किंमतही फार थोडी म्हणजे केवळ बारा आणे ठेवली आहे. अशा रीतीनें हा भाग लोकांपुढें आणण्याचें सारें श्रेय 'वधूवरसूचक मंडळा'चें आहे. म्हणून प्रकाशक या नात्यानें त्यांचे, मुद्रक रा. रानडे यांचे व माझे निरपेक्ष लेखक रा. वळीरामपंत येरकुंठवार यांचे आभार मानणें माझें कर्तव्यच आहे. या ग्रंथानें भारतीयांच्या विवाहशास्त्राचें खरें रूप समजण्यास अंशतः तरी साह्य व्हावे इतकीच त्या ज्ञानविग्रह श्रीगुरुमूर्तीस प्रार्थना आहे.

--अप्रबुद्ध

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

आजइतके वर्षांनी आजच्या विषमपरिस्थितीतही भारतीय विवाहशास्त्राच्या पहिल्या भागाच्या पुनर्मुद्रणाचा योग येत आहे ही केवळ परमेश्वरी कृपाच आहे ! व्ययहारदृष्टया या आवृत्तीचे सारे श्रेय माझे निरपेक्ष सुहृद प्रा. श्रीयुत भा. ह. मुंजे यांना आहे. त्यांनीं प्रोत्साहन देऊन आर्थिक सहाय्य केले नसते तर हा योग आलाच नसता. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देणे म्हणजेही त्यांच्या कळकळीचा अवमान करण्यासारखेच आहे !

मूळ कल्पना हे पुस्तक चार भागांत काढावे अशी होती. यापुढील भागांत आजच्या मुलींची वाढ, शिक्षण, त्यांच्यापुढें पडलेल्या द्रव्यार्जन, विवाह, त्यांची शारीरिक दुर्बळता, गुणसंपत्ती इत्यादि प्रचलीत विषयांवर विचार येऊन तिसऱ्यांत, प्रत्यक्ष विवाहसंस्कार आणि त्याला अनुसरून असले गर्भाधान वगैरे संस्कार आणि चवथ्यांत विवाहासंबंधी अनेक प्रश्न आजच्या परिस्थितींत कसे सोडवता येतील ते घ्यावे, अशी योजना होती. परंतु पहिल्या भागानंतर अनेक प्रकारच्या महत्वाच्या कार्यांत गुंतल्यामुळें जो विराम झाला त्यानें पुढच्या भागांकडे लक्ष देण्यास सवडच झाली नाहीं. या भागाचे विद्वान वाचकांनीं अपेक्षे बाहेर कौतुक केले आणि निदान त्याचे तरी पुनर्मुद्रण करावे असा आग्रह केला. परंतु माझ्या अकिंचनतेमुळें तें जमू शकलें नाहीं. सुदैवानें तो योग आज येत आहे.

पुनर्मुद्रण करिताना कांहींही फरक न करिता जसेच्या तसेंच मुद्रित केले आहे. फक्त गेल्या आवृत्तींत अनवधानानें झालेले

झाली. आणि म्हणून आठव्या लोकांपासून मागची सर्व पृष्ठ-संख्या मोजून तिच्यापुढें पृष्ठांक घातले आहेत व त्यांचाच क्रम पुढील भागांत चालविला जाईल.

हे नऊ लेखांकच एक भाग म्हणून प्रसिद्ध करण्याचें कारण असें आहे कीं, प्रसिद्ध झालेले लेखांक माझ्या मित्रमंडळीस फार आवडले. कित्येक मुद्यांसंबंधीं माझ्याशीं सहमत नसलेल्या वाचकांनीं देखील अनेक रीतींनीं त्यांचें कौतुकच केलें. आणि असे फुटकळ लेखांक एकत्रित वाचण्यास त्रास पडतो तेव्हां त्यांचें बांधीव पुस्तक हातांत द्यावें असा आग्रह केला. तेवढ्याकरतां सुमारें दीडशें पानांचा हा पहिला भाग आज प्रसिद्ध करीत आहे; आणि तो घेण्यास सुलभ जावें. म्हणून हल्लीच्या परिस्थितीच्या मानानें त्याची किंमतही फार थोडी म्हणजे केवळ बारा आणे ठेवली आहे. अशा रीतीनें हा भाग लोकांपुढें आणण्याचें सारें श्रेय 'वधूवरसूचक मंडळा'चें आहे. म्हणून प्रकाशक या नात्यानें त्यांचे, मुद्रक रा. रानडे यांचे व माझे निरपेक्ष लेखक रा. वळीरामपंत येरकुंठवार यांचे आभार मानणें माझें कर्तव्यच आहे. या ग्रंथानें भारतीयांच्या विवाहशास्त्राचें खरें रूप समजण्यास अंशतः तरी साह्य व्हावे इतकीच त्या ज्ञानविग्रह श्रीगुरुमूर्तीस प्रार्थना आहे.

--अप्रबुद्ध

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

आजइतके वर्षांनी आजच्या विषमपरिस्थितीतही भारतीय विवाहशास्त्राच्या पहिल्या भागाच्या पुनर्मुद्रणाचा योग येत आहे ही केवळ परमेश्वरी कृपाच आहे ! व्ययहारदृष्टचा या आवृत्तीचे सारे श्रेय माझे निरपेक्ष सुहृद प्रा. श्रीयुत भा. ह. मुंजे यांना आहे. त्यांनीं प्रोत्साहन देऊन आर्थिक सहाय्य केले नसते तर हा योग आलाच नसता. त्याबद्दल त्यांना धन्यवाद देणे म्हणजेही त्यांच्या कळकळीचा अवमान करण्यासारखेच आहे !

मूळ कल्पना हे पुस्तक चार भागांत काढावे अशी होती. यापुढील भागांत आजच्या मुलींची वाढ, शिक्षण, त्यांच्यापुढें पडलेल्या द्रव्यार्जन, विवाह, त्यांची शारीरिक दुर्बळता, गुणसंपत्ती इत्यादि प्रचलीत विषयांवर विचार येऊन तिसऱ्यांत, प्रत्यक्ष विवाहसंस्कार आणि त्याला अनुसरून असले गर्भाधान वगैरे संस्कार आणि चवथ्यांत विवाहासंबंधी अनेक प्रश्न आजच्या परिस्थितींत कसे सोडवता येतील ते घ्यावे, अशी योजना होती. परंतु पहिल्या भागानंतर अनेक प्रकारच्या महत्वाच्या कार्यांत गुंतल्यामुळें जो विराम झाला त्यानें पुढच्या भागांकडे लक्ष देण्यास सवडच झाली नाहीं. या भागाचे विद्वान वाचकांनीं अपेक्षे बाहेर कौतुक केले आणि निदान त्याचे तरी पुनर्मुद्रण करावे असा आग्रह केला. परंतु माझ्या अकिंचनतेमुळें तें जमू शकलें नाहीं. सुदैवानें तो योग आज येत आहे.

पुनर्मुद्रण करिताना कांहींही फरक न करिता जसेच्या तसेंच मुद्रित केले आहे. फक्त गेल्या आवृत्तींत अनवधानानें झालेले

कांहीं दोष दुरुस्त केले आहेत. मुद्रिते तपासण्याची शक्य ती काळजी घेतली आहे. तरीही कांहीं दोष राहिले असतील. परंतु ते इतके किरकोळ आणि सहज लक्षांत येण्याजोगे आहेत कीं त्यामुळें अर्थ विपर्यास अथवा हानि होणार नाही. म्हणून मुद्दाम शुद्धिपत्र दिलेले नाहीं.

सरतेशेवटी आभार मानावयाचे म्हणजे महाराष्ट्र मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. चिंतामणराव सहस्त्रबुद्धे यांचे. त्यांनी ह्या पुस्तकाच्या मुद्रणाचें कार्य फार काळजीपूर्वक व थोड्या अवकाशांत करून दिले. आणि यामुळेच हे पुस्तक इतक्या लवकर प्रकाशित होऊं शकले.

कार्तिक शु।।. ११ शके १८८३. —अप्रबुद्ध

८८
६१

अनु. ३३१८ दि. ...
... १३८ नों. दि. ९८।५।८

# भारतीय विवाहशास्त्र

## प्रकरण १ लें

## सामान्य विचार

ग्रंथ संग्रहालय ... क्र. १९५५७ ...

लग्नसंस्थेची उत्पत्ति पृथ्वीवर केव्हां व कशी झाली हा एक मोठा विचाराचा प्रश्न आहे. आणि तो कधीं समाधानकारक रीतीनें निकालांत निघेल किंवा नाहीं याची वानवाच आहे. याचें कारण असें आहे कीं, अलीकडे ज्या अर्थानें लग्नसंस्थेची गरज वाटूं लागली आहे त्या अर्थानें पाहिलें तर लग्नसंस्था ही मानव समाजांतच तर काय पण उत्क्रांतिवादा-प्रमाणें, मनुष्याच्या पूर्वस्वरूपांतील जे समाज असतील त्यांच्यांत देखील आढळून येते. लग्नसंस्थेकडे पाहण्याची नवीन दृष्टि अशी आहे कीं, लग्नानें मानवी जीवांचें एकीकरण होत असेल किंवा नसेलही; तो कांहीं लग्नाचा हेतु नाहीं; लग्नाचा हेतु प्रजोत्पादन हाच आहे. म्हणून अत्युच्च लग्नसंस्था तीच कीं, निसर्गाच्या मागणीपुरतींच स्त्री-पुरुषें एका ठिकाणीं यावीं व निसर्गाचें कार्य झालें म्हणजे पुढें एकत्र राहण्याचें कोणत्याही तऱ्हेचें बंधन त्यांच्यावर नसावें. निसर्गाच्या कार्यानंतर अपत्यसंगोपनाची जबाबदारी देखील त्यांच्यावर पडूं नये. निसर्ग आपल्या प्रेरणेनें ज्या समाजाची वाढ करतो त्या समाजावर तिचा बोजा असावा. या दृष्टीनें पाहिलें असतां पक्षीयोनींत आढळणारी लग्नव्यवस्थाही थोडीशी कमी प्रकारची ठरते. कारण पक्ष्यांना देखील, पंख फुटून पिलें मोठीं होईपर्यंत एकत्र राहून त्यांचें पोषण करावें लागतें. निसर्गाच्या प्रेरणेनें एक व्हावें

असें म्हटलें म्हणजे त्या एक होण्याला अंतःकरणप्रवृत्तीशिवाय इतर कोणत्याही प्रकारच्या नियमनाची गरज नाहीं. आणि निसर्गाचें कार्य संपल्यावरही तो संबंध टिकविण्याचीं तशीच कांहीं गरज नाहीं, मनास वाटल्यास अथवा मनास वाटेल तेथपर्यंत तो संबंध टिकवावा, ज्या दिवशीं तसें वाटणार नाहीं त्या दिवशीं तो मोडून टाकावा, अशा प्रकारचा स्त्री-पुरुष-संबंध जर एखाद्या लग्नसंस्थेमध्यें असेल तर ती संस्था मान्य करावयास विसाव्या शतकाच्या नव्या मनूंतील नवे शिपाई तयार आहेत. अशा प्रकारचा स्त्री-पुरुषसंबंध म्हणजे लग्नसंस्था असा अर्थ केला तर पक्ष्यांतील लग्नसंस्था अधिक उत्कृष्ट ठरते. या संस्थेला लग्नसंस्था कां म्हणावें असा कोणी बुरसटलेल्या विचाराचा मनुष्य विचारील तर त्याला नव्या मनूचें असें उत्तर आहे कीं, शब्दाबद्दल आमचा वाद नाहीं; आम्हांला स्त्री-पुरुष संबंधाची अशी व्यवस्था पाहिजे. त्या संबंधाला लग्नच म्हटलें पाहिजे असा तुमचा आग्रह असल्यास आमची ना नाहीं. असे संबंध म्हणजे केवळ प्रेमहीन असतात असें समजण्याचें कांहींच कारण नाहीं. निसर्गाच्या प्रेरणेनें एकत्र येणाऱ्या पशुपक्ष्यांच्या स्त्री-पुरुषांतही विलक्षण प्रेम असतेंच.

## लग्नाचा अर्थ

सारांश, लग्नसंस्थेचा इतिहास पाहत असतांना प्रथमतः लग्न म्हणजे काय याचा अर्थ निश्चित केला पाहिजे. नाहीं तर, लग्नसंस्था ही मनुष्येतर प्राण्यांत आहे असें मानून तेथपासून इतिहास पाहावा लागेल. व्याघ्रसिंहासारखे क्रूर पशू देखील दांपत्ययोग करून राहतात. त्या संबंधाला लग्न कां म्हणूं नये व स्त्रीपुरुषसंबंधालाच लग्न कां म्हणावें हा विचाराचा प्रश्न आहे. अशा, एका ठिकाणीं राहणाऱ्या मानवेतर स्त्री-पुरुषांहून मानवी स्त्री-पुरुषांचा तसा संबंध कांहींतरी निराळा असतो असें दिसून आलें तर तो निराळेपणा हाच लग्न शब्दाचा अर्थ होईल. याकरतां असा कांहीं निराळेपणा आहे कीं काय हें पाहिलें पाहिजे. सामान्यतः नेहमींच असें प्रतिपादिलें जातें कीं, प्रजोत्पादन हाच स्त्री-पुरुषसंबंधाचा हेतु असल्यामुळें त्याकरतांच ते एका ठिकाणीं येतात आणि

म्हणून तोच काय तो लग्नाचा हेतु. परंतु ही समजूत बरोबर नाहीं. कारण स्त्री-पुरुषांमध्यें जें आकर्षण असतें तें केवळ समागम-सुखाकरतांच असतें असें नाहीं. इतकेंच नव्हे तर स्त्री-पुरुषांचा मैथुनसंबंध देखील प्रजोत्पादनार्थच असतो म्हणजे तोच केवळ त्याचा हेतु असतो असेंही नाहीं. सृष्टीमध्यें असे कित्येक प्राणिवर्ग आहेत कीं ज्यांच्यामध्यें एकमेकांशीं कोणत्याही प्रकारें मैथुनसंबंध न होतां प्रजोत्पत्ति अखंड सुरू असते. आणि असा प्रकार असूनही त्यांच्यांत प्रेमसंबंध आढळून येतोच व त्याकरतां एकत्र राहण्याची प्रवृत्तिही आढळून येते. याच्या उलट, निसर्गाच्या प्रेरणेनें प्रजोत्पत्तीपुरतेंच निकट येऊन त्यापूर्वी अथवा त्यानंतरही एक-मेकांशी यत्किंचितही स्नेह नसणाऱ्यांची उदाहरणें आढळतात. आपल्या नित्य परिचयाची मनी मावशीच घ्या. भाटी व बोका यांचें समागमापलीकडे क्षणभरही कधी एकमेकांशीं पटल्याचें अथवा एकमेकांची एकमेकांस कांही गरज असल्याचें कधी कोणी पाहिलें असेल असें वाटत नाही. समागमा-पूर्वीही एकमेकांचें मोठें त्वेषानें युद्ध होतें, आणि समागम हा विजयी पक्षानें वसूल करून घेतलेला युद्धक्लेशाचा मोबदला असतो. दुसऱ्या कांही प्राणिवर्गात असें आढळतें की, निसर्गकार्यापुरती नर-मादी एका-ठिकाणी आली तरी पुन: त्यांना कधी एकमेकांची आठवणही होत नाही. अत्यंत खालच्या वर्गांतील जतूंत तर उत्पत्तीकरितां दुसऱ्या कोणाची गरजही लागत नाही. स्त्री-पुरुषांच्या आकर्षणामध्यें प्रजोत्पादन अथवा वंशवृद्धि हाच हेतु असतो असें नाही. कारण तसाच हेतु असता तर निसर्गाला मनुष्याच्या बाबतीतही तशी कांही वाट काढणें अशक्य नव्हतें. म्हणून केवळ प्रजोत्पादनापलीकडे कांही तरी त्यांत जास्त हेतु असावा असें वाटतें. याचाच अर्थ असा की, हा जो कांही जास्त हेतु असेल त्यांतील तत्व आणि लग्न म्हणविलें जाणाऱ्या स्त्री-पुरुषसंबंधांतील तत्व एक असलें पाहिजे. म्हणजे मनुष्याची लग्नसस्था कांही तरी नियंत्रित असली पाहिजे.

तसें पाहिलें तर निसर्गामध्यें स्त्री-पुरुष हा भेद नसलेले एकपेशीमय जीव, स्त्री आणि पुरुष हे दोन्ही भाव एकाच शरीरांत असलेले द्विलिंगी जीव आणि स्त्री व पुरुष असे दोन स्पष्ट असलेले जीव असे अनेक प्रकार

असें म्हटलें म्हणजे त्या एक होण्याला अंतःकरणप्रवृत्तीशिवाय इतर कोणत्याही प्रकारच्या नियमनाची गरज नाहीं. आणि निसर्गाचें कार्य संपल्यावरही तो संबंध टिकविण्याचीं तशीच कांहीं गरज नाहीं, मनास वाटल्यास अथवा मनास वाटेल तेथपर्यंत तो संबंध टिकवावा, ज्या दिवशीं तसें वाटणार नाहीं त्या दिवशीं तो मोडून टाकावा, अशा प्रकारचा स्त्री-पुरुष-संबंध जर एखाद्या लग्नसंस्थेमध्यें असेल तर ती संस्था मान्य करावयास विसाव्या शतकाच्या नव्या मनूंतील नवे शिपाई तयार आहेत. अशा प्रकारचा स्त्री-पुरुषसंबंध म्हणजे लग्नसंस्था असा अर्थ केला तर पक्ष्यांतील लग्नसंस्था अधिक उत्कृष्ट ठरते. या संस्थेला लग्नसंस्था कां म्हणावें असा कोणी बुरसटलेल्या विचाराचा मनुष्य विचारील तर त्याला नव्या मनूचें असें उत्तर आहे कीं, शब्दाबद्दल आमचा वाद नाहीं; आम्हांला स्त्री-पुरुष संबंधाची अशी व्यवस्था पाहिजे. त्या संबंधाला लग्नच म्हटलें पाहिजे असा तुमचा आग्रह असल्यास आमची ना नाहीं. असे संबंध म्हणजे केवळ प्रेमहीन असतात असें समजण्याचें कांहींच कारण नाहीं. निसर्गाच्या प्रेरणेनें एकत्र येणाऱ्या पशुपक्ष्यांच्या स्त्री-पुरुषांतही विलक्षण प्रेम असतेंच.

## लग्नाचा अर्थ

सारांश, लग्नसंस्थेचा इतिहास पाहत असतांना प्रथमतः लग्न म्हणजे काय याचा अर्थ निश्चित केला पाहिजे. नाहीं तर, लग्नसंस्था ही मनुष्येतर प्राण्यांत आहे असें मानून तेथपासून इतिहास पाहावा लागेल. व्याघ्रसिंहासारखे क्रूर पशू देखील दांपत्ययोग करून राहतात. त्या संबंधाला लग्न कां म्हणूं नये व स्त्रीपुरुषसंबंधालाच लग्न कां म्हणावें हा विचाराचा प्रश्न आहे. अशा, एका ठिकाणीं राहणाऱ्या मानवेतर स्त्री-पुरुषांहून मानवी स्त्री-पुरुषांचा तसा संबंध कांहींतरी निराळा असतो असें दिसून आलें तर तो निराळेपणा हाच लग्न शब्दाचा अर्थ होईल. याकरतां असा कांहीं निराळेपणा आहे कीं काय हें पाहिलें पाहिजे. सामान्यतः नेहमींच असें प्रतिपादिलें जातें कीं, प्रजोत्पादन हाच स्त्री-पुरुषसंबंधाचा हेतु असल्यामुळें त्याकरतांच ते एका ठिकाणीं येतात आणि

म्हणून तोच काय तो लग्नाचा हेतु. परंतु ही समजूत बरोबर नाहीं. कारण स्त्री-पुरुषांमध्यें जें आकर्षण असतें तें केवळ समागम-सुखाकरतांच असतें असें नाहीं. इतकेंच नव्हे तर स्त्री-पुरुषांचा मैथुनसंबंध देखील प्रजोत्पादनार्थच असतो म्हणजे तोच केवळ त्याचा हेतु असतो असेंही नाहीं. सृष्टीमध्यें असे कित्येक प्राणिवर्ग आहेत कीं ज्यांच्यामध्यें एकमेकांशीं कोणत्याही प्रकारें मैथुनसंबंध न होतां प्रजोत्पत्ति अखंड सुरू असते. आणि असा प्रकार असूनही त्यांच्यांत प्रेमसंबंध आढळून येतोच व त्याकरतां एकत्र राहण्याची प्रवृत्तिही आढळून येते. याच्या उलट, निसर्गाच्या प्रेरणेनें प्रजोत्पत्तीपुरतेंच निकट येऊन त्यापूर्वी अथवा त्यानंतरही एक-मेकांशी यत्किंचितही स्नेह नसणाऱ्यांची उदाहरणें आढळतात. आपल्या नित्य परिचयाची मनी मावशीच घ्या. भाटी व बोका यांचें समागमापलीकडे क्षणभरही कधी एकमेकांशीं पटल्याचें अथवा एकमेकांची एकमेकांस कांही गरज असल्याचें कधी कोणी पाहिलें असेल असें वाटत नाही. समागमा-पूर्वीही एकमेकांचें मोठें त्वेषानें युद्ध होतें, आणि समागम हा विजयी पक्षानें वसूल करून घेतलेला युद्धक्लेशाचा मोबदला असतो. दुसऱ्या कांही प्राणिवर्गांत असें आढळतें की, निसर्गकार्यापुरती नर-मादी एका-ठिकाणी आली तरी पुनः त्यांना कधी एकमेकांची आठवणही होत नाही. अत्यंत खालच्या वर्गांतील जतूंत तर उत्पत्तीकरितां दुसऱ्या कोणाची गरजही लागत नाही. स्त्री-पुरुषांच्या आकर्षणामध्यें प्रजोत्पादन अथवा वंशवृद्धि हाच हेतु असतो असें नाही. कारण तसाच हेतु असता तर निसर्गाला मनुष्याच्या बाबतीतही तशी कांही वाट काढणें अशक्य नव्हतें. म्हणून केवळ प्रजोत्पादनापलीकडे कांही तरी त्यांत जास्त हेतु असावा असें वाटतें. याचाच अर्थ असा की, हा जो कांही जास्त हेतु असेल त्यांतील तत्व आणि लग्न म्हणविलें जाणाऱ्या स्त्री-पुरुषसंबंधांतील तत्व एक असलें पाहिजे. म्हणजे मनुष्याची लग्नसंस्था कांही तरी नियंत्रित असली पाहिजे.

तसें पाहिलें तर निसर्गामध्यें स्त्री-पुरुष हा भेद नसलेले एकपेशीमय जीव, स्त्री आणि पुरुष हे दोन्ही भाव एकाच शरीरांत असलेले द्विलिंगी जीव आणि स्त्री व पुरुष असे दोन स्पष्ट असलेले जीव असे अनेक प्रकार

आढळून येतात, आणि स्त्री-पुरुषांचा प्रेमसंबंध देखील आढळून येतो. उलट एक चमत्कार असा दिसून येतो कीं, जास्त क्रूर आणि तामसी जीव वर्गात स्त्री-पुरुषसंबंध जास्त उत्कट आढळून येतो. दुष्टयोनि समजल्या जाणाऱ्या सर्पयोनींत नर-मादीचें प्रेम मोठें उत्कट आढळून येतें व्याघ्र सिंहादि क्रूर श्वापदांच्यामध्यें नर-मादी हीं जोडपीं मोठीं एकनिष्ठ व एकमेकांमध्यें अतिशय गुंतलेलीं अशीं सांपडतात. गाई आणि बैल अथवा घोडे यांच्यांत तशी स्थिति आढळून येत नाही. मनुष्याचे पूर्वरूप जे ओरँग-ओटँग अथवा चिम्पँझी यांच्यांतही नर-मादीचे संबंध प्रेमापेक्षां आवश्यकतेचेच जास्त दिसून येतात. उधईमध्यें असा प्रकार असतो कीं, त्यांच्या मोठ्या समाजामध्यें मादी फक्त एक असते व आपण ज्यांना उधई म्हणतो ते सारे नर असून मादीकडे केवळ प्रजोत्पादनाचेंच काम असतें. तिचा नराशीं अखंड समागम चाललेलाच असतो व एकसारखी ती अंडीं टाकीतच असते. याच्या उलट मुंग्या, कोंबड्या वगैरे समाजांत उलट प्रकार असतो. नर एक असतो, मादी असंख्य असतात. वृक्षांत देखील नर-मादी हा प्रकार आहेच. संस्कृत कवींनीं आपल्या कल्पनेनें लता आणि वृक्ष यांची जोडी घालून दिली आहे आणि प्रत्यक्षांत त्यांच्यांतही स्त्री-पुरुष भेद आहेत व एकमेकांच्या केसरांचा संयोग न झाला तर झाडें फळत नाहींत असा अनुभव आहे. इतकेंच काय तर कांही वनस्पतींचा असाही अनुभव आहे कीं, त्या नुसत्या केवळ फळ अथवा फूल धरीत नाहींत तर त्या सुकून जातात व मरून जातात; मग एरव्हीं त्याना केवढीही अनुकूल परिस्थिति असो. पक्ष्यांमध्यें तर स्त्री-पुरुषांचें प्रजोत्पादनाव्यतिरिक्तहि फार उत्कट प्रेम आढळून येतें. पारव्यासारखे प्राणी तर शृंगारविलासामध्यें मनुष्यावरही ताण करणारे आहेत. हें जें आकर्षण निरनिराळ्या जातींत आढळून येतें तें केवळ प्रजोत्पादनाप्रीत्यर्थच असतें असें म्हणतां येणार नाही कारण व्याघ्र-सिंहासारख्या पशूंत अथवा नागसर्पासारख्या जातींत स्त्री-पुरुष-संभोगाचें प्रमाण अगदीं आश्चर्य वाटण्याइतकें कमी असतें. म्हणजे वर्षांतून क्वचित् एक दोन वेळां घडणाऱ्या प्रसंगासाठीं ते एकमेकांचे वेडे बनून राहतात हें म्हणणें शोभत नाहीं. एकमेकांच्या सहवासाची जी

गोडी असते तिच्याकरतांच ते एकमेकांचे वेडे बनून राहतात हें उघड आहे. ही सहवाससुखाची चटक अनेक प्राणिवर्गांत आणि एकलिंगी जीवांत देखील आढळून येते.

## सहजीवनाचा हेतु

या सर्व परिस्थितीचा विचार केला असतां असें म्हणावें लागतें कीं, कोणत्याही वर्गांतील स्त्री-पुरुष-जीव जे एकत्र राहूं लागतात ते केवळ प्रजोत्पादनार्थ नसून सहवाससुख व प्रजोत्पादन या दोन्ही गोष्टीकरतां राहतात. मनुष्य जातीच्या स्त्री-पुरुषांच्या सहजीवनांत जर एवढाच हेतु असेल तर त्या दृष्टीनें मनुष्य व पशु यांच्यात कांहींच भेद नाहीं असें म्हटलें पाहिजे. आणि आपल्या लग्नसंस्थेचें स्वरूप जर मनुष्य केवळ याच तऱ्हेचें करीत असेल तर तो या दृष्टीनें पशुस्थितीस जात आहे असेंच म्हटलें पाहिजे. आणि म्हणूनच आम्ही प्रारंभीं असें म्हटलें कीं लग्नसंस्थेची उत्पत्ति कशी व केव्हां झाली हें सांगणें कठीण आहे. कारण प्रजोत्पानास करतांच लग्नसंस्था असें म्हटलें म्हणजे ती संस्था जीव-जंतूंपासून पशु-पक्षी व मनुष्यापर्यंत सर्वांतच आहे, आणि नित्य आहे असें म्हणावें लागेल. परंतु लग्न याचा जर कांहीं विशेष अर्थ आहे असें म्हटलें तर ती संस्था केवळ माणसांतच आहे असें दाखवितां येईल व तिचा कांहीं इतिहायासही आहे असें सांगतां येईल. आम्हांला हिंदु-लग्नसंस्थेची उपपत्ति व आवश्यकता यांचा विचार करावयाचा आहे. म्हणून अर्थात् इतर लग्नपद्धतींपेक्षा हिंदु लग्नपद्धति कांहीं विशेष प्रकारची आहे, त्याला कांहीं विशेष अर्थ आहे, हें दाखवावयाचें आहे. त्याकरतां थोडा तरी तुलनात्मक विचार करण्याची आवश्यकता आहे. त्याची तयारी म्हणून आम्ही इतक्या खोलांत हात घातला आहे. स्त्री-पुरुषांनी एकत्र राहून आपलें जीवन कंठावें हा प्रघात देखील कसा उत्पन्न झाला याविषयी केवळ तर्कापलीकडे कांहीं सांगतां येणार नाहीं. कारण मनुष्याचा इतिहास म्हणून जेथून आढळतो, तेथपासून स्त्री-पुरुषांचें सहजीवन आढळून येतें. असा काळच नाही की, ज्या वेळेला स्त्री-पुरुषांचें सहजीवन मुळींच दिसत नाही. अगदी मनुष्यभक्षक रानटी अवस्थेंतही हें सहजीवन आढळतें.

रानटी माणसांत अथवा पशुपक्ष्यांत हें जें स्त्री-पुरुषांचें सहजीवन आढळतें यांत अर्थातच कांहीं भाग आत्मसंरक्षण-बुद्धीचाही आहेच. परंतु आत्मसंरक्षणाचाच केवळ भाग आहे असें मात्र म्हणतां येणार नाहीं. विशेषत: कळप करून राहणाऱ्या प्राण्यांत तर स्त्री-पुरुषांच्या बाबतींत असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. व्याघ्र, सिंह इत्यादि हिंस्र पशूंच्या माद्या देखील एकएकट्या आपलें रक्षण करण्यास समर्थ असतात. कळप करून राहणाऱ्या प्राण्यांत स्त्री थोडी दुर्बळ आहे असें म्हटलें तरी कळप करून राहणाऱ्या प्राण्यांना एकमेकांच्या साह्यानें एकमेकांचें रक्षण करून घेतां येतें. म्हणून असें म्हणावें लागतें कीं, आत्मसंरक्षण आणि प्रजोत्पादन या दोन नैसर्गिक प्रेरणांखेरींज सहवासचें सुख हाही भाग सहजीवनामध्यें असतो. अपत्यसंगोपनाची जबाबदारी ही पुढची पायरी आहे. निसर्गाला तिची आवश्यकताच आहे असें नाहीं. खालच्या जीवांतील असे कित्येक प्राणी आहेत कीं, ज्यांच्यांत केवळ रतिसुखाची प्रेरणा असते आणि त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणून अपत्यप्राप्ति असते. परंतु त्यांच्या मनांत अपत्यप्रेमाचा लवलेशही नसतो व अपत्यसंगोपनाची जबाबदारी निसर्गत्यांच्यावर टाकीतही नाहीं. मत्स्य आणि सर्प यांचीं उदाहरणें सर्वांच्या परिचयाचीं आहेत. रतिक्रियेचा परिणाम म्हणून उत्पन्न झालेलीं अंडीं निसर्गाच्या प्रेरणेनें कोठें तरी एकान्तांत विष्ठेप्रमाणें फेकून देऊन हे प्राणी मोकळे होतात, पुन: त्यांना त्यांची आठवणही होत नाहीं. 'मत्स्य आठवितां पाळी । कूर्म दृष्टीनें सांभाळी ।।' हा जर नुसताच कविसंकेत नसेल तर ती कांहीं तरी आधिभौतिकापलीकडील भानगड असली पाहिजे. ती खरी असली तरी तिच्यामुळे अपत्यसंगोपनाच्या जबाबदारीनेंच सहजीवन व्हावें असा संकेत असण्याचें कारण नाहीं असेंच दिसून येतें.

हीं जीं उगाच थोडीशीं उदाहरणें दिलीं त्यावरून देखील हें लक्षांत येईल कीं, स्त्री-पुरुषांच्या सहजीवनांत प्रजोत्पादन, अपत्यसंगोपन अथवा आत्मसंरक्षण यापलीकडे निसर्गाचा कांहीं तरी आणखी हेतु आहे. या सहजीवनापासून लग्नसंस्था म्हणून आपण जिला म्हणतों तेथपर्यंत मनुष्यप्राण्यांची खरोखर कांहीं उन्नति झाली असेल तर त्या संस्थेंत हा आणखी

कांहीं हेतुही तितकाच उन्नतपणें उमटून पडला पाहिजे. हा आणखी कांहीं हेतु काय आहे याचा यथाक्रमानें आपण विचार करूं. तूर्त येथें एवढेंच लक्षांत ठेवावें कीं, केवळ एकटेपणाचा भंग आणि सहचराची गरज हाही या सहजीवनाचा हेतु होऊं शकणार नाहीं. कारण तसें असतें तर या मनुष्येतर प्राण्यांत पुरुषा-पुरुषांचेंच अथवा केवळ स्त्रिया-स्त्रियांचेंच सहजीवन आढळलें असतें. पण तसेंही तें आढळत नाहीं. ग्राम्य पशूंत अशा तऱ्हेचा कांहीं स्नेह आढळतो. पण त्यांत देखील आत्मसंरक्षणबुद्धीचाच प्रभाव जास्त दिसतो कळप करून राहणाऱ्या प्राण्यांत माद्या पुष्कळ व नर एखाददुसराच असतो. म्हणून त्यांच्यांत एकलिंगी जीवांचें सहजीवन असतें असें म्हणतां येणार नाहीं. कारण त्या माद्या एकमेकांच्या सुखाकरतां एकमेकांच्या सहवासांत राहिलेल्या नसतात. त्या कळपांतील जो नर असतो त्याच्या मोहांत त्या गुंतून राहतात म्हणून आणि कांहींशी आत्मसंरक्षक–बुद्धि म्हणून एकत्र राहतात. सारांश. त्यांच्यांत देखील सहजीवन असावयास भिन्नलिंगाची गरज असते. यावरून असें म्हणतां येईल कीं, भिन्नलिंगत्वामुळें एकमेकांत जें कांहीं निराळें असतें तें मिळविण्याची निसर्गतःच गरज वाटल्यामुळें अशा सहजीवनाची बुद्धि उत्पन्न होते; आणि म्हणूनच अगदी हिंस्र पशूंतही एकप्रकारची कुटुंब-संस्था आढळते. Man-eaters of TSavo साहोचें नरभक्षक हें पुस्तक जरी कादंबरीवजा असलें तरी त्याचा हेतु हिंस्र पशूंची माहिती देण्याचाच आहे. त्याच्यावरून कोणासही दिसून येईल कीं, हिंस्त्रपशूंतही केव्हां केव्हां कुटुंबसंस्था आढळूं शकते. एका जोडप्यापासून झालेलीं पिलें मोठीं झाल्यावर त्यांचीं स्वतंत्र जोडपीं बनलीं तरी तीं सारींच जोडपीं एका कुटुंबासारखी एका ठिकाणीं राहत असल्याचें एक उदाहरण त्यांत दिलेलें आहे. सारांश, पशुपक्ष्यांत देखील प्रजोत्पादन आणि आत्मसंरक्षण यापलीकडे कांहीं इतर सुखाची गरज असते आणि तें इतर सुख भिन्नलिंगी प्राणी एकमेकांपासून मिळवितात.

## स्त्रीपुरुषभेद

परंतु असें असेल तर भिन्नलिंगी प्राणी नुसत्या लिंगभेदापलीकडे इतरही अनेक रीतीनीं एकमेकांहून विलक्षण असले पाहिजेत. तसे ते अस-

तील तरच एकमेकाला एकमेकांच्या सहवासाची केवळ संवयीपलीकडे जास्त गोडी लागेल आणि गरज भासेल. आणि हल्लींचें विचारयुग तर असें म्हणतें कीं, प्रजोत्पादनास अवश्य असणाऱ्या यंत्रापलीकडे स्त्री-पुरुषांत तसा भेद कांहींच नाहीं. स्त्री-पुरुषांच्या समान हक्कांचें जें बंड आजकाल माजलें आहे त्याला आधार या विचाराचाच आहे. 'जो भेद विधीनें स्त्री-पुरुषीं केला । देहींच मात्र तो संततिकार्याला' हें आधुनिक नाटककार, देवल, यांचें वचन वरील कल्पनेचेंच द्योतक आहे. याचा सरळ अर्थ असाच होतो कीं, संतति उत्पन्न करण्याकरतां लागणारी क्रिया सोडली तर एरव्हीं सर्व गोष्टींत स्त्री-पुरुषांच्या आचार-विचारांत संपूर्ण अद्वैत असलें पाहिजे. हें मत हिंदुशास्त्राशीं दोन ध्रुवांसारखें विरोध करणारें आहे. हिंदुधर्महीं संपूर्ण अद्वैतवादीच आहे. परंतु त्याचा अनुभव असा आहे कीं, 'भावाद्वैतं प्रकुर्वीत क्रियाद्वैतं न कारयेत्.' जीवदृष्टया आणि अंतःकरणदृष्टया सर्वांचें ऐक्य त्याला मान्य आहे. लहान मोठा, वडील-धाकटा हा भेद सोडला तर वस्तुदृष्टया जीव तितके सारे येथून तेथून सारखेच. हिंदूच्या पंचीकरणांत सांगितल्याप्रमाणें शोक-मोहादि केवळ अंतःकरणाचे धर्म, सुखप्राप्तीची तृष्णा आणि दुःखनिवृत्तीची गरज हीं सर्वांना सारखीच. म्हणून देहदृष्टया ते एक आहेत असें मात्र नाहीं. उलट ते पूर्णपणें भिन्न असतात अशीच कल्पना आहे. म्हणूनच 'आत्मबुद्धया त्वमेवाहं' असें श्रीरामाला म्हणणारा हनुमान 'देहबुद्धया तु दासोऽहं' असें अगदीं सत्यत्वानें म्हणतो. अगदी कालपर्यंतचे विद्वान प्रतिपादित आले त्याप्रमाणें प्रजोत्पादनापलीकडे स्त्री-पुरुष शरीरांत पूर्ण साम्य तर नाहींच, उलट त्यांच्या शरीराचे घटक-परमाणूच निरनिराळ्या तऱ्हेचे आहेत असें सारीं अर्वाचीन शास्त्रें दाखवीत आहेत. एका अगदीं लहान उदाहरणावरून देखील हें लक्षांत येईल. कुत्रा, मांजर व त्यांच्या वर्गांतले इतर हिंस्त्र पशु यांचा एक असा धर्म आहे कीं, ते आपल्या संततींपैकीं पुरुष संततीचा नाश करतात. याच्या मुळाशीं, जिवंत राहिल्यास, आपल्यास स्त्री-सुखाचा वांटा मागणारा, हा आपला प्रतिपक्षी आहे व म्हणून त्याला नष्ट केलें पाहिजे अशी बुद्धि असते असें म्हणतात. पण तें योग्य वाटत नाहीं. कारण जन्मल्याबरोबर त्या पिलांच्या ठिकाणीं-

लिंगचिन्हें तेवढीं वेगळीं असतात, लैंगिक मनोवृत्ति कोणत्याच प्रकारची नसते. तिची वाढ होऊन तो प्रतिपक्षी म्हणून तयार व्हावयास बराच काळ जावा लागतो. इतक्या काळाचें धोरण आधींच ठेऊन, मनुष्याला देखील साधणें कठीण अशा अंकुरोत्पादन न्यायानें (to nip in the bud) पुढची तरतूद म्हणून ते बच्चे मारले जातात, हें म्हणणें संभवत नाही. कारण अशा प्रकारचें दूर धोरण बांधून त्याची अगोदरच तजवीज करून ठेवावयाची बुद्धि इतर कोणत्याहीं बाबतीत हे प्राणी दाखवीत नाहींत. त्यावरून असें दिसतें कीं, हीं पिलें मारलीं जातात अथवा आयांना तीं नराशी झगडून मोठ्या युक्तीनें व शिकस्तीनें वाढवावी लागतात याचें कारण कांही दुसरें असावें. स्त्री-दक्षिण्य हा या पशुपक्षी इत्यादि कोटींचा एक मोठा विशेष आहे. पुरुषाशी झगडून, पुरुषाचा नाश करण्याची जी त्यांची प्रवृत्ति असते तिच्या योगानें स्त्री-पुरुषांचे निरनिराळे वास पशूच्या डोक्यांत बसलेलें असतात. तसा वास आला की, त्याचा संहार करावयाचा एवढ्याच गोष्टीचा त्याला अभ्यास झालेला असतो. जन्मलेल्या पिलाचाही तसा वास आल्याबरोबर त्याच्यावर तुटून पडून त्याचा घात करणें हा त्याचा स्वभाव बनून गेला असतो; मग त्याचें कारण कांहींही असो. आणि असें व्हावयाचें म्हणजे स्त्री व पुरुषांचे वासच वेगवेगळे पाहिजेत. तसे ते वेगवेगळे असण्यास त्यांच्या घटक द्रव्यांतच फरक असला पाहिजे. म्हणजे मुळांतच संपूर्ण फरक आला. अर्वाचीन परिणत शास्त्रेंही तसा तो आहे म्हणून सांगतात. पुरुषाला नुसता गर्भाशय संकोच आणि लिंग-वृद्धि अथवा स्त्रीच्या ठिकाणीं लिंगसंकोच व योनिसह गर्भाशय-वृद्धि एवढाच दोघांत फरक नसून दोघांच्या ज्ञानतंतूमध्येंही फरक आहे. इतकेच नव्हे तर सर्व शरीराचें मूळतत्त्व जें hormones त्यांच्यांतच मुळी फरक आहे या फरकाचें महत्त्व फार आहे व त्यानें एकमेकांची मनोरचना, गुणधर्म, बलाबल, उत्साहशक्ति, ज्ञानशक्ति यांतही विलक्षण फरक पडतो. म्हणून स्त्री आणि पुरुष यांचीं शरीरें व त्यांचे धर्म सामान्यत: सारखे दिसत असले तरी त्यांत फार महत्वाचे आमूलाग्र भेद आहेत व त्यांच्यामुळें उत्पन्न होणाऱ्या विशेषांचा, एकमेकांनीं एकमेकांस पुरवठा करून व्यक्ति-

जीवनाची पूर्णता करावी असा या सहजीवनांत निसर्गाचा हेतु दिसतो. आमच्या पुराणांत हीच कल्पना मोठ्या काव्यमय रीतीनें मांडली आहे. समाधि-स्थितींत ब्रम्हदेवाचें शरीर दुभंगून जाऊन समभाग विभागलें गेलें. त्यांतील एकाची परंपरा म्हणजे पुरुषसृष्टि आणि दुसऱ्याची स्त्रीलिंगी-सृष्टि. मूळचे हे दोन घटक एकरूप असून विभागले गेल्यामुळे पुनः ते एक होण्यांत त्यांची पूर्णता आहे. हल्लीं ते एकत्र होऊन अपत्योत्पादन करतात. त्यांत हा हेतु साध्य होत नाहीं. कारण नव्या उत्पन्न होणाऱ्या जीवांत देखील पुरुष hormone (हार्मोन नांवाचा एक द्रव) आणि स्त्री hormone असा भेद मूळ घटकांत कायम राहूनच त्याची वाढ होत असते. यथार्थ रीतीनें हें एकीकरण घडवून आणणें हा पुराणांप्रमाणें आमच्या शास्त्रांचा लग्नसंस्थेंतील हेतु आहे. तो शास्त्रांनीं कितपत साधला आहे तें पुढें पाहूं.

## माणसापेक्षां पशू श्रेष्ठ !

प्रजोत्पादन व सहवास एवढ्याच अर्थानें पाहिले तर लग्नसंस्था ही मनुष्येतर सृष्टींतही आढळून येते. मनुष्येतर जीवांत या दोन गोष्टी केवळ निसर्गाच्या प्रेरणेनें घडून येतात. पण निसर्ग म्हटला कीं, तेथें व्यवस्था आणि नियम हे आलेच. आणि म्हणून मनुष्यास जें सहज वाटतें कीं, इतर प्राण्यांत नुसता संभोग होतो, कसलें आलें ताळतंत्र, व त्यावरून वाटेल तसें अनियमितपणें वर्तन करणाऱ्या माणसाला 'पशु' अशी तो संज्ञा देतो तें त्याचें वाटणें व करणें सर्वस्वीं चूक आहे. मनुष्येतर प्राण्याची ही लग्नसंस्था निसर्गानें अशा कांही सुंदर नियमांवर बसविली आहे कीं, तिच्याकडे पाहून मनुष्यासही लाज वाटावी. नियम म्हटला म्हणजे त्याला अपवाद असलाच पाहिजे असा जणुं कांहीं सृष्टीचा धाराच आहे. तसे या नियमांनाही क्वचित् कांहीं अपवाद नसतील असें नाही. हे अपवाद जमेस धरूनच सामान्यपणें नियमांचा अनुभव घ्यावयाचा असतो. मनुष्येतर सृष्टींत स्त्री-पुरुषांत पहिला कडक नियम हा आढळतो की, त्या सृष्टीत संभोगाच्या बाबतींत स्त्रीवर कधी बलात्कार होत नाही. बलात्कार ही बुद्धिमान् मनुष्यानें आपल्या परिणत बुद्धीनें स्वतःच्या पशुभागाची हवीतशी वाढ करून केलेली पशुसृष्टीवरील मात आहे ! म्हणून तेवढ्यापरतें तरी मनुष्याला

अनुक्रम... दि: ...
क्रमांक... नों: दि: ...

पशु न म्हणतां, 'परि मज वाटे की तो पशुपेक्षां नीच फार समजावा.' कित्येक पशुपक्ष्यांत रतिप्रसंगापूर्वी मोठें खडाजंगी युद्ध होतें. परंतु तो बलात्कार नव्हे. स्त्रीच्या विद्रावणास आवश्यक असलेला तो एक प्रयोग आहे. वात्स्यायनानेंही कर्तरी, कीला इत्यादि अशाच प्रकारचे प्रयोग सांगितले असून, वर पुन: ते कुशलतेनें करावेत, नाहीतर स्त्रीच्या जीवास अपाय होतो अशीही सूचना देऊन ठेवली आहे. * पण स्त्रीच्या संमतीनंतरचेच ते प्रयोग आहेत. स्त्रीची संमति नसतां तिच्या दुर्बळपणाचा फायदा घेऊन तिच्यावर बलात्कार होणें हें फक्त माणसांतच आढळतें.

पशुसृष्टींतील दुसरा विशेष म्हणजे स्त्रीच्या ठिकाणी संभोगप्रवृत्ति नसतां संभोग हा अशक्यच असतो. येथें प्रवृत्ति म्हणजे शरीरधर्मानें उत्पन्न होणारी प्रवृत्ति. या प्रवृत्तीशिवाय तिला स्वत:च्या भावनेनें अशी संभोगप्रवृत्ति उत्पन्नच होत नाही. मनुष्याची गोष्ट तशी नाही. मासिकस्त्रावाचा काल संपूर्ण गेल्यावरही म्हणजे वास्तविक शरीराची तयारी नसतांही केव्हांही स्त्री संभोग-वृत्तीवर (heat) येऊं शकते. या फरकांचें महत्त्व मनुष्य व पशु यांच्या जीवन-क्रमांत अतिशय मोठें आहे व त्यानें विशेषत: मनुष्याच्या आयुष्यावर फार परिणाम केला आहे पशुसृष्टींत दुसराही एक नियम अगदी सहज रीतीनें अस्तित्वांत आला आहे. मागें सांगितलेल्या वाळवीसारखे कीटयोनींतील अपवाद सोडले तर पशुपक्ष्यांमध्यें बहुपत्नीकत्व (polygamy) आढळतें परंतु बहुपतित्व (polyandry) सहसा आढळत नाही. कुत्र्याचें उदाहरण याला उपवाद म्हणून दाखवितां येईल. परंतु कुत्रीचा काम-जागृतीचा प्रकारच कांही वेगळा आहे. ठराविक काळानें ती उत्पन्न होते व एकदां उत्पन्न झाली म्हणजे सारख्या तीव्रतेनें ती कित्येक दिवस राहते. अशा स्थितीत तिच्याशीं लगट करणाऱ्या कुत्र्यास विरोध करण्याचें तिला सामर्थ्यच राहत नाही. परंतु कुत्र्यांत देखील नित्य सहवासाचा कुत्राच पसंत करण्याची व त्याखेरीज इतरांना समागम न करूं देण्याची प्रवृत्ति आढळते. म्हणून पशूंत सहजीवन एका नराशीं आणि समागम दुसऱ्याशीं असा व्यभिचार नाही, असें म्हणावें लागतें. 'एकावरि मन ठेवुनि नेत्रें खूण करिती दुसऱ्याला । आणि संगमसुख भलत्याला' ही

* टीप:-कर्तर्या कुंतल: शातवाहन: मलयवतीमाजघान ।

देखील मनुष्यजातीनें पशूंवर केलेली एक मातच आहे ! पुष्कळांच्या मतें, पृथ्वीच्या पाठीवर हल्लीचें लग्नसंस्थेचें जें स्वरूप कोठेंही आहे, त्याच्या जुलुमामुळें मानवी स्त्रीला पशूवरही मात करण्याचा प्रसंग येतो. तेवढ्या-करतां ती संस्था नष्ट करणें हाच एक उपाय आहे असें त्यांना वाटतें. परंतु ती संस्था नष्ट केल्याने अशी मात करण्याची गरज जरी मानवी स्त्रीला वाटली नाहीं तरी ती पशूच्या कोटींतच तर बसणार नाहीं, अशी नुसती शंकाही त्यांच्या मनाला शिवत नाहीं. कांहीं बाबतींत पशूंचें अनुकरण केल्यास मानवी समाजांतील कित्येक आपत्ति टळतील ही गोष्ट खरी आहे. परंतु मनुष्यास त्या आपत्ति पशु होऊन टाळावयाच्या नाहींत, आपल्या मनुष्यत्वाची वाढ करून नाहींशा करावयाच्या आहेत, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नाहीं. उदा. युरोपांत अलीकडे नवीन निघालेल्या नग्नसांप्रदायाचा प्रसार होऊन, वस्त्र म्हणून असलेल्या हरएक गोष्टींची जगांतून हकालपट्टी केली तर व्यभिचार ही वस्तूच जगांतून जवळ जवळ नाहींशी होईल हें संभवनीय आहे. पण त्याबरोबरच मनुष्याच्या जीवनांतील बहुतेक सगळें काव्यही नष्ट होईल हेंहीं तितकेंच खरें आहे. म्हणून वस्त्रावृत राहून नग्नस्थितींतील लाभही पदरांत पाडून घेणें यांत माणसाचें मनुष्यपण आहे व यालाच मनुष्याची उन्नति म्हणावयाचें. तसें न करतां केवळ व्यभिचार हा दोष निघून जावा म्हणून तो वस्त्रें टाकून देऊं म्हणेल तर त्यांत कांहीं पुरुषार्थ नाही. त्यानें त्याच्या संस्कृतीलाही धक्का बसण्याचा संभव आहे. कारण मनुष्यानें आजपर्यंत ही जी संस्कृति वाढविली आहे हिचें मूळ श्रेय त्याच्या जीवनांतील काव्याला म्हणजे अर्थात् तें काव्य जीवनांत ओतणाऱ्या स्त्रीला आहे. कसें तें आपण पुढील परिच्छेदांत पाहूं. येथें या परिच्छेदांचें तात्पर्य म्हणून एवढेंच लक्षांत ठेवावें कीं, स्त्रीची निसर्गतःच प्रवृत्ति एकनिष्ठेकडे आहे व तो 'एक' जर त्यांना पूर्ण तृप्ति देत असेल तर त्या 'एका' च्या नैसर्गिक शिकारीवृत्तीकडे दुर्लक्ष करण्याची, इतकेंच नव्हे तर आपल्या शिकारीनें त्यानें गोळा केलेल्या इतर सावजांशींही प्रेमानें वागण्याची तिची तयारी असते. स्त्रीला लोण्याचीही सवत खपत नाही असें म्हणतात त्याच्याशीं ही कल्पना विसंगत आहे असें वाटेल. त्याबद्दलचा

सविस्तर विचार पुढें करूं. येथें एवढेंच सांगावयाचें आहे की, या बाबतींत पुरुष हा जास्त मत्सरी आहे. महत्त्वाची गोष्ट एवढीच आहे की, मनुष्येतर सृष्टींत आपल्यांत आहे त्याप्रकारची पतिपत्नी ही कल्पना नसूनही पुरुषांत मत्सर जास्त आणि मनुष्यात पतिपत्नी या कल्पनेनें जास्त. जेथें अशी कल्पना नाही म्हणजे स्त्रीत्वाविषयी ज्या कांही आपण उदात्त भावना धरतों त्या नसून स्त्री ही इतर गुराढोरांप्रमाणें उपयोगाचें एक सजीव यंत्र समजलें जातें अशा कांही समाजांत असा मत्सर दिसून येत नाही व लग्नसंस्था असूनही स्त्री ही एकाच काळीं अनेक पुरुषाची पत्नि असूं शकते. आजही, टिहिरी संस्थानांत द्रौपदीप्रमाणें स्त्री ही एकाच काळीं अनेक पुरुषाची पत्नि असूं शकते. परंतु काव्य आणि उच्च संस्कृति यांचें त्या समाजांत अळक्षव-अळक्षवच आहे, हेंही तितकेंच खरें आहे. द्रौपदी स्वत: उच्च सस्कृतीची होती हें खरें आहे. पण तो एक नमुनेदार अपवादच होय.

## कुटुंबसंस्थेचा जन्म

मनुष्याच्या हल्लींच्या सर्व संस्कृतीबद्दलचें मूळ श्रेय स्त्रीस दिलें पाहिजे याचें कारण असें आहे कीं, या सर्व संस्कृतीचा विकास कुटुंबसंस्थेंतून झाला आहे. आणि कुटुंब निर्माण करण्याचें सारें श्रेय स्त्रीला आहे. उत्क्रांतिवाद गृहीत धरल्यास मनुष्य जेव्हां आपल्या मनुष्यपणानें पशूहून पूर्णपणें वेगळा उमटून पडला तेव्हां त्यानें पशूच्या पुढें पहिलें पाऊल हें टाकलें की, त्याला मातृगमन करवेना. पशुपक्षांच्या सृष्टींत अशा तऱ्हेचा कांहीच प्रकार आढळत नाही. इतकेंच नाही तर मनुष्याच्या अगदी निकट पूर्वजांत तर हुप्प्या म्हातारा झाला म्हणजे आया आपलीं पिलें एकमेकांचें साह्य घेऊन मोठ्या कष्टानें त्याच्या तडाक्यांतून वांचवितात व पुढें त्यांच्याशीं रममाण होतात. निदान जन्म देणाऱ्या स्त्रीला तरी निरंतर आपल्या संभोगापलीकडची समजून मनुष्यानें हा जो मातृभाव उत्पन्न केला, त्याची फेड या मातृदेवानें त्याला कुटुंबसंस्थेची देणगी देऊन केली. जन्मदात्री ही संभोगापलीकडची ठरल्यामुळें तिच्या

मनांत अपत्यप्रेमाची स्थिरता झाली. **अपत्यप्रेमाची स्थिरता हाच कुटुंबसंस्थेचा जन्म होय.** या अपत्यप्रेमाच्या स्थिरतेमुळें थोडीशी तरी कामवासनेपलीकडे जाऊन स्त्री पुरुषाकडे कामगंधहीन अशा उत्कट प्रेमानें पाहूं लागली. त्याचा परिणाम असा झाला की, स्त्रीस पुढें एका बाजूनें कोणाची तरी प्रेमधारा नित्य स्वत:वरून वाहण्याची आणि आपली प्रेमधारा कोणावर तरी निरंतर वाहत ठेवण्याची गरज भासूं लागली. त्यामुळें आपल्या अपत्याचा लळा तुटणार नाही व एकमेकांशीही त्यांचा लळा राहील अशा विलक्षण गोडीनें ती त्याच्यांशी निरंतर राहूं लागली. तिच्या भोंवतालच्या अशा जीवांची स्वार्थवृत्ति तिनें कमी केली व स्वत:च्या शरीरापलीकडे कांही भावनामय अस्तित्व तिनें माणसाला आणून दिलें. या कुटुंबसंस्थेची आज गरज राहिली नाही असें अलीकडे मत निघालें आहे. परंतु त्याचें परीक्षण येथें स्वतंत्रपणें करण्याचें कांही कारण नाही. एक तर हें मत स्वीकारून लग्न व कुटुंब या संस्थांचाच समूळ नाश करणाऱ्या रशियानेंच आतां पुन: पलट खाल्ली आहे. लग्न व कुटुंब या संस्थांच्या स्थिरतेकडे रशिया अलीकडे जें लक्ष पुरवूं लागला आहे त्यानेंच या मताचा सदोषपणा सिद्ध करून दिला आहे. तेव्हां त्याविषयी जास्त चर्चा करण्याचें कारणच नाही. आणि दुसरें असें की, हें मत खरें आहें असें घटकाभर गृहीत धरलें तरी त्याचा काळ अजून आलेला नाही. या मतांत अगदीच तथ्य नाही असें नाही. लग्न व कुटुंब ही संस्था पूर्वीं नव्हती असें आमची पुराणेंही म्हणतात. ज्या संस्था मध्येंच उत्पन्न झाल्या आहेत त्या शेवटपर्यंत टिकण्याचें तरी काय कारण ? एका तऱ्हेनें हें म्हणणें सरळ आहे. पण यांत आमची पुराण-कल्पना पूर्णपणें विचारांत घेतलेली नाही. प्रकाशाच्या अत्यंत विरळ लहरींनीही आंधळेपणा येतो व प्रकाशलहरीच्या सघन अतिरेकानेंही आंधळेपणा येतो. तरी पण या दोन अवस्थेंत फरक आहे. आणि आंधळेपणाच यावयाचा असला तर सघनतेच्या दर्शनानेंच यावा असेंच कोणीही म्हणेल. पुराणांची कल्पना साकल्यानें लक्षांत घेतली पाहिजे. आपल्याला अनुकूल वाटणारें तेवढेंच मध्यें उचलून घेणें हें कांही शास्त्र नव्हे. या दोन्ही संस्था नसण्याचा काळ पुराणांनी सत्ययुग सांगितलेला आहे. सत्ययुगांत मनुष्यसमाजाची जी

उच्चावस्था असते म्हणून पुराणें म्हणतात ती अवस्था समाजाची असल्या-वर या संस्थांची आवश्यकताच राहत नाही. '—न राज्यं नैव राजासीत् न दण्डो नच दाण्डिक: । धर्मेणैव प्रजा: सर्वा रक्षन्ति स्म परस्परम् ।—' अशी स्थिति असल्यावर मग आणखी काय पाहिजे ? पण दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं, तशी स्थिति अजून आली नाही. रशिया जो फसला तो इथेंच. त्यालाही लग्नसंस्था व राज्यसंस्था या दोन्हीही नकोत. पण कितीही कम्युनिस्ट असला तरी राज्यसंस्था त्याला टाकतां आली नाही. राज्यसंस्था नष्ट होण्याचा काळ अजून फार दूर आहे हें त्यानें ओळखलें. त्याप्रमाणेंच लग्नसंस्था व कुटुंबसंस्था नष्ट होण्याचा काळ अजून आला नाही हें त्याला समजलें नाही. म्हणून नाक मुठींत धरून आपली चूक त्याला आतां सुधारावी लागत आहे. उद्यां त्याला अशाच आणखी कित्येक चुका दुरुस्त कराव्या लागणार नाहीत असें तरी कोणी म्हणावें ?

# प्रकरण २ रें

# लग्नसंस्थेंचें स्वरूपच नियंत्रणरूप आहे.

पहिल्या प्रकरणांतील विवेचनावरून एक गोष्ट लक्षांत येईल कीं, मनुष्याच्या लग्नसंस्थेचा उगमच मुळीं नियमनांतून झाला आहे. नियंत्रण हें लग्नसंस्थेंचें स्वरूप आहे. परंतु तिचे उद्देश मात्र असे एकविध नाहीत. प्रजोत्पादन, सुप्रजासंरक्षण, सहवाससुख इत्यादि अनेक पैलू तिला आहेत. निसर्गतः तिचा हेतु प्रजोत्पादनापलीकडे अथवा संततिरक्षणापलीकडे कांही जास्त आहे हें आपण पाहिलेंच. आमच्या शास्त्राप्रमाणें जरी पाहिलें तरी असेंच दिसून येतें कीं, प्रजोत्पादन व संततिरक्षण या जीवाच्या एका मधल्या अवथेंतील म्हणजे मनुष्यावस्थेंतील भानगडी आहेत. वैदिकशास्त्राप्रमाणें मानव-कोटीच्या वरील ज्या दिव्य कोटी आहेत त्यांत या भानगडी नाहीत आणि प्राणिशास्त्राप्रमाणें मानवकोटीच्या खालील कित्येक हीन कोटींत त्या नाहीत. परंतु लग्नस्वरूप कोणतातरी स्त्री-पुरुषसंबंध दिव्य कोटींतही असल्याचें शास्त्रांत आढळून येतें. ही शास्त्रें खरीं असोत किंवा खोटीं असोत, खरीं असली तरी, श्री. ना. गो. चाफेकर या विद्वान गृहस्थाने म्हटल्याप्रमाणें 'हिंदूंचे सद्यःकालीन सर्वच आचार. . . . .समर्थनीय होतील की नाहीं' हा प्रश्नच आहे. समर्थनीय असूनही सद्यःपरिस्थितींत ते शक्य कोटींत आहेत किंवा नाहीत हाही एक प्रश्न आहे आणि ते जर अजिबात खोटे असतील तर त्यांना फांटा देणेंच योग्य आहे हें म्हणणेंही हिशोबी आहे. परंतु हे प्रश्न पुढचे आहेत. हिंदूंच्या लग्नसंस्थेचें स्वरूप अनादि-कालापासून आजतागायत जें दिसतें आहे तें यथार्थपणें समजून घेण्यास

तिच्या मुळाशीं असलेल्या अनेक भावना जशाच्या तशाच लक्षांत घेऊनच विचार केला पाहिजे. तसा विचार करीत असतांना वरच्यापैकी कित्येक शंकांची कदाचित आपोआपच निवृत्ति होऊन जाईल. म्हणून त्या भावना प्रथम विचारांत घेतल्या पाहिजेत.

## वैदिक धारणा

त्या दृष्टीनें पाहिलें तर स्त्री आणि पुरुष यांच्या संबंधास अपत्योत्पादन आणि त्याचें संवर्धन हाच केवळ हेतु आहे असें मुळीच दिसत नाही. कारण स्त्री-पुरुषसंबंधाखेरीज देखील अपत्योत्पादन होऊं शकतें व त्याचें स्वतंत्रपणें सवर्धनही होऊं शकतें असें मानण्यापर्यंत त्या शास्त्राची कल्पना गेली आहे. बृहदारण्यकांत या संबंधाचा थोडा विचार आहे. तेथें सहाव्या अध्यायाच्या तिसऱ्या ब्राह्मणांत, अशी संतति उत्पन्न करतां येते असें म्हटलें आहे. आमंत्रित जलानें सिंचन केलें असतां मनुष्यालाच तर काय पण काष्ठालाही अंकुर फुटतील असें म्हटलें आहे (य एनं शुष्के स्थाणौ निषिचेत जायेरञ्छाखाः प्ररोहेयुः पलाशानीति ।) (जर हे मंत्र म्हणून वाळलेल्या लाकडावर पाणी टाकले तर त्याला देखील अंकुर फुटतील). मंत्र संस्कारानें स्वयंभू गर्भ उत्पन्न करतां येतो इतकी कल्पना कदाचित अजून ग्रहण करवणार नाहीं. परंतु स्त्री-पुरुषांच्या मैथुनावांचून गर्भसंभव होतो हें तर अर्वाचीन शास्त्रज्ञांनीं व्यवहार्य करून दाखविलें आहे. आमचीं शास्त्रें तर एक पाऊल पलीकडे जाऊन असें म्हणतात कीं, ही गोष्ट मनुष्य कोटीची आहे. दिव्य कोटींत तर स्त्रीला हे गर्भधारणेचे व प्रसूतीचे क्लेश सोसण्याचें ही कारण नसतें. अत्युत्कट अशा परस्पर प्रेमातिशयानें स्त्री-पुरुषांचा जो मानसिक संयोग होतो तो तेजोरूप असतो, त्यांतूनच अपत्यरूप ठिणगी बाहेर पडते. कवि व कादंबरीकार स्त्री-पुरुषांच्या प्रेमाला ज्योतीची संज्ञा देतात व त्यांच्या प्रेमावस्थेस तेजांचें एकीकरण असें म्हणतात, ते नुसते शब्द नसून मूर्तिमंत सत्य आहे, अशीं आमचीं शास्त्रें म्हणतात. बाणाच्या कादंबरीच्या आधारानें रचलेल्या 'शापसंभ्रमां'त देवलांनीं 'पुंडरीक-कमलावरती कमलाश्री बसली होती । अवलोकनमात्रें तिची संगेच्छा झाली

पुरती' असें म्हटलें आहे, त्याचा अर्थ हाच आहे. मूलतत्त्व दुभंगून स्त्री आणि पुरुष असे जे दोन पर्याय होतात त्यांच्या भिन्नपणाची सीमा येथपर्यंत संपली. याच्यापुढें शास्त्रांनीं एकच पायरी सांगितली आहे आणि ती म्हणजे पुन: दोघे एक होऊन एकच स्वरूपानें राहणें. महाविष्णु, महाशिव, महागणपति म्हणून जी कोटी शास्त्रांनीं सांगतिली आहे ती ही. या अवस्थेत महालक्ष्मी आहे व महाविष्णु आहे, महेश्वर आहे व महेश्वरी आहे, परंतु वेगळे नाहींत. एकाच दिव्याच्या दोन अंगांप्रमाणें एकाच ज्योतीची ती पाहणाऱ्याच्या दृष्टीमुळें झालेलीं दोन अंगें आहेत. जो महाविष्णु तीच महालक्ष्मी व जी माहेश्वरी तोच महेश्वर. वैदिक संस्कृतीनें स्त्री-पुरुष-संबंधाचें हें अत्युच्च ध्येय पुढें ठेविलें आहे. दोघे मिळून एक शरीर होईल. 'They shall be one flesh असें ती म्हणत नाहीं. दोन्ही मिळून एक जीव होईल. 'They shell be one soul' असें तिचें सांगणें आहे. या ध्येयाच्या मानानें अपत्योत्पादन, संततिरक्षण इत्यादि ध्येयें हिमालयाच्या मेखलेपर्यंत संचार करणाऱ्या ढगांप्रमाणें खालींच राहतात. हें ध्येय अनेक जन्मांतून सिद्ध व्हावयाचें आहे. हिंदूंच्या लग्नसंस्येचें स्वरूप आज कांहींही दिसो, तिच्या मुळाशीं या भावना आहेत, हें लक्षांत ठेवूनच तिच्या सर्व अंगांचा विचार केला पाहिजे.

## लग्नबंधनाचें सामान्य तत्व

हिंदूंच्या लग्नसंस्थेचा प्रश्न बाजूस ठेवला आणि जगांत विद्यमान असलेल्या अथवा इतिहासावरून समजून येणाऱ्या इतर मानव समाजांचा विचार केला तरी देखील मनुष्याची लग्नसंस्था नियंत्रणरूप आहे असेंच आढळून येईल. आजच्या रशियानें लग्नसंस्थाच नाहींशी केली आहे म्हणून त्याचा विचार सोडून देऊं. तरी देखील तेथें स्त्री-पुरुषांच्या वैषयिक संबंधालाही कांही सहज निर्बंध आहेत. मग ते आरोग्यशास्त्र किंवा वंशशास्त्र अशा कोणत्याही दुसऱ्या शास्त्राच्या निमित्तानें असोत. उदाहरणार्थ, सख्ख्या बहिणभावंडांचे विवाह रशियांत प्रशस्त मानले जातात अथवा तसे ते झाले असल्याचें कोठे वाचनांत नाहीं. मग त्याच्या वरच्या म्हणजे मातृसंबंधाच्या उदाहरणांचा विचारच करावयास नको.

पुरुष–समागमाच्या बाबतींत रशियांतील स्त्रियांस कोणत्याही समाजांतील स्त्रियांपेक्षां जास्त स्वातंत्र्य आहे, हें खरें आहे. पण त्या देशांतील लग्न शब्दाचा अर्थ अपत्यपोषणाची जबाबदारी, वारसासंबंधाचे कांहीं प्रश्न यापलीकडे दुसरा कोणताच नाहीं. समाज करून राहणाऱ्या स्त्री-पुरुषांत हल्लींच्या अर्थमय जीवनाच्या काळीं अशी कांहीं व्यवस्था असणें अवश्यच आहे. तिला 'लग्न' हें जुने नांव राहूं देण्याची रशियानें मेहरबानी दाखविली आहे, इतकेंच ! 'लग्न' आहे; पण लग्न म्हणून कोणची संस्था रशियांत मुळींच नाहीं. त्या व्यतिरिक्त इतर सर्व देशांत लग्नसंस्था आहेत व त्या कांहीं ना कांहीं तरी नियमबद्ध आहेत. आफ्रिकेंतील निग्रो लोकांत जेथें कंत्राटी लग्नें होतात, रस्त्यानें जातां जातां सहज लग्नें जमतात व सहज मोडतात तेथें देखील, क्षणभंगुर कां होईना, कांहीं बंधन आहेच. म्हणजे लग्न आहे तोंपर्यंत तरी त्या स्त्रीवर पुरुषाची सत्ता असते. प्राचीन काळापासूनच्या उपलब्ध असलेल्या सर्व लग्नसंस्थांचा इतिहास ही एक सामान्य गोष्ट दाखवितो, कीं, लग्नाच्या योगानें स्त्रीवर पुरुषाचें कोणत्यातरी प्रकारचें स्वामित्व उत्पन्न होतें. हिंदु लग्नसंस्थेंत तर हें स्वामित्व विशेष प्रकारचें म्हणजे कशानेंही भंग न पावणारें आहे. हा नियम अर्थातच त्रैवर्णिक हिंदूंस धरून आहे. हिंदूंच्या लग्नसंस्थेविषयीं इतर लोकांना जें कधींही समजणें शक्य नाहीं व आमच्याही आर्वाचीनांस समजणें अत्यंत कठीण असण्याचें कारण हें कीं, नुकतेंच दाखविल्याप्रमाणें, हिंदु लोकांपुढे वैदिक संस्कृतीनें ठेवलेले स्त्री-पुरुषसंबंधाचें विशेष ध्येय हें होय. त्यामुळेंच या स्वामित्वाशीं संबंध नसलेल्या नियंत्रणाच्या ज्या इतर बाबी त्यांतही आमचे असेच विशेष फरक पडतात.

## लग्नाचे कांहीं प्रकार

इतिहासावरून असेंही दिसून येतें कीं, हिंदूंच्या लग्नसंस्थेचें आज जें स्वरूप दिसतें ती त्या संस्थेची परिणतावस्था आहे. याचें कारण असें कीं, इतर कोणत्याही समाजाचा इतिहास जर पाहिला तर त्यांत लग्नसंस्थेचा, फार झाले तर, एखादा दुसरा प्रकार आढळतो. परंतु हे सारेही प्रकार वैदिक संस्कृतीच्या इतिहासांत आढळतात. किंबहुना लग्नसंस्थेसंबंधीं अशी

कल्पनाच नांही कीं जिचा निर्देश वैदिक वाङ्मयांत नांहीं. हे सारे प्रकार त्या वाङ्मयांत आढळतात याचाच अर्थ असा की, त्या सर्वांचा अनभव घेऊन हिंदूंनीं आपल्या लग्नसंस्थेचें स्वरूप निश्चित केलें आहे. लग्नसंस्थाच नव्हती अशाहीं काळाचा उल्लेख त्यांत आढळतो. लग्नसंस्था असूनही शास्त्रसंमत स्वैराचाराची स्त्रीस मुभा असल्याची हकीकत आपणांस श्वेत-केतूच्या कथेवरून कळते. केवळ प्रेमविवाह, जबरदस्ती विवाह, नियमित काळचा विवाह (श्रीमद्भारत, माधवीची कथा), आधीं समागम व मग विवाह, बालविवाह, प्रौढविवाह, समतविवाह, असमतविवाह, बहुपुरुष-विवाह, बहुभार्यात्व, जरठ - कुमारी विवाह, कुमार - जरठा विवाह (श्रीमद्भागवत, स्कंध९शैब्या व ज्यामघ यांची कथा), पुनर्विवाह, नियोग, स्वयंवर, कन्यादान आणि अशाच प्रकारचे स्त्री-पुरुषसबंधाचें जितके पर्याय आज कल्पितां येतील त्या सर्वांचे प्रयोग आमच्याकडे पूर्वीं झाल्याचें पुराणांवरून आढळून येतें. त्यावरून निदान एक गोष्ट तरी दिसून येते कीं, पुष्कळशा अनुभवांनीं शहाणे होऊन भारतीयांनीं आपल्या लग्नसंस्थेचें स्वरूप निश्चत केलें, आणि म्हणूनच त्यांना तिचीं गोड फळेंही अनंत काळ चाखावयास सांपडलीं. त्या संस्थेमुळें वैवाहिक जीवनाचा अत्युच्च आदर्श मिळून इतर कोणत्याही देशापेक्षां भारतवर्षांतील स्त्री-पुरुषांना श्रेष्ठ प्रतीचें विवाहसुख मिळालें, असें सर्व परकीय अभ्यासकांनीं आपलें एकजात मत दिलें आहे; आणि अद्यापही तिच्या मोडकळलेल्या स्थितींतही, या पद्धतीने लग्न झालेल्या कुटुंबांतच सुखशांति नांदते, असेच उद्गार सर्वत्र निघतात. अगदीं कालपर्यंत अशी स्थिती होती कीं, सुरूप-कुरूप सधन-निर्धन, सुशिक्षित-अशिक्षित, समंजसअ समंजस, सव्यंग-अव्यंग, कशीही मुलगी असो, ती लग्नाशिवाय राहिली आहे असें कधीं देखील घडलें नाहीं. किंबहुना मुलगी लग्नाशिवाय राहावयाचीच नाहीं हा निर्बंध व अनुभव फक्त भारतवर्षांतच दिसून येतो. इतर राष्ट्रांना त्याकरतां प्रयत्न करावे लागलेले आहेत. प्राचीन काळीं खाल्डियांत तर कांहीं ठिकाणीं लिलावानेंच स्त्रियांचा विवाह होत असे. म्हणजे सर्व उपवर कन्यांना एका ठराविक दिवशीं संस्थानाकडून बाजारांत मांडलें जाई व त्यांतील ज्या सुंदर व सुलक्षणी अहेत त्यांचा भारी किंमतीत लिलाव करण्यांत येऊन वसूल

झालेल्या रकमेंतून कुरूप व अवलक्षणी मुलींचे विवाह फार मोठे हुंडे देऊन करण्यांत येत असत. विवाहासंबंधाचीं नियंत्रणे सर्वांत अतिशय विकट व कडक असूनही मुली विवाहाशिवाय राहावयाच्या नाहींत हा चमत्कार फक्त भारतवर्षानेंच करून दाखविला.

या छोटयाशा लेखांत आपणांस विवाहसंस्थेचा तुलनात्मक अभ्यास करतां यावयाचा नाहीं. तात्पर्य गोष्ट एवढीच आहे कीं, भारतवर्षापुढें एक विशेष घ्येय असल्यामुळें आपल्या विवाहसंस्थेला त्यांना जास्त नियंत्रित करावें लागलें आणि इतर देशांत नियंत्रणें होतां होईल तितकीं ढिलीं करावीं लागलीं. परंतु कांहीं झालें तरी नियंत्रणें हीं होतींच. या सर्व नियंत्रणांचे मुख्य प्रकार दोनचार होतात एक जातीचें अथवा वर्गाचें नियंत्रण; दुसरें, ज्याला आपण सपिण्डय म्हणतों तशा प्रकारचें, तिसरें वयाचें आणि चौथें एकनिष्ठेचें. कमीजास्त प्रमाणानें या नियत्रणानीं लग्नसंस्था तयार झाल्या आहेत. रोमन लोकांत गोत्र व सापिण्डय याचे कांहीं नियम होते. ज्यू लोकांत एक प्रकारचें सापिण्डय होतें. कॅथॉलिक ख्रिश्चन लोकांत सापिण्डय होतें, तर याच्या उलट इजिप्शियन लोकात सख्ख्या बहीणभावडाचें लग्न लावून त्यांना गादीवर बसविण्याची राजघराण्यांत चाल होती. पारशांत सापिण्डयसंबंध प्रशस्त मानले आहेत व मुसलमानांत 'स्तनंधया' खेरीज म्हणजे जन्मल्यापासून एकाच दुधावर पोसले गेलेल्या स्त्री-पुरुषांखेरीज इतर कोणाचेही विवाह विहित आहेत. जपानी व चिनी लोकांतही कांहीं सापिण्डयनियम आहेतच. वयासंबधीं नियम फक्त भारतवर्षांत आढळून येतो. एकनिष्ठेचा नियम टिहरीसारखे कांहीं अपवाद सोडले तर स्त्रीच्या बाबतींत, सर्व जगभर सारखाच आहे. पुरुषांच्या बाबतींत ही फक्त ख्रिश्चन लोकांत आहे. हिंदूंच्या लग्नसंस्थेंत या सर्व गोष्टींचा विचार असून इतरही कांहीं बाबतींत जगांतील इतर लग्नसंस्थांहून तिचें स्वरूप वेगळें आहे. त्या सर्वांत मोठी बाब ही आहे कीं, इतर बहुतेक लग्नसंस्थांत लग्न हें करार स्वरूपाचें आहे त्यानें स्त्रीचें स्वतंत्र अस्तित्व नष्ट होत नाहीं व लग्ननिश्चयांत तत्त्वतः तरी स्त्री-पुरुष प्रेमास आद्यस्थान दिलें आहे. याच्या उलट हिंदूंची गोष्ट आहे. त्यांची

लग्नसंस्था संस्कारस्वरूप व कराररूप आहे. करार मोडूं शकतो, संस्कार नाहींसा होऊं शकत नाहीं. त्यानें उत्पन्न झालेलें स्त्रीवरील स्वामित्व अभंग असल्यामुळें तत्वत: लग्नानें स्त्रीचें स्वतंत्र अस्तित्व नाहींसें होतें व लग्न-निश्चयांतही स्त्री-पुरुष प्रेमास आद्यस्थान नाहीं. ही सर्व घटना कितपत समर्थनीय आहे तें आपण पुढें पाहूं.

## प्रेमतत्व व त्याविषयीं भारतीय कल्पना

इतर लग्नसंस्थांतील नियंत्रणें आणि हिंदु लग्नसंस्थेंतील नियंत्रणें यांत दुसराही एक मोठा फरक आहे. आमच्या लग्नसंस्थेंतील बहुतेक प्रमुख नियंत्रणें अगदीं आजच्या विज्ञानशास्त्रांच्याही कसोटीला बहुतांशीं उतरतात. श्री. निमकर यांचें 'हिंदु लग्नसंस्था' व श्री. गो. म. जोशी यांचें 'हिंदूंचें समाजरचनाशास्त्र' हीं पुस्तकें वाचणाऱ्याला ही गोष्ट कबूल करावीच लागते. इतर लग्नसंस्थांतील नियंत्रणें, या इतक्या सर्व शास्त्रांचा विचार करून आलेलीं आहेत असें दिसत नाहीं. तत्वत: त्यांत स्त्री-पुरुष प्रेमास मुख्य स्थान आहे. आमच्यांत तें तसें नाहीं असें म्हटल्यानें गैरसमज उत्पन्न होण्याचा संभव आहे, म्हणून प्रथमत: त्याचा थोडासा खुलासा करूं. हिंदु लग्नसंस्थेंत प्रेमास आद्यस्थान नसण्याचें कारण प्रेम या वस्तूची त्यांना ओळख नव्हती अथवा त्या भावनेचें महत्व त्यांना कळत नव्हतें किंवा तिची लज्जत न कळण्याइतके ते अरसिक होते, हें नाहीं. उलट, जास्त सूक्ष्म बुद्धि आणि मानसशास्त्राच्या दृष्टीनें व्यापक अनुभवावर केलेल्या खोल अभ्यासाच्या साह्यानें इतर कोणत्याही लोकांपेक्षां प्रेम या भावनेचा पूर्ण विचार त्यांनीं केल्यामुळेंच त्यांच्या लग्नसंस्थेंत प्रेम या शब्दाची मातब्बरी कमी आहे. त्यांच्या समजुतीप्रमाणें प्रेम, आनंद आणि ईश्वर हे तिन्हीही पर्याय शब्द आहेत. ईश्वर म्हणजे प्रेम (God is love) हा संदेश ख्रिस्तानें भारतवर्षापासूनच शिकून पाश्चात्य जगाला दिला. 'अनिर्वचनीयप्रेमस्वरूप: ईश्वर:' असें भारतीयांचें मत भक्तिसूत्रांत नारद सांगतात, आणि 'रसो वै स:' म्हणजे वस्तुमात्रांतली गोडी अथवा आनंद म्हणून जो कांहीं आहे तें ईश्वराचें स्वरूप आहे, असें उपनिषदांत म्हटलें आहे. तात्पर्य इतकेंच कीं, प्रेम म्हटलें कीं, तें आनंदस्वरूपच असलें पाहिजे

आणि निर्भेळ आनंद म्हणजे ईश्वरस्वरूपच, असें हें समीकरण आहे. पण, ईश्वर म्हणजे सर्व सामर्थ्य. आमच्याच तर काय पण कोणत्याही धर्मांत दुबळ्या ईश्वराची कल्पना नाहीं. ईश्वराच्या इतर गुणांविषयीं कदाचित निरनिराळ्या धर्मांत मतभेद असूं शकतील, कोणी त्याला परमदयाळु समजत असतील तर कोणी त्याला न्यायनिष्ठुर म्हणत असतील, कोणी त्याला जगाची उठाठेव करणारा समजत असतील तर कोणी त्याला 'न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः' असा उदासीन समजत असतील, कोणी त्याला एकटा समजत असतील तर कोणी माया अथवा प्रकृति यांच्यासारख्या कोणातरी सहचरीचा दादला होऊन संसार थाटणारा म्हणत असतील, कोणी त्याच्यापलीकडे पूर्णता कांहींच नाहीं म्हणून समजत असतील, कोणी त्याला सृष्टिरूप अध्यास झाला असें म्हणत असतील कोणी त्यानें सृष्टि उत्पन्न केली असें म्हणत असतील तर कोणी ती त्याच्यापासून उत्पन्न झाली असें समजत असतील, कोणी तो निर्गुण निराकार आहे असें म्हणत असतील तर कोणी तो केवळ सगुण आहे असेंहि म्हणत असतील, पण ज्या एका गोष्टीविषयीं सर्व धर्मांची एकवाक्यता आहे ती ही कीं, या परमेश्वरमूलक सृष्टींत परमेश्वराइतका समर्थ कोणी नाहीं. तो परमेश्वर प्रेम किंवा आनंदस्वरूप आहे आणि सामर्थ्यरूपही आहे, याचाच अर्थ असा कीं, खरें प्रेम आनंदस्वरूपच असलें पाहिजे आणि प्रेम व आनंद ह्या प्रत्यक्ष ईश्वरी कला असल्यामुळें सामर्थ्यरूपच असल्या पाहिजेत. त्यांनीं माणसाला समर्थ बनविलें पाहिजे. दुःखी आणि दुबळें करणारें तें आर्यकल्पनेप्रमाणें प्रेमच नव्हे या गोष्टींची कल्पनाही नसणाऱ्या नष्टाम्यांना 'Love's sad satiety' प्रेमाचा खेदकारक उबग (शेले) चा अनुभव सर्वत्र जगात यावा आणि "Our sincerest laughter with some pain is fraught; ज्यावेळी आम्ही मनापासून हसतो तेव्हा देखील त्यांत कोठे दुःखाची छटा असतेच, आणि आमची अत्यंत गोड गाणी तीच असतात की ज्यांत कांही ना कांही करुण रस भरला असतो. Our sweetest songs are those that tell of saddest thought." असे

उद्गार काढणें भाग पडावें हें योग्यच आहे. त्यांच्याचपासून शहाणपण उचलणाऱ्या आमच्या इकडील 'कवि' म्हणविणाऱ्यांनाही "प्रीती या जगतांत कंटकयुता हा एक वल्ली असे। शूलारोपण यूप त्यावरिल ती कीर्तिध्वजाची दिसे।" (केशवसुत) यापेक्षां अन्य काय अनुभव येणार ! प्राचीन आर्यांची प्रेमाविषयींची कल्पना या रडया कवींच्या कल्पनेहून अगदींच भिन्न होती. स्त्री-पुरुषांच्या प्रेमाचा अत्युत्कर्ष हेंच त्यांच्या स्त्री-पुरुषसंबंधाचें ध्येय होतें. त्याचा विचार त्यांनीं कसा केला तें पाहूं.

## स्त्रीपुरुष प्रेमाचें वैदिक ध्येय

स्त्री आणि पुरुष या दोघांनाही परस्पर प्रेमाचा अत्युच्च अनुभव घ्यावयाचा असला तर एका गोष्टीची आवश्यकता आहे आपलें स्वाभाविक स्त्रीत्व अथवा पुरुषत्व म्हणून जें कांही असेल तें कायम राखून त्यांनी सर्वसमर्थ झालें पाहिजे. याचाच अर्थ असा की, त्यांनी प्रथमतः पूर्ण झालें पाहिजे. जीव हा ईश्वराचाच अंश असल्यामुळें आनंदरूपच आहे. मग त्याला दुःख कां होतें ? तर तो अंश आहे, पूर्ण नाहीं म्हणून. अंश असल्यामुळें त्याला प्रत्येक ठिकाणीं जें कुंठित झाल्यासारखें वाटते त्यामुळें तो दुःखी होतो आणि त्यामुळेंच तो लोलंगत होऊन वासनेच्या मागें कुत्र्यासारखा भटकतो. वासना उत्पन्न होते याचाच अर्थ अपूर्णतेची जाणीव असते. कांहीं कमी पडल्याखेरीज वासनाच उत्पन्न कशी होणार ? आणि वासनाच नसल्यावर दुःख तरी कसें होणार ? सारांश, दुःखाचें मूळ अपूर्णतेंत आहे. मनुष्याची प्रेमकल्पना जर त्याला दुःखी करीत असेल तर त्याचा अर्थ इतकाच कीं, ती प्रेमकल्पना पूर्ण नाहीं. पूर्णत्वाचा एक अंश आहे. पूर्णत्वाचा आनंद देण्यांत असतो, घेण्यांत नाही आणि त्या आनंदालाही स्वभावाशिवाय दुसरें कांहीं कारण नसतें. दृष्टान्त तितका एकदेशी असतो तरी पण दृष्टान्तावरूनच कल्पना करावी लागते. व्यावहारिक स्थितीवरून जर कल्पना करावयाची झाली तर अपत्यप्रेमावरून कल्पना करतां येईल. स्वभाव म्हणून आपल्याला त्याच्यांत आनंद वाटतो आणि तो सारा आनंद त्याला देण्यांत असतो. ज्यावेळेला त्याच्यापासून कांहीं घेण्यांत आपल्याला आनंद वाटूं लागतो त्यावेळेला आपलें अपत्यप्रेम

थोडें हिणकस बनलेलें असतें. म्हणून अपत्यप्रेमाचेंही निर्भेळ स्वरूप जर कोठें पहावयास मिळत असेल तर तें त्यांच्या बाल्यावस्थेंतच. या दृष्टान्तांत एक पक्ष अत्यंत दुर्बल व दुसरा त्यामानानें फार सबल आहे. म्हणून तो देखील पूर्णपणें लागूं पडत नाहीं. दोन विरुद्धलिङ्गी जीवांचा विकास होऊन एकमेकांत वाटणाऱ्या गोडी पलीकडे आणि एकमेकांचे जे विशेषधर्म आहेत त्यांचें दान दुसऱ्याला करण्यांत पराकाष्ठेचा आनंद वाटण्यापलीकडे, एकमेकांवर अवलंबून राहण्याचें यत्किंचितही कारण न पडण्याइतकें पूर्णपणें स्वतंत्र आणि पूर्णपणें समर्थ ते बनले तरच त्यांचें प्रेम अत्युच्च व पूर्ण होऊन केवळ आनंदमय दशा होईल. त्याच्या पलीकडे मग एकमेकांचे विरुद्ध धर्मही नाहीसे होणें व एकरूप होणें ही शेवटची पायरी आहे. पण तेथें आनंदाचा उपभोग नाहीं. आनंदाचा उपभोग असण्यास, तितकी परिपूर्णता येऊन मागें सांगितल्याप्रमाणें, 'विधात्याची तनु दुभंगतांना' जे कांहीं भिन्न विशेष घेऊन स्त्री-पुरुष हें जोडपें निर्माण झालें, तो भिन्नपणा प्रत्येकांत तसाच असला पाहिजे. स्त्रीचें स्त्रीत्व आणि पुरुषाचें पुरुषपण हीं कायम राहून अशा परिपूर्णतेचा अनुभव घेतां येतो अशी आमची कल्पना आहे.*

या जोडप्यांत स्त्रीच्या ठिकाणीं कोमलपणा, प्रसवशीलता इत्यादि रक्षणास व वर्धनास आवश्यक असणाऱ्या साऱ्या भावना आहेत व पुरुषाच्या ठिकाणीं उत्पादनास लागणाऱ्या व जगताची स्थिति टिकविण्या-करितां अपरिहार्य असलेल्या संहारास अवश्य असणाऱ्या दांडगेपणा, निष्ठुरपणा, क्षणिकपणा इत्यादि भावना आहेत. अर्थात या फक्त एकाच ठिकाणीं आढळतात आणि दुसरीकडे नाहीं. असें नाहीं. त्यांचें प्रमाण

---

*" I cannot but believe that there is some Where a great power that thinks herself as feminine."—(Vivekananda, "Master as I saw him, p. 203)
विश्वांत कोठे ना कोठे तरी अशी एक शक्ति आहे की, जी कर्तुमकर्तुम् असूनहि स्वतःला स्त्री असल्याचे समजते. 'माझे गुरु मला जसे दिसले तसे.'
निवेदिता.

कमीजास्ती आहे. ज्ञान, सामर्थ्य, ऐश्वर्य, विलास इत्यादि सर्व गोष्टींनीं केवळ एकरूप असलेल्या दोन ज्योतींत अशा तऱ्हेचा फरक पडल्यामुळेंच एकाच ज्योतीची विष्णु व लक्ष्मी अशीं दोन स्वरूपें झालीं. म्हणूनच मागें म्हटलें कीं, जो महेश्वर तीच माहेश्वरी. आमच्या शास्त्रांतील या श्रेष्ठ देवतांच्या दंपत्याची कल्पना ही अशी आहे. हरिदास-पुराणिकांनीं अथवा काव्य-कथांनीं त्यांना जें मानवी स्वरूप दिलें आहे तशी नाहीं. कामवासनेचा थोडासा अंशही शिल्लक राहिला तरी साधक देखील वरच्या पायरीस पोहोचूं शकत नाहीं. मग साधनावस्थेच्या अगदीं उपान्त्य अवस्थेंत कामवासनेचा व तिच्या अपेक्षेनें उत्पन्न झालेल्या पतिपत्नीसंबंधाचा गंध कोठून राहील ? योगवासिष्ठकारानें चूडाला आणि शिखिध्वज यांच्या आख्यानांत हेंच तत्व लोकांपुढें मांडलें आहे. दोन स्त्री-पुरुषजीवांनीं हें ध्येय पुढें ठेवून प्रवास केला असतां त्यांनाही सर्व रसांचा उपभोग मिळून त्यांचा मार्गही सुलभ होईल व इतर जनतेलाही त्यांचा उपयोग होईल हें ओळखून त्या तत्वावर वैदिकांनीं आपली हल्लींची लग्नसंस्था बसविली आहे.

सारांश, वैदिक लग्नसंस्थेचें ध्येय नुसती प्रजोत्पत्ति अथवा केवळ संघाची आवश्यकता हें नसून स्त्री आणि पुरुष यांच्या परस्पर प्रेमाचा अत्युच्च रसास्वाद हेंच आहे. सर्व प्रकारच्या रसांचा अनुभव घेऊन मोक्षाला गेलें पाहिजे असें तांत्रिक म्हणतात. सर्व रसांचा पूर्णपणे आस्वाद घेऊन शास्त्रोक्त कर्म केल्यावर मनुष्य पूर्णाभिषिक्त होऊं शकतो अथवा सर्व रसांच्या अनुभवाने तृप्त होऊन पूर्ण ज्ञान झालें म्हणजेच माणूस जीवनमुक्त होतो. 'अनुभूय रसान्सर्वान् क्रियाकाण्ड विधाय च । साधक-स्थिरचित्तेन कुर्यात् पूर्णाभिषेचनम् ।।' अथवा 'पूर्णज्ञानरसानन्दाज्जीव न्मुक्तोभवेद् ध्रुवम् ।' (वामकेश्वर तन्त्र) हा रसास्वाद आज न मिळण्यास मोठा अडथळा हा आहे कीं, स्त्रीच्या कोमलपणामुळें तिला एकप्रकारचें दुर्बलत्व येऊन ती परतंत्र बनली आहे. तिला पूर्णपणें स्वतंत्र करून स्त्रीपुरुषांना हा रसास्वाद चाखविल्यावर त्यांनीं मोक्षमार्गाची धारणा करावी अशी शास्त्रयोजना आहे. अर्थात् हें ध्येय एक जन्मांत साध्य

होणारें नाही; त्यास अनेक जन्मांचा अनुभव अवश्य आहे. परंतु स्त्री-पुरुषांचा जोड जन्मोजन्मीं कायम राहून हा अनुभव घेतला गेला तर तो स्वतंत्रपणें एकमेकांनीं केलेल्या प्रयत्नापेक्षां जास्त लवकर फलद्रूप होणारा व सुगम आहे. हें रहस्य पुराणांतील अनेक कथांत व योगवसिष्ठांतील इंद्र आणि अहल्या यांच्या आख्यानांत दाखविलें आहे.

## रशियन स्त्रीचा अनुभव

आज स्त्रीच्या पारतंत्र्याची चर्चा फार चालू आहे, आणि तिला स्वतंत्र करण्याचे प्रयत्नही चालू आहेत. मनुष्यानें आपल्या स्वभावांत अजून बऱ्याच शिल्लक असलेल्या पशुपणानें स्त्रियांवर जो कांहीं जुलूम केला असेल तो ह्रींसा करणें हें वाजवीच आहे. परंतु असा बाहेरून कितीही प्रयत्न केला तरी काय उपयोग? आंतून जी स्वतःच दुर्बळ होऊन परतंत्र झाली आहे तिला बाहेरून स्वतंत्र कशी करणार? 'सह्याद्री'च्या सन १९३८ जानेवारीच्या अंकांत 'रशियांतील वैवाहिक जीवन' म्हणून एका रशियन स्त्रीच्या पत्राचें मराठी भाषांतर आलेलें आहे. त्यांत तिनें रशियांतील स्त्रियांच्या स्थितिबद्दल 'पण यांत वाटतें तेवढें सुख आहे असें मला स्वानुभवावरून वाटत नाहीं,' 'आमच्या हृदयाचे ठोके जर तुम्हांला पडताळून पहावयाचे असतील, तर त्यांतून तुम्हांला आज ऐकूं येत आहेत त्यापेक्षां कांहीं निरांळे ध्वनि ऐकूं येतील' असें म्हटलें आहे, तें फार मार्मिक आहे व त्यांत फार खोल अर्थ आहे. 'केवळ स्वैर-पणापेक्षां कांहीं नियंत्रण असलेलें वैवाहिक जीवनच स्त्रियांच्या स्वाभाविक प्रवृत्त्यनुसार सुखदायक होईल' हा तिचा निर्णयही फार सुंदर व मनुष्याची लग्नसंस्था नियंत्रणरूपच असली पाहिजे, या आमच्या सिद्धान्तास धरूनच आहे. अंतःकरणाच्या दृष्टीने पाहिलें तर आजच्या स्थितींत स्त्री आणि पुरुषजीव यांचे परस्परसंबंध negative ऋण विद्युत आणि positive electrons धन विद्युत सारखे आहेत. कदाचित अपत्योत्पादनाच्या प्रेरणेमुळें ते तसे झाले असतील. कारण उत्पादन सामर्थ्य जरी पुरुषाच्या ठिकाणीं असलें तरी उत्पादनाची अनिवार इच्छा मात्र स्त्रीच्या ठिकाणीं असते. तिला स्वतःच्याच सामर्थ्यानें तें करतां येत नाहीं म्हणून पुरुषाचें

साह्य घ्यावें लागतें. ह्या घटनेमुळें, अर्वाचीन शास्त्रज्ञ सुचवितात त्याप्रमाणें, तिच्या स्वभावांत भिन्नता उत्पन्न झाली आहे कां स्वभावतःच तिच्यांत फरक आहे, हें सांगणें कठीण आहे. म्हणजे, जीवदृष्टया दोन्ही जीव अगदीं एकजात एकसारखे असून शरीररचनेच्या भिन्नपणाचा परिणाम त्यांच्यावर होऊन त्यांचे स्वभाव वेगवेगळे बनतात कां जीवतःच त्यांत फरक असल्यामुळें वरच्या देहास वेगवेगळे आकार येतात हा प्रश्न आहे. अर्वाचीन शात्रज्ञांत त्यांच्यासंबंधीं सर्व प्रकारची मतभिन्नता आहे. तरी पण एकंदर अर्वाचीन विचाराचा निष्कर्ष लिङ्गनिश्चयांतील तत्त्व जीवाश्रित स्वयंभू आहे असाच आहे. आमच्या शास्त्राचा असा निश्चित सिद्धान्त आहे कीं, तें जीवाश्रित असून स्वयंभू आहे व त्याच्यामुळें लिङ्गनिश्चय होऊन पिंडास वेगवेगळे आकार येतात. दोन जीवांत अशी भिन्नता कां आली हें आजच्या स्थितींत सांगणें अशक्य आहे. परंतु त्या भिन्नतेमुळें दोघांत मुख्य फरक असा पडला आहे कीं, स्वभावतःच पुरुष हा एक प्रवृत्तीचें ओझें वाहतो तर स्त्री ही दोन प्रवृत्तींचें ओझें वाहते. पुरुषाची प्रवृत्ति दानरूप असल्यामुळे त्या दृष्टीनें तो स्त्रीपेक्षां थोडा पूर्ण आहे. स्त्रीच्या ठिकाणीं एकीकडून घेण्याची व दुसरीकडून देण्याची अशा दोन्ही प्रवृत्ति असल्यामुळें ती अपूर्ण राहिली आह व त्या दोन्हीही प्रवृति आहेत तोपर्यंत तिला पुरुषाचें आधीन होऊन राहणें भाग आहे. हें म्हणणें केवळ प्रजोत्पादनास अवश्य असलेल्या मैथुनक्रियेपुरतेंच आहे असें नाहीं. तसें असतें तर प्रजा उत्पन्न झाल्याबरोबर स्त्रीची एक प्रवृत्ति शांत होऊन ती पुरुषाप्रमाणें स्वतंत्र झाली असती. परंतु तसें होत नाहीं.

## स्त्री स्वभावतःच पराधीन

घटकाभर आपण अशी कल्पना करूं की, अर्वाचीन शास्त्रज्ञांनीं काढलेल्या इंजेक्शनची पूर्ण परिणति होऊन सृष्टीची परंपरा टिकविण्याकरिता आणि तिच्याकरतां म्हणून सृष्टीच्या ओघानें उत्पन्न होणारी अपत्यप्रेमाची भूक भागविण्याकरता स्त्रीला पुरुषाच्या समागमाची कांहींच गरज राहिली नाहीं, तर स्त्रीचा वर सांगितलेला दुर्बळपणा नाहींसा होऊन ती पुरुषपराधीनतेंतून पूर्ण मुक्त होऊन खरी स्वतंत्र होईल कीं काय आणि

negative पणा जाऊन तिच्यांत positive electrons चा धर्म येईल काय, असा प्रश्न आहे. त्याचें उत्तर नाहीं असेंच द्यावें लागेल. एक प्रकारें पुरुषांनीं असा विचार केला तर ती गोष्ट कांहीं मर्यादेपर्यंत तरी त्याला शक्य आहे. परंतु स्त्रीला तर ती मुळींच शक्य नाहीं. याचें कारण असें कीं, स्त्री वर सांगितल्याप्रमाणे एक दुतोंडी सावज आहे आणि पुरुषाला फक्त एकच तोंड आहे. समजा, उद्यां जगांतील सर्व स्त्रियांनी एकत्र होऊन पुरुषांशीं अगदीं असहकारिता केली तर पशुसंभोग, पुरुषसंभोग, स्वयंसंभोग इत्यादि उपायांनीं, पूर्ण समाधान मिळण्याची नसली तरी विकाराचा छळ आपल्यास सुसह्य होईल अथवा जाणवणार नाहीं, इतक्यापुरती सोय पुरुषास त्यांच्यावांचून करतां येईल. यांतील कांहींही करावयाचें नाहीं म्हटलें तरी देखील स्त्रीइतका ताण त्याच्यावर पडणार नाहीं, कारण निसर्गानेंच पुरुष-शरीर अल्पधारणेचें केलें असून विकाराचा जोर जास्त झाल्यास आपोआपच वीर्यस्राव होऊन ताण कमी होण्याचा एक safe-guard त्याला मिळाला आहे आणि त्याच्या ठिकाणची प्रवृत्तीच दानरूप असल्यामुळें कशाही का रीतीनें होईना त्याच्या जवळचें ओझें फेंकलें गेल्याबरोबर त्याला थोडातरी विसावा होतोच. स्त्रीची गोष्ट तशी नाहीं. तिच्या शरीराचे परमाणु व रचना हे जास्त नाजुक व म्हणूनच जास्त श्रेष्ठ दर्जाचे असतात. विकाराचा वेग धारण करण्याची तिची शक्तिही जास्त असते. मनोविकाराच्या अतिरेकानें देखील तिला विद्रावण होत नाहीं* आणि तसा कांहीं थोडाबहुत प्रकार होत असला तरी त्यापासून तात्पुरतेंही शरीर थंड न होतां उलट त्याला जास्त व्यथा होते. कारण स्त्रीचें समाधान पुरुषाप्रमाणें विद्रावणांत किंवा विसर्गांत नसून ग्रहण करण्यामध्यें आहे. विश्वांतल्या यच्चयावत पुरुषजातीनें स्त्रीशीं असहकार केल्यास कोणत्याही खाणीच्या स्त्रीला, हें ग्रहण करण्यापासून मिळणारें समाधान इतर कशानेंही मिळणें शक्य नाहीं. ही झाली निव्वळ शरीराची गोष्ट;

---

* 'आसनमयूरकं गोपनीयं भवति किं न वा' असा प्रश्न 'मालती माधवां'तील लवंगिकेनें आपल्या मैत्रिणीला केला आहे. तो अर्थातच 'असंबद्ध परिहास'च आहे.

अंत:करणाच्या दृष्टीनें पाहिलें तरीही अशीच गोष्ट आहे. त्या दृष्टीनेंही पुरुष स्त्रीपेक्षां जास्त स्वतंत्र आहे. एका काव्यमय कल्पनेनें स्त्रीपुरुषांच्य अंत:करणाचे सहजधर्म जास्त चांगले लक्षांत येतील. पुरुषाचा सर्व आनंद स्त्रीला आपल्या बाहूंत सर्वस्वी कवटाळून घेण्यांत आहे. तोच आनंद, अपत्याला आपल्या बाहूंत कवटाळून, जणुं कांहीं आपल्या हृदयांत मिळवून घेण्यांत स्त्रीला मिळतो. परंतु नुकतेंच सांगितल्याप्रमाणें स्त्रीचें अंत:करण हें एक दुतोंडी सावज असल्यामुळें त्यानें एका तोंडाचीच भूक काय ती शांत होते. जसें तिला एकीकडून एका जीवाला आपल्या बाहूंत कवटाळून जणूं कांहीं आपल्या हृदयांत मिळवून टाकण्यांत सुख वाटतें तसेंच सुख तिला दुसऱ्याच्या हृदयांत मिळून जाण्यांत वाटतें आणि तेवढ्याकरतां कोणीतरी आपल्याला बाहूंत सर्वस्वी कवटाळून स्वत:च्या हृदयांत मिळवून घेण्याची तिला तहान असते. या प्रवृत्ति पुरुषाच्या ठिकाणीं अशा प्रकारें केव्हांही नसतात. स्त्री आणि पुरुष जर आपापल्या प्रकृत्यनुरूप वाढले असले तर त्यांच्या अंत:करणाचे धर्म हेच असले पाहिजेत. तसें नसल्यास त्यांची वाढ प्रकृत्यनुरूप नसून विकृति रूप आहे (abnormal) असें समजण्यास कांहींच हरकत नाहीं. 'बृहदुर:श्रियो वीक्ष्य धाम ते । मुहुरति-स्पृहा मुह्यते मन: ।।' (गोपीगीत)ही मनाची तळमळ केवळ अपत्य-सुखाकरतांच नाहीं. सारांश, जोंपर्यंत कोणीतरी आपल्याला जवळ घ्यावें ही अत:करणाचीच तहान आहे, तोंपर्यंत त्या जीवनाची परतंत्रता जाणें शक्य नाहीं. रशियांतील वैवाहिक जीवनाचा अनुभव सांगणारी **शशेन** वस्तुत: अंत:करणाची हीच तळमळ प्रकट करीत आहे. जेथे विवाहसंस्थेचें रूप स्त्री व पुरुष एकाच बैठकीवर बसलेले असें आहे, तेथें ही तळमळ कशी शांत होणार ? **शशेंनाचें** शब्द अगदीं साधे व थोडकेच आहेत पण मोठे अंत:करणाला हलवून सोडणारे आहेत !

## फ्राईडचें शास्त्र

मनोविश्लेषणशास्त्र म्हणून जें अलीकडे एक शास्त्र निघालें आहे त्याच्याशीं हें म्हणणे विसंगत दिसतें असें वाटण्याचा संभव आहे. कारण त्याचें तर म्हणणें असें आहे कीं, कोणत्याही अवस्थेंतील स्त्री-पुरुष जीवांचा

जो आनंद तो या नाहीं त्या रीतीनें भोगलालसेला धरूनच असतो. अगदीं आईच्या वक्षःस्थलावर दुग्धपान करणाऱ्या नुकतेंच डोळे उघडलेल्या बालकापासून तों जगांतील यच्चयावत स्त्री-पुरुषव्यवहारांत संभोगसुख हाच स्थायीभाव असतो, वात्सल्यानें मुलाला पाजणाऱ्या आईच्या वृत्तीचें सोलीव स्वरूप संभोगसुखाची संवेदना हेंच असतें आणि पिणाऱ्या बच्चाच्याही शरीराला त्याच सुखाची भावना मिळत असते. परंतु हें वाटणें बरोबर नाहीं. हा विषय विस्तृत विचार करण्याजोगता आहे, तथापि या लेखांत त्याचा स्वतंत्र विचार करणें अर्थात शक्य नाहीं. येथें एवढेंच लक्षांत ठेवलें तरी पुरे आहे कीं, फ्राइडचा सिद्धान्त अजून अनुभवाच्या पूर्ण कसोटीस उतरून सर्वसंमत झाला नाहीं. त्याचा अभ्यासही विकृत मनापासून सुरू होऊन विकृतींच्या दृष्टीनेंच जास्त झाला असल्यामुळें त्याचा अभ्यास व त्याचा सिद्धान्त हे दोन्हीही विकृत असणें संभवनीय आहेत. आणि दुसरें असें कीं, त्या प्रश्नांत खोल जाण्याचें, आपल्या विषयापुरतें पाहिलें तर, कारणही नाहीं. स्त्री-पुरुषांतील प्रेम या वृत्तीचा अर्थ फ्राईड म्हणतो तसा असला तरी त्यामुळें आमच्या प्रतिपादनाला बाध येणार नाहीं. प्रवृत्तीचें मूळ कांहींही असलें तरी ती प्रवृत्ति, स्त्री व पुरुष यांच्या भिन्नभिन्न देहांत भिन्नभिन्न दिशांनीं वाढून, आम्ही सांगितल्याप्रमाणें, स्त्री आणि पुरुष यांच्या अंतःकरणाच्या तृष्णांत फरक करीत नाहीं असें फ्राईडही म्हणत नाहीं. म्हणून प्रस्तुत प्रकरणीं फ्राईडला विचारांत घेण्याचें कारण दिसत नाहीं.

अशा प्रकारें, हल्लीं आहे या स्थितींत तरी स्त्री ही स्वभावतःच परतंत्र आहे. लग्नानें स्त्रीचें स्वतंत्र अस्तित्व नष्ट होऊन पुरुषाचें स्वामित्व तिच्यावर प्रस्थापित होतें, हा हिंदुलग्नसंस्थेचा विशेष म्हणून वर सांगितला आहे, त्याच्यांतही कांहीं शास्त्रीयता आहे. शास्त्रकारांनीं स्वातंत्र्य नष्ट केलेलें नाहीं. परंतु स्त्रीला स्वभावतःच परतंत्र करणाऱ्या वरील दोन्हीही गोष्टी लक्षांत घेऊन विशिष्ट ध्येयाच्या दृष्टीनें शास्त्रकारांनीं त्या स्वातंत्र्यास नियमित मात्र केलें आहे. अशा प्रवृत्ति स्त्रीच्या हृदयांत असतात आणि कोणत्याही वयांत त्या पूर्णपणें नष्ट कधींच होत नाहींत हें

ओळखण्यांत शास्त्रकारांचें शहाणपणच आहे. मानवी हृदयाचे सारे पडदे अगदीं पूर्णपणें उघडून दाखविणारें कादंबरी, काव्य वगैरे सर्व ललित-वाङ्गम या शहाणपणाचें समर्थनच करतात. कोणत्याही वयांत स्त्रीच्या हृदयांत सुप्त अथवा जागृत, सूक्ष्म अथवा उदार थोडातरी मातृभाव असतोच असें नेहमींच म्हटलें जातें. स्त्री कितीही वृद्ध होवो, अगदीं बेंबीच्या देठाशीं ती निरंतर तरुणच असते, असें अलेक्झांडर ड्यूमानें आपल्या एका कादंबरींत (Viscount De Bregallone) मोठ्या मार्मिकपणें म्हटलें आहे. **या वस्तुस्थितीचा शास्त्रकारांनीं आपल्या ध्येयाशीं मेळ कसा घातला आहे हें पाहणें म्हणजेच हिंदु लग्नसंस्था काय आहे हें समजणें होय.** अशा रीतीनें साऱ्या जगाला घोंटाळ्यांत टाकणारा व लग्नविचारांत अत्यंत बिकट होऊन बसलेला **स्त्री-पुरुष प्रेमाचा प्रश्न प्रेमाला शास्त्रीयतेचीकसोटी लावून भारतीयांनीं सोडविला.** तेव्हां त्यांना समजून आलें कीं स्त्री-पुरुष प्रेम म्हणून कांही नितांत मधुर व दिव्य वस्तु आहे हें खरें आहे. पण हल्लीं आहे या स्थितींत मनुष्यजातीस तिची ओळख होणें कठीण आहे. ज्याला आज मनुष्य 'प्रेम' म्हणतो ती एक प्रेमाचा वास दिलेली मिश्र वस्तु आहे आणि म्हणूनच तिचा बहुश: दु:खमय अनुभव येतो. ज्याला तो प्रेमपूर्तीचा आनंद म्हणतो तो वस्तुत: positive नसून भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें "प्रतीकारो व्याधे: सुखमिति-विपर्यस्यति जन: ।।" सुख म्हणून कांही स्वतंत्र वस्तु आहे हेंच लोकांस कळत नाही. व्याधि नाहीशी झाली म्हणजे सुख मिळालें असें लोक समजतात. असा negative स्वरूपाचा आहे. म्हणूनच व्याकुलस्थितींत त्याला त्याचा सर्वोच्चबिंदू आढळतो. या वृत्तीचें परीक्षण करून भारतीयांनी तिच्याविषयीं तीन मुख्य सिद्धांत काढले. ते असे कीं :—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.
अनुक्रम ... २३९८८ दि. ...
क्रमांक ... ९३८८ ...

# प्रकरण ३ रे

# प्रेमाचे दोष

(१) प्रेम या वृत्तीचें परीक्षण केल्यानंतर त्यांना असें आढळून आलें कीं, सर्वसामान्य मनुष्यजातीला अद्याप प्रेम या वृत्तीची ओळख पटण्याइतकी मनुष्याची वाढ झालेली नाहीं; म्हणून प्रेम हें मूलतत्त्व धरून रचलेली योजना सामान्यत: सर्व मनुष्यजातीच्या सुखाकरतां उपयोगी पडणार नाहीं. त्याकरितां प्रेम डोळ्यापुढें ठेऊन कांही दुसरी योजना केली पाहिजे.

(२) सामान्यत:, सर्व मनुष्यजात प्रेमाची अधिकारी आहे असें म्हटलें तरी तें प्रेम स्वभावत:च सिद्ध असतें असें नाहीं. निरनिराळ्या जीवांस निरनिराळ्या वयानंतर आणि अनुभवानंतर ही वृत्ती प्रतीत होते.

(३) कोणत्या ना कोणत्या वयांत कां होईना प्रत्येक माणसाला या भावनेची प्रतीति येतेच असें म्हटलें तरी ही भावना संपूर्णपणें एकदम प्रकट होते असेंही नाहीं. म्हणजे तिची देखील जोपासना व वाढ व्हावी लागते.

## प्रेम म्हणजे काय ?

येथें एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं व्यवहारांत स्त्री-पुरुषांचे संबंध येऊन एकमेकांची एकमेकांच्या ठिकाणीं आसक्ति होते; तिचा तर

या ठिकाणीं हिशोबच नाहीं. जरी तिलाही प्रेम हेंच नांव असलें तरी प्रेमाहून ती कांही वेगळी आहे ही गोष्ट सिद्ध व्हावयास कांहीं जास्त प्रतिपादनाचीही गरज नाहीं. निव्वळ काम आणि प्रेम यांतील फरक प्रौढ मनाला तेव्हांच कळून येतो. परंतु प्रेम आणि ही आसक्ति यांच्यांतील फरक कळून येण्यास फार कठीण आहे. कित्येक उच्च दर्जाच्या कादंबऱ्यांतून नायक अथवा नायिका असें म्हणतांना दाखविलेले असतात कीं, 'प्रेम म्हणजे काय हें मला आतां कळलें !' त्यांना पूर्वीचे अनुभव असतात व त्या अनुभवाच्या काळीं ते आपल्या भावनेला प्रेमच म्हणत असतात. पण, मग असें कळून येतें कीं तें प्रेम नव्हतें ! नवीन वृत्तींत आणि पूर्वीच्या वृत्तींत जो मोठा फरक आढळून येतो, तोही वस्तुत: दोन आसक्तींतील उत्कटतेचाच असतो. तरी पण, उत्कटता ही पुढची पायरी असल्यामुळें ज्याला खरें प्रेम म्हणतां येईल त्या वृत्तीची तिच्यावरून कल्पना येऊं शकते प्रेम म्हणजे काय असें जर पाहूं लागलें तर थोडक्यांत अशी व्याख्या करतां येईल कीं **प्रेम म्हणजे आत्मप्रतीति**, आपल्या स्वत:ला आपली प्रतीति या जडदेहामध्यें येते म्हणून या जडदेहावर आपलें अत्यंत प्रेम असतें. त्यांत कोणत्याही प्रकारचा यत्किंचितही हेतु नसतो. इतकेंच नाहीं तर सुखदु:खमयतेचाही फारसा संबंध नसतो. देह अनुकूल असून सुख देत असतांना आपल्याला त्याच्या ठिकाणीं जशी प्रतीति येते तशीच तो प्रतिकूल असून दु:ख देऊं लागला तरीहि येते; व सुखमय असतांना त्याच्याविषयीं जितकी आवड असते तशीच तो दु:ख देत असतांना देखाल असते. आपल्या देहांत अनुभवास येणारी ही आत्मप्रतीति जगांतील इतर वस्तूंतून व जीवांतून मनुष्य घेऊं लागला म्हणजे त्याच्या प्रेमास सुरुवात होते. जितकी आत्मप्रतीति दाट तितकें प्रेम दृढ व उत्कट. आत्मप्रतीतिकरतां देहावरील जें प्रेम त्यांत दुसरा कांहींही हेतु नसतो, केवळ तशी प्रतीति येत राहणें एवढेंच निमित्त त्याला पुरें असतें. पतंजलींनीं म्हटलें आहे 'स्वरसवाही विदुषोऽपि रूढोऽभिनिवेश:' (पा० २, सू० ९); इतका पूर्ण अभिनिवेश दुसऱ्या जीवांत प्रतीत होणें ही दोन मनुष्य जीवांतील प्रेमाची पराकाष्टा आहे. आत्मप्रतीतीपलीकडे त्या दुसऱ्या जीवांतून दुसरें कांहींही मिळण्याचा आग्रह असणें ही आसक्ति. हीच गोष्ट उपनिषदांनीं

उलटचा रीतीनें सांगितली आहे. 'आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति' या बृहदारण्यकाच्या वाक्यांत सोलीव अर्थ एवढाच आहे. अर्थात तेथील प्रसंगाला अनुसरून तेथें उलटचा रीतीनें तत्त्व मांडलें गेलें आहे. अशा रीतीनें 'न वा अरे पत्यु: कामाय पति: प्रियो भवति' अथवा 'न वा अरे जायायै कामाय जाया प्रिया भवति' 'आत्मनस्तु कामाय' म्हणजे आत्म-प्रतीति येते म्हणून जोंपर्यंत दोन जीव एकमेकाला प्रिय वाटत नाहींत तोंपर्यंत एकमेकांपासून निदान आनंद आणि सुख ही मिळविण्याची तरी इच्छा असतेच सामान्य मनुष्य जीवांना या इच्छेपलीकडे कधींही जातां येत नाहीं. म्हणून व्यवहारांत या वृत्तीसच प्रेम म्हणतात. परंतु या प्रेमामध्यें, आपलें चीज झालें पाहिजे एवढां तरी वासनेचा भाग असतोच. म्हणून तें माणसाला दुर्बळ व दु:खी बनवितें. व्यवहारामध्यें खऱ्या प्रेमाचें थोडें स्वरूप कोठें पहावयास मिळत असेल तर तें फक्त आपल्या वेडचाविद्रचा अथवा व्यसनी अपत्याविषयीं निरपेक्षपणें तिळतिळ तुटणाऱ्या मातृ-हृदयांतच मिळतें.

## शास्त्रदृष्टीच पाहिजे

या ठिकाणीं अशी शंका येणें साहजिक आहे कीं, दोन माणसांचा विवाह एक नित्य व्यवहारांतली साधी गोष्ट आहे. त्या विवाहाची कोणत्याही समाजाचा साधा व्यवहार पाहून कल्पना करावयाची त्याच्या ऐवजी मानसशास्त्र, मनोविश्लेषण ही काय भानगड आहे ? व एवढचा खटाटोपाचें कारण तरी काय ? पुष्कळवेळां असेंही म्हटलेलें ऐकूं येतें कीं, अलीकडच्या लोकांना एवढा विचार करावयास वेळही नसतो आणि एवढा विचार त्यांना झेंपतही नाहीं. अलीकडच्या लोकांची ही तक्रार खरी आहे असा सार्वत्रिक अनुभव आहे. परंतु शास्त्रचर्चा ही माणसाचा रागरंग पाहून करावयाची गोष्ट नाहीं. ती जशी करावयाची तशी पायाशुद्धच केली पाहिजे. कदाचित् तिचे रसिक फार थोडे निघतील, पण म्हणून ती न करून चालावयाचें नाहीं. याचें कारण असें कीं, आमूलाग्र विचार करावयाची ज्यांची शक्ति नाहीं असे सारे लोक अनुयायी वर्गांतच पडतात; मग तें अनुयायित्व कोणाचेंही असो. तें कोणाचेंही असलें तरी त्या मूळ

पुरुषानें शास्त्रशुद्ध विचार केला आहे व तसा तो करण्याची त्याची पात्रता आहे, असाच दृढ विश्वास अनुयायांच्या ठिकाणीं असतो. सारांश, शास्त्र समजणारे व शोधणारे लोक जगांत कितीही असोत, जगांतील सारें विचारप्रवर्तन शास्त्रदृष्टीच्या लोकांकडूनच होतें. म्हणून कोणत्याही विचाराचे पाणी शास्त्रदृष्टीच्या पाटांतच सोडलें पाहिजे. भारतीय संस्थांविषयीं विचार करताना तर असें करण्याची अत्यंतच आवश्यकता आहे. तसें केले नाहीं तर अगदीं मोठमोठचांनाही आमच्या साध्या साध्या व लहान लहान गोष्टींचें देखील हृद्गत कळणें दुरापास्त होतें. उदाहरण म्हणून विवेकानंद स्वामींचे देतां येईल. विवेकानंद हे पाश्चात्य शिक्षण घेतलेले, हाडांत ब्राह्मणपणा मुरलेले, अंतःकरणांतील जळजळीमुळें देशोद्धाराचें कंकण बांधून पुढें सरसावलेले; अध्यात्म-विद्येंत ऋषित्व पावलेले, योगशास्त्राचा अनुभव घेतलेले, अनेक लहान मोठचा अतीन्द्रिय सिद्धि मिळविलेले व फार मोठमोठचा नव्याजुन्या अधिकारी पुरुषांच्या सहवासांत राहिलेले सव्यसाची धनुर्धर होते. परंतु आमच्या परंपरांचा अभ्यास करतांना त्यांच्या बुद्धिरूपी बाणाला एकाच फेंकींत कोणत्याही गोष्टीचे हृद्गत गांठतां आलें नाहीं. त्यांच्या समग्र वाङमयांत असा प्रकार पुष्कळ आढळेल. आपल्या प्रस्तुत विषयासंबंधीं एक ठळक उदाहरण द्यावयाचें तर विधवापुनर्विवाहाचें घेतां येईल. 'जो धर्म विधवांना पुनर्विवाह करूं देत नाहीं तो धर्म कसला !' असें त्यांना जवळ जवळ सर्व आयुष्यभर वाटत होतें. परंतु अखेरीस, म्हणजे निर्याणाच्या पूर्वी थोडे दिवस त्यांना आपली चूक समजून आली होती आणि धर्मविवाहाला कांही अर्थ असला तर तो अभेद्यच (indissoluble) असला पाहिजे हें त्यांच्या लक्षांत आलें होतें स्वामींची इंग्रजी पत्रें असा घोंटाळा होण्याचें कारण हेंच कीं, आमचा धर्म व आमची संस्कृत्ति यांच्या संबंधीं अत्यंत महत्त्वाची गोष्टच करूणेच्या भरांत त्यांनी प्रथम डोळचाआड केली.

जगाच्या इतिहासांत आतांपर्यंत भारतीय संस्कृति आणि रशियन साम्यवादी संस्कृति या दोनच संस्कृति अशा आहेत कीं, ज्या अशी ठांसून प्रतिज्ञा करूं शकतात कीं, आपली रचना कांहीं शास्त्रीय तत्त्वांवर

(science) आहे. त्या त्यांच्या प्रतिज्ञा कितपत यथार्थ आहेत आणि त्यांच्या मुळाशीं असलेल्या शास्त्रांची हल्लाच्या दृष्टीनें काय किंमत आहे या प्रश्नांत आपणांस या छोटया लेखांत जास्त जातां यावयाचें नाहीं. आणि जो कांहीं थोडा बहुत विचार करावा लागेल त्यांतही या ठिकाणीं शिरण्याचें कारण नाहीं. भारतीय विवाहसंस्थेचें अंतर्बाह्य रूपदर्शन झालें म्हणजे ते प्रश्न सहजच सुटतील. या ठिकाणीं तिच्या स्वरूपाची यथार्थ किंमत कळण्याकरितां प्रथमतः तिचें अंतरंग समजून घेतलें पाहिजे आणि तें कळण्याकरितां ज्या वस्तुतत्वांचें तें बनलेलें आहे त्यांचा शोध केला पाहिजे. आम्ही ज्या विचारांत शिरत आहोंत ते विचार भारतीय संस्कृति पटाला वस्तुतत्त्वा-(fabric) सारखेच आहेत हें विचारवन्तांच्या तेव्हांच लक्षांत येईल.

## प्रेमाच्या प्रांतांत स्त्री आणि पुरुष

नुकतेच सांगितल्याप्रमाणें मातृत्व हेंच मनुष्याच्या सहज आटोक्यांत असलेलें प्रेमाचें उच्च स्वरूप आहे. पण आपण पूर्वी पाहिलेंच आहे कीं, केवळ मातृत्वानेंही स्त्री-हृदयाचें पूर्ण समाधान होणार नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें स्त्री-हृदयाच्या या दोन अपेक्षा नसत्या आणि केवळ संततींतच त्याला आपली परिपूर्णता वाटली असती तर स्त्री ही परतंत्र न बनतां पुरुष परतंत्र बनला असतां. कोणत्याही कारणानें कां उत्पन्न होईना पण मध्येंच उत्पन्न झालेली ही परतंत्रता नाहींशी करण्याकरितां दुबळी होऊन स्त्री negative electron प्रमाणें पुरुष-जीवाचा आश्रय करते. म्हणूनच पुरुषाची सारी ऐट आहे. एरव्हीं पाहिलें तर हा संबंध उलटा असला पाहिजे. म्हणजे खरें पाहिलें तर पुरुषजीवानें स्त्रीजीवा-भोंवती घुटमळलें पाहिजे. कारण, त्याच्या अंतःकरणास ज्याची तहान आहे त्या कोमलपणाच्या बाबतींत स्त्री हा त्याचा गुरु आहे. केव्हांना केव्हां तरी या कोमलपणाची प्रतीति स्त्रीकडूनच त्याला मिळते, एरव्हीं शक्य नाहीं. पुरुष जो स्त्रीमध्यें एवढा गुंतून पडतो तो केवळ विषया-करतांच नाहीं. विषयाची भूक तर मोलानेंही विकत घेतलेल्या रतिक्रियेनें

भागूं शकेल. केवल पशुतुल्य अशीं कांहीं माणसें सोडलीं तर जिच्यामध्यें स्त्री-हृदयाचा कोमलपणा पाझरत नाहीं अशी रतिक्रिया पुरुष पैसे दिले तरी पत्करणार नाहीं. तसा प्रसंग म्हणजे माणसाची विटवनाच आहे असें वृद्ध चाणक्यानें म्हटलें आहे ते यथार्थ आहे (खण्डे खण्डे च पाण्डित्यं क्रयक्रीतं च मैथुनम् । भोजनं च पराधीनं तिस्रः पुंसोविडम्बनम् ।। ) स्त्री हृदयाचा हा नैसर्गिक अधिकार ओळखून तंत्राने त्यालाच देवाधि-देवाच्या पदावर बसविलें आहे. अशा रीतीने प्रेम अथवा कोमलपणा या मधुर भावनांच्या बाबतींत स्त्री गुरु असली तरी आज तिची स्थिति मात्र पुरुषरूपी positron च्या भोंवती फिरणाऱ्या negative electron सारखी आहे आणि प्रेमाच्या शास्त्रांत केवळ ठोंब्या असलेला पुरुषजीव तिचा उपभोक्ता होऊन तिचा नियंता झाला आहे. मनुष्यजाति या दृष्टीनें पाहिलें तर संभोगसुखाच्या नैसर्गिक प्रवृत्तीनें वाटणाऱ्या आकर्षणापलीकडे या वृत्तीची जाणीव असणारे फारच विरळा ! शेंकडा नव्याणव पुरुषांच्या बाबतींत, ज्याला तो **स्त्रीवरील प्रेम म्हणतो तें बहुत करून, फ्राईड म्हणतो त्याप्रमाणें, लैङ्गिक आकर्षण व निसर्गाच्या भुकेनें वाटणारी आसक्ति, हेंच असतें.** कित्येक सुसंस्कृत जीवांत यांच्या पलीकडे म्हणजे यांची गरज नसतांना देखील आसक्ति आढळते. परंतु तिचा देखील बहुतांशीं प्रकार बायरननें म्हटल्याप्रमाणें accident, blind contact and strong necessity of 'loving' * (Childe Harold's Pilgrimaga, Canto IV, 125) योगायोग, डोळेझाक अथवा प्रेम करण्याची जबरदस्त आवश्यकता, असाच असतो. (चाइल्ड हॅरोल्डचा प्रवास सर्ग ४ पान १२५) व मागें सांगितल्याप्रमाणें प्रेम ही वर्धमान वृत्ति असल्यामुळें पुढें त्यांची प्रेमांत परिणति होते. ही प्रेमाची परिणाम-शीलता भवभूतीने मान्य केली आहे. (कालेऽनावरणात्ययात्परिणते स्नेहसारे स्थितमयत् ). कालगतीने लज्जेचें दडपण थोडें कमी झालें म्हणजे ज्यांत प्रेमाची सारी गोडी साठविली आहे अशी स्थिति येते. साहित्यिकांचे तें अद्भुतरम्य प्रेम फार क्वचित कांहीं विशेष जीवांच्या आटोक्यात असतें.

---

*अविचार, सहवासाचा परिणाम अथवा व्यवहार.

याच्या उलट स्त्रीची स्थिति आहे. आजच्या स्थितींत तरी जीवांना शरीरांच्या द्वारेंच एकमेकांवर प्रेम करणें भाग आहे. शरीर म्हटलें कीं निसर्ग आलाच, आणि निसर्ग म्हटला कीं, त्याच्या इतका जुलमी कोणीच नाहीं. हें जरी खरें असलें आणि स्त्रीलाही निसर्गाचा तडाखा सोसावा लागत असला तरी देखील असें म्हणतां येतें कीं, तिच्या अंतःकरणाची सहजप्रेरणा निसर्गाकडे नसून प्रेमाकडे आहे. व्हिक्टर ह्युगोनें आपल्या Les Miserables कादंबरींत एका ठिकाणीं हा फरक फार सुंदर रीतीनें दाखविला आहे.* पुरुषाला अशी शरीराची अपेक्षा असल्यामुळें आणि त्याची प्रवृत्ति प्रदानरूप असल्यामुळें शिकारीपणांत त्याचा आनंद आणि विलास आहे. त्याच्या स्त्रीगुरूनें त्याला, एकाद्या रासायनिक मिश्रणांत सोनें विरवावें त्याप्रमाणें आपल्या कोमलपणांत विरविला म्हणजे मगच त्याला प्रेम म्हणजे काय हें कळतें. त्या कोमलपणांतही तो विरून जाण्यास मोठा कठिण आहे. बहुतेक सारे पुरुष माडखोलकरांच्या 'अनिरुद्धा' प्रमाणें 'अनू'चें देऊळ भंगून 'मनू'ला पूजा बांधणारेच असतात. याच्या उलट स्त्रीची स्थिति आहे. 'पुरुषांचेनि अष्टगुणें।

---

*"One of the magnanimities of a woman is to yield, and love, that elevation where it is absolute, is complicated by a certain celestial blindness of modesty. But what dangers you incur, ye noble souls ! You often give the heart and we take the body : your heart is left you, and you look at it in darkness with a shudder " स्त्री हृदयाचा उदारपणा हा आहे की, ते आत्मसमर्पण करते, आणि पराकाष्टेच्या सुखक्षणीं प्रेम हें एक प्रकारच्या दैवी संकोचानें आंधळें बनलें असतें. परंतु हे थोर जीवानों त्यामुळें तुम्ही केवढ्यां संकटांत येतां ! तुम्ही अंतःकरण देतां आणि आम्ही शरीर तेवढं घेतो. तुमचें अंतःकरण तुमच्याजवळच राहिलेलें लक्षांत आलें म्हणजे घोर अंधारांत एकटें पडल्यासारखे होऊन तुम्ही कांपूं लागतां.

स्त्रियांसि ईश्वरी देणें' असें श्रीसमर्थांनीं म्हटलें आहे तें खरें आहे. म्हणजे त्या आठपट खातात अथवा त्यांना आठपट काम आहे असा अर्थ नाहीं. या विषयांच्या बाबतींत त्यांच्या वासनेची तीव्रता आठपट जास्त असूं शकते असाच त्यांच्या म्हणण्याचा अर्थ आहे. त्यांचें शरीररूपी यंत्र श्रेष्ठ दर्जाचें असण्याचा हा परिणाम आहे. मोठ्या माणसाचा आवाज चढत्या सुरांत लागत नाहीं. पण एखादें लहान पोर एकदम पांचव्या पट्टींत गाऊं शकतें. हा त्याच्या कंठकूपाचा विशेष आहे. परंतु असें असूनहि मनोवृत्तीला आपल्या कह्यांत ठेवण्याची स्त्रीच्या ठिकाणीं एवढी शक्ति असते कीं, त्या मानानें पुरुष फार दुर्बळ ठरतो. पुरुषापेक्षां संभोगसुखाचा आनंदही स्त्रियांनाच जास्त मिळतो असें भीष्माचार्यांनी सांगितलें आहे. रतिप्रसंगांत सुखाच्या अतिरेकानें झोपेसारखी अथवा समाधीसारखी अवस्था पुरुषाची कधींच होत नाहीं असें म्हणतात. याच्या उलट स्त्रीच्या बाबतींत हा अनुभव वाटेल तितक्या लोकांकडून ऐकण्यांत येतो. अशी स्थिति असतांनाही स्त्रीचें समाधान विषयांत नसून प्रेमामध्यें आहे. 'अनिरुद्धा'च्या उलट, नुसत्या कल्पनेच्या देवाला पूजा बांधण्याकरतां निसर्गाला लीलेनें पायाखालीं तुडवून हांहां म्हणतां सारा जन्म काढून नेण्याची स्त्रीची तयारी असते. सारांश इतकाच कीं, नुसत्या शरीरापलीकडे कांहीं तरी जास्त दोघांनाही हवें असतें. निसर्गाचे गुलाम दोघेहि असतात. पण स्त्रीच्या अपेक्षेनें शरीरसुखाची गोडी कमी असून व स्त्रीकडून मिळणारा कोमलपणा अपूर्व असूनही पुरुषाला शरीरसुख व तो कोमलपणा या दोघांचीही सारखीच तहान असते व दोन्हीही मिळाल्याखेरीज त्याची तडफड शांत होत नाहीं. या दोहोंत देखील शरीरसुख मिळत राहिल्यास कोमलपणाची उणीव तो सोसून घेऊं शकतो. उलट मात्र सहसा आढळत नाहीं. याच्या उलट स्त्रीचें आहे. स्वतःचा पूर्ण विसर पडून एक प्रकारची समाधि लागण्याइतका पुरुषाकडून मिळणाऱ्या रतिसुखाचा तिचा आनंद मोठा असतो तरी देखील प्रेम आणि तो आनंद यांच्यांत निवड करावयाचा प्रसंग आल्यास त्या आनंदाला ती सहजच झुगारून देऊं शकते. त्यामुळें पुरुषाचा शिकारीपणा तिच्या वृत्तींत नसतो; इतकेंच नव्हे तर तिच्या अंतःकरणाच्या उभयविध प्रवृत्तींपैकीं एका म्हणजे देण्याच्या प्रवृत्तीनें

साऱ्या जगाला पाखर घालण्याची त्यांची तयारी असतांना दुसरी प्रवृत्ति, कोठें तरी एकाच ठिकाणीं शांत व्हावी असाच त्यांचा सहज धर्म आहे. अशी ती एका ठिकाणीं शांत न झाली तर अनेक ठिकाणें धुंडूनही बहुधा ती त्या जन्मांत शांत होतच नाहीं. आणि तें ठीकच आहे. दोन बाहूंच्या आलिंगनांत एकाच वेळीं अनेक व्यक्तींना घेणें शक्य आहे. परंतु एकाच वेळीं अशा अनेक व्यक्तींच्या आलिंगनांत राहणें मात्र शक्य नाही. सारांश, **सत्यतेनें स्त्रीला कोणाची तरी एकदांच पत्नी होतां येतें.** त्याशिवाय अनेकांची ती झाली तरी त्या पत्नीपणांत कांही तरी अपूर्णता असल्याशिवाय राहत नाहीं. अनेक साहित्यिकांनीं आपल्या कादंबऱ्यांतून स्त्रीच्या या स्वभावधर्माचीं मोठीं मनोहर चित्रें रेखाटलीं आहेत. मराठीमध्यें, विशेषत: 'भंगलेल्या देवळां'त माडखोलकरांनीं हें तत्त्व जास्त स्पष्टपणें मांडलें आहे. पुराणांतरीचें उदाहरण द्रौपदीचें आहे. ती प्रान्त:स्मरणीय कन्या आहे. भारतीय स्त्रियांत सीता-सावित्रींच्या मालिकेंत बसण्याइतकी तिची योग्यता आहे. पांच पतींचा पत्नीधर्म सांभाळून तिनें सतित्वाची पदवी मिळविली आहे. तशीच ती पुण्यशील व पुण्यगंधा अशी महाभारतावरून दिसते. तरी तिलाही एक गोष्ट करतां आली नाहीं. पांच नवऱ्यांवर तिला सारखें प्रेम करतां आलें नाही तिच्या हृदयाचा लाल एक अर्जुनच होता.*

या साऱ्या प्रतिपादनावरून कोणास अशी शंका येईल कीं, स्त्रियांविषयीं आजपर्यंतच्या मोठमोठ्या सर्व लोकांनीं 'स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यम् । देवो न जानाति कुतो नराश्च' 'नैता रूपं परीक्षन्ति' अथवा 'पुमानित्येव भुञ्जते' इत्यादि, जो अनुभव सांगून ठेवला आहे, त्याच्या तर हें अगदींच विरूद्ध आहे. परंतु हें त्यांचें वाटणें बरोबर नाहीं. एथपर्यंत जें प्रतिपादन केलेलें आहे तें निसर्गत: स्त्री आणि पुरुष यांच्या

---

* स्वर्गारोहण पर्वात ही गोष्ट सांगितली आहे. पांडव सदेह स्वर्गाला जातांना धर्माखेरीज सर्व जण एक एक असे मध्येंच गळून पडले. द्रौपदीही पडली. तेव्हां त्याचें कारण, पांच पांडवांत तिचें प्रेम अर्जुनावर जास्त होतें आणि या दोषानें तिचें पतन झालें असें धर्मानें सांगितलें आहे.

अंत:करणाची ठेवण कशी आहे, त्यांच्या बाबतींत सृष्टिकर्त्याची योजना काय आहे, या दृष्टीनें केलें आहे. आजपर्यंतच्या अनेक शहाण्यांच्या अनुभवांत किती सत्य आहे हा प्रश्न बाजूस ठेवून, पूर्ण तथ्य आहे असें म्हटलें तरी, शास्त्रदृष्टीनें असें म्हणतां येतें कीं, ती निसर्गाची योजना नाहीं, तो मनुष्याचा पराक्रम आहे ! मनुष्याच्या अज्ञानानें, गुणानें व स्वच्छेनें झालेली ती निसर्गाची विकृति आहे. मनुष्यानें निसर्गाला असें कितीतरी विकृत केलें आहे निसर्गाच्या विकृतिकरणाची क्रिया दोघांच्याही बाबतींत सारखीच चालू आहे. परंतु स्त्रीच्या बाबतींत ती परिणामाबाहेर नेहमींच यशस्वी होते, इतकेंच. असें होण्याचें कारणही स्त्रीस्वभावांतील दुसरा एक विशेष हेंच आहे.

## स्त्रीस्वभावाचा विशेष

मागें सांगितलें आहे कीं, स्त्रीचें शरीरयंत्र हें पुरुषांपेक्षां जास्त श्रेष्ठ दर्जाचें व नाज़ूक आहे. त्याचा एक परिणाम असा होतो कीं, धृति हा गुण स्त्रीच्या ठिकाणीं पुरुषांपेक्षां कमी आहे. स्वभावत:च पुरुषाच्या ठिकाणीं बाह्य परिस्थितीशीं टक्कर देण्यास लागणारें धैर्य (courage) जास्त आणि अंत:परिस्थितीशीं झगडण्यास लागणारें धैर्य (fortitude) स्त्रीच्या ठिकाणीं जास्त. या उलटसुलट धर्मांचा परिणाम होऊन स्त्री-पुरुषांच्या स्वभावाचे विचित्र असे विशेष उत्पन्न झाले आहेत. त्यापैकींच, बाह्य परिस्थितींत धृतिहीनता हा एक स्त्रीविशेष आहे. ही कल्पना थोडी जास्त स्पष्ट केली पाहिजे. स्त्रीस्वभावाचा असा एक विशेष आहे कीं, भावनांच्या बाबतींत स्त्रीचें अंत:करण कोणत्या तरी टोंकास जाऊं पहातें. मध्येंच राहणें त्याला जमत नाहीं. मध्यें राहण्यांत जो ताण पडतो अथवा जी कळ सोसावी लागते ती त्याला जास्त सोसवत नाहीं. त्यापेक्षां चटकन टोंकाला जाऊन त्याचे परिणाम मुकाट्याने जन्मभर सोशीत बसणें त्याला परवडतें. परंतु बाह्य परिस्थितींत मात्र स्त्रीची सहज प्रवृत्ति होतां होईल तों टोक न गांठण्याची असते. याच्या उलट पुरुषाची स्थिति आहे. भावनांच्या बाबतींत स्त्री इतका तो टोंकास सहसा जाऊं शकत नाहीं आणि होतां होईल तों मध्येंच राहणें त्याला परवडते. उलट, बाह्य

परिस्थितींत मात्र कोणत्याही गोष्टीचा एकदम सोक्षमोक्ष करून टाकण्याकडे पुरुषाची प्रवृत्ति जास्त. म्हणूनच त्याच्या ठिकाणीं साहस जास्त. 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि' हें वर्णन स्त्री-हृदयास पूर्णपणें लागू पडतें. इतकेंच नाहीं तर कोणत्याही सद्‌गुणाच्या अथवा दुर्गुणाच्या बाबतींत असेंच म्हणतां येईल. सद्‌गुणी झाली तर स्त्री जितका सद्‌गुण प्रकट करील त्याच्या अर्ध्यानिंही पुरुषास प्रकट करतां येणार नाहीं आणि दुर्गुणी होऊन बिघडली तर स्त्री जितकी बिघडेल तितकें पुरुषास यत्न करूनही बिघडतां येणार नाहीं. स्त्रीच्या दयालुत्वाची सर पुरुषास येणार नाहीं आणि निष्ठुर बनली तर स्त्री जो क्रूरपणा करूं शकेल त्याची पुरुषास कल्पनाही करवणार नाहीं. अर्थात् हें सर्व बोलणें सामान्यत: आहे एरव्हीं, सर्व प्रकारचीं उदाहरणें दोन्हीही वर्गांत आढळतातच. तात्पर्य एवढेंच आहे कीं, बरें अथवा वाईट, कांहींही करण्यासंबंधीं तुलनाच करू म्हटलें तर स्त्री एखादी गोष्ट जितक्या वरच्या दर्जाची करील तितकी पुरुष करूं शकणार नाहीं. म्हणूनच स्त्रियांत देखील पुरुषांनाही लाजविणाऱ्या तरवारबहाद्दूर स्त्रिया झाल्या आहेत. पण त्यांतही एक प्रकार आढळून येतो. स्त्रीधर्म जास्त असलेल्या स्वभावाचे पुरुष घेतले तर ती त्यांची सहजावस्थाच आढळून येते. परतु पुरुष गुणांतील स्त्रियांची प्रवीणता ही त्यांची सहजावस्था नसते. उत्सवादिकांच्या प्रसंगीं मनुष्य विशेष तऱ्हेचा पोषाख व शृंगार करतो व त्यांत त्याला आनंदही वाटतो. पण ती त्याची नित्यावस्था नाहीं. थोडा जास्त वेळ झाला तर प्रसंग केव्हां सपेल आणि आपण पुन: ढुंगणाला पंचा केव्हां गुंडाळूं असें त्याला होऊन जातें. त्या पंचांत त्याची सहजावस्था आहे. स्त्रीनें पुरुषगुणांत जरी प्राविण्य दाखविलें तरी त्यावेळींही, ती आपलें स्त्रीत्व विसरत नाहीं व मधून मधून त्या स्त्रीत्वाकडे तिचें अंत:करण वळतच असतें, असाच सर्व सूक्ष्मदर्शी लोकांचा अनुभव आहे. भारतीय शास्त्रकारांनीं स्त्रियांविषयींचे आपले विचार पक्के करण्यापूर्वी हें सर्व मानसशास्त्र पुरें लक्षांत घेतलें आहे.

येथपर्यंतच्या विवेचनावरून हें लक्षांत येईल कीं, शास्त्रकारांना विवाहाच्या दृष्टीनें प्रेमाचा विचार करतांना स्त्रीस्वभावांत मुख्य तीन दोष दिसून आले. ते असे:

(१) मध्यें न राहतां कोणतें तरी टोंक गांठण्याइतकी भावनांची उत्कटता.

(२) प्रथमपासूनच प्रेम ह्या वृत्तीची जाणीव नसून विशेषकालीं विशेष अनुभवानें तें उत्पन्न होण्याचा मानवधर्म.

(३) स्वत:च्या प्रेमवृत्तीची परिणामशीलता.

विवाहाचें मुख्य तत्व प्रेम हें करण्याच्या दृष्टीनें त्यांना हे तीन दोष वाटले आणि मनुष्याच्या अंत:करणाचे बारीक बारीक धैर्य प्रकट करणारे सारे ललित अथवा शास्त्रीय वाङमय या त्यांच्या निर्णयाचें समर्थनच करतात.

## प्रेमाची विकासशीलता

प्रेम हें विकासशील आहे हें म्हणणें कदाचित् कोणास पटणार नाहीं. कारण हल्लींच्या पुष्कळ वाङमयांत अशा तऱ्हेचा सूर वाहतो कीं, येशू ख्रिस्तावर ईश्वरीकृपा जशी खबूतराच्या रूपानें एकदम उतरली त्याप्रमाणें कोणत्या तरी प्रसंगानें मनुष्याला प्रेमाचा एकदम साक्षात्कार होतो आणि सारें प्रेमतत्व त्याच्या एकदम स्वाधीन होतें. हें म्हणणें काव्यमय असलें तरी सत्यमय नाहीं. असल्या तऱ्हेची प्रेमाची कल्पना कादंबरीच्या अद्भुत प्रांतांतच शक्य आहे. मनुष्य जातींत ती अपवादरूपानें शक्य असली तरी अपवाद हा नियम केव्हांही होऊं शकत नाहीं. आजकाल, या कल्पनेनें मनुष्यप्राणी वेडे होऊन गेलेले दिसतात याचें कारण इतकेंच कीं, ती अद्भुत कल्पना आहे व हल्लींच्या युगांत प्रभावशाली मुख्य रस अद्भुत आहे. एका काळीं वीररसाचा प्रभाव होता व माणसांचीं अंत:करणें वीर-रसानें सर्वांत अधिक मोहून जात. शांत रसाचाही एक काळ झाला. हल्लीं अद्भुत रसाचा काळ आहे. आचार, विचार, वेष, कल्पना, भाषा, इत्यादि सर्वांत कांहींना कांहीं तरी अद्भुतता आणण्याचा अलीकडे जो अट्टाहास चालू आहे त्याचें कारण हेंच आहे. म्हणूनच ही प्रेमाची अद्भुत कल्पनाही पसरलेली आहे व डोळे मिटून, कांहीं काळ, माणूस तिच्यांत आनंदानें डोलूं शकतो. परंतु प्रत्यक्ष अनुभव पाहिला तर मात्र तिच्या उलट आहे. इतर कोणताही विचार न करतां केवळ मनोदेवानें कौल दिला तो खरा

मानून प्रेमाच्या भरंवशावर झालेले प्रेमविवाह दुसऱ्याच दिवशीं मोडून जाण्याचे प्रसंग येतात त्याचें कारण हेंच आहे. स्त्रीप्रेमाचा इतिहास पाहिला तरी त्यावरून हेंच दिसून येतें. अपवादात्मक व्यक्ति टाकल्या तर सामान्यत: असा अनुभव आहे कीं, 'accident, blind contact and strong necessity of loving* या जशा पुरुषप्रेमाच्या पायऱ्या आहेत त्याचप्रमाणें (१) **सौजन्य**, (२) **लोभ**, (३) **स्नेह**, (४) **सख्य** आणि (५) **प्रेम** या स्त्रीप्रेमाच्या पायऱ्या आहेत. स्त्रीपुरुष संबंध जेथें कुठें कोणच्याही प्रकारचे समाधानकारक आढळतात तेथें ते या पांचांपैकीं कोणत्या तरी अवस्थेंत आणि या अवस्थांच्या क्रमानें परिणत झालेले असे आढळतात. **सौजन्य** म्हणजे एकमेकांशीं गोड रीतीनें (मग तें कित्येक वेळां मनाविरुद्ध असलें तरीं तसें) वागावेसें वाटणे. हें नुसत्या सहवासाचें परिणत फळ आहे. यापुढें आपल्या भलेपणाकरितां असें गोड न वागतां माणूस आवडूं लागणें, आपल्या सुखदु:खाच्या प्रसंगीं त्याची आठवण होऊन तें सुख किंवा दु:ख त्याच्याकरतां थोडें तरी अडणें याचें नांव **लोभ**. वाती मागून तेल ज्याप्रमाणें धांवत जातें त्याप्रमाणें एकमेकांच्या वृत्ति एकमेकांत भरून राहणें याचें नांव **स्नेह**. सर्वसाधारण माणसाची उडी येथपर्यंत जाते व यालाच व्यवहारांत प्रेम म्हणतात. याच्या पुढील पायरी सख्य ही आहे. नुसतीं एकमेकांचीं अंत:करणें एकमेकांत गुंतून न राहतां सहजच त्यांच्यांत एकरूपता होणें याचें नांव **सख्य**. 'समप्राण: सखा स्मृत:' किंवा 'तस्मात्सखा त्वमसि यन्मम तत्तवैव'. याचें नांव सख्य. प्रेम ही याच्या पुढील सर्वोच्च पायरी आहे. प्रेम म्हणजे एकात्मता. अनेक दिव्यांतून एकच विद्युत्प्रवाह पेटतो त्याप्रमाणें देह दोन असले अथवा जीव दोन असले तरी त्यांच्यांत चैतन्याची एकच ज्योत असणें याचें नांव **प्रेम**. पुराणांनीं या प्रेमाची कल्पना गोपींच्या रूपानें पुढें ठेवली आहे. कृष्णावर त्यांचें असें प्रेम होतें. स्त्रीच्या ठिकाणी बहुधा सौजन्य हें असतेंच. आणि तिच्या अंत:करणांत निरंतर वास करणाऱ्या मातृत्वामुळें त्याचें रूपांतर

---

* अविचार, सहवासाचा सहज परिणाम अथवा व्यावहारिक आवश्यकता.

लोभांत व्हावयास केव्हांही वेळ लागत नाहीं. त्याला एवढें तेवढें निमित्त किंवा निव्वळ सहवासही पुरतो. परंतु या लोभाचें स्नेहांत रूपांतर होणें ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाहीं. स्नेहासंबंधीं एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, पुरुषाप्रमाणेंच स्त्रियांत देखील सर्व स्त्रिया स्नेह करूं शकत नाहींत. म्हणजे कांहीं अशाही असतात कीं, साऱ्या जन्मांतही त्या कधीं स्नेहाच्या पदवीस येऊं शकणार नाहींत. अशा स्त्रियांसच एलिनॉर ग्लीन या नटीनें तटस्थ म्हणजे neuter म्हटलें आहे. अशा स्त्रिया विद्याव्यासंग, सार्वजनिक कामें किंवा अशाच प्रकारचें कांहीं तरी ध्येय ठेवून द्रव्य किंवा कीर्ति इत्यादि कांहीं एषणांच्या साह्यानें एकट्या आयुष्य घालवूं शकतात. त्यांनीं लग्न केलें अथवा अनेक पुरुषसहवास करून त्यांस समागमसुख दिलें तरी देखील त्या प्रेमसुख देऊं शकत नाहींत. त्यांच्या ठिकाणीं स्त्री-प्रज्ञाच नसते. फार झालें तर योगाभ्यास, आत्मविद्या यासारख्या श्रेष्ठ उद्योगांतही त्या लक्ष घालूं शकतील. पण आतांपर्यंत सांगितलेल्या प्रेमाच्या विषयास त्या अनधिकारी असतात. एलिनॉर ग्लीनच्या 'माता आणि सखी' या दोहोंना एकाच वर्गांत टाकून बृहदारण्यकानें स्त्रियांचे दोनच वर्ग केले आहेत. याज्ञवल्क्याच्या दोन बायकांपैकीं मैत्रायणी ब्रह्मवादिनी होती. परंतु 'स्त्री-प्रज्ञा तर्हि कात्यायनी' अशी दुसरी होती. अशी स्त्री-प्रज्ञा ज्यांची आहे अशांतील उपजत मातृभावाच्या स्त्रिया फार श्रेष्ठ दर्जाच्या होत. सर्वसामान्य स्त्रियांना त्या भावावर पाऊल टाकावयाचें असतें. आतांपर्यंत केलेल्या प्रतिपादनावरून एक गोष्ट लक्षांत येईल कीं, मातृत्वाचा संपूर्ण विकास हीच एका मनुष्यजन्मापुरती स्त्रीजातीची इतिकर्तव्यता आहे असें भारतीयांनीं ठरविलें आहे आणि म्हणून त्यांच्या विवाहसंस्थेचें धोरणही ती जेणेंकरून साध्य होईल अशा प्रकारचें आहे. इतर संस्कृतींनी स्त्रीहृदयांतील हें मातृत्व ओळखलें आहे. मात्र, तेंच तिची इतिकर्तव्यता हें त्यांस अजून पटलें नाहीं. त्यामुळें स्त्री-प्रेमाच्या त्यांच्या कल्पना अजून एका सूत्रांत बसलेल्या नाहींत. रमणी, कन्या, भगिनी, सखी, माता इत्यादि सर्व, त्यांच्या कल्पनेप्रमाणें स्त्रीप्रेमाचे भिन्नभिन्न नमुने आहेत तर आमच्या कल्पनेप्रमाणें त्या एकाच क्रमांतील पायऱ्या आहेत. असें असल्या-मुळें बहुतेक इतर सर्व लोकांच्या स्त्रीपुरुष संबंधाचें ध्येय सख्य हें आहे.

हा बारीक फरक त्यांच्या आमच्या स्त्री- विषयक धारणेंत लक्षांत ठेवणें जरूर आहे.

## तरुणींचे दोन भाव

या सख्याचें पूर्वरूप जो स्नेह, तो उत्पन्न होण्याचाही कांहीं प्रकार आहे असें वर म्हटलें आहे, त्याचा थोडा विचार करूं. त्यापूर्वीं स्त्री-स्वभावाचा आणखी एक विशेष लक्षांत घेतला प हिजे कोणत्याही बाबतींत टोकास राहण्याच्या गुणामुळें स्त्रीहृदय म्हणजे सर्व प्रकारच्या विरोधांचें अधिष्ठान आहे. शारिरीक दुर्बलतेमुळें आणि मागें सांगितलेल्या रीतीनें धृतीचा कमीपणा असल्यामुळें स्त्री-स्वभावांत एक प्रकारचा कमालीचा भित्रेपणा उत्पन्न झालेला असतो. त्या भित्रेपणामुळेंच ती चाणाक्षपणा, सावधपणा, संशय, धूर्तता, चातुर्य, कौशल्य, इत्यादि गुणांत संस्कृत कवींनीं म्हटल्याप्रमाणें 'निसर्गपाण्डित' आहे. नित्य व्यवहारावरूनही ही गोष्ट सिद्ध होईल. मुद्दाम केलेली गोष्ट सहजगत्या घडली आणि सहज घडलेली गोष्ट हेतुपुरस्सर अथवा खोल विचारानें केली असें भासविणे, हा त्यांचा एक विशेष आहे. या स्वभावधर्माला अपवादक अशी एकही स्त्री आढळणार नाही असें म्हटलें तरी अतिशयोक्ति होणार नाही परंतु दुसऱ्या बाजूनें, या निसर्गपाण्डित्याइतकाच एखाद्या लहान बालकासारखा स्त्रीस्वभाव सरळ व भोळा आहे. स्त्रिया वयांत आल्या म्हणजे सामान्यत: त्यांची वाढ दोन भावांना धरून होत असते. एक बालकभाव आणि दुसरा रमणीभाव. यांपैकीं कोणत्या तरी एका भावास धरून प्रत्येक तरुणीची वाढ होते. रमणीभावाच्या स्त्रियांना, आपलें स्वत:चें शरीर व अंत:करण ही एक अतिशय अमूल्य व अलौकिक वस्तु असून कोणा तरी योग्य माणसास तिचें निरपेक्ष दान करून स्वत: केवळ त्या सत्कृत्याचा आनंद उपभोगावयाचा आहे, याची अंतर्गत जाणीव असते. अशा स्त्रिया आपली स्वाधीनता सर्वस्वी केव्हांच विसरूं शकत नाहींत. याच्या उलट बालकभावाच्या स्त्रियांची स्थिति असते. त्या स्वत: कितीही बुद्धिमान व कर्तृत्वशाली असल्या तरी, लहान मुलाला ज्याप्रमाणें वडील माणसाचा आश्रय लागतो तशी त्यांची स्थिति असते व लहान मुलाप्रमाणेच त्या वडील माणसा-

संबंधी त्यांची सरल धारणा असते. लहान मुलाला ज्याप्रमाणें चंद्राकडे बोट दाखवून एकदां आई सांगते कीं, 'हा चांदुमामा अं !' कीं झालें! तो त्याचा मामा बनतो. त्याबद्दल त्याला कधीं शंकाही येत नाहीं. त्याचप्रमाणें, इतरही सर्व विषयांत चांगले-वाईटपणाची दिशा एकदां दाखवून दिली, हा तुझा भाऊ, ही तुझी काकू, ही ताई, असें एकदां शिकविलें म्हणजे झालें, त्याप्रमाणें त्या त्या वृत्तीनें तो खरोखरच त्यांच्याशीं वागू लागतो. तशीच शक्ति स्त्रियांच्या अंतःकरणांतही, त्यांचा सहजसिद्ध बालकभाव जर मुद्दाम नष्ट झाला नसला तर पूर्णपणें असते. या दोन भावांमुळें स्त्रियांच्या स्नेहाचे हेतूही दोन होऊं शकतात. एक, वर सांगितल्याप्रमाणें वडील मनुष्य अथवा शास्त्र अथवा कुटुंब, समाज असें कांहीं तरी वडील वाटणारें जें असेल त्याचें अनुशासन आणि दुसरा, तसें अनुशासन नसतांही आत्मप्रवृत्ति. ही आत्मप्रवृत्ति बहुशः पांच कारणांमुळें उत्पन्न होते (१) शुद्ध विषयवासना (२) कृतज्ञता (३) दया किंवा औदार्य (४) हौस (विलासप्रियता इत्यादि मनोधर्म या हौसेंतच येतात) (५) ज्याला प्रेम म्हणतां येईल असा 'आन्तरःकोऽपि' शुद्ध हेतु. प्रेमाच्या बाबतींत पुरुषाचा गुरु असलेल्या स्त्रीच्या अंतःकरणांतच, निरनिराळ्या भावनांचें, हें असें सूक्ष्म व दाट जाळें आहे. त्या सर्वांचा विचार करून भारतीयांनीं असें ठरविलें कीं, प्रेम हेंच काय तें विवाहाचें एकमेव तत्त्व ठरविणें धोक्याचें आहे. कारण मागच्या साऱ्या भानगडी लक्षांत घेऊन कोणाच्याही प्रेमाचें स्वरूप ओळखणें हेंच आधीं प्रारंभीं अशक्य; मग, त्याच्या अनुरोधानें त्याला विवाह करावयाला सांगणें त्याहून अशक्य. तशा कांहीं भानगडींत न पडतां केवळ अंतःकरण-प्रवृत्तीला प्रमाण मानून कोणत्या तरी वृत्तीला प्रेम म्हणून त्या धोरणानें विवाह करावयास सांगावें तर त्यांत शास्त्रीयता नाहीं. विचारी माणसाचें त्यानें कधींच समाधान व्हावयाचें नाहीं. बरें, एकमेकांविषयीं वाटणाऱ्या आकर्षणांत प्रेम असतेंच असें म्हटलें तरी, मागें सांगितल्याप्रमाणें ती वृत्तीच विकासशील असल्यामुळें विशेष उदाहरणांतलें प्रेम जगणारें आहे का मरणारें आहे, चिवट आहे का तकलादी आहे, वर्धमान आहे का वाढ खुंटणारें आहे, इत्यादि गोष्टी ठरविण्यास कांहींच गमक नाहीं. असें

कांहीं गमक नसल्यामुळें नुसतें प्रेम प्रेम म्हणून एकमेकांच्या गळ्यांत गळा घालणारें अरुन्धती–सत्यवान हें जोडपें क्षणभरानें एकमेकांचा द्वेष करतांना आढळतात. प्रेमाची ही विकासशीलता लक्षांत घेऊन भारतीयांनीं तिचा मोठ्या कुशलतेनें उपयोग करून घेतला. याच्या उलट, तिचें महत्त्व अगदींच न ओळखणाऱ्या नवयुगांतील प्रेम–विवाहांत तिचा फार दुष्परिणाम दिसून येतो.

## प्रेम आणि लज्जा।

स्त्री स्वभावतःच लज्जाशील आहे हें खरें आहे. पशुपक्ष्यांत देखील स्त्रीच्या ठिकाणीं ही लज्जा सूक्ष्म प्रमाणांत आढळून येते. 'नवयुग' कारांनीं तर असाही अनुभव सांगितला आहे कीं, बाजारांत बसून देहविक्रय करणाऱ्या वेश्याही एकान्तांत लाजतात. अलीकडे, स्त्रियांचा हा सहजधर्म होईल तितका नष्ट करण्याचे प्रयत्न चालले आहेत. या **लज्जेचा** उपयोग **प्रेमाला खतासारखा होतो**. हें खत न मिळालें तर वेळेस त्याचें मूळ उघडें पडून करपून जातें, ही गोष्ट पुष्कळांच्या लक्षांत येत नाहीं. "नवयुगांतील प्रेमविवाह" असें मुद्दाम म्हटलें आहे त्याचा कांहीं हेतु आहे. पूर्वीच्या पद्धतींत स्वयंवर, अनुनय (courting) वगैरे सर्व कांहीं प्रकार असले तरी ते सारे प्रकारही कांहीं मर्यादित क्षेत्रांत होते. आणि मर्यादित क्षेत्रांतले प्रेमविवाहच यशस्वी झाल्याचा अनुभव आहे. म्हणजे स्त्रियांच्या सहवासांत येणारी माणसें बहुशः वडील माणसांच्या परीक्षेतून चांगलीं ठरलेलींच असत व अशा माणसांतून मग पुढें अंतःकरणप्रवृत्तीनें निकाल व्हावयाचा असतो. अंतःकरणानें निकाल दिलेला असला तरी देखील, कोणत्या तरी तऱ्हेचा प्रत्यक्ष विवाहविधि होईपर्यंत आणि तसा तो झाल्यावरही तरुणींची प्रवृत्ती लज्जेचें आवरण न टाकतां 'रक्ष विनयं' असें प्रियकराला दटावण्याची असे. हल्लींच्या प्रेमविवाहांत काय होतें कीं, स्त्री आणि पुरुष, वडीलांच्या अनुभवाचा असा कोणताच फायदा न मिळतां यदृच्छेनें गांठ पडून एकमेकांकडे ओढले जातात. प्रथमपासूनच ते समानभूमिकेवर असतात आणि प्रत्यक्ष संभोग नसला तरी तेथपर्यंतच्या

सर्व अवस्था आधींच अनुभवून टाकतात. सख्यत्वाच्या (सखीभावाच्या नव्हे !) अनैसर्गिक कल्पनांमुळें लज्जेचें आवरणही त्यांनीं झुगारून दिलेलें असतें. म्हणजे, फुलाआधीं फळ असा प्रकार होऊन प्रत्यक्ष संभोग काय तो शिल्लक राहतो आणि त्याच्या सुखाची जागा, अनुनयांतील अर्थ-शून्य शब्दजाल आणि संभोगसुखाच्या कल्पनेचा भ्रम यांनीं भरून निघते. याचा परिणाम असा होतो कीं, विवाह होऊन प्रत्यक्ष संभोग झाल्या-बरोबर, क्रमाक्रमानें त्याची गोडी वाढविणारा मसाला आधींच खलास करून टाकला असल्यामुळें प्रत्यक्ष तो अनुभव अत्यंत क्षणिक व बेचव होऊन त्याची पशुतुल्यता एकदम अंतःकरणावर प्रतिबिंबित होते. अशा रीतीनें एकदां मुख्य भ्रम निरस्त झाला कीं, त्याच्यासुद्धां सर्व जीवनाला यन्त्राचें स्वरूप येतें. जीवनांतली उणीव भरून निघतच नाहीं, कांहीं तरी कमी पडतें, असें वाटूं लागतें व मग ती उणीव भरून काढण्याकरतां व्यासंग, कलेची उपासना, समाजसेवा, लोकोपकार असलीं कांहीं तरी थोतांडें उभीं केलीं जातात. या गोष्टी वाईट आहेत असें नव्हे, परंतु अंतःकरणाची उणीव भरून काढण्याच्या दृष्टीनें तीं केवळ थोतांडेंच आहेत. न्यू थिएटर्सच्या 'जिन्दगी' या सुंदर बोलपटांत हें हृदविदारक सत्य उघडें केलें आहे. भारतीयांनीं प्रेमाची विकासशीलता ओळखून आपली विवाहसंस्था होतां होईल तों या दुष्परिणामापासून दूर ठेवली आहे. स्त्रीनें नवऱ्यापुढें नेहमीच लाजावयाचें, इतकेंच तर काय, त्याचें नांवही लाजविल्याशिवाय घ्यावयाचें नाहीं; इत्यादि अनेक गोष्टींत, कोणत्याच प्रकारच्या जुलमाचें अथवा विषमतेचें तत्त्व नाहीं, प्रेमाचें कोंवळें मूळ उघडें पडून करपून जाऊं नये याविषयीं खबरदारी आहे. त्याचा जास्त विचार पुढें करूं. आतां या सर्व मानसशास्त्राचा भारतीयांनीं विवाहांत कसा उपयोग केला तें पाहूं.

---

श्री. क. ४५८७

## प्रकरण ४ थें

# अधिकाराची विषमता व शास्त्र

आतांपर्यंत सांगितलेल्या बारीक दृष्टीनें विचार करून रचलेल्या भारतीयांच्या विवाहसंस्थेकडे नुसती ओझरती नजर टाकली तरीही जी गोष्ट चटकन लक्षांत येते ती ही कीं, तिची उभारणी स्त्रीपुरुषांच्या अधिकाराच्या विषमतेवर केली आहे. विषमतेवर केली आहे म्हणजे तिच्यांत कांहीं अर्थ नाहीं असें मात्र नाहीं. इंग्रजी गायनांत हार्मनी म्हणून जो प्रकार आहे तो, सप्तसुरांची संगति म्हणून जी कांही समजली जाते तिच्या विषमतेवरच रचलेला आहे.* परंतु, त्यामुळें स्वतंत्र गायनप्रकार

---

*Another factor that perplexes and disconcerns many a listener when he first approaches modern music is its high degree of dissonance. Here once more, his instinct is probably right in the main. (R. O. Morris, B. A., Professor of Harmony & Comiter point in the Royal College of Music, London.) पाश्चात्य संगीत ऐकल्याबरोबर पुष्कळ श्रोते जे घोटाळ-सात आणि विमनस्क होतात, त्याचें कारण स्वरांतील पराकाष्टेचा विसं-वाद. आणि तसें पाहिलें तर त्याची ती अनुभूती केवळ मिथ्या आहे असें म्हणतां येत नाही. (आर. ओ. मॉरिस बी. ए. लंडन येथील रॉयल कॉलेज या गांर्धव विद्यालयांतील प्रोफेसर.)

उत्पन्न झाला आहे यांत कांहीं शंका नाहीं. म्हणून, केवळ विषमतेवर आधारलेली आहे एवढ्याचकरितां आमच्या विवाह संस्थेंत कांहीं अर्थ नाहीं, असें कोणास म्हणतां येणार नाहीं. याचा अर्थ असा कीं, तिच्यांत स्त्रीपुरुषांच्या अधिकाराची विषमता आहे, तेव्हां तिच्यांत कांहीं शास्त्रीयता असणें शक्य नाहीं, जो काय आहे तो शास्त्रकारांचा दुरभिमान, पुरुषी अरेरावी, स्त्रीजातीला उपभोग्य समजून तिच्या जीवावर स्वतः हवी तशी चैन करण्याची प्रवृत्ति, मत्सर, द्वेष असाच सारा मामला आहे, हें म्हणणें सयुक्तिक नाहीं. मनुष्यजात झाली तरी अंतःकरण प्रवृत्तीच्या दृष्टीनें येथून तेथून सारी एकच आहे. कोणीही एक वर्ग दुसऱ्या वर्गाला निरंतर अज्ञानांत ठेवूं शकत नाहीं व अशा रीतीने दुसऱ्याला दास्यांत ठेवून स्वतः सुखी होऊं शकत नाहीं. देशांत निरनिराळ्या अधिकारांच्या जीवांचे थर पडतात ही गोष्ट खरी आहे. तरी पण कोणत्याहि काळीं अगदीं अधरोत्तर वर्ग घेतले तरी त्यांच्यामध्यें, कांहीं पाषाण युगांतले, कांहीं विसाव्या शतकांतले असा फरक कधींच असूं शकत नाहीं. मनुष्यास आपलें जीवन कंठण्यास लागणारें ज्ञान, आपले हिताहितसंबंध व नित्य व्यवहारांतील अशाच सामान्य गोष्टी यांच्या दृष्टीनें सर्व समाजाच्या ज्ञानाची एक सरासरी ठरली जाते. तिला अपवादक असे जीव केवळ अपवादात्मकच असतात, आणि असाही सार्वत्रिक अनुभव आहे कीं, समाजांत असून अथवा नसूनही त्यांचा समाजांशीं संबंध क्वचितच येतो. पाण्यांत राहणाऱ्या पद्मपत्राप्रमाणें ते अलिप्तच असतात. असे अपवाद सोडले तर समाजांतील निरनिराळ्या थरांत जो फरक असतो तो अज्ञानाचा नसतो, विशेष ज्ञानाचा असतो. त्यामुळें मात्र समाजांत पुढारी व अनुयायी असे वर्ग उत्पन्न होऊन पुढाऱ्यांच्या मोठ्या जहाजांना अनुयायांची होडगीं जोडलीं जातात व एकामागून एक असा प्रवास सुरू होतो. अशी परिस्थिति असल्यामुळें विशेष ज्ञानाच्या अथवा कर्तृत्वाच्या दृष्टीनें खरोखरच अधिकारभेद असल्याखेरीज नुसत्या जुलुमानें अथवा फसवेगिरीनें कोणताहि एक वर्ग दुसऱ्या वर्गास शेंकडो किंवा हजारों वर्षें एकजात एकसारखा दास्यांत ठेवूं शकत नाहीं. भारतीयांच्या इतिहासांत मात्र कमींत कमी आठदहा हजार वर्षांची परंपरा अशी आहे कीं, विवाह-

संस्थेंत स्त्री ही अधिकारदृष्टया पुरुषापेक्षां अगदीं निराळी समजली गेली आहे. कमी समजली गेली आहे असें मात्र मी म्हणत नाहीं. कारण एकतर, कमीजास्त हे शब्द सापेक्ष आहेत. कोणत्यातरी एका स्थिर बिंदूच्या सापेक्षतेनें त्यांना किंमत येते. एरवीं त्यांना अर्थच नाहीं. स्थिर बिंदु जर बदलला तर कमी आहे तें जास्त होईल आणि जास्त आहे तें कमी होईल. दुसरें असें कीं, कोणत्याही काळचे शास्त्रकार क्षुद्र अथवा अशुद्ध हेतूनें शास्त्ररचना करीत नाहींत. तसें म्हणणें म्हणजे शास्त्र शब्दाचाच उपमर्द करण्यासारखें आहे. शास्त्रकार आपल्या काळीं इतरांहून विशेषज्ञच असतात. समाजाची प्रगति होऊन ज्ञान वाढलें म्हणजे तेच अज्ञानी ठरतात हा भाग वेगळा. एकतर त्यामुळें त्यांचें शास्त्र कोतें पडून निराळ्या परिस्थितींतील समाजास अहितकारक होतें, अथवा उत्तम शास्त्र असूनहि मनुष्य आपल्या उद्दामपणानें तें बाजूस सारून मधून मधून समाजांत जे घोटाळे उत्पन्न करतो, त्यामुळें, परिपालन न केल्यामुळें तें शास्त्र लटकें पडतें. भारतीयांचीं अनेक शास्त्रें अतिशय परिणत असूनहि त्यांच्यामुळें समाजांत आज पुष्कळ बाबतींत असंतोषकारक परिणाम आढळून येतो, हें खरें आहे. पण माझें म्हणणें असें आहे कीं, वर्डस्वर्थच्या म्हणण्याप्रमाणें तो मनुष्याचा पराक्रम (what man has made of man) आहे. (!) त्याचें खापर शास्त्राच्या माथीं फोडणें एक तर मतलबीपणाचें अथवा असमंजसपणाचें आहे.

आमच्या विवाहसंस्थेंतील विषमता जर कोठें प्रथम जाणवत असेल तर, तिनें विवाहसंस्था टिकविण्याची सारी जबाबदारी स्त्रीवरच टाकल्यासारखी दिसते, या गोष्टींत आहे. नुसतें दिसतें असेंच नव्हे तर तें आहेही तसेंच. पुरुषाकडे कांहीं जबाबदारी नाहीं असें नाहीं. परंतु स्त्रियांच्या मानानें ती जबाबदारी कमीच आहे हें कबूल करणें भाग आहे. ती जबाबदारी झुगारून देऊं म्हटल्यास पुरुष जितका दोषी ठरतो त्या मानानें स्त्री किती तरी पटीनें जास्त ठरते व ती जबाबदारी पार पाडीत असतांनाही पुरुषांना जितकी सवलत आहे त्या मानानें स्त्रीला किती तरी कमी आहे, हें पाहिलें म्हणजे विवाहसंस्थेच्या रक्षणाची सारी जबाबदारी शास्त्रकारांनीं

स्त्रीवरच टाकली आहे हें म्हणणें अतिशयोक्ति होत नाहीं. हल्लीच्या काळीं, सुशिक्षित म्हणविणारी एखादी प्रौढ स्त्रीच तर काय पण चार पुस्तकें वाचलेली अल्लड मुलगीही सहज असाच प्रश्न विचारते कीं, 'पुरुषांनीं एकाच काळीं अनेक भार्या केल्या तरी शास्त्रकारांना तें मानवतें पण स्त्रीनें पतिव्यतिरिक्त नुसता कोणाशीं स्नेह केला तरी देखील अब्रम्हण्यम् होऊन जातें, याला पुरुषाची अरेरावी म्हणावी नाहीं तर दुसरें काय म्हणावें?' शास्त्रकारांच्या जुलुमाची भाषा तिच्या कानावर अशा रीतीनें व इतकी पडलेली असते कीं, दुसऱ्या रीतीनें तिला कितीही समजावून सांगितलें तरी, वर्डस्वर्थला भेटलेल्या अजाण बालिकेच्या "Nay, we are seven" (आम्ही सातच भाऊ आहोंत) या आग्रहाप्रमाणें "तें कांहीं नाहीं, शास्त्रकारांचा जुलूमच हा" हें तिचें पालुपद कांहीं सुटत नाहीं!

शास्त्रकारांनीं जर अशी जबाबदारी विषमतेनें विभागली असली तर त्यांची दोनच कारणें असूं शकतील. एक, आजच्या परिस्थितींत जरी तशी गरज नसली तरी त्यांच्या काळीं ती गरजच असेल. म्हणजे त्यांच्या पुढें जें ध्येय व जी परिस्थिति होती तिला तें करणें अवश्य होतें किंवा दुसरें असें कीं, आपणांस जरी तें अप्रिय वाटलें तरी तें सार्वकालिक असें कठोर सत्यच असेल. उदाहरणार्थ, पुरुषानें मोठ्या ऐटीनें स्त्रीच्या ठिकाणीं बीज ठेवून वाटेल तसें वागण्यास मोकळें व्हावें, परंतु स्त्रीनें मात्र त्याचा परिणाम म्हणून निदान दहा महिने तरी ओकाऱ्या काढीत आणि कण्हत कुण्हत पडावें ही परिस्थिति सर्वथैव विषम आहे. सुखाची प्राप्ति दोघांसहि सामान्यत: सारखीच, परिणामांत मात्र कांहीं, काळ जीव नकोसा वाटण्या-इतका फरक. इतकेंच नव्हे तर, वेळेस प्राणाशींही गांठ. प्रसूतिवैराग्य हा शब्दप्रयोग सर्वांच्याच परिचयाचा आहे. आपणास जरी पटत नसली तरी आजच्या घडीला अशी परिस्थिति आहे हें खरें. निसर्गानेंच तशी विषमता केली आहे; त्याला कोण काय करणार ? कठोर सत्य म्हणूनच त्याचा स्वीकार करणें भाग आहे. अशा प्रकारेंच, विषमता दिसूनही कठोर सत्य म्हणून शास्त्रकारांनीं जर निर्भयपणानें तें पतकरलें असेल तर त्यांना दोष देणें सयुक्तिक होणार नाहीं. यावर नेहमीं असा युक्तिवाद केला जातो कीं,

अनुक्रम ...339.CL... दि: ...
क्रमांक ...23CL..... नों: दि. ...

"निसर्गावर संपूर्ण विजय मिळवीपर्यंत मनुष्याला त्याच्यापुढें निमूटपणें वांकणें भागच आहे. एवढ्याकरतां केवळ नैसर्गिक विषमता म्हणून जी असेल ती खेरीजकरून इतर सर्व बाबतींत तरी संपूर्ण समता कां करूं नये? अपत्योत्पादनाच्या लालसेनें थोडेंसें पुरुषवश होणें हा निसर्ग असेल, परंतु तें अपत्य स्त्रीनें एका ठराविक पुरुषाकडूनच करून घेतलें पाहिजे अथवा तेवढ्याकरतां इतर सर्व बाबतींतही पुरुषांचें दास्य पतकरलें पाहिजे, यांत कसला आला आहे निसर्ग ? या बाबतींत स्त्रीची जी लतिकावृत्ति आढळते तो, पुरुषांनीं तिला अज्ञानांत ठेवून तिच्या मनावर बळेंच रूढ केलेला अनैसर्गिक संस्कार आहे." मागें रशियन स्त्रीचें उदाहरण घेऊन ही लतिकावृत्ति केवळ अनैसर्गिक नाहीं हें दाखविलें आहे. आतां या लतिकावृत्तींत पुरुषाचा भाग केवढा आहे तें पहावयाचें आहे.

## स्त्री ही अधिक विश्वसनीय आहे

कांहीं व्यक्तींनीं मिळून एक कार्य करावयाचें असें ठरलें तर, नित्याचा अनुभव असा आहे कीं, त्याचा बोजा त्या व्यक्तींत जो जास्त लायक असेल त्याच्यावरच पडतो. कुटुंबापुरतें पाहिलें तरी, कुटुंबचालक म्हणून जो असतो तो बहुतकरून काबाडकष्टाचाच भागीदार असतो. कुटुंब चालविण्याकरितां पुष्कळ प्रसंगीं त्याला आपलें स्वतःचें व्यक्तित्व मारून टाकावें लागतें. कुटुंबांतल्या कर्त्या माणसानें उकिरड्यासारखें राहिलें पाहिजे असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. निसर्गाप्रमाणेंच पाहिलें तर मनुष्यानें असें राहण्याची कांहीं गरज नाहीं. इतकेंच नाहीं तर, तें अनैसर्गिकच आहे. परंतु, कुटुंब चालविलें पाहिजे ही आवश्यकता एकदां त्याचा मनांत उत्पन्न झाली कीं एतद्वासनायुक्त जीव या दृष्टीनें उकिरडा बनणें हा त्याचा निसर्गच ठरतो. भारतीय विवाहसंस्थेंत स्त्रीपुरुषाच्या अधिकारांत विषमता होऊन स्त्रीकडे जो कठीण भाग आला आहे त्याचें कारण हें आहे. विवाहसंस्था टिकविण्यास स्त्री ही जास्त लायक आहे. त्या कामाला लागणारे गुण तिच्यांत जास्त आहेत म्हणून तिच्याकडे हा भाग आला आहे. कोणत्याही संस्थेच्या दृष्टीनें दोन गोष्टी आवश्यक आहेत. एकतर, तिचें जें ध्येय ठरलें असेल त्याकडे तिची नेहमी

प्रगति होत राहणें आणि दुसरें, ती मोडून जाणार नाहीं अथवा विस्कळित होणार नाहीं अशा भक्कम पायावर तिची उभारणी होणें. मागें केलेल्या प्रतिपादनावरून भक्कमपणाच्या दृष्टीनें पुरुषापेक्षां स्त्रीच जास्त भरवं-सेशीर आहे हें सहज लक्षांत येईल. पुरुष हा शिकारी वृत्तीचा आहे तशी स्त्री नाहीं हें मागें सांगितलें आहे; आणि कोणत्याही विवाहसंस्थेचें स्वरूप नियंत्रणात्मक असतें हेंही सांगितलें आहे. या नियंत्रणास एकनिष्ठ राहण्याची पात्रता निसर्गतःच पुरुषापेक्षां स्त्रींत अधिक आहे. म्हणून, विवाहसंस्था स्थिर करावयाची तर पुरुषापेक्षां स्त्रीच जास्त विश्वसनीय आधार आहे. निसर्गतः तिची प्रवृत्ति एकनिष्ठच आहे. तिची लतिका-वृत्तीही हेंच दाखविते. लतिका कोणत्यातरी एका वृक्षाच्याच आधारानें उभी राहते आणि मग आपल्या कोमल करपाशांत हव्या तितक्या वस्तूंना कवटाळून घेते.

पुरुष शिकारी आहे, स्त्री तशी नाहीं; अथवा, स्त्री ही स्वभावतःच एकनिष्ठ असते असें वाचलें म्हणजे कित्येक वाचक म्हणतील कीं, "याला अनुभव नाहीं" अथवा "स्त्रीवर्गाची खुशामत करण्याकरितां हा असें लिहितो." कित्येक नवमतवादी असें म्हणतील कीं, "पाहिलेंत, मनुष्य कोणत्याहि मतांचा असो, विचार करूं लागला कीं, उदार बनलाच पाहिजे." परंतु, दोघांचेंही हें म्हणणें योग्य नाहीं. वस्तुस्थिति जशी दिसते तसें बोलणें भाग आहे. पुरुषच शिकारी असतो आणि स्त्री केवळ सावज असते असें नाहीं. स्त्रीच्या ठिकाणींही कोणती वृत्ति अत्यंत प्रबळ आणि दुर्दमनीय असेल तर ती विजिगीषाच होय. परंतु दोघांच्या वृत्तींत महत्वाचा फरक आहे. पुरुषपारध्याला स्त्रीरूपी सावजें पाडाव करूनच समाधान होत नाहीं. त्याला तीं उपभोगावयास पाहिजे असतात. ती त्याला मिळतीलच अथवा त्याकरितां तो अगदी तडफडच करील असेंही नाहीं. पण मिळाल्यास त्याला तीं उपभोगावयास पाहिजे असतात व त्या उपभोगानें जास्त सुखी झाल्यासारखें त्याला वाटतें. स्त्रीची धारणा याच्या अगदी उलट आहे. आपल्या टप्यांत येणारें पुरुष सावज नुसतें घायाळ करून ठेवण्यांत व त्यानें दीन होऊन आपल्या भोंवतीं गोंडा

चोळीत राहावें, अशी त्याची स्थिति करण्यांतच तिचा मोठा आनंद असतो. उपभोग घेण्याच्या दृष्टीनें तिनें त्याला जवळ करणें म्हणजे त्याचा दीनपणा नाहींसा करून त्याच्यावरील आपली सत्ता नष्ट करण्यासारखें आहे; इतकेंच नव्हे तर, स्वतःवर त्याचें स्वामित्व मान्य करण्यासारखें आहे, याची तिला अंतर्गत जाणीव असते. म्हणून त्या पायरीवर ती उतरतांच तिचा तो आनंद राहत नाहीं. एवढ्याकरितां, फार झालें तर सर्व आयुष्यांत एखाद्याच प्रसंगीं आपण होऊन ती त्या पायरीवर उतरते. याकरितांच मी तिला नुसती जिगीषु व पुरुषाला शिकारी असें म्हणतों. परंतु, स्त्री ही सर्व पापांची खाण व तिच्यामुळें पुरुष बिघडतो, अशी सर्वसामान्य समजूत असल्यामुळें तिचा नैसर्गिक एकनिष्ठपणा म्हणजे काय याची फोड केली पाहिजे. नेहमी असा वाद चाललेला आढळतो कीं, कोण कोणाला बिघडवितो ? त्याचा थोडा प्रथम विचार करूं.

---

## प्रकरण ९ वें

# कोण कोणाला बिघडवितो ?

कोण कोणाला बिघडवितो हा वाद बहुतकरून नित्यच चालत आलेला आहे. आणि त्याचें समाधानकारक उत्तर अजून कांहीं मिळालें नाहीं. तसें तें मिळणें कठीणच आहे. स्त्री अथवा पुरुष, दोघांनांही आप-आपल्या वर्गाचा अभिमान असल्यामुळे अर्थातच, प्रत्येकाचा प्रयत्न दुसऱ्याच्या डोक्यावर खापर फोडण्याचा असतो. निसर्गत: पाहिलें तर दोघेही सारखेच जबाबदार असावेत असें वाटतें. परंतु, थोडें सूक्ष्म अवलोकन केलें तर यापेक्षां कांहीं जास्त नियमही या बाबतींत सांगतां येतील. चारित्र्यभ्रष्ट लोकांचीं उदाहरणें गोळा केलीं तर असें दिसून येतें कीं, त्यांचे मुख्यत: दोन वर्ग पडतात. पहिला मोठा वर्ग, दोघांपैकी कोणीतरी आधीं बिघडलेला असून त्याच्यामुळें दुसरा बिघडला अशांचा, चारित्र्यभ्रष्ट लोकांत या वर्गाचें प्रमाण फारच मोठें आहे. दुसरा वर्ग उभयतांही चांगले असून त्यांतील कोणीतरी एकाच्या नादानें आणि अविचारानें दुसरा व म्हणूनच दोघेही बिघडले, अशांचा. या दोनही वर्गांचा विचार निर-निराळ्या रीतीनें केला पाहिजे. या विचारांत प्रत्यक्ष समागमाचें महत्त्व कमी आहे. अगदी कांहीं अपवादात्मक उदाहरणें सोडलीं तर काय वाटेल तें झाले तरी समागमाच्या पायरीवर आपण होऊन पाऊल न टाकण्याइतका स्त्रीचा स्वाभिमान बहुधा केव्हांही जागृत असतो. पशुसृष्टीमध्यें कित्येक जातींत स्त्रीला युद्धांत जिंकून समागम करावा लागतो. तसें केल्याखेरीज तिला समागमाचा आनंदच काय पण प्रवृत्तीही होत नाही. त्याचा हा अवशेष आहे की काय कोण जाणें! थोडा तरी दांडगेपणा पुरुषानें दाखवि-

त्याखेरीज स्त्रीला समागमाचा सारा रसास्वाद मिळाला असें वाटत नाही असें म्हणतात; आणि हेंच गमक धरून विचार केला तर या बाबतींत केव्हांही पुरुषच दोषी ठरेल. कारण पुरुषानें मनावर घेतल्याखेरीज रतिक्रियाच संभवत नाहीं. परंतु ही निर्णयाची योग्य दिशा नाही. रतिप्रसंग होऊन स्त्री-पुरुष शीलभ्रष्ट होतात असें नाही. ते शीलभ्रष्ट होतात म्हणून रतिप्रसंगास बळी पडतात. म्हणून प्रत्यक्ष त्या प्रसंगी 'पहिलें पाऊल' कुणाचें पडतें हा मुद्दा येथें नाहीं. ज्या शीलभ्रष्टतेमुळें ते रतिप्रसंगावर येतात, तिला कारणीभूत असणारा मोह प्रथम कोण कोणाला पाडतो हा येथें मुख्य विचार आहे आणि या गोष्टीच्या विचारापासून कांहीं उपकारक निर्णय काढावयाचा असेल अथवा कांहीं उपयुक्त सूचना घ्यावयाच्या असतील तर या मोहाचा विचार करून त्याला कशा रीतीनें व कोठें खंडून टाकावयाचा अथवा कशी मुरड घालावयाची हें पाहिलें पाहिजे.

## सामान्य नियम

सर्वमान्य समजूत पाहिली तर मोह पाडणारी स्त्रीच होय, अशी आहे. बायबलानें तर तिला मनुष्यजातीच्या सर्व अधःपाताचें मूळ ठरविलें आहे. आमच्याकडीलही, केवळ कांहीं शास्त्रीय प्रसंग टाकले तर, इतर सर्व प्रकारचें वाङ्मय याच निकालास पुष्टि देतें. बौद्ध, जैन वगैरे इतर धर्मपंथांच्या मतांचें तात्पर्य जवळ जवळ असेंच आहे. माझ्या मतानें हा विचार सदोष आहे. हा विचार करतांना, मी आतांच दर्शविल्याप्रमाणें, पतित लोकांचे दोन वर्ग करून त्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. त्याखेरीज केलेला निर्णय सत्यास धरून होणार नाहीं. त्यांत चक्रापत्ति येते. पुरुष आत्मसंयमन करण्यास असमर्थ होऊन समागमाचा दांडगेपणा कां करतो ? तर स्त्री त्याला मोह पाडते म्हणून. पण, स्त्री तरी त्याला मोह काय म्हणून पाडते? तर तिला पुरुषाचा मोह पडतो म्हणून ! म्हणून वर सांगितलेल्या वर्गीकरणाच्या सहाय्याने याचा विचार झाला पाहिजे. चारित्र्यभ्रष्ट लोकांचा हा जो मोठा वर्ग सांगितला त्यांच्यासंबंधानें एकच साधा नियम सांगतां येतो. आणि तो हा कीं, **जो स्वतः आधीं बिघडलेला असतो तो आपल्या तावडींत सांपडलेल्या दुसऱ्याला बिघडवितो; मग,**

एकाद्या उदाहरणांत मूळ स्त्री असेल नाहींतर पुरुष असूं शकेल. तें योगायोगावर अवलंबून राहील. चारित्र्यभ्रष्ट झालेल्या लोकांचा इतिहास प्राय: असाच असतो. व ही गोष्ट इतकी सरळ आहे कीं, तिचा जास्त विचार करावयाचेंही कारण नाहीं. याशिवाय जो दुसरा वर्ग आहे त्याचा मात्र बारीक विचार केला पाहिजे. या दुसऱ्या वर्गांतील लोक मूळचे चांगल्या प्रवृत्तीचे असतात. आपण स्वत: बिघडूं नये, इतकेंच नव्हे तर दुसऱ्यानेंही बिघडूं नये, अशी देखील त्यांची प्रवृत्ति असते. असें असूनही स्वत:च्या दुर्बलतेनें त्यांतील एक विकारवस होतो आणि दुसऱ्यालाही करतो. दोन्ही जीवांची सारख्याच विकारवश अवस्थेंत गांठ पडून एकदम ते अविचारास प्रवृत्त होतात असें सहसा कधींच घडत नाहीं. येथेंही, मुळांत विषम स्थिति असून एकानें दुसऱ्यास ओढण्याचीच क्रिया घडते. फरक इतकाच कीं, तो ओढणारा मूळचा चांगला असूनही विकाराच्या अतिरेकानेंच अविचारी बनतो व दुसऱ्यास बनवितो. अर्थात, या ठिकाणींही अशी व्यक्ति मुळ स्त्री असणें अथवा पुरुष असणें हा केवळ योगायोग आहे. त्यासंबंधी कांहींही नियम सांगतां येणार नाही. परंतु एक साधारण नियम असा दिसून येतो कीं, **विकाराच्या या प्रबलतेचें आणि मनुष्याच्या या दुर्बलतेचें वयोमान मात्र स्त्री-पुरुषांत भिन्नभिन्न आहे.** सुसंस्कृत समाजांतील स्त्री-पुरुषांची प्रवृत्ति बहुधा आत्मनिग्रहाकडे आणि शील-संपन्नतेकडे असते. आणि तसें राहणें त्यांना जडही जात नाही. या बाबतींत मनुष्याच्या अंत:करणाची प्रवृत्ति वाघासारखी आहे. ज्यानें मनुष्याच्या रक्ताची एकदांहि चव घेतलेली नाही तो वाघ माणसावर सहसा हल्ला करीत नाही; इतकेंच नव्हे तर त्याला बराच भिऊन दूरच राहतो. परंतु एकदां कां त्या वाघानें थोडें देखील मनुष्याचें रक्त चाखलें कीं, मग त्याच्यासारखा भयंकर प्राणी कोणीच नाहीं. विषयाच्या बाबतींत स्त्री-पुरुषांची स्थिति अशीच आहे. एकमेकांच्या सहवासाची गोडी आणि संभोगाचा अनुभव ज्यांनी मुळींच घेतलेला नाहीं त्यांना आपल्या सुसंस्कृत-तेची आठवण ठेवून आत्मसंयमन करणें फारसें कठीण जात नाहीं. पुरुषां-पेक्षां जास्त निग्रहशक्ति असलेल्या स्त्रीजातीला तर, एवढासा आधार मिळाला तरी तेवढ्यांत आपलें अंत:करण गुंतवून विषयप्रवृत्तीला सहज

तुच्छ करून टाकतां येतें. परंतु, वरील गोष्टींचा थोडा तरी अनुभव ज्यांनी घेतला आहे, त्यांच्या अंतःकरणांतील निसर्गाचा व्याघ्र, मनुष्याचें रक्त चाखलेल्या व्याघ्रा इतकाच भयंकर व दुर्दम्य असतो.

## स्त्रीपुनर्विवाहवाद्यांची मोठी चूक

स्त्रियांच्या कळवळ्यानें जेव्हां विद्वान लोक निदान अविद्धयोनि कन्यांचे तरी पुनर्विवाह व्हावे असें प्रतिपादितात, तेव्हां मनुष्य-स्वभावा-विषयी त्यांचें भयंकर अज्ञान दिसून येतें. वस्तुतः त्यांचा प्रश्न इतका कठीण नसतोच. कोणत्यातरी एका ध्येयांत मन गुंतवून विषयाच्या वाटेस जाण्याची इच्छाही न करतां जन्म काढणें त्यांना सुलभ असतें. ज्याप्रमाणें कांगारूचें पिल्लूं एकदां आईच्या पिशवीत शिरलें म्हणजे साऱ्या जगाला विसरून पूर्ण सुखांत असतें त्याप्रमाणें स्त्रीच्या ठिकाणी असलेल्या निसर्ग-सिद्ध बालभावामुळें तिचीही स्थिति असते. एका बाजूनें, सारें जगही मिळालें तरी पुरें पडणार नाहीं एवढा सर्व गोष्टींचा सोस, पराकाष्ठेची हौस, कोणीतरी स्वतःचे लाड करावे अशी एकसारखी तहान आणि फार मोठी महत्त्वाकांक्षा असूनही दुसरीकडून, स्त्रीचें विरोधपूर्ण अंतःकरण एवढासा जरी आधार सांपडला तरी बाकीच्या सर्व विश्वाला विसरून तेवढ्या लहानशा जागेंतच अनंत सुखाचें विश्व उत्पन्न करूं शकतें. स्त्रीच्या मोहानें पुरुष कितीही वेडा आणि नादान बनला, आपले आप्तस्वकीय विसरून गेला आणि कालिदासाच्या 'अग्निवर्णा' प्रमाणें सर्वस्वी स्त्रैण झाला, तरी देखील तो जगाला पूर्णपणें विसरूं शकत नाही, व्यर्थ मानूं शकत नाही आणि क्वचित असा विसरला तरी आपलें सुखाचे विश्व उत्पन्न करण्याची शक्ति तर त्यांच्यांत नसतेच नसते. यामुळें, पुनर्विवाहाची गरज त्याच बायकांना असते कीं, ज्यांनी विषयसुखाची थोडीतरी गोडी चाखली आहे, परंतु ज्यांच्या अंतःकरणाला, ज्यांत कासवाप्रमाणें आपलें सारें विश्व आवरून ठेवतां येईल असें कांहीं कवच मिळालेलें नाहीं. ज्यांनी विषयाची गोडी मुळींच पाहिलेली नाहीं त्यांची गोष्ट तितकीशी कठीण नसते. परंतु विषयसुखाचीही गोडी कळण्याचें वयोमान स्त्री-

पुरुषांत वेगवेगळें असतें. आणि म्हणूनच आपण होऊन विघडण्याचें वयोमानही स्त्री-पुरुषांत निरनिराळें पडतें.

## निरनिराळीं वयोमानें

शरीराच्या आणि मन-बुद्धि इत्यादि सर्व अंतरेंद्रियांच्या वाढीपुरतें पाहिलें तर असें आढळतें की, स्त्रीची वाढ पुरुषाच्या मानानें फार लवकर होते. तेरा–चौदा हें जर वाढीच्या प्रारंभाचें आणि अठरा-एकोणवीस हें पूर्णतेचें वयोमान स्त्रीचें घेतलें तर, पुरुषांत सतरा-अठरा हें प्रारंभाचें वयोमान आणि सुमारें पंचवीस हें पूर्णतेचें मान सहज ठरतें. त्यानंतर शरीरें वाढत नाहीत, असा याचा अर्थ नाही. परंतु, ती बहुतकरून या कालांत ठरलेल्या दिशेनेंच वाढतात; नवीन दिशा घेत नाहीत. अंतःकरणाच्या वाढीच्या बाबतींत असें आढळून येतें की, मन, बुद्धि, भावना, विकार यांची वाढ स्त्रीमध्यें पुरुषाच्या मानानें फार लवकर व झपाट्यानें होते. साधारणतः आठ नऊ वर्षांची मुलगी व चौदा वर्षांचा मुलगा अशी घेतली तर मुलीची वाढ जास्त आढळून येते. समवयस्क मुलामुलींत मुलांपेक्षां मुली यामुळेंच जास्त हुशार ठरतात. त्या खरोखरच जास्त बुद्धिमान असतात असें नव्हे. असें जरी आहे तरी यांत दुसरीही एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे. लवकर सुरू होणारी मुलींची वाढ खुंटतेही लवकरच. पंचवीस-सव्वीस वर्षांनंतर ही वाढ सुरू असलेल्या स्त्रिया फार कमी आढळतात. त्यांचा एक अंतर्बाह्य सांचा ठरून जातो व त्याच दिशेनें पुढे त्यांची वाढ होते. नवीन संस्कार घेण्याची क्षमता या वयानंतर फारच थोड्या स्त्रियांत आढळून येते. याच्या उलट पुरुषाची स्थिति आहे. त्याची वाढ या बाबतींत पंचवीस वर्षांनंतरच सुरू होते आणि ती तेथून दहा–बारा वर्षें तरी चालू असते. असें हें स्थूलमानाचें कोष्टक इतर सर्व बाबतींत जरी लागू पडत असलें तरी विषयसुखाच्या बाबतींत मात्र त्याचें प्रमाण अगदी उलटें आहे. पुरुषांत त्याचा आवेग व गोडी पहिल्या वयांत जास्त असतात तर स्त्रियांत वयाच्या प्रौढपणाबरोबरच त्यांचाही प्रौढपणा वाढत जातो. भवभूतीनें 'जरसा यस्मिन् अहार्योरसः' असें म्हटलें आहे तें शृंगाराच्या बाबतींत

स्त्रियांसच जास्त लागू पडतें; पुरुषांच्या बाबतींत उलटा अनुभव ऐकण्यांत येतो. आंत मन कितीही उच्छृंखल असलें तरी ज्याला विषयसुखाची खरी लज्जत म्हणतां येईल ती पुष्कळ स्त्रियांना जवळजवळ तीस बत्तीस वर्षांचें वय झाल्यावरच कळूं लागते, अशी अनुभवी लोकांची साक्ष आहे. याचें कारण कांहींही असो, त्याचा परिणाम मात्र एक असा होतो की, नुकतेंच सांगितल्याप्रमाणें आपण होऊन बिघडण्याची स्त्री-पुरुषांचीं वयोमानें निरनिराळीं पडतात. म्हणून असा नियम बांधतां येतो की, विषयाचा अनुभव घेतलेला जीव, मग तो स्त्री अथवा पुरुष कोणीही असो, कोणत्याही वयांत स्खलन पावूं शकतो. इतकेंच नव्हे तर उतारवयांत तो जास्त स्खलनशील होतो. कारण त्याच्या सर्व शक्ति क्षीण होतात त्याप्रमाणें त्याची निग्रहशक्तिही क्षीण होते. पुष्कळ मुलामुलींच्या अशा साक्षी आहेत की वयस्क म्हणून निर्धास्तपणें विश्वास ठेवलेल्या स्त्री-पुरुषांनीच त्यांना पातित्याची दीक्षा दिली. सारांश, स्त्री आणि पुरुष दोघांच्यांही बाबतींत हा नियम सारखाच आहे. परंतु विषयसुख मुळीच न अनुभविलेल्या अथवा एकतंत्रानें तें अनुभवून चारित्र्य सांभाळलेल्या स्त्री-पुरुषांच्या बाबतींत मात्र तो उलटा आहे. वयाच्या पस्तीस-छत्तीस वर्षेपर्यंत जो आपलें शील सांभाळून राहिला आहे असा मनुष्य आपण होऊन सहसा बिघडत नाही आणि अर्थातच दुसऱ्यांस बिघडवीत नाही.* त्याचप्रमाणें तीस-बत्तीस वर्षांपर्यंत दुसऱ्याकडून प्रोत्साहन न मिळालें तर स्त्रीही सहसा आपण होऊन बिघडत नाही. तेथपासून सुमारें चाळीस वर्षांच्या वयापर्यंत मात्र तिच्या आयुष्यांतील धोक्याचें स्थळ कसतें. निपुत्रिक विधवांच्या बाबतींत

*टीप:—विधुरावस्था आल्यास या वयानंतरच विशेषत: कित्येक पुरुष वाटेल तसे चाळे करतांना आढळतात व निर्लज्ज, बनतात हें माझ्या वरील लिहिण्याशी विसंगत वाटेल. पण तसें नाही. जर पूर्व वयांत मनुष्य सत्प्रवृत्त असेल तर या वयांतही, विधुरावस्थेनें त्यांच्या हृदयांतील व्याघ्र पिसाळूनही त्यांची प्रवृत्ती लग्नाची अथवा फार झालें तर वेश्यागमनाचीच असते. याला कांही अपवाद आढळत नाहीत असें नाही. पण ते अपवादच असतात व असे अपवाद कोणत्याही बाबतींत असतातच.

तर ही गोष्ट फार मोठ्या प्रमाणावर आढळून येते. संसार करणाऱ्या परंतु कित्येक कारणांनी असंतुष्ट असणाऱ्या अनेक स्त्रिया देखील या वयांतच आपण होऊन उन्मत्त होतात व दुसऱ्यासही उन्मार्गवर्ती करतात. या सर्व मनोधर्मांचा शास्त्रकारांनी विवाहसंस्थेची रचना करतांना बारीक विचार केला आहे. आणि म्हणून, स्त्री असो अथवा पुरुष असो, हें सारें वयोमान निघून जाईपर्यंत त्यांनी एकमेकांस जपून राहिलें पाहिजे, असा त्यांनी सिद्धान्त ठरविला आहे. नुसता एवढाच त्यांचा सिद्धान्त असता तर तो कांही अर्वाचीनांनाही पचविण्यास जड वाटला नसता. परंतु या जपण्याकरितां म्हणून जें शास्त्र त्यांनी सांगितलें आहे तें अर्वाचीनांच्या गळीं उतरत नाही. आणि म्हणून 'शास्त्रकारांचा जुलूम' अशी भाषा अलीकडे जिकडेतिकडे ऐकण्यास मिळते. तिच्याविषयीही थोडा विचार करूं.

## हिंदुधर्माचा विशेष : स्वयंनिर्णय

कोणत्याही काळचे शास्त्रकार असोत, ते एखाद्या क्षुद्र वृत्तीनें मुद्दाम दुसऱ्यावर जुलूम करूं इच्छितात असें म्हणणे, शास्त्र या शब्दाचा उपमर्द करण्यासारखे व स्वतःची अशास्त्रीयता प्रकट करण्यासारखें आहे, हें मागें सांगितलेंच आहे. शास्त्रकारांनी स्त्रियांवर जुलूम केला अथया स्त्रियांविषयी त्यांच्या मनामध्यें हीन भाव होता, हें म्हणणें तर अधिकच असमंजसपणाचें आहे. याचें कारण असें की, शास्त्रकार झाले तरी ती माणसेंच होतीं आणि मनुष्याच्या अंतःकरणांत स्त्रीच्या पत्नीत्वाची श्रेष्ठता जरी उदय पावलेली नसली तरी स्त्रीविषयी प्रेम हें निरनिराळ्या स्वरूपांत अनादि कालापासून स्वयंभूच आहे. प्रेमाची जातीच अशी आहे की, प्रेमविषयास क्लेश किंवा दुःख•होऊं नये असें त्याला वाटतें. माता, भगिनी, कन्या इत्यादिकांवर प्रेम करणारा मनुष्यप्राणी, अर्वाचीन समजतात त्याप्रमाणें, जर खरोखरच त्यांच्याविषयी निष्ठुर झाला असेल, तर त्याचीं कारणें दोनच संभवतात. एक तर, अगतिकत्वामुळें त्याला तसें होणें भाग पडलें असेल अथवा दुसरें, अज्ञानामुळें. शास्त्रकारांनी स्त्रियांकरतां नियम केले ते कांही आपल्या मुलीबाळी वर्ज्य करून इतर

स्त्रियांकरतां केले नाहीत. म्हणजे हे नियम करतांना ते कांही आपल्या कोमल भावना विसरले नव्हते. असें असतांना त्यांना हे नियम करावे लागले तेव्हां त्यांत कांही जास्त सार असलें पाहिजे हें उघड आहे. आमच्या धर्मशास्त्राचा तर एक विशेष असा आहे की, तें कल्याणाचाही कोणावर जुलूम करीत नाही. प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णांनीही अर्जुनाला एवढें धर्मशास्त्र सांगितलें, विराट स्वरूप दाखविलें आणि 'मी तुझी पापापासून सुटका करीन' अशी हमीही घेतली, तरी देखील शेवटी 'विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु' असेंच सांगितलें. जुलमी म्हणून समजला गेलेल्या मनु भगवानाच्या धर्मशास्त्राचा तर प्रारंभच, धर्म हा 'हृदयेनाभ्यनुज्ञातः' असा असला पाहिजे, या विधानापासून आहे. या 'हृदयेनाभ्यनुज्ञातः' शब्दांचा अथवा त्याचाच भाऊबंद जो 'आत्मतुष्टि' शब्द त्याचा अर्थ, अलीकडे, 'स्वतःला जें करावेसें वाटेल तो धर्म' अशा तऱ्हेचा केला जातो तो हास्यास्पद आहे* स्वतःला जें जें वाटेल तोच जर धर्म असेल तर तेवढ्याकरतां मोठमोठाले ग्रंथ लिहिण्याची कांहींच गरज नाही. इतकेंच नव्हे तर, अनेक लोक एकाठिकाणी गोळा करून बहुमतानें निकाल घेण्याचीही गरज नाहीं. आत्मतुष्टि किंवा हृदयाची आज्ञा यांचा असा अर्थ करणाऱ्या लोकांचा बहुमतावरील भर देखील मग व्यर्थच आहे. कारण बहुतेक वेळेस बहुमत आपल्या हृदयाला अनुसरून नसेल, इतकेंच नाहीं तर आत्मतुष्टीच्या ऐवजीं आत्मक्षोभच उत्पन्न करणारें असेल. म्हणून, अशा तऱ्हेचे कांहीं तरी अर्थ करण्याचा प्रयत्न नुसता अशास्त्रीयच नव्हे तर पोरकट आहे. मनूच्या 'हृदयेनाभ्यनुज्ञातः' याचा अर्थ, विद्वान् लोकांनी अथवा संतांनीं सांगितलें म्हणून नव्हे तर त्याचें तत्त्व आपल्या अंतःकरणास पटतें म्हणून धर्माचें परिपालन केलें पाहिजे, असा आहे. याला अनुसरूनच श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांनीं म्हटलें आहे कीं, वैदिक हिंदु जें धर्माचरण

*टीपः—कुल्लुकभट्ट व मेधातिथी यांनी असाच अर्थ केला आहे असें वाटतें, पण तसें नाही. कारण ही अनुज्ञा वैकल्पिक धर्मांत पाहिजे असें ते म्हतात. गोविंदराज तर स्पष्टच आहे.

करतो तें तत्त्वप्रेमामुळें करतो; इतर कोणत्याही कारणानें त्यास तसें करणें वस्तुत: अशक्य आहे. ( "It will thus be seen that the Vedic Hindoos are voluntary subjects of the Law and the subjection has had its origin in the free and voluntary determination of every individual to abide by the Law, and not any pact, force or compulsion of any kind whatever" श्रीअण्णासाहेब चरित्र, खंड ३, पा. ४४) असें दिसून येतें कीं धर्माची सत्ता राजीखुशीने मान्य केली असते. वागण्याचा त्याचा निश्चय हा कोण नाही जुलुम, करार अथवा आवश्यकता यांच्यामुळें झालेला नसून त्याच्या मुळाशी असलेल्या तत्वावरील श्रद्धेतून निघालेला असतो. अशी स्थिति असल्यामुळें हिंदु धर्मांत Inquisition सारखीं शुद्धिमंडळें आणि तंजीम किंवा तबलीघ यांच्यासारख्या संस्था केवळ अशक्य आहेत. असें असतां स्त्रियांवरच तेवढा त्यानें जुलूम केला आहे ही भाषा जरी नवशिक्षितांस शोभली तरी ही विचारसरणी त्यांच्या ज्ञानाभिमानास शोभणार नाहीं.

## मनूवरील आक्षेप

शास्त्रकारांमध्यें मनूचा मान सर्वांत मोठा आहे हें निर्विवाद आहे. बाकीचे सारे कमी-अधिक प्रमाणानें त्याचेंच अनुसरण करणारे आहेत. म्हणून एका मनूचा विचार केला असतां सर्वांचा विचार केल्यासारखा होईल. एवढ्याकरितां मनुस्मृतीचा थोडा विचार करूं. मनु स्त्रियांना सर्वस्वी कमी लेखीत नाहीं; इतकेंच नव्हे तर त्याच्याठिकाणी कांही स्त्रीदाक्षिण्यही आहे. रस्त्यानें जात असतां समोरून स्त्री आली तर आपण बाजूला होऊन तिला वाट द्यावी या नियमांत स्त्रीदाक्षिण्य नाहीं असें कोण म्हणेल ? तुच्छता असती तर स्त्रीनें बाजूस व्हावें असें त्यानें म्हटलें असतें. परंतु तो तर म्हणतो की, 'चक्रिणो दशमीस्थस्य रोगिणो भारिण: स्त्रिया: । स्नातकस्य च राज्ञश्च पन्था देयो वरस्यच ॥' (रथांत बसलेला, नव्वद वर्षांचा म्हातारा-मग तो चांडाल कां असेना, रोगी, ओझेवाला,

स्त्रिया, सोडमुंजीस निघालेला ब्रह्मचारी, राजा अथवा लग्नाकरितां निघालेला मुलगा यांना आपणहून वाट दिली पाहिजे.) मनुवर अर्वाचीनांचे दोन फार मोठे आक्षेप आहेत. एक, तो ब्राह्मणांचें महत्त्व फार मोठें समजणारा आहे आणि दुसरा, पुरुषांचा पक्षपाती आहे. तो स्त्रीद्वेष्टाच आहे असें कांही म्हणतां येणार नाही. कारण, 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' म्हणजे ज्या घरांत बायकांचा मान राखला जातो त्या घरांतच देवतांना संतोष होतो, अशी चार दोन कां होईना पण कांहीं वाक्यें त्यानें लिहिलीं आहेत. पण याच्या उलट, स्त्रिया म्हणजे नित्य व्यभिचाराची संधि पाहणाऱ्या, इतकेंच नव्हे तर रूप, वय इत्यादि कशाचाही विचार न करतां केवळ आपली भोगवासना तृप्त करण्याचें एक साधन म्हणून हव्या त्या पुरुषाचा स्वीकार करण्या इतक्या भोगलोलुप, पुंश्चली, चंचल चित्ताच्या आणि नि:स्नेह असतात, असें विषारी मतही त्यानें प्रकट केलें आहे. म्हणून त्याच्यावर अर्वाचीन स्त्रीचा आणि तिच्या अनुरंजनाविषयीं तत्पर असलेल्या पुरुषाचा राग असावा हें ठीकच आहे परंतु हें अर्वाचीन शिक्षित लोक पूर्ण विचार करीत नाहीत असें म्हणावेसें वाटतें.

## मनूचा पुरुषावरील शेरा

ब्राह्मणाच्या महत्त्वाविषयीं जो आक्षेप आहे तो सर्वस्वी खरा आहे. मात्र इतकेंच कीं, असलाच तर त्यांत केवळ मनूच दोषी नाहीं. ऋग्वेदापासून तों संबंध संस्कृत वाङ्मयांत ब्राह्मण हा इतका महत्त्वासच चढला आहे. म्हणून नुसत्या मनूस दोष देतां येत नाहीं. असला तर तो साऱ्या संस्कृतीचा म्हणजे संस्कृतीस आधारभूत असलेल्या योगासारख्या अनेक शास्त्रांचा दोष आहे. तीं शास्त्रें खरीं आहेत कीं खोटीं आहेत आणि त्या शास्त्रांप्रमाणें ब्राह्मण्य म्हणजे काय व त्यांचें महत्त्व इतकें मोठें कां, हे स्वतंत्र विचाराचे प्रश्न आहेत. तूर्त, आपणांस अशा प्रकारची श्रद्धा वाङ्मयांत आढळते आणि तिला धरून मनु लिहितो एवढेच पुरें आहे. स्त्रियांविषयीं तशी गोष्ट नाहीं. अरबी लोकांत ज्याप्रमाणें, स्त्री म्हणजे

एक प्रजोत्पादनाचें यंत्र आणि विवाह म्हणजे त्या यंत्रांतून निघालेल्या मालाची कायदेशीर विल्हेवाट असें शास्त्र आहे, त्याप्रमाणें, भोगविषयक भावनेपासून तों स्त्री म्हणजेच जगज्जननी, विधि-हरि-हरांची नियंत्री, विश्वस्वामिनी, परम श्रेष्ठ अशी देवता, एथपर्यंत साऱ्या भावना संस्कृत वाङमयांत आहेत. या निरनिराळ्या भावनांचा विचार करून मनूनें आपलें अनुशासन दिलें आहे. तो त्याचा विचार काय असावा हें थोडें पहातां येतें. स्खलनशीलतेच्या दृष्टीनें स्त्री आणि पुरुष हे दोघेही मनु सारखेच मानतो. दोघांचेही मरण एकमेकांत आहे असेंच तो म्हणतो. 'स्वभाव एष नारीणां नराणामिह दूषणम्' असें तो निःपक्षपातीपणानें म्हणतो. या 'इह' शब्दाचा अर्थ 'इह' म्हणजे या लोकीं, वर्तमानस्थितींत, अशा तऱ्हेचा कुल्लुकभट्टानें घेतलेला आहे, तो बरोबर नाहीं. निरनिराळ्या परलोकांतही स्त्री- पुरुषभेद आहेच आणि तेथूनही स्त्रीच्या मोहानें पुरुष भ्रष्ट होतात अशी पुराणांची साक्ष आहे. म्हणून या 'इह' चा संबंध 'एष' शब्दाकडे आहे. पुरुषांना मोह पाडणें म्हणजे मुद्दाम पाडणें नव्हे, मोह पडण्यासारखें वर्तन असणें हा स्त्रीचा स्वभाव आहे, असा 'एष स्वभावः' याचा अर्थ आहे. 'नराणामिह दूषणम्' म्हणजे याच ठिकाणी पुरुषांचाही दोष आहे. म्हणजे, स्त्रियांच्या सहज वर्तनाचा विपरीत अर्थ करून स्वतः मोहांत पडणें व त्यांना पाडणें, हा पुरुषांचाही अवगुण आहे, असा या वाक्याचा अर्थ आहे. स्त्री तरी पुरुषाला मोह पाडण्यासारखें वर्तन करते, यांत तिचा कांहीं दुष्टपणा आहेअसें मनु म्हणत नाही. मोहकारक वर्तन हा तिचा सहजधर्म आहे. तिला स्वतःलाही पुरुषाचा मोह पडतो म्हणून तो तिच्या वर्तनांत प्रकट होतो. तात्पर्य, परस्परां-विषयी अनिवार मोह हा दोघांचाही दोष आहे असेंच मनूचें म्हणणें आहे. तसें त्यानें उघड म्हटलेंही आहे. पुरुष हा इतका उच्छृंखल आहे की, प्रत्यक्ष आई, मुलगी, आणि बहीण यांच्या बरोबरही तो एकटा रहाण्यास योग्य नाहीं असें तर तो म्हणतोच. मात्रा स्वस्त्रा दुहित्रा वा न विविक्तासनो भवेत् । बलवानिन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति हें कांही पुरुषास शिफारसपत्र आहे असें कुणी म्हणेलसें वाटत नाहीं.

## 'पुमान् इत्येव भुञ्जते'

याच्या पुढें 'नैता रूपं परीक्षन्ते नासां वयसि संस्थितिः । सुरूपं वा विरूपं वा पुमानित्येव भुञ्जते' हें म्हणणें कांहीच नाहीं; आणि बारीक विचार केला तर असें आढळून येते की, निदेइतकीच त्यांत स्त्रीजातीची प्रशंसाही आहे. 'बलवानिन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति' असें म्हटलें म्हणजे त्यांत, सुरुपा वा विरुपा वा योनिमत्येव भुञ्जते हें तर दूषण येतेंच, परंतु आई, बहीण इत्याहि मानवी भावनाही पुरुषाला नसतात असेंही होते. स्त्रियाबद्दल मनूनें तसें कोठेंही म्हटलें नाहीं. आणि जें म्हटलें आहे तें आजपर्यंतच्या सर्व ललितवाङ्मयाच्या अभ्यासकांस अनुभूत असेंच म्हटलें आहे. 'पुमानित्येव भुङ्जते' हें म्हणण्यांत, श्रीपादकृष्णांच्या

'अनुभविक लोक जगभरी निरखिती । योषितांची रीती ।
नीच वृत्ति असूनीही नर ठेवि शुद्ध प्रेमा । दुणार्गु तयाच्या रामा
चित्ति ना धरीती ।।

या पलीकडे जास्त भाव नाहीं. वेदाभ्यासजड अशा मनूनें हा सिद्धांत आपल्या कर्कश वाणीनें सांगितला आहे म्हणूनच कडू लागतो. 'पुमान्' म्हणजे श्रीपाद कृष्णानीं म्हटल्याप्रमाणें प्रेम ठेवणारा पुरुष. इंग्रजी कादंबरीकार अगदीं याच अर्थानें 'man' असाच शब्द वापरतात. मनुष्य आपल्यांत सर्वस्वी गुंतून पडला आहे, या एका कल्पनेची स्त्रीला इतकी भयंकर मोहिनी आहे कीं, तिच्यामुळें रूप, वय, धनदौलत, गुण-अवगुण इत्यादि साऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून ती त्याच्या पायाची बटीक होऊन राहते. यांत तिच्या अंतःकरणाची थोरवीही आहे. आजचा काळ असता तर मनूनें आपली कल्पना अशी फोडूनच मांडली असती. आजचें सर्व जगांतील कादंबरी वाङ्मय पाहिलें असतां त्यांत याच तत्वाचें विशेषें-करून दर्शन होतें. मनूच्या लिहिण्याचें प्रयोजन लक्षांत घेतलें जात नाहीं म्हणून त्याचें लिहिणें जास्त कठोर झालें आहे असें वाटतें. एकदां, एका अस्सल ग्रंथ न पहातां अलीकडचें प्रचारकी मराठी वाङ्मय वाचून बहुश्रुत बनलेल्या विदुषीनें माझ्याशीं असा वाद घातला कीं, "मनूनें स्त्रियांना संतुष्ट ठेवावें असें म्हटलें आहे, एवढ्यावर आम्हांस फसवूं नका. त्यांतही

त्याचा हेतु पुरुषी मतलबीपणाचाच आहे. स्त्रीकरितां स्त्रीचा संतोष त्याला नको आहे, त्याच्या संततीच्या हिताकरितां तो पाहिजे." मी त्या विदुषीला मूळ ग्रंथ काळजीपूर्वक वाचण्याची आग्रहपूर्वक विनंती केली आणि 'मात्रा स्वस्त्रा दुहित्रा वा' इत्यादि वचनेंही दाखविलीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, नुसती संतितिच स्त्रीच्या आधीन आहे -असें मनु म्हणत नाहीं. मनुष्याची सारी संस्कृतीच स्त्रीच्या आधीन आहें व म्हणून तिला संतुष्ट ठेवलें पाहिजे. असेंच तो म्हणतो.

## मनूची स्त्री-विषयक पूज्यबुद्धि

संस्कृतींत, सर्वांत सातत्याचें महत्त्व अधिक असल्यामुळें संतति-विचाराइतका महत्त्वाचा विचार दुसरा कोणचाच नाहीं. म्हणून त्यानें सुप्रजेचा आणि स्त्रीच्या संतोषाचा संबंध त्याच्यावर जास्त जोर देऊन सांगितला आहे इतकेंच. परंतु त्याशिवायही त्यानें, कल्याण हवें असेल तर स्त्रीला संतुष्ट ठेवा, असें स्पष्ट म्हटलें आहे. इतकेंच नाहीं तर पुनः पुनः 'पूज्याः' असा शब्द वापरून आपल्या भावनेची शुद्धता व उत्कटताही प्रकट केली आहे.

'पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिभिर्देवरैस्तथा ।
पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमीप्सुभिः ॥५५॥
यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥५६॥
शोचन्ति जामयो यत्र विनश्यत्याशु तत्कुलम् ।
न शोचन्ति तु यत्रैता वर्धते तद्धि सर्वदा ॥५७॥
जामयो यानि गेहानि शपन्त्यप्रतिपूजिताः ।
तानि कृत्या हतानीव विनश्यन्ति समन्ततः ॥५८॥
तस्मादेताः सदा पूज्या भूषणाच्छादनाशनैः ।
भूतिकामैर्नरैर्नित्यं सत्कारेषूत्सवेषु च ॥५९॥

मनुस्मृति अ० ३.

हें सर्व म्हणणें सामान्य आहे. यांत संततीचा कांहीच संबंध नाहीं. आमच्या संस्कृतींतील सर्व रचनांचें तत्त्व अधिकाराप्रमाणें विभागणी हें

आहे. त्याप्रमाणें कुटुंबांत स्त्रियांचीं व पुरुषांचीं कामें विभागून दिलीं आहेत. परंतु स्त्रीकडे दिलेलें काम कोणत्याही तन्हेनें कमी महत्त्वाचें नाहीं. राज्यांत किंवा कुटुंबांत अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे खजिना व जमाखर्च. गृहराज्यांत तो स्त्रीच्या ताब्यांत द्यावा व खर्चाचाही अधिकार तिच्याकडे असावा असें स्पष्ट म्हटलें आहे. 'अर्थस्य संग्रहे चैनां व्यये चैव नियोजयेत् ।'. असें असूनही अनुदार वाटणारे उद्गार स्त्रियांविषयीं ज्यानें काढले आहेत ते तेथील प्रयोजनास अनुसरूनच काढले आहेत. म्हणजे स्वतःच्या संततीच्या मतलबाकरितां प्रशंसा केली नसून संततीच्या हिताकरितांच कठोरपणानें स्त्रीस्वभावांतील सत्य दाखविलें आहे.

## पुरुष स्त्रीचा रक्षक : स्त्री संस्कृतीची रक्षक

वैदिक संस्कृतींतील अधिकारविभागणींत स्त्रियांकडे संस्कृति टिकविण्याचें काम आलें आहे. कारण पुरुष त्याला नालायक आहे. म्हणून पुरुषाच्या योग्य असें काम त्याच्याकडे देऊन स्त्रीच्या रक्षणाची सर्वप्रकारें जबाबदारी त्याच्यावर टाकली आहे. आठव्या अध्यायांत त्यानें, ब्राह्मणासुद्धां सर्वांनीं स्त्रीचें रक्षण करण्याकरितां शस्त्र घेऊन हिंसा करणें हाच धर्म आहे, त्या हिंसेचा त्यांना दोष लागत नाहीं असें स्पष्ट म्हटलें आहे. धर्मच्छल, स्वतःचें ऐहिक व आध्यात्मिक संरक्षण, विप्र म्हणजे ज्ञान अथवा विद्या आणि स्त्रिया यांचें रक्षण करण्याकरितां त्यानें म्हटलें आहे कीं,

'शस्त्रं द्विजातिभिर्ग्राह्यं धर्मो यत्रोपरुद्धयते ।
द्विजातीनां च वर्णानां विप्लवे कालकारिते ॥३४८॥
आत्मनश्च परित्राणे दक्षिणानां च संगरे ।
स्त्रीविप्राभ्युपपत्तौ च घ्नन्धर्मेण न दुष्यति' ॥३४९॥

याचप्रमाणें त्यानें आततायी ब्राह्मणाचा वध करण्यांत देखील पाप नाहीं असें म्हटलें आहे. आततायी म्हणजे आपण मराठींत समजतो त्याप्रमाणें नुसता हट्टी असा अर्थ नाहीं. धर्म सोडणारा, धर्मद्वेष्टा अथवा धर्मच्छल करणारा असाच मुख्यत्वें त्याचा अर्थ आहे. आधिभौतिक शरीराच्या रक्षणाचीच नुसती जबाबदारी पुरुषावर टाकली आहे असें

नाहीं तर त्यांच्या आध्यात्मिक रक्षणाची जबाबदारीही पुरुषावर टाकली आहे. आणि त्याकरितां त्यांच्या स्वभावाचें, विशेषत: धोक्याचीं स्थळें दाखवून बारीक वर्णन केलें आहे. ज्या नवव्या अध्यायांत हें वर्णन आहे त्यांत संततीचाच विषय आहे; त्याला अनुसरूनच तेथे शब्दयोजना आहे इतकेंच. 'अस्वतंत्रा: स्त्रिय: कार्या:' हें मनूचें म्हणणें कडू लागतें. परंतु त्यांत जगाच्या व्यवहारास सोडून असें कांहींच नाहीं. ज्याच्या रक्षणाचा सर्वस्वी भार आपण घेतो त्याला आपल्या तंत्रानें वागावयास लावणें भागच पडतें. त्यानें हवें तसें वागावें आणि आपण मात्र त्याचें रक्षण करावें, हें त्या रक्षणाकरितां प्राण दिले तरी शक्य नाहीं. नुसती तरवार हातांत घेऊन परशत्रूपासून अथवा कोंडून ठेवून स्वकीय शत्रूपासून मनुष्य कितीसा रक्षण करणार ? आणि जेथें आध्यात्मिकदृष्टचा रक्षण करा- वयाचें आहे तेथे तर या उपायांचा काडीइतका उपयोग होणें शक्य नाहीं. स्वत: मनूच म्हणतो आहे 'अरक्षिता गृहे रुद्धा: पुरुषैराप्तकारिभि:' अथवा 'न कश्चित् योषित: शक्त: प्रसह्य परिरक्षितुम्'. तेव्हां रक्षणाच्या जबाबदारीबरोबरच पुरुषाला कांहीं सूचनाही करणें अवश्य होतें. त्या करण्यापलीकडे मनूनें काय केलें आहे ?

## नवीन स्त्रियांचा लाडका हट्ट

जर आपल्या रक्षणाची जबाबदारी पशुस्त्रीप्रमाणें मानवस्त्री पुन: स्वत:वर घेईल तर मनूला इतक्या गोष्टी सांगण्याचें कांहींच कारण पडणार नाहीं. तशीं स्थिति कधीं येणें शक्य असेल तर ती येईलच. आज तरी तिचा विचार करण्याचें कारण नाहीं. आज तर स्थिति अगदीं उलट आहे. हिंदुस्थानांत काय आणि इतरही कोठें काय जसजशी सुधारणा जास्त तसतशी स्त्री आत्मसंरक्षणाच्या दृष्टीनें जास्त दुर्बळ बनलेली आढळून येते. एका बाजूनें, स्त्रिया खांद्यावर बंदुका टाकून लष्करी कवाइतीचे देखावे करीत असल्या आणि खंदकांत उभ्या राहून शिपाईगिरीही करीत असल्या तरी त्यालाही कांहीं मर्यादा आहे व सर्वत्र स्त्रीच्या रक्षणाची जबाबदारी आज तरी पुरुषावरच आहे. पूर्ण साम्यवादी म्हणविणाऱ्या

रशियांतही याच्यापेक्षां कांहीं वेगळी परिस्थिति नाहीं. शिक्षणानें एवढेंच झालें आहे कीं, कृतघ्न बनून स्त्री, 'तोबऱ्याला पुढें आणि कंठाळ्याला मागें' अशा तऱ्हेची मागणी मात्र करूं लागली आहे. आजपर्यंत जगांत पुरुषांचें जितकें रक्त सांडलें, असेल त्यांतील तीन चतुर्थांश रक्त स्त्रीच्या रक्षणाकरितां सांडलें आहे असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. आजही त्याची आवश्यकता आहेच. आणि यापुढें अनंत काळ ती राहील अशीच कल्पना होते. या रक्षणाकरितां म्हणून आपलें रक्त सांडणाऱ्या पुरुषास, त्याचकरितां कांहीं नियम सांगण्याचा अधिकार असावा, हा मात्र आजकालच्या स्त्रियांना जुलूम वाटतो. हल्लींच्या ज्ञानांत जो अर्धवटपणा आहे तो हाच. स्त्री ही पुरुषापासून संरक्षणाची आणि सामर्थ्याची अपेक्षा करते, तें जर त्याच्यापासून तिला मिळालें नाहीं तर ती कोठेंही असली तरी काय, 'घराबाहेर'च आहे, हें हल्लींचा आचार्य देखील सहज सांगू शकतो. स्त्रीला घर पाहिजे आहे, घर देणाऱ्याचा अधिकार नको आहे. नवयुगाप्रमाणें स्त्रीचें पुरुषीकरण होऊन प्रत्येक क्षेत्रांत पुरुषाची प्रतिस्पर्धी म्हणून तिनें उभें राहणें जर इष्ट असेल तर पुरुषावरील हा आपल्या रक्षणाचा भारही त्यांनीं आपणहून काढून घेतला पाहिजे. एरव्हीं, त्यांच्या आग्रहांत लाडक्या हट्टापलीकडे तात्त्विक तथ्य कांहींच उरत नाहीं. सारांश, नुसतें रक्षण करूं म्हणणाऱ्यालाही थोडीशी आपली इच्छा दुसऱ्यावर लादण्याचा अधिकार आहे. मग आधिभौतिक व आध्यात्मिक अशा सर्व प्रकारें रक्षणाची सर्व जबाबदारी आपल्याकडे घेणाऱ्यास तर हा अधिकार असण्याची किती आवश्यकता आहे हें सांगावयास नकोच.

## मनूच्या कठोरतेचें रहस्य

आज देखील अगदीं शुद्ध हेतूनें कां होईना जेव्हां एक राष्ट्र दुसऱ्याच्या रक्षणाची हमी घेतें तेव्हां त्याला त्या रक्षित राष्ट्राचें (protectorate) स्वातंत्र्य कांहींतरी नियमित करावेंच लागतें. तसेंच हें आहे. पण त्यांत देखील रक्षणाचें मुख्य तत्त्व काय सांगितलें आहे हें महत्त्वाचें आहे. 'आत्मानमात्मना यास्तु रक्षेयुस्ताः सुरक्षिताः' कोणत्याही परिस्थितींत स्वतःच स्वतःचें रक्षण करूं शकेल अशी जर स्त्रीची अंतर्बाह्य

तयारी असली तरच ती खरी सुरक्षित. बाह्य शत्रूपेक्षां अंतःशत्रु म्हणजे मोह हा जास्त भयंकर व अजिंक्य आहे. कारण त्याची गति दुर्ज्ञेय आहे. त्याचा प्रवेश कोठून कसा होईल हें सांगतां येत नाहीं. प्रवेश झालेला कळत नाहीं. ज्या वेळेला कळतें त्यावेळेला हेंच कळतें कीं, शत्रूनें किल्ला ताब्यांत घेतला असून तेथें त्याचें निशाण फडकत आहे. अशा स्थितींत त्यासंबंधाच्या सर्व सूचना शास्त्रकारांनीं देऊं नयेत तर काय करावें ? त्यांचा सिद्धान्त तर असा कीं, 'यादृशं भजते हि स्त्री सुतं सूते तथा विधम् ।' या ठिकाणीं 'भुञ्जते' सारखा कांहीं शब्द योजिला नाहीं त्याचें कारण असें कीं, प्रत्यक्ष परपुरुषसमागमानें संततीवर परिणाम होतो हें तर उघडच आहे. हल्लींच्या शास्त्रांत देखील 'Telegony' चें तत्त्व सर्वमान्य नसलें किंवा तो अबाधित नियम नसला तरी त्याची शक्यता संभवनीय आहे, एथपर्यंत कल्पना आहेच. अर्वाचीन शास्त्राचीं हीं तत्त्वें बहुशः मनुष्येतर प्राण्यांवर प्रयोग करून ठरविली आहेत. मनुष्येतर प्राण्यांत मनस्तत्त्व हें वाढलेलें नसल्यामुळें त्याचा शरीरावर परिणाम फारच कमी होतो. त्याच्या उलट माणसाची गोष्ट आहे. मानसशास्त्रांतील 'psycho-physical parallalism' चें म्हणजे 'मन व पिंड यांच्या अन्योन्य परिणामकारकतेचें' तत्व आमच्या शास्त्रास पूर्णपणें मान्य आहे. म्हणून, नुसत्या पिंडपरंपरेची काळजी घेतली म्हणजेच विशिष्ट पिंड तयार होतात असें त्याचें मत नाहीं. पिंडांतर्गत मनही त्याच विशिष्ट तऱ्हेचें असलें पाहिजे, तरच खरी एकजात परंपरा निर्माण होते, अशी आमच्या शास्त्र-कारांची कल्पना आहे. अर्वाचीन शास्त्रें ती ग्रहण करूं शकत नसली तरी ती खोटी आहे असेंही त्यांनीं सप्रयोग सिद्ध केलेलें नाहीं. आणि आजच्या घटकेस तरी तसें होणें शक्य नाहीं. कारण मनाच्या परिणामाचा वेग तीव्र आणि मृदु अशा दोन्ही प्रकारचा आहे. हे दोन्हीही प्रकार लक्षांत घेऊन प्रयोगानें कांहीं तत्त्व ठरवावयाचें म्हटलें तर दहा-पंधरा पिढ्या तरी पद्धतशीर प्रयोग केले पाहिजेत. म्हणजे कमीतकमी दोन-अडीचशें वर्षांची गोष्ट आहे. अजूनपर्यंत असे प्रयोग झाले नाहींत ही गोष्ट सिद्ध आहे. पुढें तसें होणें शक्य असल्यास ती गोष्ट आजच्या प्रत्यक्ष शास्त्रांच्या कक्षेबाहेरची

आहे. तात्पर्य इतकेंच कीं, नुसता पर पुरुषसमागमच नव्हे तर परपुरुषावरील उत्कट प्रीति देखील संततीवर परिणाम करणें शक्य आहे. म्हणून, बीजतः शरीरांची परंपरा विशेष गुणधर्माची काढली पाहिजे असा कटाक्ष असणाऱ्या शास्त्रकारांनीं स्त्रीच्या मनोधर्माचें सूक्ष्म विवरण करून जपण्याच्या दृष्टीनें धोक्याची सूचना देऊन ठेवली आहे, हें ठीकच आहे. त्यांचा अर्थ अर्थातच, प्रत्येक स्त्री अशी असते अथवा त्यांनीं सांगितलेल्या या दोषापलीकडे स्त्रींत दुसरे कांहीं गुणच नाहींत असा केव्हांही होऊं शकत नाहीं. मागें स्त्रीस्वभावाचें जें वर्णन केलें आहे तें लक्षांत घेतलें म्हणजे असें दिसून येतें कीं, स्त्रीस्वभाव मध्ये न रहातां कोठें तरी टोंकास राहून पृथ्वीवर स्वर्ग किंवा नरक उत्पन्न करूं शकतो. (पुरुषाचा प्रश्नच नाहीं. तो नरकापासून कितीही दूर राहिला तरी स्वर्ग उत्पन्न करण्याची स्वभावतःच त्याची पात्रता नाहीं.) असें असलें तरी स्त्रीची स्वाभाविक प्रवृत्ति चांगल्याकडे आहे व मागें जी एकप्रकारची धृतिहीनता सांगितली आहे तिच्यामुळें ती वाईटाकडे जाते. हा त्यांचा दोष नाहींसा होऊन त्यांच्याठिकाणीं श्रेष्ठ धारिष्ट उत्पन्न होणें म्हणजेच त्या 'आत्मानमात्मनारक्षेयुः' अशा होणें आहे. ही धृति जर त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न न झाली तर त्यांच्या नैसर्गिक बालभावामुळें 'शय्यासनमलंकारं कामं क्रोधमनार्जवम् । द्रोहभावं कुचर्यांच' असे त्यांचें मनोधर्म होणें शक्य आहे. लहान मुलांच्या स्वभावांत या सर्व गोष्टी असतात. त्याचप्रमाणें अशा त्यांच्या विचित्र स्वभावधर्मामुळें पुरुषानें आपल्या आंगच्या रूप, बल, ऐश्वर्य इत्यादि गुणांचा भरंवसा धरून न रहातां स्त्रीच्या ठिकाणीं स्वतःचें सामर्थ्य उत्पन्न होईल असें करण्याची जबाबदारी पुरुषावर आहे, एवढेच मनूला सांगावयाचें आहे, व तेवढ्याचें दिग्दर्शन करून देखील तो स्त्रियां या पूजनीय असल्या पाहिजेत असाच नियम सांगतो.

## मनूचा निःपक्षपात

असें करीत असतांना ती धृति उत्पन्न करण्याचा मार्गही सांगणें अवश्य होतें. स्त्रीधर्म म्हणून मनूनें जें सांगितलें आहेत त्या सर्वांचा अर्थ हें श्रेष्ठ धारिष्ट उत्पन्न करणें हाच आहे. अर्थात् मागें सांगितलेल्या स्त्री-

पुरुषसंबंधाच्या वैदिक परम ध्येयाच्या आकांक्षेनें हें धारिष्ट सांगितलें आहे. तें ध्येय आणि ही धृति. या दोघांची जोडगोळी पाहिजे. एरव्हीं, नुसती धृति उत्पन्न करतां आली, तरी वैदिक संस्कृतीच्या दृष्टीनें ती रोखेंत टाकलेल्या आहुतीप्रमाणें वायाच जाणारी गोष्ट आहे. तें परमोच्च ध्येय साधण्याकरितां पुरुषाच्या मागें तिनें ब्रह्मचर्याची कडक दीक्षा लावून दिली आहे. आणि गृहस्थाश्रमाचीही शिस्त कांहीं कमी कडक नाहीं. शास्त्राज्ञा म्हणून पुरुषाला एकाच वेळीं अनेक भार्या करतां येतात अथवा एक मेल्यानंतर हव्या त्या वयांत दुसरी स्त्री करतां येते, एवढयाचवरून शास्त्रकारांवर रुष्ट होणाऱ्या लोकांनीं या दोन्हीही आश्रमाचे शास्त्रोक्त धर्म पहावे म्हणजे. असें दिसून येईल कीं, इतक्या बायका करूनही त्यांत चैन किंवा इंद्रियाराधन (Sensory pleasures) यांचा भाग जवळ-जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल. स्त्रीधर्म म्हणून मनूनें जें सांगितले आहेत ते कांहीं ब्रह्मचर्याच्या धर्माहून तत्वतः मुळींच वेगळें नाहींत. गुरु आणि शिष्य व पति आणि पत्नी हे दोन्हीही संबंध या दृष्टीनें अगदीं एकसारखे आहेत. अधिकारविभागणीप्रमाणें पुरुषास पुढें धकाधकीचीं कामें करावयाचीं असल्यामुळें पुरुषाची पत्नी अवस्था ठराविक कालानंतर संपवावयास सांगितली आणि स्त्रीची ती अशी मुद्दाम न संपवितां न कळत संपून जावयाची आहे, एवढाच काय तो फरक. म्हणजे मुद्दाम कांहीं जास्त कठोरता स्त्रीकरतां केली आहे असें नाहीं. सारांश, या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन भारतीय विवाहसंस्थेचा विचार केला पाहिजे. त्यांतही पुनः एक चमत्कार आहे. भारतीयांनीं आपल्या संस्थांची रचना समाजाच्या निरनिराळ्या थरांत उलटयासुलटया त्रिकोणाप्रमाणें केली आहे. कसें तें पहा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक 33,9(C... दि: ...
क्रमांक ...93९C...... नों दि: ...

## प्रकरण ६ वें

# समाजरचनेचा त्रिकोण

भारतीयांचें सर्वच कांहीं विलक्षण. त्याप्रमाणेंच त्यांची समाजरचनाही विलक्षण आहे. मात्र इतकेंच कीं, त्या विलक्षपणाचें हसूं येण्याऐवजीं विचारवान मनुष्य आश्चर्यानें गुंग होऊन जातो, व त्याला असें कौतुक वाटतें कीं, जगाच्या इतिहासांत उपलब्ध असलेल्या कोणत्याही इतर देशांतील मनुष्याला जें आजपर्यंत नुसतें समजणें देखील अशक्य होतें, तें या भारतीयांनीं नुसतें साध्यच करून दाखविलें असें नाहीं तर स्वाभाविक करून दाखविलें. हा चमत्कार झाला तरी कसा ? भारतीयांच्या समाजाची रचना उलटचा-सुलटचा त्रिकोणाप्रमाणें आहे आणि अशी समाजरचना प्रयत्नपूर्वक घडवून आणल्याखेरीज यदृच्छेनें केव्हांहीं उत्पन्न होत नसते. मनुष्याच्या जीवनाचे सामाजिक दृष्टचा भोग आणि जबाबदारी (म्हणजेच त्याग) असे दोन भाग पडतात. भारतीयांनी भोगाला खालचा थर ठरवून जबाबदारी अथवा त्याग हा वरचा थर ठरविला आहे. समाजांत जसजसें खालच्या थराकडे जावें तसतसा भोगाचा प्रान्त वाढत जातो. भारतीय समाजाच्या खालच्या थरांस यामुळेंच सर्व भोगांच्या बाबतींत अधिक-अधिक मोकळीक आहे आणि निर्बंध अधिक-अधिक कमी आहेत. मनुष्याची देहयात्रा जोमदारपणानें चालेल अशा रीतीनें त्यानें हवे ते भोग घ्यावे, व समाजांतून आपण विघातक म्हणून फुटून निघणार नाहीं एवढचापुरतीं बंधनें पाळावीं, इतकाच काय तो नियम आहे. त्यानें मांसाहार करावा, स्त्रियांचें सुख घ्यावें, मद्यपान करावें, द्यूतानें आपली करमणूक करून

त्यावी, मृगया करावी, गुरें-ढोरें पाळून वाहनादि सौख्य अनुभवावें. समाजानें त्याला नेमून दिलेल्या क्षेत्रांत, ज्यांच्याकरितां आजची मनुष्य-जाति सारखी तडफडत आहे, त्या गोष्टींकरितां त्याला कोणाचीच ना नाही. आजचा शूद्रवर्ग कित्येक विधिनिषेध पाळतांना आढळतो ते शास्त्रानें त्याच्यावर निर्बंध लादले म्हणून नव्हे, तर त्या विधिनिषेधांची श्रेष्ठता ओळखण्याइतकें त्याचेंही अंतःकरण संस्कारक्षम झालेलें आहे म्हणून, आपल्या अंतःकरणाच्या हौशीनें, एक चांगलें अनुकरण म्हणून तो ते पाळतो. वस्तुतः शूद्राला कांहींच विधिनिषेध नाहीं असें मनूनें स्पष्ट म्हटले आहे. * संपत्तीच्या दृष्टीनेंही, शूद्राला श्रीमंत असण्यास कोणताही प्रत्यवाय नाहीं. त्यानें अमुक तऱ्हेनेंच उपजीविका केली पाहिजे असा निर्बंध आहे हें खरें, पण त्या रीतीनें उपजीविका करून देखील त्यानें संपत्ति व सुखसोय यांचा उपभोग घेऊं नये असा निर्बंध नाही. राष्ट्रविप्लव उत्पन्न झाला असतां शूद्रानेंही लढाई केली पाहिजे या पलीकडे शूद्रावर दुसरें कोणतेंच विधिबंधन नाहीं. समाजधारणेस अवश्य असणाऱ्या अहिंसा अस्तेय, अव्यभिचार इत्यादि नैतिक बंधनांशिवाय दुसरें कोणतेंच बंधन त्याच्यावर नाहीं. त्या मानानें वैश्याजवळ व्यापारामुळे पैसा जास्त व त्याची जबाबदारीही जास्त. परंतु तितक्याच प्रमाणांत उपभोगाला निर्बंध जास्त. क्षत्रियाला त्याहून जास्त निर्बंध (म्हणजे विधिनिषेध) आणि एक जो अगदीं वरचा थर ब्राह्मणाचा, त्याला संपत्ति आणि उपभोग यांचें अत्यंत दारिद्र्य तर, जबाबदारी सर्वांत मोठी. म्हणजे भोगप्रवृत्ति ही समाजाच्या खालच्या थरांत पूर्णपणें व्याप्त असून सर्वांत वरचा थर जो ब्राह्मण त्यांत ती सुईच्या अग्रासारखी बारीक आहे. आणि त्यांतही, अगदीं बारीकसारीक भोगाच्याही मागे विधिनिषेधांचें लफडें असल्यामुळें तादात्म्य नाहीसें होऊन ते भोग जवळ जवळ निरस होऊन गेलेले. याच्या उलट आतांच सांगितल्याप्रमाणें, समाज व संस्कृति टिकविण्याची आणि स्वतःची संस्कारक्षमता (Culture) वाढविण्याची जबाबदारी शूद्रावर

---

*"नशूद्रे पातकं किञ्चिन्न च संस्कारमर्हति ।
नास्याधिकारो धर्मेऽस्मिन्न धर्मात्प्रतिषेधनम्" ।।अ. १०, श्लो. १२६ ।।

अत्यंत कमी आहे. ब्राह्मणावर मात्र ती जबाबदारी सर्वस्वी ठेवलेली आहे. म्हणून, उच्च थरांतल्या ब्राह्मणजवळ भोग त्रिकोणाच्या अग्रासारखे तर त्याग त्रिकोणाच्या पायासारखे अनंत आणि शूद्राजवळ जबाबदारी त्रिकोणाच्या अग्रासारखी व भोग त्रिकोणाच्या पायासारखे, अशी स्थिति आहे. या रचनेचें महत्त्व आणि रहस्य अलीकडे कित्येक पाश्चात्य विद्वानांच्या ध्यानांत येऊं लागलें आहे.

## प्रयोगांतली खुबी.

ही अशी जी समाजरचना उत्पन्न झाली आणि तिच्यांत भोग-त्यागाची जी ही वांटणी झाली ती कांहीं केवळ यदृच्छेनें नव्हे, हें मागे सांगितलें आहे. अतीन्द्रिय ज्ञानाचा प्रश्न बाजूस ठेवला तरी अनुभवाच्या दृष्टीनें भारतीय विद्वान श्रेष्ठ होते म्हणून त्यांनीं अशी रचना केली असें सहज म्हणतां येतें. समाज आणि विवाहसंस्था यांच्यासंबंधीं अशी एकही कल्पना नाही कीं, जिचा भारतवर्षामध्यें प्रयोग झाला नाहीं व अनुभव घेतला गेला नाहीं. आज नवीन वाटत असलेल्या साऱ्या कल्पनांचा भारतवर्षांत अनुभव घेतला गेला आहे. मात्र इतकेंच कीं प्रत्येक वेळां सर्व समाजावर प्रयोग न करतां निरनिराळ्या क्षेत्रांत त्यांचा अल्प प्रमाणावर उपयोग करून त्याचें रहस्य भारतीयांनीं अनुभविलें आहे. भारतवर्षाच्या विलक्षणपणांत हाही एक विलक्षणपणा आहे. नवीन पक्वान्न करून पाहावयाचें म्हटलें म्हणजे बायका ज्याप्रमाणें साराच तूप-रवा नाशीत नाहींत, प्रयोग म्हणून प्रथमत: थोड्याशा प्रमाणांत पदार्थ करून पाहतात, तसेंच अशा सर्व गोष्टींत भारतीयांनीं आजपर्यंत केलें आहे. त्या अनुभवांनीं शहाणे होऊन त्यांनीं आपली संस्था निश्चित केली. आणि आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं, अर्वाचीन तत्त्ववेत्त्यांच्या आणि शास्त्रवेत्त्यांच्या सिद्धान्तांचा ओघ देखील त्यांनाच शहाणें ठरवूं पहात आहे !

"ही ब्राह्मणांची प्रथा बरेंवाईट यांच्या परिवर्तनशील क्षीतीजाच्या पलिकडे जाते, बहुविध जीवांच्या अखंड वाहणाऱ्या प्रवाहाचें गंभीरपणाने आणि स्पष्टपणाने निरिक्षण करते आणि त्याला अनुसरुन दुर्बलांना हात

देते. आणि समर्थ म्हणविणाऱ्यांना कठोरपणें वागविते. कारण ही अत्युच्च प्रज्ञा समर्थ म्हणविणाऱ्यापासून अत्युच्च त्यागाची अपेक्षा करते. त्यांच्या वर्णाश्रम पद्धतीकडे आजचे बडे म्हणविणारे लोक तिरस्काराने पाहतात. कारण आज पाश्चात्यांच्यामधे असलेल्या गर्वोद्धत लोकशाहींच्या अगदि उलट ती कल्पना आहे. जसजसा मनुष्य वरच्या दर्जाचा तसतशा सुखोपभोगाचा हक्क त्याला कमी आणि जबाबदाऱ्या मात्र असंख्य. कांहीं झाले तरी कीतीहि निकृष्ट मनुष्य असला तरी आपण आज नाही उद्या उच्च प्रकारच्या राहणीमुळें आपली प्रतिष्ठा वाढवून घेऊं अशी त्याला खात्री असते. इतकेच नाही तर अशी उच्च अवस्थाहि त्याला प्राप्त करून घेता येते की जेथून त्याला दिक्कालांचे बंध तोडून अनंतांत विलीन होतां येते. (रोमाँलोलाँ यांचा 'शिव-प्रणिपात' हा लेख.)

## रोमाँ रोलाँचें मत

Its* vision which passes beyond the changing horizon of good and evil, judges lucid and serene, the flood of souls that goes by, indulgent to the frailties of the weak, and severe only with the strong. For this lofty thought demands much of those who are capable of much; and its entrie conception of the hierarchy of castes, which at first sight, seems so contemptuously aristocratic, is based on this principle (diametrically opposed to that of the egotistical democracies of the West) that the more elevated the man be, fewer are his rights and the more numerous his duties !, and in any case, lowly as a man may be, every man can raise himself, every one knows that he can.

---

* Brahmanic conception. ब्राह्मणांची प्रज्ञा.

sooner or later, by reason of the normal evolution of existences, arrive at the culminating point of curve, from whence by way of the return the soul will escape fromtime and its vicissititudes. "Homage to Shiva" by Romain Rolland.)

रोमाँ रोलाँ यांचे हे उद्गार फार मार्मिक व जिव्हाळ्याचे आहेत, आणि पाश्चात्य आणि पौर्वात्य दोन्ही संस्कृतींशीं तादात्म्य पावून घेतलेल्या अनुभवाचे आहेत. त्यामुळें, त्यांत कांहीं तथ्य नाहीं असें म्हणण्याची कोणाही विचारी मनुष्याची तयारी होणार नाहीं. खऱ्या अभ्यासूपणानें आमच्या संस्कृतीचा अभ्यास केला असतां परकीयाला देखील तिच्या गूढ तत्वांचा साक्षात्कार होतो आणि कोणतीहि गोष्ट पाश्चात्यानें पावन करून दिल्याखेरीज उपयोगाची न समजणाऱ्या आम्हाला मात्र ती दिसत नाहीं. दैवाची वक्रता (irony of fate) म्हणतात ती ही !

रोमाँ रोलाँना जें कांहीं नवल वाटतें तें हें कीं, पाश्चात्त्य लोक जो जो कांहीं नवीन म्हणून प्रयोग करीत आहेत, त्या सर्वांना कोठें ना कोठें तरी आमच्या विचारांत स्थान आहेच. कोणतीहि कल्पना घ्या, तिला नकार असा नाहींच; मात्र इतकेंच कीं, तिचा प्रांत तिला तोडून दिलेला असून, त्यांत काय तो तिनें आपला प्रभाव गाजवावा अशी व्यवस्था. "खरोखर भारत म्हणजे भव्यता ! त्याचें गंभीर आणि विशाल आत्मज्ञान, विश्वकोशाची कल्पना, समाजरचना, जी प्राचीन काळींतर परिपूर्ण होतीच पण आजहि विश्वाची कोडी सोडविण्यांत समर्थ आहे. स्त्री, गृह, प्रेम आणि विवाह इत्यादि अनेक महत्वाच्या प्रश्नांचा त्याने केलेला उलगडा, इतकेच नव्हे तर त्याची कलात्मकता सारेच कांहीं भव्य आहे. या सुशोभित आणि प्रमाणबद्ध असणाऱ्या भव्य प्रासादावर सर्वत्र जिकडेतिकडे एकसंधिपणा विलसतांना दिसून येतो. नाही असे कशाला नाहीच! सर्वच गोष्टीची संगती लावलेली. जणुं काही सुंदर उपवनांतून हाजारो वृक्ष आपल्या

बाहूंनी त्याच्याकडे पाहूणाऱ्याचे स्वागतच करतात ! आणि या विश्वनृत्याचा अधिपतिच प्रत्यक्ष मार्गदर्शन करीत आहे. प्रत्येकाचें क्षेत्र नियत झालेलें ! प्रत्येकाचें कर्तव्यहि नियत झालेलें आणि सर्वांचा मिलाफ एका दिव्य संगीतात होऊन संवादानेच तर काय पण विसंवादानेहि विश्वसंगिताच्या माधुर्यांत भरच घालतात. पश्चिमेंत जेथे फार, झालें तर तर्कशास्त्राच्या कठोर कात्रीने कोणत्याहि गोष्टीचे विभाग पाडून अन्तःकरणाच्या निरनिराळ्या कप्यांतफार झालें व्यवस्थीतपणे लावून ठेवले असतात, तेथे भारतांत, निर्सग आणि मानव यांच्या स्वाभाविक भिन्नता लक्षांत घेऊन त्या सर्वांचा असा सुंदर समन्वय केला असतो की सर्वत्र एकात्मताच प्रत्यायास येते. जणू कांही विरोधांचा विवाह हेंच भारतीय जीवनांतील मुख्य सूत्र आहे. (रोमाँरोलाँ–शिवप्रणिपात)

India's calm and ample metaphysic, her concept-ion of the universe, her social organisation, per-fect in its own time and *still capable of adapting itself to the new time; the solution that she has given to the problems of women, the familly, love, marriage;* and the magnificent revelation of her art, are indeed grand. Over all the cathedral, ornate and proportioned, of Asia's mighty soul, ranges the same spirit of sovereign synthesis. No negation. Everything is harmonised. All the forces of life group themselves like a forest, with a thousand waving arms. Directed by Nataraja the master of the dance. Each thing in its place, each being ful-filling its function, and all associated in the Divine Concert, making with their various voices and *even dissonances*, according to the saying of Heraclitus the most enquisite harmony. While in the Occident, strong, cold logic separates the dis-similar, shuts it up, sorted in distinct and separate

compartments of the spirit, India, taking account of the natural differences of beings and things, seeks to combine them so as to re-establish in its plentitude its total unity. *The marriage of contraries forms a rythm of existence.* ("Homage to God Shiva." इटालिक्स आमचे आहेत.)

दोन्ही उतारे थोडे मोठे आहेत हें खरें, परंतु निर्मळ मनानें अभ्यास केला असतां मनुष्याच्या वाणींतून काय बाहेर पडेल याची त्यांच्यावरून फार उत्तम कल्पना येते. म्हणून मोठे असूनही ते मुद्दाम दिले आहेत. आमच्याकडेही, कोणी जर पूर्वग्रह मनावर न ठेवतां विचार करील, तर असेच उद्‌गार काढील. परंतु शेंदीडशें वर्षेपर्यंत एकजात, एकासारखा, एकरंगी भडक प्रचार कानीं पडल्यामुळें दोनतीन पिढयांत आमची सारी बुद्धीच पालटल्यासारखी झाली आहे. आतां कोठें, कांहीं विचारवान लोकांना ही आपली चूक दिसून येऊं लागली आहे. 'स्त्रीजातीचा कळवळा' हें एक वस्तुत: प्रचारकी ढंगांनी उत्पन्न केलेलें ढोंग कसें आहे, हें डॉ. मनोरमाबाई थत्ते यांच्यासारख्या केवळ सुधारकी वातावरणांत वाढलेल्या विदुषींनांही आतां पटूं लागलें आहे ('वाचा आणि विचार करा' प्रस्तावना). लग्नसंस्था आणि स्त्री यांच्यासंबंधीही असेंच आहे. परंतु कोणी पाहील तर ना ? ज्याला उन्नति म्हणून आज म्हटलें जातें, ती तरी आमच्या स्त्रियांची खरोखर उन्नति आहे काय, हाही मोठा प्रश्न आहे. कदाचित असेंही असूं शकेल की उन्नति नसून, ती अवनतीच आहे.

## अर्वाचीन कल्पनांचा शिळेपणा.

आमच्या सुशिक्षित स्त्रिया आणि त्यांचे कैवारी हे ज्या ज्या गोष्टी करूं पाहत आहेत, त्या पाहिल्या म्हणजे एक गोष्ट चटकन लक्षांत येते. ती ही कीं, त्यांत नवीन असें कांहीच नाही. क्षुल्लक फरक सर्वच गोष्टींत होत राहतात. तसे कांहीं असतील, पण आधारभूत मूळ गोष्टी साऱ्या अनु-

भवलेल्याच आहेत. सोन्याची ठुशी टाकून देऊन कापडाची कॉलर घेतली आणि मोलाचीं गोंडेबोरें सोडून परदेशी रिबन घेतली तरी तीं तीं स्थानें भूषणांस योग्य आहेत व भूषणांनीं त्यांत आकर्षकता येते, ही कल्पना त्यांत जुनीच आहे. तसे कांही फरक असले तरी साऱ्या कल्पना आमच्या-कडे अनुभवलेल्याच आहेत! मात्र इतकेंच कीं, रोमाँ रोलाँनें वर म्हटल्याप्रमाणें त्यांच्या त्यांच्या पर्यायानें. हल्लींच्या प्रगत म्हणविणाऱ्या स्त्रिया नवीन कल्पना स्वीकारीत नसून, टेनिसच्या खेळांत ज्याप्रमाणें थोडा खेळ झाल्यावर गडी आपापली बाजू बदलतात. त्याप्रमाणें आपलीं स्थानें पालटीत आहेत, एवढेंच. वर सांगितलेली भारतीय समाजाची त्रिकोणात्मक उलटासुलटी रचना पाहिली म्हणजे उन्नति नसून त्या अवनतीचाच हव्यास करीत आहेत, असें म्हणावेंसें वाटतें.

## आर्यत्व आहे कशांत ?

आमच्या स्त्रियांना जर कोणत्या गोष्टीचा अभिमान असेल तर तो आपण आर्यमहिला आहों, या गोष्टीचा. पण हें त्यांचें आर्यत्व म्हणजे काय आणि इतर कोणत्याही स्त्रीसमाजाहून त्याचा श्रेष्ठपणा कोणत्या गोष्टींत आहे, असें जर विचारलें तर, आमच्या विचाऱ्या जुन्या भोळ्या स्त्रियाच तर काय, पण या नवयुगांतील अरुंधती देखील काय उत्तर द्यावें म्हणून विचारांत पडतील. इतकेंच नाहीं तर, विचार करूनही त्यांना त्याचें उत्तर देतां येईलसें वाटत नाही. हिंदुस्थानाच्या ठराविक देश-मर्यादेंत जन्मलों म्हणून आर्य व हिंदुस्थान श्रेष्ठ म्हणून आपण श्रेष्ठ हें उत्तर संघांतल्या मुलींना शिकवायला चांगलें असलें तरी तत्वतः त्यांत कांहींच अर्थ नाहीं. कारण तसें कोणत्याही देशाबद्दल म्हणतां येईल. आमची ऐतिहासिक परंपरा उज्ज्वल आहे, म्हणून आम्ही श्रेष्ठ, हें म्हणणें थोडेंसें सत्यास धरून असलें तरी अतिशय लाजिरवाणें आहे. 'सांगे वडिलांची कीर्ती । तो एक मूर्ख ।।' असें श्रीसमर्थांनीं म्हटलें आहे. परंतु नुसतें तेवढेंच नाहीं. त्यांत मूर्खपणाची विसंगतिही आहे. कारण, 'तें जुनें ठेवणें अडाणीपणाचें,' असें म्हणून तर आमच्या सुशिक्षित स्त्रिया श्रेष्ठ-पणाचा अभिनव चांद कवळूं पाहत आहेत. 'ज्याच्यामुळें तूं सर्वांत श्रेष्ठ

उरलास, तें तूं कां सोडतोस आणि देशकालाला अनुसरून तें आतां उपयोगाचें नाहीं म्हटलें तर नवीन असें काय काढतोस,' असा जर कोणी सरळ प्रश्न केला तर अर्वाचीन काळचे सारेच विद्वान स्त्रीपुरुष निःस्तब्ध बसतील असें वाटतें. विशेषतः ब्राह्मणवर्गाच्या स्त्रियांची तर जास्तच शोचनीय स्थिति होईल. खरी गोष्ट अशी आहे कीं विशेष म्हणून आज ज्या ज्या गोष्टी त्या करूं पाहत आहेत, त्या विशेष नसून भोळ्याभाबड्या, अडाणी स्त्रियांनी आजवर ज्या केल्या, त्याच विशेष आहेत. दुर्दैवाची गोष्ट इतकीच आहे कीं, हेंही आतां लक्षांत येईनासें झालें आहे. गोमांसाचा निषेध करून हिंदुराष्ट्रानें जगांत अद्भुत चमत्कार करून दाखविला, म्हणून त्याचें कौतुक करणारे विवेकानंद*. पण आपली विवाहसंस्था प्रेमाच्या पायावर न उभारतां कर्तव्याच्या पायावर उभारून आणि कर्तव्यांत प्रेम अनुभविण्यास शिकवून यशस्वी करून दाखविण्याचा जो त्याहूनही अद्भुत चमत्कार भारतीयांनी करून दाखविला, तो त्यांच्या ध्यानांतही येत नाही, मग त्याचें महत्व त्यांना कळणार कुठून ? विवेकानंदाची ही गोष्ट, मग लोकशिक्षणाचें कार्य अंगावर घेणाऱ्या पोटार्थी लेखकांची कथा काय सांगावी ?

## प्रश्न सांस्कृतिक आहे; नैतिक नाहीं

भोग आणि त्याग यांची जी उलटासुलटी व्यवस्था खालच्यावरच्या थरांस धरून वैदिक संस्कृतीनें केली, तिचेंच धोरण त्यांनीं स्त्रियांच्या बाबतींतही स्वीकारलें. ब्राह्मण वर्गांतल्या स्त्रियांना सर्व प्रकारच्या सुखोपभोगांचे कमालीचे निषेध आहेत, ते, इतर स्त्रियांहून खरोखर कांही विशेष करण्याची धमक त्यांच्यांत आहे, हें दाखविण्याकरितां. **त्या विधिनिषेधांच्या मुळाशीं सांस्कृतिक तत्त्वें आहेत; आजचे लोक अडाणीपणानें समजतात त्याप्रमाणें केवळ नीतिअनीतीचा विचार नाहीं.** क्षत्रिय कुमारिकांची नीति नाचगाणें शिकून बिघडत नव्हती, म्हणून त्यांना त्याची मोकळीक होती आणि ब्राह्मण कुमारिकांची मात्र बिघडत होती,

*"Master as I saw him" by Sister Nivedita.

म्हणून त्यांना या गोष्टी वर्ज्य केल्या गेल्या, असें नाहीं. गांधर्वविवाह क्षत्रिय कुमारिकांच्या बाबतींत हितावह होत होता आणि ब्राह्मण-स्त्रियांना मात्र तो दुःखांत लोटीत होता, असें नाहीं. शूद्रादिक वर्गांत स्त्री आणि पुरुष सर्वच अर्थोत्पादन करणारे असतात आणि एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून काम करतात, एकमेकांचा सहवास करतात, परंतु त्यामुळें शूद्र स्त्रिया साऱ्याच अनीतिमान होतात, असें कांही वैदिक संस्कृति म्हणत नाहीं. उलट, अस्पृश्यादि स्त्रियांच्या सतीचींही ठिकठिकाणी वृंदावनें आहेत आणि ब्राह्मणही त्यांना आदरानें मान देतो. या गोष्टीं करण्यामध्यें नवीन असें आमच्या स्त्रिया कांही करीत नाहींत; जगांतील साऱ्या स्त्रिया जें करतात तेंच तें आहे. **सांस्कृतिक ध्येयाकरतां या सुखांचा त्याग आमच्या स्त्रियांनी केला होता, हें विशेष आहे;** त्याच गोष्टी पुनः करण्यांत हें विशेष स्थान सोडून आमच्या स्त्रिया पुनः सामान्य वर्गांत जात आहेत, आणि त्यामुळेंच इतर स्त्रियांहून आर्य-स्त्रीचें वैशिष्टय काय, हें त्यांना आतां सांगतां येईनासें झालें आहे.

## आर्य-स्त्रीचा विशेष

जगांतील इतर स्त्रियांकडे पाहिलें तर असें दिसून येतें कीं त्यांच्यांतही आर्य स्त्रियांनी मान डोलवावी, अशा स्त्रिया अनेक होऊन गेल्या आहेत. बुद्धिमत्ता, सद्‌गुण, चारित्र्य, धैर्य, शौर्य, एकनिष्टता, प्रेमळपण-इत्यादि सर्व बाबतींत आणि अलीकडच्या पद्धतानें बोलावयाचें म्हणजे विद्या, कलाकौशल्य, समाजसेवा इत्यादि सर्व गोष्टींत थोर, आणि लोकोत्तर स्त्रिया सर्व समाजांत आणि सर्व काळीं होऊन गेल्या आहेत. आज तरी, निदान या कोणत्याही बाबतींत, आर्य स्त्री इतर स्त्रियांपेक्षां आपला श्रेष्ठत्वाचा दर्जा सिद्ध करूं शकणार नाहीं. कारण, प्रत्येक बाबतींत ती या दुसऱ्या स्त्रियांचें अनुकरण करूं पाहत आहे. अनुकरण करणारा ज्याचें अनुकरण करावयाचें त्याला आपल्यापेक्षां श्रेष्ठ आणि चांगला समजत असतो, म्हणूनच त्याचें अनुकरण करीत असतो, ही गोष्ट स्वतःसिद्ध आहे. दुर्गुणाचें 'दुर्गुण' म्हणून कोणीं अनुकरण केलें आहे, असें कोणाच्या ऐकिवांत आहे काय ? सारांश पोषाख, विचार, ध्येय, आचार, व्यवहार

आणि उपभोग इत्यादि सर्व गोष्टींत जर आमच्या स्त्रिया दुसऱ्याचेंच अनुकरण करूं पाहत असतील तर, केवळ एखाद्या बाबतींत आमच्याकडील स्त्रियांची संख्या जास्त भरेल, पाश्चात्यांत कमी भरेल, म्हणून तेवढ्यावरूनच त्यांची योग्यता श्रेष्ठ ठरणार नाहीं. आतांपर्यंतच्या परिभाषेंत बोलावयाचें म्हणजे ज्या गोष्टी समाजाच्या खालच्या थरानें करावयाच्या म्हणून जाणूनबुजून उच्च वर्णीयांनीं सोडून दिल्या, त्या करण्यांत त्या वर जात नसून खालींच जात आहेत. हल्लींच्या समाजोन्नतींत ज्याप्रमाणें **महाराजाचा ब्राह्मण होत नसून, ब्राह्मणाचा महार बनतो** आहे, त्याप्रमाणेंच स्त्रियांचीही गोष्ट आहे. आमच्या स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य पाहिजे व अर्थोत्पादनाचीही हौस आहे. खालच्या वर्गांतील स्त्रिया कांहीं प्रमाणांत अनादिकालापासून तसें करीतच आहेत. कल्पना नवीन नाहीं, जुनीच आहे. गोंड, कंजारी वगैरे कित्येक जातींचे आचार पाहिले तर साहेब लोकांचीच आठवण होईल, परंतु असें असूनही त्यांच्यांत स्त्रीची नीतिमत्ता कमालीची उच्च दर्जाची आहे. या लोकांतील स्त्रीपुरुषांचें नृत्य आणि पाश्चात्य लोकांतील स्त्रीपुरुषांचें नृत्य यांत तर विलक्षण साम्य आहे. अशाच प्रकारें, इतर कांहीं गोष्टी ज्या हक्क म्हणून आजच्या सुशिक्षित ब्राह्मणस्त्रिया संपादूं पाहत आहेत, त्या सर्व नवीन कल्पना नसून, त्या प्रचारांत आणण्यांत त्या कांहीं नवीन करीतही नाहींत. समाजांत निरनिराळ्या थरांत त्या आजहि आहेतच. इतर स्त्रियांहून आपलें आर्यत्व वेगळें राखण्याकरितां आणि त्याचा अत्युच्च आदर्श जिवंत ठेवण्याकरितां त्या गोष्टींचा त्यांनी मुद्दाम त्याग केला होता. तो उच्च बिंदु सोडून पुनः त्या सामान्य स्त्रियांत मिळून जाऊं पाहत आहेत इतकेंच! प्रेममूलक विवाह, बहुपतित्व, असंस्कृत विवाह, घटस्फोट, प्रौढविवाह, समागमोत्तर विवाह आणि यांना अनुसरून, सौंदर्यप्रसाधनाची अनिवार लालसा इत्यादि साऱ्या गोष्टी आमच्यांत, त्यांच्या त्यांच्या पायरीनें आहेतच. या कांहीं विशेष नाहींत. कांहीं ध्येयाकरितां यांचा त्याग करणें हें विशेष आहे. खरोखर, जर **आर्यस्त्रियांनीं एक वर्ग या नात्यानें कांहीं विशेष करून दाखविलें असेल तर तें हेंच कीं विवाहाचें मूलतत्व प्रेम हें नसून ध्येय (कर्तव्यप्रेम) हें आहे आणि या पायावरील विवाह संस्थाच**

जास्त सुखकारक होते, हें साऱ्या जगाला सिद्ध करून दाखविलें. आमच्या येथपर्यंतच्या विचारसरणींत बोलावयाचें म्हणजें **मातृत्वाचा पूर्ण विकास आणि तें मातृत्व कळण्यापुरतेंच पत्नीत्वाचें महत्व असणें हेंच स्त्रीजीवनाचें अत्युच्च आणि उदात्त असें ध्येय आहे,** हें त्यांनी जगाला सिद्ध करून दाखविलें. हेंच तिचें आर्यत्व आहे आणि या आर्यत्वांतच तिची श्रेष्ठता आहे. मातृत्वाचा विकास म्हणजे काय हें जरी जगांतल्या स्त्रीमात्राला कळत असलें, तरी जगांतल्या कोणत्याहि स्त्रीवर्गानें 'वर्ग' म्हणून तें ध्येय आपल्यापुढें ठेवलें नाहीं, आणि म्हणूनच पत्नीत्वापलीकडे आणि पत्नीत्व म्हणजे सख्यत्व या कल्पनेपलीकडे त्या अजून गेलेल्या नाहींत. अपवादात्मक उदाहरणें अर्थातच सोडून द्यावयाचीं. तसे अपवाद सर्वच बाबतींत सर्व ठिकाणीं आढळतात. जर आमच्या सुशिक्षित स्त्रियांना आपल्या आर्यत्वाचा अभिमान बाळगावयाचा असेल आणि त्यांत कांहीं श्रेष्ठत्व आहे असें दाखवून द्यावयाचें असेल, तर या गोष्टींचा त्यांनी नीट विचार केला पाहिजे; एरव्हीं लक्ष्मीबाई, अहिल्याबाई, जिजाबाई अथवा सुलभा, मैत्रेयी यांचीं नुसतीं नांवें घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं. शूर, पतिव्रता, कर्तृत्वान अशा अनेक स्त्रिया अनेक देशांत होऊन गेल्या आहेत हें वर म्हटलेंच आहे. स्त्रियांसंबंधींच्या आमच्या संस्कृतीनें ठरलेविल्या साऱ्या व्यवस्था आणि इतर संस्कृतीच्या व्यवस्था यांच्यांत पुष्कळ बाबतींत अंतर पडतें तें यामुळेंच !

## एक मोठा विचार–दोष

ही गोष्ट न समजल्यामुळें जशी विचारप्रवर्तकांची दिशाभूल होऊन जाते तशीच आणखीहि एक गोष्ट विसरण्यांत चूक होते. आज हिंदुस्थानच्या उन्नतीचा व त्या उन्नतीकरितां हिंदुसमाजाची पुनटर्घना करण्याचा एकसारखा विचार होत आहे. पण त्यांत नकळत एक नसतेंच ढोंग उत्पन्न झालें आहे. आणि तें ढोंग म्हणजे ब्राह्मण व ब्राह्मणांचा आचार यांना हिंदुस्थानच्या अवनतीबद्दल जबाबदार धरून एकीकडे शिव्या द्यावयाच्या आणि दुसरीकडे, हिंदुस्थानचे सामाजिक प्रश्न मूठभर ब्राह्मणवर्गाच्या पुढें असलेल्या प्रश्नावरून सोडवूं पाहवयाचे. ही गोष्ट निर्विवाद आहे कीं,

भारतवर्षाच्या या विशाल संस्कृतींत ब्राह्मणवर्गाचें कांहीं विवक्षित स्थान आहे. म्हणजे. ब्राह्मणांनीं आपली म्हणून कांहीं एक भारतीय संस्कृतीच्या ओघांतलीच परंतु स्वतंत्र संस्कृति उत्पन्न केली आहे आणि तिचें कांहीं कार्यही आहे. भारतवर्षांतील एकंदर जनसंख्येच्या मानानें ब्राह्मणवर्ग हा अत्यंत थोडा आहे. म्हणजे सुमारें २६ कोट लोकसंख्येंत ब्राह्मण पुरते अर्धा कोटीही नसतील. हिंदुस्थानच्या उन्नतीच्या आड येणाऱ्या म्हणून ज्या गोष्टी समजल्या जातात ते बहुतेक सारे विधिनिषेध मुख्यत्वें ब्राह्मणांनाच लागू आहेत. असें असतां केवळ त्यांच्या सनातनीपणामुळें हिंदुस्थानची उन्नती अडून राहिली हें म्हणणें समंजस नाहीं. उदाहरणार्थ मांसाशनाचा विषय घ्या. मूठभर ब्राह्मण व तसेच थोडेसे जैन सोडले तर मांसाहाराचा निषेध ब्राह्मणाखेरीज इतर कोणत्याही वर्गास धर्मशास्त्रानें केला नाहीं. इतर लोक मांसनिवृत्त झाले असतील तर ते धर्मशास्त्रामुळें नव्हे. त्यांची अभिरुचीच उच्च दर्जाची झाली म्हणून झाले. राष्ट्रदृष्टचा हें चूक आहे असें म्हटलें तर तिची दुरुस्ती राष्ट्रांतील २३–२४ कोटी लोकांना भरपूर मांस खाऊं घालून केली पाहिजे. आणि तसें झालें तर, देशातील ब्राह्मणांसारखा एक बुद्धिजीवी वर्ग मांसनिवृत्तीमुळें दुबळा राहतो असें म्हटलें तरी तेवढयानें देशाचें कांहींही नुकसान होत नाहीं. मांसाहारी राष्ट्रांतही, नाहीं-तरी, बुद्धिजीवी वर्ग निमित्तालाच मांसाहारी असतो. तेव्हां देशांतील बहुजनसमाज मांसाहारानें समर्थ बनल्यावर एक लहानसा वर्ग मांसाहारी नसला म्हणून कांही बिघडत नाहीं. हिंदुस्थानचा हा बहुजनसमाज पुरेसा मांसाहार नसल्यामुळें दुर्बळ बनला आहे हें म्हणणेंच आधी शास्त्रशुद्ध नाहीं. निदान तें शास्त्रीयदृष्टचा संशयास्पद आहे असें खास म्हणतां येतें. जपानी लोकांना हवें तें मांस चालते हें सुप्रसिद्ध आहे. तरी देखील इतर मांसाहारी राष्ट्रांच्या मानानें जपान हा निमित्तमात्रच मांसाहारी म्हणता येईल. बहुतांशीं तो शाकाहारी व मत्स्याहारी आहे. इतकेंच नाहीं तर जपानमधील अर्ध्याअधिक लोकांना हिंदुस्थानाप्रमाणेंच अर्धपोटीं राहावें लागतें. अशी स्थिति जपानला दारिद्रयामुळें आली नसून सतत त्याला युद्धाची जी तयारी ठेवावी लागते तिच्यामुळें आली आहे हें खरें आहे. परंतु कारण कांहीं असलें तरी

वस्तुस्थिती तशी आहे हें उघड आहे. कंदमुळें खाऊन देखील पुष्कळ लोकांस राहावें लागतें. प्रत्यहीं सुमारे दोन लाख मुलांना पुरेसें अन्न मिळत नाहीं आणि सात लाख माणसांत जवळजवळ उपास पडतो. (Barn yarn grass, roots and barks are used as food- 2000,00 suffer from malnutrition, 700,00 men on the verge of starvation. Grandmothers and grandfa thers too old to work commit suicide--"Where going Japan? p. 54") अशी स्थिति असूनही जपानी लोकांची शरीरसंपत्ति इतकी स्पृहणीय आहे कीं, मांसाहाराचा आणि शरीरबलाचा म्हणण्यासारखा कांहीं संबंध नाहीं असें शास्त्रज्ञ म्हणू लागले आहेत. जपानी लोक शरीर कसें कमावितात याचें रसभरीत वर्णन करून लेखक विलिआर्ड प्राईस म्हणतो: आज जपानी लोकांच्या आहाराची उपयुक्तता शास्त्राने सिद्ध होत नाही तर त्यांचे शरीरबळ आणि युद्धांत दिसून येणारी चिकाटी आणि धैर्य यांनी सिद्ध होत आहे. Today Japan's simple fare is not only endorsed by scientists but verified by the brute strength of the Japanese.... and fortitude in wars: "Where going Japan?" (जपानां तू कुठे चालला आहेस ? पान ३६) page 36. शास्त्रीय लोकांमध्येंच असे मतभेद असून मांसाहारास फार महत्व आहे असें धरलें तरी, राष्ट्रांतील सुमारें २५ कोट लोक दुर्बळ राहून मांसाहार केलेले मूठभर ब्राम्हण त्यांच्या कितीसे उपयोगी पडणार हा प्रश्नच आहे. असें असतां ब्राम्हणांच्या मांस खाण्यावरच हिंदुस्थानची सारी उन्नति अडून राहिली आहे. असेंच जवळ जवळ भासविलें जातें. हल्लीच्या बिकट परिस्थितींत मांसाशिवाय ब्राह्मण जगेल किंवा नाहीं हा स्वतंत्र प्रश्न आहे. त्याचा हिंदुस्थानाच्या सौभाग्याशीं दाखविला जातो तसा संबंध नाहीं. म्हणून ब्राम्हणांनीं त्याचा विचार हिंदुस्थानच्या दृष्टीनें न करतां आपल्या स्वतःचे दृष्टीनें केला पाहिजे.

स्त्रियांचे प्रश्नाचीही अशीच गोष्ट आहे. जे कित्येक हक्क स्त्रियांना आज पाहिजे आहेत त्यांच्यावाचून जर राष्ट्राचें गाडें खरोखरच अडलें

असेल तर राष्ट्रांतील बहुसंख्य स्त्रियांस ते, धर्माची आडकाठी न येतां देऊन राष्ट्राचें गाडेंही पुढें रेटतां येईल आणि ब्राह्मणस्त्रियांस आपलें विशिष्टत्वही कायम राखतां येईल. असें वैशिष्टय कायम राखण्याची काय गरज आहे, तें राखतां येईल किंवा नाहीं आणि राखल्यास एक-राष्ट्रीयत्वाच्या आड येईल किंवा काय, त्याचप्रमाणें तें सोडल्याखेरीज राष्ट्राचें हित करणें शक्यच नाहीं कीं काय, इत्यादि सर्व प्रश्न या ठिकाणीं उद्भवणें सयुक्तिक आहे. परंतु या वादांत मला येथें शिरतां येणार नाहीं. एकतर या पुस्तकाकरतां आखलेल्या मर्यादेपलीकडे फार विस्तार करावा लागेल आणि दुसरें असें कीं, ज्यांना आपल्या हिंदुत्वाची आणि म्हणूनच वैदिकत्वाची चाड आहे अशांकरितांच हें ग्रंथलेखन आहे, आणि म्हणूनच स्त्री आणि विवाहसंस्था यांच्या मूळ वैदिक धारणा काय आहेत तें पाहण्याचा हा उद्योग आहे. कोणत्याही कारणाकरितां कां होईना, हिंदुत्व म्हणून कांहीं वेगळें राखण्यांत आतां शहाणपणा नाहीं, अशीच ज्यांची श्रद्धा आहे, त्यांना आपल्या आर्यत्वाचा आणि त्याच्या श्रेष्ठपणाचा अभिमान असण्याचें कारणच नसल्यामुळें त्यांच्या दृष्टीनें हें प्रश्नच संभवत नाहींत. जगांतील सारे मानवजीव ज्या वर्गांत आहेत त्याच वर्गांत असणें, फारच झालें तर, वर्गांतल्या वर्गांत वरचा नंबर मिळविणें हीच त्यांची इतिकर्तव्यता असल्यामुळें सर्व मानवजातीच्या विचाराच्या सामान्य ओघाप्रमाणेंच हें प्रश्न त्यांना सोडवावे लागणार. म्हणून या प्रश्नांचा या लेखांत जास्त विचार करण्याचें कारण नाहीं.

## सामाजिक घटनांचें मुख्य तत्व

आतांपर्यंत केलेल्या एकंदर प्रतिपादनावरून एक गोष्ट लक्षांत येईल कीं, विवाहाचें आद्यतत्व प्रेम हें नसलें पाहिजे असें जें आमच्या लोकांनीं ठरविलें, तें त्यांना प्रेमाची गोडी नव्हती अथवा प्रेमाचें महत्व कळत नव्हतें म्हणून नव्हे. तर समाजाच्या हिताकडे पाहूनच हा गोड घांस, केवळ प्रसाद म्हणून त्यांनी आपल्या लोकांच्या ताटांत टाकला. असें करण्यांत समाजाचें नुकसान तर त्यांनी कांहींच केलें नाहीं, परंतु उलट, विवाहसंस्था जास्त टिकाऊ आणि सुखकारक केली अशी साक्ष अनेक

परकीय विद्वानांनीं दिलेली आहे. तसें करण्यांत स्त्रीचेंही त्यांनी नुकसान केलें नाहीं. आपली समाजव्यवस्था ठरवितांना ज्याप्रमाणें वैदिक लोकांनी परपरत्वें अधिकारविभागणीचें तत्त्व डोळ्यांपुढें ठेवलें होतें त्याप्रमाणेंच, आतांपर्यंत प्रतिपादिलेलें प्रेमशास्त्र ध्यानांत घेऊन दुसरेंही एक तत्त्व ठेवलें होतें. आपल्या सर्व संस्था मध्यम मानांत बसवून आपला बहुजन-समाज सुखदु:खाच्या मध्यरेषेवर स्थिर केल्याखेरीज गत्यंतर नाहीं, हें त्यांनी पुरतें ओळखलें होतें. कोणत्याही समाजामध्यें नेहमीं तीन प्रकारचे लोक आढळतात. एक, स्वभावत:च उत्तम गुण-संपत्तीचे आणि ज्यांना आपण थोर, उदात्त किंवा उदार म्हणतों तसल्या प्रवृत्तीचे. समाजांतील अभिजात वर्ग म्हणतात तो हा. यांनांच श्रीसमर्थांनी सद्विद्येचें व गीतेनें दैवीसंपत्तीचें म्हटलें आहे. हे कोणत्याही परिस्थितींत राहिले तरी त्यांतल्यात्यांत स्वत: सुखी होण्याची आणि दुसऱ्यास सुखी करण्याची यांच्या अंगांत पात्रता असते. आणि स्वत: सुखी होणें शक्य नसल्यास आपलें दु:ख निमूटपणें गिळून टाकून विलक्षण मनोबलानें सुखी असल्याचा देखावा करूनही हे दुसऱ्यास सुखी करूं शकतात. पृथ्वीच्या पाठीवर सर्व ठिकाणीं असे लोक आहेतच. असे थोडे तरी लोक ज्यांत नाहींत असा कोणताच समाज जिवंत राहूं शकत नाहीं. या दृष्टीनें हे लोक संस्था आणि व्यवस्था यांच्यापलीकडे असतात. म्हणजे त्यांचे निर्बंध त्यांना मान्य नसतात असें नाहीं. तर ते सर्व इमानेंइतबारें पाळूनही, "जातीच्या सुंदरांना" ज्याप्रमाणें कांहींही शोभतें आणि कोणत्याही गोष्टीनीं त्यांचें सौंदर्य उलट खुलूनच दिसतें त्याप्रमाणें, कोणत्याही संस्थेंत अथवा व्यवस्थेंत ते, आपले सुखी होण्याचें अथवा दुसऱ्यास सुखी करण्याचें कार्य संपादीतच असतात. समाजाची घडी बसवितांना यांच्याकडे लक्ष देण्याचें कारण नसतें.

## ललित वाङ्मय

समाजाच्या निरनिराळ्या घड्यांचें समर्थन करण्याकरितां जें कांहीं काव्य, लघुकथा, कादंबरी, नाटक अथवा प्रबंध इत्यादि वाङ्मय लिहिलें जातें त्यांत बहुतकरून अशी चूक केली असते कीं, ज्या व्यक्तींच्या दर्शनानें

त्या घडीचा चांगलेपणा सिद्ध करावयाचा असतो, ती या वर्गांतली घेतलेली असते; त्यामुळें तो सुपरिणाम त्या विशिष्ट घटनेमुळें घडून आला कीं त्या व्यक्तीच्या अभिजाततेमुळें घडून आला याचा नीटसा बोध होत नाहीं. नवऱ्याचें जीवन एकेरी असो कीं दुहेरी असो, माडखोलकरांची सालस सुलू घरधनीण असतां त्या घरांत सुखच नांदणार. याच्या उलट "गीता" ज्यांना आसुरी प्रवृत्तीचे म्हणते ते अविद्येचे लोक होत. यांना कितीही चागल्या परिस्थितींत ठेविलें तरी हे दुसऱ्यास दुःखच देणार, आपलें जीवन अपयशी करणार आणि ज्या सामाजिक घटनेंत ते असतील तिला नालायक ठरविणार. या दोन्हींही वर्गांतील लोक जरी समाजांत पुष्कळ असले तरी बहुजन समाज यांच्या मध्यरेषेवर असतो. त्यांच्याकरतां सामाजिक घटनेचें महत्व आहे. अभावितपणें सद्विद्येचा उठाव होऊन अविद्येचा अंश नामोहरम होईल अशी कांहींतरी घटना त्यांना पाहिजे असते. तरच ते लोक सामान्यतः स्वतः सुखी होतात. दुसऱ्यास निदान दुःख तरी देत नाहींत आणि त्यामुळें सामाजिक जीवनाचा ओघ संथ आणि गंभीरपणें वाहूं शकतो. सामाजिक घटनांची रचना करताना विशेषतः हा वर्ग लक्षांत घ्यावा लागतो.

इतर सर्व गोष्टींप्रमाणें प्रेमाचा साक्षात्कार प्रेम-सामर्थ्य आणि प्रेमसुख यांच्या बाबतींतही हा वर्ग अपुऱ्या वाढीचाच असतो. मागील लेखांकांत प्रेमाविषयीं ज्या कांहीं गोष्टी सांगितल्या—म्हणजे तें विकासशील आहे, त्याची प्रतीति घेण्याची पात्रता प्रत्येकांत नसते आणि त्याची प्रतीति येण्यास देखील बहुजन समाजाला विशिष्ट वयाची, विशिष्ट परिस्थितीची आणि विशिष्ट अनुभवाची गरज असते—ते सर्व या वर्गांतील लोकांस अनुलक्षून आहे. अशा स्थितींत प्रेम हेंच प्रमुख तत्त्व धरून त्याच्या धोरणानें विवाह लावले गेले तर ते सुख-परिणामी न झाल्यास नवल नाहीं. झाले तर नवल. समाजाचें वास्तविक चित्र दाखविण्याच्या हेतुनें तयार केलेलें ललित वाङ्मय पाहिलें तर असेंच दिसून येतें. पाश्चात्यांत या प्रेम-विवाहाचें बंड फार वाढलें आहे. विवाह-संस्था जवळजवळ नाहींशी होऊं पहात आहे. कुटुंब-संस्था नष्टच झाली आहे. सकाळीं

विवाह आणि संध्याकाळीं घटस्फोट अशा मासल्याचे हास्यास्पद प्रकार हवे तितके होऊं लागले आहेत. खून, आत्महत्या, वेड यांना ऊत आला आहे आणि आश्चर्यकारक अशीं सर्व प्रकारचीं सुखाचीं साधनें परिपूर्ण असूनही सुखाची तृष्णा मात्र यत्किंचितही पुरी न होतां अतृप्ततेनें उलट एकसारखी वाढतच गेल्यामुळें, बाहेर प्रेमाचें नाटक करणारीं लक्षावधी अंतःकरणें, आपल्या ठिकाणीं नित्यशः एकसारखी तडफडत व रडत आहेत. 'सुखाचा शोध' न लागल्यामुळें नित्य नवीन नवीन प्रकार आणि नवेनवे ढंग उत्पन्न होत आहेत आणि या सर्वांचा भावी परिणाम लक्षांत आल्यामुळें प्रज्ञावंतांचीं अंतःकरणें भयविव्हल व सचिंत होऊन आतां पुन्हां उलटे सूर काढूं लागलीं आहेत. त्या सर्वांचा अर्थच हा आहे कीं, विवाहाच्या बाबतींत प्रेमाला सर्वस्वी शहाणे समजण्यांत आणि सर्व अधिकार त्याचेकडे देऊन टाकण्यांत कांहीं तरी चूक होत आहे, असें त्यांना आतां वाटूं लागलें आहे. अर्वाचीन मराठी वाङ्मयांतही, हें प्रेमतांडव संपून आतां काहीं निराळी प्रभात दिसूं लागणार, असें सूचित करणारे कांहीं कोंबडे आरवूं लागले आहेत. सुप्रसिद्ध लेखक खांडेकर यांचें "पहिलें प्रेम" हें या दृष्टीनें सर्वस्वीं नसलें तरी फार आदरणीय आहे. 'सर्वस्वी नसलें तरी' असें म्हणण्याचें कारण असें कीं, चांगला सुंदर विचार घेऊन, त्याचा संपूर्ण ठसा मात्र वाचकाच्या किंवा प्रेक्षकाच्या मनावर कधींच उठणार नाहीं अथवा त्यामुळेंच तो जास्त भोंवऱ्यांत पडून कांहींतरी यद्वातद्वा करण्यास प्रवृत्त होईल, असा या कादंबरीचा प्रकार एका बारीक गोष्टीनें झाला आहे. 'प्रेम' वाटणें स्वाभाविक आहे. पण तसें वाटतें असें वाटतांच त्याच्या मागें लागावें कां कांहीं समंजसपणानें त्याला आळा घालावा, हाच तर प्रश्न आहे [ 'प्रेम' करण्याचा तरुणांचा हक्कच आहे' हा श्री. खांडेकर यांचा अभिप्राय वाचतांच, वायकोनें केलेलीं पक्वान्नांचीं वर्णनें ऐकून तोंडाला पाणी सुटलेल्या मृच्छकटिकांतील सूत्रधाराचा ज्याप्रमाणें "अस्त्यापणे" असें तिनें म्हटल्यावरोबर एकदम विरस होऊन जातो, त्याप्रमाणें वाचकाची स्थिती होऊन जाते.]

## 'पहिल्या प्रेमा'चें परीक्षण

आपल्या विषयाच्या दृष्टीनें सदरहू कादंबरी अवश्य वाचण्याजोगी आहे. प्रेम हेंच विवाहाचें आद्य तत्व समजून आणि tha first love is the only love. and by the second highest sense of love is already lost, पहिलें प्रेम हेंच खरें प्रेम, दुसरें प्रेम केवढेंहि चांगलें असलें तरी प्रेमातील वाफ निघून गेलेली असते. म्हणजे पहिलें प्रेम हेंच खरें प्रेम, दुसऱ्या प्रणयांत आनंद नसतो असें नाहीं, परंतु पहिल्यांतला आनंदाचा अतिरेक त्यांत थोडातरी कमी झालेला असतो, हें गटेचें महावाक्य उराशी बाळगल्यानें नित्य लक्षावधी तरुणतरुणींचीं जीवनें दु:खमय होऊन केवढा राष्ट्रघात होत आहे, हें लक्षांत आल्यामुळें पाश्चात्य राष्ट्रांत आतां त्याच्याविरुद्ध पुन: चळवळ होऊं लागली आहे. आपलीही नवीन पिढी त्याच वळणावर जात असल्यामुळें श्री. खांडेकर यांनी त्यांना 'खबरदार' करण्याकरतां 'पहिल्या प्रेमा'चा हा तांबडा कंदिल उभा केला आहे. परंतु 'प्रेम करण्याचा तरुणांचा हक्कच आहे', असें म्हणून स्वत:च त्यांनीं या कंदिलाचा फारच थोड्या लोकांना उपयोग व्हावा, अशीही व्यवस्था करून ठेवली आहे. सामान्य नीतितत्वापलीकडे सशास्त्र असें सांस्कृतिक ध्येय नसल्यास लिहिणाराचा असा प्रकार होणें साहाजिक आहे. "Morals in the melting pot" (बदलणारी नीतिमूल्यें) हें इंग्रजी पुस्तक या दृष्टीनें वाचण्याजोगें आहे. आधुनिक परिस्थितीमुळें तरुणतरुणींचें जें वर्तन अलीकडे घडतें त्याचा आणि त्याच्यामुळें उद्भवणाऱ्या अनेक प्रश्नांचा सूक्ष्म विचार करून ग्रंथकारानें शेवटीं दोन निष्कर्ष काढले आहेत. एक 'प्रेमापलीकडे विवाहांत आणखी कांही आहे' हें तरुणांनी लक्षांत ठेवून 'प्रेमभंगामुळें सर्व बाजार बुडाला' अशी समजूत होऊं देऊं नये आणि दुसरा 'संततिप्रतिबंधक उपायांचा नीट अभ्यास करून आपले प्रेमाचे प्रयोग जास्त अनर्थकारक होणार नाहींत, याची खबरदारी घ्यावी.' संततिप्रतिबंधकांचा उपदेश या कादंबरींत श्री. खांडेकर यांनीं केला नाही, हें खरें आहे. तथापि प्रेमभंगानें निराशा होऊं देऊं नये, हें उपयुक्त तत्व सारखेंच आहे. श्री. खांडेकर

काय किंवा ग्रिफिथ काय, या सर्व लेखकांच्या लक्षांमध्यें ही गोष्ट येत नाहीं कीं, तरुणांच्या भावना अतिशय उत्कट व शक्तिमान असतात आणि सारासार विचार करून कोणत्याही गोष्टींचें सेवन करण्याची पात्रता अंगीं येण्यास त्यांना बराच अनुभव घ्यावा लागतो. अशा वेळीं, एकतर कोणास किती प्रयोगांनी ही पात्रता येईल, याचा कांहीच नियम नाहीं. प्रेमभंगाचा एक प्रयोग झाल्याबरोबर लगेच मनुष्य शहाणा होणें शक्य असतें, तर श्री. खांडेकर यांना आपलें 'पहिलें प्रेम' प्रसिद्ध करण्याची गरजच वाटली नसती. आणि दुसरें असें कीं असें शहाणपण सुचलें तरी त्याला अनुसरून, thus for and no further, 'बस एवढेंच अशा' रीतीनें आपल्या मनोवृत्तींवर ताबा चालविण्याची शक्ति कादंबरींतल्या पात्रांइतकी व्यवहारांतल्या व्यक्तींत सुलभ नसते. जीवन नीरस झालें म्हणून आत्महत्येच्या तयारीनें बाहेर पडलेले असतांही इतक्या लवकर सुविचार सुचणारे 'प्रभाकर' व्यवहारांत कितीसे आढळतील ? अशा स्थितींत प्रेमाचे खेळ करण्यास प्रथमत: प्रोत्साहन द्यावयाचें आणि दुसरीकडून त्याचे परिणाम मात्र मनावर होऊं देऊं नको असें सांगावयाचें, हें एकदम मनुष्याला स्थितप्रज्ञ होण्यास सांगण्यासारखें आहे. सामान्यत: सर्व जगाचा अनुभव असा आहे कीं असे पुरुष फार थोडे असतात आणि नुकतेंच वर सांगितल्याप्रमाणें सामाजिक घटना करतांना त्यांच्याकडे लक्ष देण्याचें कारण नसतें. ज्यांच्याकडे लक्ष देण्याची जरूर असते, त्यांच्यासंबंधी असा अनुभव आहे कीं अनिष्ट गोष्टींपासून त्यांना आधीपासूनच दूर ठेवणें हाच एक उपाय शक्य असतो. त्यामुळें मनांत भरण्याजोगती कोणतीही तरुणी सहवाससुलभ झाली म्हणजे तिच्याकडे 'पत्नी' म्हणून पाहावयाला लागण्यांत अथवा अशा तरुणाच्या स्वाधीन शरीर करण्यांत कांही वावगें नाहीं, इतकेंच नाही तर उमर खय्याम सारखे मोठमोठाले देखील 'तसें करण्यांत कांही गुन्हा नाही' असें म्हणतात, तेव्हा तो एक स्वाभाविक धर्मच आहे, अशी त्यांची समजूत करून देऊन त्या विषयांत त्यांना लोटल्यावर जरी त्यांनी मागाहून माडखोचकरांच्या मुकुन्दरावाप्रमाणें 'माझ्यावर झालेल्या संस्कारांचा आणि मला आलेल्या अनुभवाचा परि-

णाम आहे हा, त्याला मी काय करूं ?' अशा निर्लज्जपणानें* आपल्या वर्तनाचें समर्थन करण्याचा यत्न केला तरी देखील शेवटी, 'मी कांही एकटाच हीणकस नाहीं या दुनियेंत' असें हीणकस समाधान मानून घेण्याचाच प्रसंग येतो ! याचें कारण उघड आहे. कादंबरींतील पात्रें नुसतें उत्कट प्रेम करूं शकतात, आलिंगनचुंबनादि सोहळे अनुभवूं शकतात आणि पुन: समागमापासून अलिप्त राहूं शकतात; व्यवहारांत तसें घडत नाही. इतके सर्व प्रकार हक्कानें करून पुन: समागमापासून अलिप्त राहूं म्हणणारा मनुष्य व्यवहारांत एकतर विरळा आढळतो, अथवा दैववशात जास्त संधि न मिळाल्यामुळें वांचलेला ! अशा स्थितीत खांडेकरांनी दिलेल्या या हक्काचे दोनच परिणाम संभवतात. एकतर संततिप्रतिबंधक साधनें वापरून लग्नाचा योग येईपर्यंत गंभीरपणें प्रेमभंगाचे प्रयोग पहात बसावें किंवा अशी ताकत अंगीं नसल्यास स्वत:च्या आयुष्याचा कांही वेडाविद्रा परिणाम करून घ्यावा.

## खांडेकरांचीं तीन तत्वें

या कादंबरींत श्री. खांडेकर यांनी मुख्य तीन तत्वें सांगितलीं आहेत. पुष्कळ वेळां 'पहिलें प्रेम' म्हणून तरुण ज्याला समजतो, तें वस्तुत: प्रेम नसतेंच. आम्हीं मागें प्रेमाचें जें स्वरूप दाखविलें आहे त्यास धरूनच हा निष्कर्ष आहे. मग ज्या वाटेनें मृगजळ लागण्याचा संभव आहे, अशा वाटेवर सावजाला सोडाच कां ? त्यांत कोणतें शहाणपण आहे ? यावर कोणी असें म्हणेल की हें सोडावें लागत नाहीं, 'लपंडावां'तील सुलभेनें म्हटल्याप्रमाणें 'कोणी सोडल्याशिवाय हें सावज स्वभावत:च तिकडे जातें,' मग त्याला 'नाहीं' म्हणण्यांत तरीं काय अर्थ आहे ? तर हें म्हणणें सयुक्तिक नाहीं. युरोपांत काय किंवा इकडे काय अर्वाचीन वाङमय उत्पन्न होण्यापूर्वी देखील हजारों वर्षें स्त्रीपुरुषें तारुण्यावस्थेंत राहतच आले आहेत. सुलभेनें म्हटल्याप्रमाणेंच नैसर्गिक प्रेरणेनेंच त्यांच्याही

---

*असें म्हणण्याचें कारण, हें समर्थन घेतलें की कोणतीही गोष्ट योग्यच आहे !

मनोवृत्ती तरल होत आल्या आहेत. सुलभेचा सिद्धांत कांही नवा नाहीं. बाणाच्या महाश्वेतेनें तो पूर्वीच सांगून ठेवला आहे; परंतु त्याबरोबरच त्या अन्त:प्रवृत्तीचें स्तोम माजविल्यास जन्मोजन्मीं रडावें लागतें, 'तृणमिव लघुवृत्ति: स्त्रैणम्' असें म्हणण्यांतच कल्याण आहे, हेंहि सत्य तिनें निर्भयपणें शिकविलें आहे. म्हणजे सर्व काळीं तरुण स्त्रीपुरुषांची अवस्था एकच राहात आली आहे, तरीपण हल्लीच्यांसारखे दुःखमय प्रसंग आणि प्रश्न उत्पन्न होऊन एकंदर समाजाची शांतता कधी बिघडली नाहीं. याचें कारण हेंच की सुंदर दिसली आणि सुलभ झाली कीं प्रेमाच्या मागें लागण्याचा हक्क आहे, अशी शिकवण त्या वेळी मुलांमुलींस दिली जात नव्हती. 'मोह उत्पन्न होणें' हा स्वाभाविक धर्म आहे. परंतु त्या मोहाची पूर्तता हवी त्या रीतीनें करून घेण्याचा हक्क नाहीं; सांस्कृतिक ध्येयाला अनुसरून समाजाच्या कल्याणार्थ अवश्य असलेल्या कांहीं पद्धतीनेंच तो पूर्तता करून घेतली पाहिजे; तसें होत नसल्यास कितीही मोह झाला तरी मन घट्ट करून त्याच्यामागें न जाण्याचाच हक्क आहे, अशी शिकवण दिली जात होती; आणि तीच जास्त परिणामकारक होत होती, असें आजपर्यंतच्या जगाच्या इतिहासावरून स्पष्ट होतें. तात्पर्य इतर कोणत्याहि गोष्टीचा निर्बंध न पाळतां प्रेम करण्याचा तूं खुशाल हक्क घे, परंतु प्रेमभंग झाल्यास मात्र बेडरपणें खुशाल दुसरे प्रयोग करून पहा, हें श्री. खांडेकर यांचें सांगणें, बहुजनसमाजाच्या दृष्टीनें तरी 'दलदलीत उडी घे पण फसूं नको' असें सांगण्यासारखें आहे; बहुजनसमाजाला त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. दलदलीपासून दूर ठेवणेंच हितावह ठरतें. अर्थात यासंबंधीं वादांत शिरण्याकरतां हें लिहिलें नाहीं. हें चूक आहे असें कोणास वाटत असल्यास खुशाल वाटो! श्री. खांडेकर यांचेवरहि मला टीका करावयाची नाहीं. भारतीय दृष्टिकोण या बाबतींत कसा आहे हेंच सांगावयाचें व या कादंबरीवरून तो फार चांगला लक्षांत येतो. म्हणून तिचें उदाहरण घेतलें इतकेंच. थोडाबहुत मतभेद असणारच, पण कादंबरी मला तर फार उपयोगी व वाचनीय वाटते.

ही विचारसरणी अर्थातच केवळ सुखदुःखाच्या दृष्टीनेंच मी मांडली आहे, तिच्याशी संस्कृतीचा कांहीं संबंध नाहीं. दुसरें तत्व खांडेकरांनीं

अनुक्रम..२३९८८..... दि: ..१.
क्रमांक ...१३८८...... नों दि:..

असें मांडलें आहे कीं पहिलें प्रेम हें खरें आहे, असें समजलें तरी त्यांत झालेल्या निराशेनें मनुष्याची स्त्रीच्या प्रेमानें सुखी होण्याची पात्रता नष्ट होते, असें नाहीं. ती पात्रता संपूर्ण राहते, असें तर तेही म्हणू शकत नाहींत; कारण आपल्या परिणीत पतिपत्नीच्या सहवासांतही त्यांच्या कादंबरींतील पात्रें पूर्वीच्या प्रेमाच्या आठवणींनीं व्याकुळ होतातच. म्हणजे श्री. खांडेकरांच्या मनांत तरुणांच्या मनावर कांहींही बिंबवावयाचें असलें तरी by the second the highest sense of love is already lost हें त्यांनाही मान्य करावें लागलेंच आहे. सुदैवानें कादंबरींतील पात्रें तितकीं चाणाक्ष नसतात किंवा माडखोलकरांच्या सुलोचनेप्रमाणें, गडकऱ्यांच्या सिंधूला गुरु मानून आमच्या अडाणी बायकांवरही ताण करून 'मीच मेली वाईट !' असें म्हणणारी असतात म्हणून बरें ! त्यांना जर कां इंग्रजी कादंबऱ्यांतील नायकनायिकांप्रमाणें त्या व्याकुळतेचा वास आला तर कादंबरीची ट्रॅजेडी होण्यास फारसा वेळ नको ! आणि नित्य व्यवहारांतील पात्रें बहुधा तितकीं चाणाक्ष नसतात, असाच अनुभव आहे. हा जो पहिल्या प्रेमाचा ठसा अंतःकरणावर राहतो तो कांहींकेल्या नाहींसा होतच नाहीं, असाच अनुभव बहुतेक सर्व भावनाभ्यासी लेखकांनीं सांगितला आहे. त्याची तीव्रता निरनिराळ्या व्यक्तींत निरनिराळ्या प्रमाणाची असू शकेल. त्यामुळें किंवा पहिलें प्रेम खरें प्रेम नसतेंच, अनुभवानें खरें प्रेम उत्पन्न होतें, हें खरें असल्यामुळें (हें खरें, असें मी म्हणत नाहीं आणि खांडेकरांनाही तसें निखालसपणें दाखवितां आलें नाहीं, पण तसें म्हणण्याचा त्यांचा प्रयत्न आहे; तें खरें मानून मी असें म्हणतों) मागें सांगितल्याप्रमाणें सारे प्रश्न उत्पन्न होतात. खरें प्रेम उत्पन्न होईपर्यंत किती प्रयोग करीत राहावयाचे आणि अशा अनेक प्रयोगांनीं तरी तें उत्पन्न होईलच कीं नाहीं, याची शंकाच आहे. ही आपत्ति जास्त वाटू नये म्हणून आणि नुसत्या प्रायोगिक ज्ञानापलीकडे प्रेम कळण्यास सुलभ जावें म्हणून खांडेकरांनीं आपल्या तिसऱ्या सिद्धांतांत 'प्रेमाचें तत्व' सांगितलें आहे. तें तत्व हेंच आहे कीं **प्रेमाची अपेक्षा करण्यांत खरें प्रेम नाहीं, प्रेम देण्यांत खरें प्रेम** आहे; त्याची पूर्तता किती होईल, याचा हिशोबी पद्धतीनें अंदाज पाहून प्रेम करणें, तें प्रेमच

नव्हे ; ती होवो न होवो, आपला स्वभाव म्हणून प्रेम करणें, आपल्याला कदाचित थोडें अथवा पूर्ण समाधान मिळत नसलें तरी त्या समाधानाच्या प्रेमापेक्षां दुसऱ्या जीवाला सुखी करण्याच्या संतोषाचेंच जास्त प्रेम असणें हेंच काय तें प्रेमाचें रहस्य* असा त्यांच्या लिहिण्याचा मथितार्थ आहे: आणि त्यांत अत्यंत सत्य आहे.

## भारतीय पद्धति

मागें सांगितल्याप्रमाणें जगाचा हजारों वर्षांचा इतिहास वैवाहिक जीवन सुखी असल्याचा जो देखावा दाखवितो, तो या कारणामुळेंच ! या प्रेमाचाच आदर्श त्या वेळच्या विवाहितांपुढें ठेवला जात असे; मात्र इतकेंच कीं प्रेम करण्याच्या हक्कानें त्यांना दुःखांत न टाकतां तो शिकविला जात असे, म्हणून सुपरिणामी होत असे. कारण त्यामुळें असें होई कीं ज्या प्रयोगांना खांडेकरांना दोन स्वतंत्र शाळा घ्याव्या लागतात, ते प्रयोग तरुणतरुणी एकाच शाळेंत शिकत. अर्थात या शिकण्याची पद्धति मात्र निरनिराळी होती. खांडेकरपद्धतींत प्रथमतः एकमेकांवर प्रेम करावयाचें म्हणजे प्रेमाची पूर्ण कल्पना उराशीं धरून, तें अनुभविण्याची धडपड करायची; दैवाचा फांसा अनुकूल पडला तर सारेंच ठीक, पण दुर्दैवानें उलट पडून तसा न सुटल्यास प्रेम देण्यांत प्रेम आहे, हा समंजसपणा धरावयाचा अथवा तो धरून व पुनः कोणावर तरी प्रेम करून त्याला सुखी करावयाचें असा आहे. आमच्या शास्त्रकारांचा क्रम उलटा आहे. शास्त्रसंमतीनें जो कोणी जोडीदार ठरेल त्याला प्रेम देण्यांत आणि सुखी करण्यांत खरें प्रेम आहे, मग तो कसा कां असेना, या कल्पनेपासून प्रारंभ

---

* टीप–भारतीय स्त्रियांच्या हाडींमासींच ही कल्पना मुरलेली आहे:
सीतादेवी म्हणते: आत्मानं नियमैस्तैस्तैः कर्शयित्वा प्रयत्नतः ।
प्राप्यते निपुणैर्धर्मो न सुखाल्लभ्यते सुखम् ॥
—श्रीरामायण, अरण्यकांड ९-३१.

सुखं सुखेनेह न जातु लभ्यम् । दुःखेन साध्वी लभते सुखानि ॥(वनपर्व २३३-४)
हे द्रौपदीचे उद्गार तर सुप्रसिद्धच आहेत !

करून प्रेम देणें आणि प्रेम मिळणें या दोन्हीही सुखांचे यथाकालीं अधिकारी व्हावयाचे, हा आमचा क्रम. अर्थात या क्रमांत दोन पुरुष पालटण्याचे कांहीं कोणासच कारण पडत नाहीं, आणि कदाचित कांहीं काळ शिकण्याचा ताण जास्त पडलेला दिसला तरी खांडेकरी पद्धतींत उत्पन्न होणारे सारे प्रश्न उत्पन्न न होतां एकंदरींत समाजस्वास्थ्य सुदृढ राहतें.

## प्रचाराचें महत्व

यावर अशी एक शंका येऊं शकेल कीं, कदाचित तुम्ही म्हणतां तें सर्व बरोबर धरलें तरी आतां त्याचा काय उपयोग ? नवीन विचार, नवीन संस्कार, नवीन ध्येय यांनीं आमच्या तरुणांचीं मनें पूर्णपणें भारून गेलीं आहेत, आतां त्यांना या गोष्टी सांगून काय उपयोग ? कालाच्या ओघाला मान देऊन ज्याप्रमाणें पुढें असेल त्याला आपण अनुसरतों, त्याप्रमाणेंच या बाबतींतही करणें भाग आहे. परंतु ही शंका मोठीशी बरोबर नाही. निदान विचारी माणसास तरीती पटणार नाहीं हें उघड आहे. तसें नसतें तर प्रेमभंगाला डरूं नका, असें सांगण्याचा उद्योग श्री. खांडेकरांनीं केलाच नसता. प्रेमाच्या कल्पनेंत बुडून गेलेल्या तरुणांना प्रेमभंगानें गडबडूं नका म्हणून सांगावयाचें, त्याबरोबरच पहिल्यापासूनच प्रेम म्हणजे काय आणि त्याचा हक्क म्हणजे काय, हें नीट समजून घेऊन 'विसरूं नका,' असेंही सांगावयाचें इतकेंच ! जर एकाचा परिणाम होईल तर दुसऱ्याचा कां होऊं नये ? नाहीं तरी आजची स्थिति कांहीं स्वाभाविक नाहीं. परकीयाच्या पावलावर पाऊल ठेवून स्वतःचा मूर्खपणा घोकीत पद्धतशीर प्रकारानें केलेल्या सुमारें शंभर वर्षांच्या सर्वतोमुखी प्रचाराचा तो परिणाम आहे. प्रचारानें जर हें कार्य होऊं शकलें, तर दुसरेंही कार्य कां होऊं नये ? त्या कार्याची आवश्यकता वाटणाऱ्या वर्गानें निश्चय करून, तसाच पद्धतशीर प्रचार सुरू केल्यास, हळुहळू कां होईना, तोही परिणामकारक झालाच पाहिजे. असो. आतां ही सारी भूमिका लक्षांत घेऊन आपल्या मुख्य विषयाकडे वळूं.

# प्रकरण ७ वें

आतांपर्यंत केलेल्या प्रतिपादनाप्रमाणें आपल्या विवाहसंस्थेचें स्वरूप निश्चित करतांना भारतीयांनीं कोणती गोष्ट विचारांत ठेवली होती, त्याची पुन्हा एकदां उजळणी करूं.

(१) स्त्री आणि पुरुष यांचे अंतःकरणधर्म जरी सारखे असले तरी त्यांच्यांतील भेद निव्वळ शरीरापुरतेच नसून जीवदृष्टयाच दोघांत समूळ फरक आहे. याचा अर्थ असा कीं, त्यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता देखील निरनिराळ्या गोष्टींत आहे. म्हणून पहिल्यापासूनच त्यांच्या वाढीची दिशाही निरनिराळी असली पाहिजे.

अर्वाचीन शास्त्रदृष्टयाही लिंगनिश्चयाचें तत्व स्वयंभू असतें आणि स्त्री-पुरुषांच्या Hormones (विजाणू) मध्येंच फरक असतो, हें मागें सांगितलेंच आहे. ह्या फरकाची उपपत्ति अर्वाचीन शास्त्रांस अजून लागली नाहीं. त्या सूक्ष्म पिंडांच्या आश्रयानें असणाऱ्या जीवांतच फरक असतो. म्हणून त्या पिंडांत फरक पडतो. अशी आमचीं शास्त्रें म्हणतात. हा फरक पुढेंही एकसारखा शरीराच्या घटनेंत दिसून येतो. मग तो संततिकार्याकरतां असो अथवा इतर कोणत्याही हेतूनें असो. महत्वाची गोष्ट ही आहे कीं अत्यंत बारीकसारीक गोष्टीपासून स्त्रीच्या शरीराची वाढ वेगळ्या प्रकारानें होत असते. म्हणून तिला मदत करण्याचा प्रकारही पुरुषांच्या शरीराहून वेगळा असला पाहिजे. स्त्रीपुरुषभेद 'देहींच मात्र तो संतति-कार्याला' असें समजून वागणें निसर्गास धरून नाहीं. स्त्री आणि पुरुष यांच्या, वरून सारख्या दिसणाऱ्या अवयवांत देखील सूक्ष्म फरक असले पाहिजेत, हें एका गोष्टीवरून लक्षांत येईल.

## अमृतपिंडाचें विशेष कार्य

मनुष्याच्या मेंदूत अत्यंत महत्वाचा भाग म्हणजे ज्याल 'अमृतपिंड' म्हणतात ती Pituitary gland हा होय. दिसावयास हा पिंड स्त्रीपुरुषांत सारखाच दिसतो परंतु त्याच्या कृतींत फार मोठा फरक पडतो. उदाहरणार्थ, स्त्रीअंड नुसतें गर्भाशयांत येऊन अथवा पुरुष-बीजाशीं त्याचा संबंध येऊन भागत नाहीं. गर्भाच्या वाढीकरतां गर्भाशयाची वृद्धि होणें वगैरे गोष्टींची आवश्यकता असते. शास्त्रज्ञांची अशी कल्पना आहे कीं, 'अमृतपिंडा' पासून एक विशेष स्राव गर्भाशयाकडे जातों आणि त्याच्यामुळें हें कार्य घडून येतें. गर्भधारणेंनंतर हा स्राव जर न मिळाला तर गर्भधारणा निष्फळ होते. आणि केव्हां केव्हां गर्भधारणा नसतांही अमृतपिंडाच्या क्रियेनें असा स्राव तेथें पोहोचतो, तेव्हां, गर्भ नसूनही गर्भधारणेचीं सारी चिन्हें उमटतात. याचा अर्थ असा कीं, स्त्रीच्या अमृतपिंडांतच ही शक्ति असते. ती पुरुषांत नसते. अशी शक्ति त्या पिंडांत यावयाची म्हणजे मुळापासूनच त्याची वाढ वेगळ्या रीतीनें झाली पाहिजे. मनुष्याच्या शरीरावर सर्वस्वी सत्ता चालविणारा जो मेंदू त्याचा हा 'अमृतपिंड' म्हणजे बालेकिल्ला आहे. त्याचीच जर ही गोष्ट तर इतर अवयवांची कथा सांगावयास नकोच. भारतीयांनीं इतक्या सूक्ष्मदृष्टीनें हें शास्त्र जाणलें होतें. असें जरी आज म्हणतां येणार नाहीं तरी, हें तत्व जाणले होतें हें खास. याच्याच बरोबर, अर्वाचीन मानसशास्त्रज्ञांना जी गोष्ट नुकती कोठें कळूं लागली आहे तिचाही साक्षात्कार त्यांना झाला होता. या नवीन गोष्टीसच हल्लीं मानसशास्त्रांत "रूपमानस" म्हणजे Form Psychology अथवा Gastalt असें म्हणतात.

## रूपमानस (Form Psychology)

ह्या मानसशास्त्राचें तत्व असें आहे की, मनुष्याच्या अंतरिंद्रियांना बाह्य वस्तूंचें जें ज्ञान होत असतें, तें केवळ त्यांच्या पृथक्संस्कारांपुरतेंच नसून त्यापासून प्रत्यक्ष न मिळणारा परंतु सर्वांचा मिळून होणारा वेगळा, असाही कांहीं संस्कार उत्पन्न होत असतो. ह्या संस्कारालाच जर्मन

शास्त्रज्ञांनी Form म्हणजे "रूप" असें नांव दिले आहे. एका उदाहरणावरून हें लक्षांत येईल. ज्यावेळेला आपण गाण्याचे सूर काढीत असतों त्यावेळेला सा, री, ग, म, इत्यादि सुरावटीची तर प्रतीति येतच असते. पण तिच्यावरोबरच कांहीं दुसऱ्या गोष्टींची प्रतीति येत असते. तिलाच आपण राग म्हणून ओळखतों. या सुरावटींना गायनशास्त्रांत 'रागाचें स्वरूप' असाच शब्द आहे. सप्तस्वरांप्रमाणें बाहेरून घेतलेल्या निरनिराळ्या संस्कारांचा मिळून रागासारखा जो एक परिणाम मेंदूवर होतो त्यालाही अर्वाचीन शास्त्रांनीं 'स्वरूप' असेंच नांव दिलें आहे, तें समर्पकच आहे. याचा प्रतिसिद्धांत असा कीं, ज्या तऱ्हेचा राग उत्पन्न करावयाचा असेल त्या तऱ्हेची सारी सुरावटच वेगळी करावी लागते. आपल्या विवाहसंस्थेंत अत्यंत महत्वाचे घटक जे स्त्रीपुरुष त्यांची वाढ देखील, हें मानसशास्त्र लक्षांत ठेवून झाली पाहिजे, नाहीं तर, बेसूर मामला होईल हें भारतीयांच्या लक्षांत आलें होतें. अलीकडच्या पद्धतीच्या, म्हणजे पूर्वी सांगितल्याप्रमाणें बेसूर अशा, Harmony हार्मनी संज्ञक प्रकाराने देखील करमणूक होऊन आनंद होत नाहीं असें नाहीं, पण त्यानें, रसाचा पूर्ण परिपोष होऊन भारतीयांच्या गानयोगाचें ध्येय पदरांत पडत नाहीं, हेंही तितकेंच खरें तसाच हाही प्रकार आहे.

## गायनाचा दृष्टान्त

गायनशास्त्राच्या उदाहरणावरूनच, अर्वाचीन आणि प्राचीन यांच्या स्त्रियांच्या वाढीसंबंधींच्या कल्पनांतील फरक उत्तम लक्षांत येतो. अलीकडे संगीताच्या प्रांतांत एक मोठाच वाद उत्पन्न झाला आहे. पाश्चात्य आणि पौर्वात्य यांच्या समागमांत ज्याप्रमाणें, प्रत्येक बावतींत, 'पाश्चात्य कां पौर्वात्य?' असा भ्रम आमच्या मंडळीस पडला, तसाच हाही आहे. नवलाची गोष्ट ही आहे कीं, हा वाद इतक्या उशीरां उत्पन्न झाला. प्रत्येक गोष्टीला अनुकूल निमित्त लागत असतें. सिनेमाच्या धंद्यानें ह्या वादास निमित्त सांपडलें. त्यामुळें हा वाद आणि त्याला धरून असणारे 'स्वरांचें सप्तक म्हणजे काय,' 'रसांचा आणि रागांचा कांहीं स्वयंभू संबंध आहे कीं नाहीं,' 'पाश्चात्य संगीत व आमचें संगीत यांचें मिश्रण

कसें करावें,' 'हार्मनीचा आणि आमच्या रागदारीचा मेळ कसा घालावा,' 'हार्मनीच्या योगानें आमच्या संगीताची हानि होईल कीं काय,' 'आमच्या, संगीताची किंमत तरी काय,' 'ती हानी झाल्यास आमचें मोठें नुकसान होईल कीं काय' आणि 'ती हानी होऊं देऊन देखील घेण्याइतकी हार्मनीची किंमत आहे कीं काय' इत्यादि साऱ्या प्रश्नांचा मोठ्या जोरानें खल होत आहे. आपल्या पुढील प्रश्न आणि हा प्रश्न तत्वतः एकाच स्वरुपाचे आहेत. म्हणून ह्या प्रश्नांचा विचार करणें आपल्या प्रश्नांच्या दृष्टीनेंही उपकारकच होईल. एवढ्याकरतां तसा थोडा विचार करूं.

वर सांगितलेले संगीतांतल्या अनेक प्रश्नांचे वाद हल्लीं ज्या दृष्टीनें सोडविण्याचा यत्न केला जातो, त्या दृष्टीनें त्यांचें खरें उत्तर मिळेल असें वाटत नाहीं. वर सांगितलेंच आहे कीं, या वादाची उत्पत्ति विशेषतः, सिनेमाच्या धंद्यांतून निघाली आहे. असें नेहमी सांगितलें जातें की, हल्लीच्या जीवनकलहाच्या तीव्रतेनें तापून गेलेल्या मनाला शास्त्रदृष्टीची गरज असतेच कोठें ? कोणीकडून तरी घटकाभर करमणूक करून घ्यावयाची असते आणि तेवढ्याकरतां लोक सिनेमा पाहावयास येतात. त्यांना शास्त्राची गरजही नसते, आणि शास्त्र कळतही नाहीं. अशा स्थितींत त्यांच्यापुढें कोणी मोठ्या सशास्त्र ताना घेत बसला तर उलट ते चिडून जातील आणि सिनेमावाल्यांना एक पैसाही देणार नाहींत. ह्या आक्षेपामध्यें कांहीं सत्य आहे असें धरलें तरी, त्यामुळें आमच्या सशास्त्र संगीतास बाध येण्याचें कांहीं कारण नाहीं. अशा संगीताची आवश्यकताच आहे असें म्हटलें तरी त्याचा अर्थ एवढाच होईल कीं, देशांत संगीताचे शुद्ध व मिश्र असे दोन सांप्रदाय ठेवावे लागतील. आणि त्यानें कांहीं नुकसानही होणार नाहीं. असे आणखी सांप्रदाय असले तरी हरकत नाहीं. कारण, त्यांचीं स्वरूपें स्पष्ट असतात. वाद उत्पन्न होण्याचें कारण असें पडतें की पाश्चात्य संगीतांतले कांहीं विशेष आपल्याकडे रूढ करण्याच्या निमित्तानें आमच्या संगीताच्या स्वरूपावरच घाला घातला जातो.

## पाश्चात्य संगीत व आमचें संगीत

उदाहरणार्थं, रस आणि राग ह्यांचा प्रश्न घ्या. युरोपियन संगीत आणि आमचें संगीत ह्यांच्यामध्ये मोठा फरक असा आहे की, आमचें

संगीत कंठप्रधान (vocal) आहे, आणि पाश्चात्य संगीत वाद्यप्रधान (instrumental) आहे. ह्याचा परिणाम अशा झाला आहे की, निरनिराळ्या स्वरांच्या व निरनिराळया तयारीच्या असंख्य लोकांनाहीं, युरोपियन संगीतांत, एकाच वेळीं एकसारखा भाग घेतां येतो. नुसती गायनशास्त्राची माहिती व सूर काढण्याचा अभ्यास असला म्हणजे पुरे. ह्याच्या उलट आमच्याकडे परिस्थिति आहे. एक प्रकारचा राग एक मनुष्य गात असतां अनेक लोकांना त्यांत स्वतंत्र रीतीनें भाग घेतां येणार नाहीं. म्हणजे, पुष्कळ वादक त्याची साथ करतील, परंतु त्याच्या आवाजांत आवाज मिळून दुसरा गवई सहसा साथ करूं शकणार नाहीं. ह्याचें कारण असें की, कोणत्याहीं रागाची सुरावट ठरलेली असली तरी, एका स्वरापासून दुसरा स्वर निघण्याकरतां मध्यें जो वेळ जातो, त्यांत गवयाला स्वतंत्र करामत करतां येते आणि त्यामुळें स्वर जरी तेच असले, तरी निरनिराळ्या इसमांच्या गाण्याला तर काय पण, एकाच इसमाच्या वेगवेगळ्या बैठकींत गायलेल्या त्याच रागास वेगळी गोडी येते. *अशी स्थिती असल्यामुळें, बैठकींत एकानें गावें आणि बाकीच्यांनीं शांतपणानें त्याचा उपभोग घ्यावा अथवा फार झालें तर थोडीशी वाद्याची साथ करावी एवढेंच शक्य आहे. आमच्या संगीतांत गोडी (melody) आहे. आणि पाश्चात्य संगीतांत हार्मनी आहे असें म्हणतात तें यामुळेंच. विवेकानन्द स्वामींनीं देखील दोन संगीतांतला हाच फरक दाखविला आहे. जर संगीताच्या योगानें कांहीं विशिष्ट ध्येय साध्य होत असलें तर तें अर्थातच ह्या परस्परविरुद्ध सांप्रदायांचे परस्पर विरुद्धच असूं शकेल.

---

* टीप—पाश्चात्य संगीत वाद्यप्रधान होऊन हार्मनीच्या मार्गावर गेलें याचें कारण रा. कृष्णराव मुळे यांनीं असें सुचविलें आहे कीं, त्यांची शब्दोच्चाराची पद्धतच अशास्त्रीय व हेल आणि झटके यांनीं युक्त आहे, त्यांत बरेंच तथ्य असावें. माधुर्य हा व्यक्तिशः स्वरांचा 'रूपपरिणाम' आहे. स्वरांनाच स्थैर्य नसल्यानें हा परिणाम पुरेसा होत नाहीं. परंतु कांहीं तरी कमी पडतें याची जाणीव राहून तो उणेपणा भरून काढण्याकरतां वाद्यांकडे जास्त लक्ष जाणें साहजिक आहे.

आणि म्हणूनच दोन स्वतंत्र ध्येयांचीं स्वतंत्र साधनें होऊन, हे दोन सांप्रदाय अगदीं वेगळे ठेऊन त्या रीतीनेंच त्यांचा उपभोग घेणें हें योग्य होईल.

परंतु आधीं, सिनेमांतलें संगीत सोपें असतें आणि रागदारीचें संगीत सामान्य लोकांस झेंपत नाहीं, हें म्हणणेंच बरोबर नाहीं. आमच्या रंगभूमीवर ज्यावेळेला शुद्ध संगीत गायलें जात होतें, त्यावेळींही, त्यावर अगदीं सामान्य प्रेक्षकांच्या उडया पडतच होत्या. त्याचप्रमाणें, हल्लींच्या सिनेमांतील सोपें संगीत समजतें म्हणून अथवा त्याच्या गोडीनेंच मोहून लोक सिनेमाला येतात, हें म्हणणें खरें नाहीं. थोडया पैशांत नाटकापेक्षांही अनेक प्रकारचें सृष्टीसौंदर्य, मानवी जीवनाचे अनेक प्रकारचे देखावे, चमत्कारिक घटना आणि मानवी हृदयाचे आविष्कार पहावयास मिळतात म्हणून लोक येतात; स्टंट सिनेमावरून हें लक्षांत येईल. 'जिंदगी' किंवा 'नर्तकी' सारख्या चित्रांत आणखी कांहीं हार्मनीचीं पदें घातलीं म्हणून त्याला लोकांची गर्दी होईल असें नाहीं. ह्याच्या उलट एखाद्या स्टंट सिनेमांत शुद्ध रागदारीचीं पदें ठेवलीं तरी देखील सामान्य लोकांची गर्दी होईलच. म्हणूनच लोकानुरंजनाच्या सबबीवर आमच्या संगीताचा चिवडा करण्याचें आणि तेवढ्याकरतां. आमच्या रागदारींत स्वयंभू तत्त्वच नाहीं म्हणजे रागांचा आणि रसांचा कांहीं स्वयंभू संबंध नसून तो केवळ काल्पनिक आहे असेंच ठरविण्याचा प्रयत्न करण्याचेंही कारण नाहीं.

## रस आणि राग

रस आणि राग यांचा संबंध कसा आहे, हें केवळ प्रयोगानेंच सिद्ध होणारें आहे. विशेष प्रकारच्या मनोवृत्तीला अनुकूल अशी स्वरयोजना आणि वाद्ययोजना, नाहीं तरी, पाश्चात्य गीतांतही करावीच लागते. तसें नसतें तर, कोणत्याही गीतानें कोणत्याही भावनेचें कार्य केलें असतें. म्हणून स्वरांचा आणि रसांचा तसा कांहीं संबंध नाहींच असें कोणी म्हणतील असे वाटत नाहीं. प्रश्न एवढाच आहे की आमच्या शास्त्रानें जो संबंध ठरला आहे तसा तो आहे किंवा नाहीं. परन्तु ही गोष्ट, वर सांगितल्याप्रमाणें, केवळ प्रयोगानेंच सिद्ध होणारी आहे, आणि तशी ती होईल असें वाटतें.

ज्याला आमच्या भाषेचें कांहीच ज्ञान नाहीं अशा बुद्धिमान आणि संगीताची आवड असलेल्या माणसापुढें 'असावरी' कोणी म्हणून दाखविल्यास त्याला वीररसाची स्फूर्ति होणार नाहीं; आपल्या एखाद्या अंतरलेल्या संबंधी असलेल्या माणसाचीच आठवण होईल. अशा प्रकारचे प्रयोग मनुष्यांच्या गाण्यापेक्षां सतार, बीन, सारंगी अशा प्रकारच्या उच्च दर्जाच्या तंतु-वाद्याच्या साह्यानें जास्त चांगले होतील हें उघड आहे. कारण, गवई गायवास बसला म्हणजे नाहीं म्हटलें तरी कांही हावभाव करतो आणि नुसत्या ठेक्यापुरता कां होईना, तबल्याचाही जोड त्याला लागतो. त्याच्यामुळें स्वराशी तादात्म्य कमी होऊन कांहीं वेगळाच परिणाम नवीन माणसाच्या मनावर होण्याचा संभव असतो. आमच्याकडील लोकांनी अशा तऱ्हेचे प्रयोग करून कांही नियम बसविले आहेत.

## मूळ राग सहाच कां !

मूळ राग त्यांनीं सहा ठरविले आहेत, त्याचें कारण हेंच आहे. वैदिक संस्कृतीचा हाच एक विशेष आहे कीं, तिच्या साऱ्या अंग-प्रत्यंगांतून एकजात एक तत्त्व भरून राहिलेलें आहे. साहित्य आणि गायन यांचा तर फार निकटचा संबंध. तेव्हां त्यांच्यांत एक तत्त्व कसें नसेल ! आमचे साहित्यशास्त्र आणि ललितकला यांचा भावयोगाशीं दृढ संबंध आहे. किंबहुना असेंहीं म्हणतां येईल कीं, संगीत, साहित्य आणि निरनिराळचा कला यांना विशिष्ट वळण लागून त्यांचे शास्त्रोक्त नियम ठरले गेले तेच मुळीं भावयोगाच्या साह्यानें ठरले गेले. भावयोगाचें ध्येय आनंदात्मक संप्रज्ञांत समाधि-योग हें आहे. त्याला धरून, त्याला प्रत्यक्ष अनुकूल होणाऱ्या तेवढचाच गोष्टी साहित्यांतून त्यांनीं गायनशास्त्रांत घेतल्या. साहित्यांत नवरस असतां त्यांतील बीभत्स, भयानक आणि हास्य हे तीन सोडून देऊन उरलेल्या सहांचाच गायनशास्त्रानें स्वीकार केला. आणि म्हणून त्यांचे मूळ रागही सहा ठरले हें युक्तच आहे. यावरूनच आमच्या गायनाचें अंतिम ध्येय काय तें लक्षांत येईल. बीभत्स, भयानक आणि हास्य यांच्या योगानें जरी रसिक माणसांचें मनोरंजन झालें तरी, इतर रसांचा जो परिणाम होतो, त्याहून तो परिणाम भिन्न प्रकारचा असतो.

हास्याच्या योगानें मनुष्याच्या वृत्ति एकीभूत होण्याच्या ऐवजीं, शाळा सुटून बाहेर पडलेल्या पोरांप्रमाणें मोकळ्या होतात. आणि, बीभत्स व भयानक यांत जरी तसा प्रत्यय येत नसला तरी, त्यांचें जर हास्यांत रूपांतर न झालें तर, जें कांहीं त्यांचें स्वरूप असतें तें आनन्दअवभासाहून अगदीं वेगळें असतें. बीभत्स आणि भयानक यांच्यापासून जेव्हां जेव्हां आनन्दप्राप्ति होते तेव्हां ती, त्यांतून हास्य उत्पन्न होतो, तेव्हांच होते. इतर सहा रसांची गोष्ट तशी नाहीं. त्यांची पराकाष्टा झाली असतां चित्त-वृत्तींची एकतानता होऊन सविकल्प समाधि प्राप्त होते.* रौद्र, अद्‌भुत, वीर यांचा तसा परिणाम सहज लक्षांत येत नाहीं. परंतु, भावयोगांत तशा प्रकारचीं ध्यानें साधकाकरतां मुद्दाम योजलेलीं आहेत व कित्येक साधकांनीं त्यांच्या सहाय्यानें भावसमाधि प्राप्त करून घेतली अशी साक्ष आहे. संगीतांत बीभत्स, भयानक आणि हास्य यांना निसर्गतःच वाव नाहीं, आणि अद्‌भुत परिणाम करणारी चमत्कृति, वीराचा उत्साह, आणि रौद्राची उत्तेजकता हे परिणाम घडवून आणण्याचें सामर्थ्य आहे. यावरूनच संगीताचा निसर्गतः हेतु आनन्दरूप भावसमाधि हा आहे, हें तत्त्व ओळखून त्या धोरणानेंच आमच्या संगीताची रचना आहे. यावर कोणी असें म्हणेल कीं, पाश्चात्य संगीतानें आनन्द कां होत नाहीं ? तर त्यावर आमचें असें म्हणणें आहे कीं, त्यानेंही आनन्द अवश्य होतो. परंतु, संगीताचें हें विशेष ध्येय लक्षांत ठेवून त्याची रचना झाली नसल्यामुळें, त्यानें उत्पन्न होणाऱ्या आनन्दाचा ध्येयस्थानीं असलेल्या आनन्द समाधींत परिपोष होत नाहीं. इतकेंच नाहीं तर कांहींसा उलट परिणाम होतो. सामान्य लोकांच्या नित्य परिजयाच्या दोन शब्दांनीं ही कल्पना जास्त समजेल.

## संगीताचीं दोन ध्येयें

मराठी भाषेंत आनन्द शब्द फार व्यापक आहे. म्हणून विशेष अर्थाचे **सुख** व **हर्ष** हे शब्द घेऊं. आणि त्यांचें विश्लेषण करूं म्हणजे ही गोष्ट

---

*टीप–तैत्तिरीयांत सांगितलें आहे कीं 'रसो वै सः रसह्येवायं लब्ध्वाऽनन्दीं भवति.' म्हणूनच जगन्नाथ पंडितानें रसाची व्याख्या 'रत्याद्यवछिन्ना भग्नावरणा चिदेव रसः' अशी केली आहे.

लक्षांत येईल. दिसावयास जरी या दोन्हीही एक दिसल्या तरी अंतःकरणावर परिणाम करण्याच्या दृष्टीनें त्या अगदीं भिन्न आहेत. हर्ष झाला असतांना मनुष्याच्या मनावरचा ताण निघून जाऊन त्याच्या सान्या वृत्तीही मोकळ्या होतात. शाळा सुटल्याबरोबर, आंत कोंडून राहिलेलीं मुलें ज्याप्रमाणें एकदम बाहेर पडून नाचूं उडूं लागतात त्याप्रमाणेंच मनुष्याचें क्षणभर होतें. याच्या उलट सुखाची गोष्ट आहे. प्रत्यक्ष सुखाच्या क्षणामध्यें मनुष्याच्या सान्या वृत्ति त्या एका ठिकाणीं केंद्रीभूत होऊन क्षणमात्र सर्वच एकमय अशी अनिर्वचनीय अवस्था होते. तिची जाणीव घेण्याच्या अथवा बोलण्याच्या अवस्थेमध्यें मनुष्य येतो त्यावेळीं प्रत्यक्ष सुखाचा क्षण निघून गेलेला असतो व त्या क्षणाचा शरीर-मनावर झालेला सुखमय परिणाम आणि सुखकारक स्मृति एवढींच काय तीं शिल्लक उरतात. म्हणूनच, विषयाचें असो अथवा निर्विषय असो, कोणतेंही सुख 'आत्मयाचे भेटी । जीवासि होय' असें श्रीज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे.* आपणांस या विषयाचा विस्तार करावयाचा नसल्यामुळें तात्पर्यरूपानें एवढेंच लक्षांत ठेवावें कीं, **हर्षप्राप्ति हें सर्व पाश्चात्य संगीताचें मुख्य ध्येय आहे.** क्वचित कांहीं वेळां या पलीकडे त्याची मजल जात असली तरी ती आकस्मिक गोष्ट होय, त्या शास्त्रानें ठरविलेलें ध्येय नव्हे. याच्या उलट **सुखप्राप्ती हें आमच्या संगीताचें शास्त्रीय ध्येय आहे.** ध्येयाच्या दिशाच अशा विरूद्ध असल्यामुळें आनन्द हा सामान्य परिणाम जरी सारखा असला तरी, दोन्हीही संगीताची वाढ अगदीं भिन्न दिशेनें होणें अपरिहार्य होतें. आणि त्यांचें हवें तसें मिश्रण ही यादृष्टीनें अशक्य आहे. तसें केल्यानें घड हें नाहीं आणि तेंही नाहीं असें कांहीं तरी तिसरेंच धेडगुजरी उत्पन्न होईल. त्यापेक्षां, ध्येयासह हीं त्यांचीं स्वरूपें स्पष्ट करून दोन स्वतंत्र गोष्टी म्हणून त्यांना भिन्न ठेवण्यांत आणि तशा जाणीवेनेंच प्रसंगानुरूप

---

* **टीप**–एतस्यैवनंदस्यान्यानि भूतानि मात्रामुपजीवन्ति । बृ. उ. या ब्रह्मानंदाच्या किंचिन्मात्र अंशावरच भूतमात्रें जगतात. म्हणजे त्यांना जो आनंद पंचविषयांपासून मिळतो तें अत्यंत अल्पकाल असणारें कां होईना ब्रह्मसुखच आहे.

मराठी ... अनुक्रम ...३७८८ १३८८ निबंध ९।७।५।५२

भिन्नपणें त्यांचा आस्वाद घेण्यांत जास्त लाभ आहे, असें माझ्या अल्प-बुद्धीस वाटतें.

## दृष्टान्ताचें तात्पर्य

अशा रीतीनें दोन भिन्न ध्येयांच्या दृष्टीनें या दोन संगीतांची योग्य वाढ करावयाची म्हटलें तरी, त्यांना अगदीं मुळापासूनच त्या त्या धोरणाने वाढविणें अवश्य आहे. पाश्चात्य लोकांना आमचें ध्येय पाहिजे असेल तर शब्दोचार करण्याची आपली हेल आणि झटके यांची पद्धति बदलण्यापासून फरक करावा लागेल. आणि आम्हांला आमचें राखणें असेल तर, प्रत्येक स्वरात विशिष्ट प्रकारचें माधुर्य ओतणारी आमचीच गायकी प्रमाण धरावी लागेल. स्त्रियांसंबंधानेंही तसेंच म्हणतां येतें. स्त्री जर बीजतःच पुरुषाहून कांहीं भिन्न प्रकृतीची असली तर त्याचा अर्थ हाच आहे कीं, तिची इतिकर्तव्यताही पुरुषजातीहून कांहीं वेगळी असली पाहिजे. आणि अशा रीतीनें ज्या दोन गोष्टींचे आदि-अन्तच एकमेकांहून वेगवेगळे आहेत त्यांच्या वाढीची दिशा मात्र तंतोतंत एक असली पाहिजे हें म्हणणें सयुक्तिक नाहीं. तिच्यांत क्वचित कोठें साम्य येणार नाहीं असें नाहीं, येईलही. परंतु तो कांहीं नियम नव्हे आणि तें त्यांच्या वाढीचें तत्त्वही होऊं शकत नाहीं. हीच गोष्ट लक्षांत ठेवून आमच्या प्रज्ञावन्तांनीं आपली संस्था निश्चित केली. त्यांनीही असेंच ठरविलें की, आत्मदृष्टया जरी स्त्री-पुरुष हा भेद व्यर्थ असला तरी, जीवदृष्टया व देहदृष्टया ज्याअर्थी तो तसा भेद आहे त्याअर्थी, तो लक्षांत घेऊनच त्याची व्यवस्था केली पाहिजे. असें करणें हेंच निसर्गास धरून होईल. याच्या उलट केलेली कृति मात्र निसर्गास सोडून होईल. निसर्ग म्हणजे नुसती प्रेरणाच नव्हे, तर प्रेरणा आणि तिच्या पूर्ततेचा प्रकार ही दोन्हीही. सुखाची प्रेरणा, दुःख, शोक, मोह, भय इत्यादि अंतःकरण-धर्म हे जीवमात्रांत सारखेच आहेत; परंतु त्यांचे प्रकार मात्र वेगळे आहेत. वाघाच्या प्रेरणेच्या पूर्तीचा प्रकार रक्तपानांत आहे तर हरणाच्या प्रेरणापूर्तीचा प्रकार हरळीमध्यें आहे. वाघाला रक्त देणें आणि हरणाला हरळी देणें हा निसर्ग आहे. वाघ आणि हरिण समान मानतों म्हणून दोघांपुढें रक्त ठेवणें अथवा दोघांपुढें हरळी

ठेवणें हा कांहीं निसर्ग नाहीं. स्त्री-पुरुषांच्या ठिकाणीं पूर्ण भावसाम्य असलें तरी त्यांच्या तृप्तींचे प्रकार भिन्न असावेत असा निसर्ग आहे. म्हणून भारतीयांच्या विवाहसंस्थेंतलें मूळसूत्र असें ठरलें की, विवाहबद्ध होणारी स्त्री-पुरुषें पहिल्यापासूनच त्यांच्या त्यांच्या वाढीला योग्य अशा रीतीनें वाढविलीं पाहिजेत. आणि अशा रीतीनें तीं वाढावयाचीं म्हटली म्हणजे बीजतःत्र तशीं वाढणें अवश्य आहे. एवढ्याकरतांच त्यांच्या विवाह-संस्थेंत गोत्र आणि सापिण्डय यांचे निर्बंध आहेत.

## एक शास्त्रीय अडचण : विवाहाचे दोन प्रकार

भारतीयांनी, मागें सांगितल्याप्रमाणें आपली प्रत्येक गोष्ट मध्यम-मानांत बसवली आहे. तेंच धोरण त्यांनी याही बाबतींत ठेवलें आहे. अत्यंत परिश्रमानें स्वतःची अशी एक स्वतंत्र मनुष्यजाति (type of man) उत्पन्न केल्यावर त्यांच्यापुढें ती टिकविण्याचा प्रश्न येऊन पडला. अशी एखादी जाति टिकवावयाची म्हणजे तिची पिंड-परंपरा एकजात राखली पाहिजे. तशी ती न राखली तर, एक तर तिच्यांत अनिष्ट संस्कारांचें मिश्रण होऊन तिचा स्वतंत्रपणा नाहींसा होईल अथवा तिची उत्पादन-क्षमता कमी होऊन ती नष्ट देखील होऊं शकेल. यापैकीं कोणत्याही प्रकारानें त्या जातीचें स्वतंत्र अस्तित्व नष्ट झालें म्हणजे, केवळ बाह्य परिश्रमानें त्यांतील जीवांचीं वाढ हव्या त्या दिशेनें करणें हेंही काम दुष्कर होतें. एवढ्याकरतां, विवाहेच्छु स्त्री-पुरुष अत्यंत मर्यादित क्षेत्रांतील असावींत असा निर्बन्ध केला तर, त्याचा परिणाम हळू हळू जाति नष्ट होण्यांत होतो. कारण, एक रक्ताचा संबंध (consanguinity) कालान्तरानें वंशाचा जोम नाहींसा करून दुर्बळ प्रजा उत्पन्न करतो. दोन अगदीं भिन्न जातीचें मिश्रण होऊंच शकत नाहीं. इतकेंच नाहीं तर एकमेकांशीं निकट संबंध असलेल्या दोन जातीचें मिश्रण देखील पुढें प्रजा उत्पन्न करीत नाहीं असा अनुभव आहे. मिश्र जातीय संतती फार विरळाच आढळेत, आणि अशी संतती जरी आढळली तरी त्यांच्या-पासून तशाच तऱ्हेच्या जातींतील नरमादींत संतती उत्पन्न करण्याची शक्ति नसते. (सर जे आर्थर थॉमसन. आऊटलाईन ऑफ मॉडर्न नॉलेज).

For, the occuruence of fertile hybrids between related species is only occasional, It is typical of species that they are not fertile with related species, though not a few species hybrids, i. e., mules, are well-known.—Sir J. Arther Thomson : Outline of Modern Knowledge.) अशा स्थितींत जातीचें स्वतंत्र अस्तित्व नष्ट होणार नाहीं आणि तिची वाढही खुंटणार नाहीं असा मार्ग काढणें भाग होतें. सावर्ण्य, सगोत्रता आणि सापिण्डय यासंबंधीं निर्बंध करून भारतीयांनीं तो मार्ग काढून दिला. तेवढयाकरतां त्यांनीं विवाहाचे मुख्य दोन भेद कल्पिले आहेत. एक, केवळ सुखप्राप्ति करून देणारा आणि दुसरा ध्येयाच्या मार्गावर ठेवून पुढें नेणारा. केवळ सुखप्राप्तीवर कडक निर्बंध घालतां येत नसल्यामुळें त्याच्या-संबंधाचे नियम जास्त सढळ आहेत. परंतु दुसऱ्याच्या मानानें त्याचा दर्जा कमी प्रतीचा ठेवला असून हें दोघांतील तारतम्य समाजापुढें अखण्ड राहील अशा तऱ्हेच्या त्याच्या गौणत्वाच्या कांहीं खुणाही अढळ करून ठेवल्या आहेत. या गोष्टीमुळें त्यांची विवाहसंस्था व समाजरचना जास्त घोटाळयाची झाली आहे हें खरें आहे. पण तो घोटाळा पतकरणें अपरिहार्यच होतें. ध्येयनिष्ठ विवाहांना सशास्त्र-विवाह आणि दुसऱ्या प्रकारांना सकाम-विवाह असें म्हटलें जातें. सकाम विवाहांत वर सांगितल्या प्रमाणें सवर्णतेचे कडक नियम नाहींत. परंतु धर्मशास्त्राची नसली तरी त्याला व्यवहार-धर्माची म्हणजे ज्याला आपण आज Law अथवा कायदा म्हणतो त्याची पूर्ण मान्यता होती. या व्यवस्थेमुळें अशी सोय झाली कीं, धर्मशास्त्राचें कडक बंधन पाळण्याचा जो ताण समाजाला दु:सह होतो, त्यांत शिथिलपणा येऊन तो सुसह झाला. मनुष्य जातीचा अत्युच्च गुणकर्म-संपन्न असा वर्ग निर्माण करावयाचा म्हटला म्हणजे हा ताण घेणें अवश्यच अतेंस. इतिहासाचें अवलोकन केलें तर असें आढळून येतें कीं उदयास येऊन वैभवसंपन्न होऊन इतिहासांत कांहीं कार्य करून

दाखविणाऱ्या प्रत्येक मनुष्य जातीनें हा ताण घेतला आहे. म्हणूनच विशेष प्रकारचा मनुष्यप्राणी तिला उत्पन्न करतां आला. परंतु केसरलिंग म्हणतो त्याप्रमाणें हा ताण एकसारखा राखणें केव्हांही अशक्य असते. उत्कृष्ट गुणाच्या नरमादी एकत्र आणून उत्कृष्ट गुणसंपत्तीची परंपरा वाढवूं म्हटले तर ती गोष्ट जमणें शक्य नाहीं. कारण त्याकरितां शारीरिक वगैरे ज्या अनेक गोष्टींची आवश्यकता असते त्यांचा ताण मनुष्य-स्वभावाला चिरकाल सोसतां येत नाही. (The exceptional endowment cannot be preserved as it requires as its physiological base a state of tension which nature cannot support as a permanent condition.) हा ताण अथवा हें tension सहन न झाल्यामुळेंच जगांतील मोठमोठीं कर्तत्ववान राष्ट्रें नष्ट झालीं. भारतवर्षांतील माणसेंही कांहीं या निसर्गाला अपवाद नाहींत, त्यांनाही हा ताण दुःसह होईल हें भारतीय प्रज्ञावंतांनीं ओळखलें होतें. त्याप्रमाणें मधूनमधून तो दुःसह होतो ही. आजचा काळ अशा दुःसहतेचाच आहे हें उघड आहे. भारतवर्षांत, मधूनमधून, वर्णाश्रम-धर्मांविरुद्ध जीं बंडें एकसारखीं उत्पन्न होत आलीं आहेत, तो या निसर्गनियमाचाच परिणाम आहे हें ओळखून, एका बाजूनें हा निसर्ग अपरिहार्य म्हणून निर्भयतेनें पत्करून दुसरीकडून त्याचा ताण मात्र नाहींसा करून टाकावयाचा हें महत्कार्य फक्त भारतीयांनाच साधलें.

## सकामविवाहाचें शास्त्रीय तत्त्व

सकामविवाह आणि परमतसहिष्णुता या दोन मोठ्या अस्त्रांच्या साह्यानें भारतीयांनीं आपल्यापुढील अडचण दूर केली. सबंध मनुष्य-जातीला जास्त ताण सहन होणें केव्हांही शक्य नाहीं आणि उच्च गुण-संपत्ति उत्पन्न करावयाची तर हा ताण घेणें तर अवश्य आहे, अशा स्थितींत त्यांनीं जो मार्ग काढला त्याचीच त्यांनीं, पुढें पद्धतशीर वाढ केली. हा प्रश्न जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांपुढें नेहमींच पडत आला आहे व त्यांनी तो आपआपल्या परीनें साधेल तसा सोडविला आहे. इस्लाम म्हणून

जो एक वर्ग त्या वर्गापुरता प्रत्येक महंमदीयानें हा ताण सोसावा आणि त्या व्यतिरिक्त जगाशीं वागतांना हा ताण अजीबात फेंकून देऊन हवें तसें वागावें, असा मुसलमानांचा धारा आहे. आमच्या लोकांनी असें न करतां दुसराच मार्ग काढला. जास्त उन्नत झालेल्या त्यांच्या अंत:करणाला, जगाला तापदायक होईल असा कोणताही मार्ग स्वीकारणें स्वभावत:च अशक्य होतें. म्हणून त्यांनी अशी व्यवस्था केली कीं, समाजांत उच्च नीच वर्णाच्या पायऱ्या उत्पन्न करून देऊन मागें सांगितल्याप्रमाणें उत्तरोत्तर वर्णावर हा ताण जास्त टाकला आणि खालच्या वर्णांना यांतून अधिकाधिक मोकळें केलें. तोच प्रकार सकाम विवाहाचा आहे. सकाम विवाहाची मोकळीक ठेवून हा ताण त्यांनी कमी केला आणि सकाम विवाहामुळें उत्पन्न होणारे निरनिराळ्या गुणसंपत्तीचे कांहीं वर्ग उत्पन्न करून या सकाम विवाहामुळें उत्पन्न होणारें मिश्र गुण-संपत्तीचें पीक त्यांत जिरवून टाकण्याची व्यवस्था केली. या योजनेमुळें वर्णव्यवस्था कायम राहून तिचा ताणही बराच सुसह होई. परंतु इतकेंही करून केव्हां केव्हां हा ताण प्रमाणाबाहेर वाढतो. तेव्हां बौद्ध, जैन, लिंगायत, महानुभाव, ब्रह्मसमाज, आर्यसमाज अशा प्रकारचे बंडखोर धर्मपंथ उत्पन्न होतात. त्यासंबंधी भारतीयांनी अशी धारणा ठेवली कीं, बौद्धिक वादविवादापलीकडे त्यांना फारसा विरोध न करतां मुकाट्यानें सहन करावयाचें आणि आपल्या सहवासांत राहूं द्यावयाचें कालान्तरानें ती लाट आपोआपच जिरते आणि त्यांत सांपडलेले लोक पुन: मुळाकडे परिवर्तित होतात. या कारणानें विवाहाच्या बाबतींत भारतीयसंस्था endogomus आणि exogomus अशा मिश्र स्वरूपाची झाली आहे. धर्माचरणाकरतां प्रत्येकानें सवर्ण विवाहच केला पाहिजे या निर्बन्धापुरती ती endogomus आहे. कामनापूर्तीकरितां असवर्ण विवाहही करितां येतो; इतकेंच नाही तर अवैदिक लोकांशीही विवाह करतां येतो या दृष्टीने ती exogomus आहे. कामनापूर्तीकरतां भारताबाहेरील अवैदिक राष्ट्रांतील स्त्रियांशी विवाहसंबंध केल्याचीं उदाहरणें भारतांत व पुराणांत हवी तितकी आहेत. ऐतिहासिक काळांतही कांहीं थोडीथोडकीं नाहीत. सेल्युकसनें आपली मुलगी चन्द्रगुप्ताला दिल्याचें उदाहरण सुप्रसिद्धच आहे. मध्यकालांतलें

अलीकडचें उदाहरण उदेपूरच्या एका राजाचें आहे. एका जिंकून आणलेल्या हूण राजाच्या दरियदेवी नांवाच्या राणीशी त्यानें लग्न केल्याचा ताम्रपटांत उल्लेख आहे. (स भूपतिःप्रिया यस्य हूणक्षोणीशवल्लभा ।) Hybrids ची जात पुढें वाढत नाहीं हें लक्षांत घेऊन सवर्णविवाहाचा कडक नियम त्यांनी केला. त्याबरोबरच, एकरक्तसंबंधाचा नियम करणेंही भाग होतें. तेवढ्या-करितां त्यांचें सपिण्डच शास्त्र उत्पन्न झालें. सगोत्र-विवाह-निषेध हा त्या .सापिण्ड्यांचाच उच्च प्रकार आहे.

## एक मोठी शंका

यावर अशी एक शंका येते कीं, मुसलमान, पारशी, मिसरी इ. कित्येक लोकांत एकरक्ताचा निषेध नव्हता; इतकेंच नाहीं तर तसा संबंध प्रशस्त मानला आहे. पण त्यामुळें त्या समाजांची वाढ खुंटली असें अजून तर कांहीं कोणी म्हणत नाहीं. तेव्हां भारतीयांनाच या गोष्टीचा इतका बाऊ कां वाटला ? हल्लीं श्री. गोविन्दराव देशमुख यांचें सगोत्र-विवाहसंबंधीं बिल धारासभेपुढें आहे. त्यांत देखील शूद्रांत असगोत्राचा-निर्बन्ध नाहीं. हाही एक मुद्दा सगोत्र-विवाहाच्या बाजूचा म्हणून दिला आहे. धर्मशास्त्रदृष्ट्या पाहिलें तर हा मुद्दा अगदींच वेडगळ वाटणारा आहे. शूद्रांत देखील आज, गोत्र नसलें तरी, सापिण्ड्यासारखे कांहीं नियम पाळले जातात, तरीपण तें कांहीं धर्माचें बंधन नव्हे. मागें सांगितलेंच आहे कीं, शूद्राला समाजनीतीपलीकडे बंधन असें कशाचेंच नाहीं आणि समाजनीति पाळून केलेल्या कोणत्याही आचाराचें पाप त्याला लागत नाही. (न धर्मात्प्रतिषेधनम्) शूद्र जी कांही व्यवस्था पाळतात ती त्रैवर्णिकांच्या सहवासानें आणि वंश-शास्त्रास उपयुक्त गोष्ट म्हणून. तेव्हां, शूद्रांत गोत्रनिषेध नाही हें रा. देशमुख यांचें म्हणणें यथार्थ आहे. त्यांतील पोरकटपणा एवढाच आहे की: वैदिक समाजाची घडी शूद्रांवरून बसविलेली नाही; उलट, धार्मिकदृष्ट्या विधिनिषेध नसतांही त्रैवर्णिकांचें अनुकरण करून भारतीय शूद्र हा इतर कोणत्याही तत्समान वर्गापेक्षां जास्त सुसंस्कृत झाला आहे. आज देखील, शूद्रांची एकसारखी धडपड

ब्राह्मण व्हावें म्हणून चालली आहे आणि हे श्रीयुत म्हणतात शूद्रांचा आचार प्रमाण धरून त्रैवर्णिकाकरतां कायदा केला पाहिजे !

अशा रीतीनें धार्मिक दृष्टचा हा मुद्दा जरी हास्यास्पद वाटला तरी, त्याला सुप्रजाजननशास्त्राच्या (Eugenics) दृष्टीनें महत्त्व आहे आणि तेवढयाचकरतां त्याच्यावर रा० देशमुख यांनी जोर दिला आहे, असें मला वाटतें. शूद्र अथवा मागे सांगितलेले मुसलमान, मिसरी, पारशी वगैरे समाज अतिशय जवळच्या रक्ताचा संबंध करीत असून त्यांच्यावर कांहीं अनिष्ट परिणाम झालेला दिसून येत नाहीं; मग तो त्रैवर्णिकांवर कां व्हावा असा हा प्रश्न आहे. एकरक्ताचा संबंध सुप्रजेची हानि करतो हें तर उघड आहे. एखाद्या गाईस दिलेल्या सांडाकडूनच तिच्या उत्तरोत्तर दोन चार पिढयांची निपज केल्यास, त्या पिढया हीन दर्जाच्या निपजतात, असा अनुभव आहे; मग या लोकांच्या बाबतींतच तो व्यर्थ कां ठरावा ? याचें कारण असें आहे कीं, मुसलमान वगैरे लोकांत बाहेरून निरनिराळया जातीचे आणि धर्माचे लोक नित्य समाविष्ट होत असल्यामुळें त्यांच्या रक्तांत मुळचीच त्रैवर्णिकाप्रमाणें एकजात नाही. एकजात होऊन त्याचे दुष्परिणाम भासूं लागण्यास जितका दीर्घकाल लोटला पाहिजे तितका अजून त्यांच्या उत्पत्तीलाही झालेला नाही. आणि दुसरें असें की, जरी कोठें, एकरक्तसंबंधाची जास्त परंपरा चालल्यानें वंश-दृष्टचा हानि झाली असेल, तरी देखील, त्यांच्यांत नित्य निरनिराळया जातीची भर पडत असल्याकारणानें ती समाज-दृष्टचा त्यांना जाणवत नाही. नुकतेंच वर सांगितलें आहे की, ऐतिहासिक काळापर्यंत आमच्यांत शूद्रांत देखील एकीकडून अशी भर पडत होती आणि दुसरीकडून सकामविवाहानें उत्पन्न झालेल्या अंतःप्रभव जातीही त्यांच्यांत समाविष्ट होत होत्या. त्रैवर्णिकांना ही सोय नसल्यामुळें आणि केवळ एवढयाच सोईकरितां सर्व बाबतींत गांठलेले आपलें उच्चस्थान सोडण्याची सोय नसल्यामुळें गोत्र आणि पिण्ड यांच्याविषयीं निर्बंध करणें अवश्य होतें. असो.

## स्त्रियांचे चार वर्ग

वर सांगितल्याप्रमाणें आमची विवाहसंस्था endogomus आणि exogomus अशी द्विविध स्वरूपाची आहे. सकामविवाह धर्मकार्यास

विहित नसला तरी त्यांतही, सगोत्र आणि सापिण्डच यांचे नियम पाळावे असा शास्त्रांचा कटाक्ष आहे. इतकेंच नाही तर, स्वैरिणीनें देखील हे नियम पाळले पाहिजेत असें विज्ञानेश्वरानें 'या पुनः कौमारे पतीं त्यक्त्वा कामतः सवर्णमाश्रयति सा स्वैरिणीं' अशी स्वैरिणीची व्याख्या केली आहे, तिच्यावरून दिसून येतें. केवळ व्यभिचारिणी ही शास्त्राच्या कक्षेबाहेरची आहे. म्हणून तिच्यासंबंधी मात्र शास्त्रांनी कांहीच अपेक्षा केली नाही आणि ती शिक्षापात्र ठरविली आहे. स्त्रीपुरुषाची व्यवस्था ठरवितांना शास्त्रकारांनी जी सूक्ष्मदृष्टि ठेवली आहे, ती बहुधा लक्षांत घेतली जात नाही. शास्त्रकारांनी स्त्रियांचे एकंदर चार वर्ग केले आहेत. पतिव्रता, पुनर्भू, स्वैरिणी आणि व्यभिचारिणी असे ते चार वर्ग आहेत. यापैकी पतिव्रताच काय ती धर्मदृष्टचा मान्य आहे. कोणत्याही अवस्थेंत एक-पुरुषाश्रय करून जी राहते तो पतिव्रता म्हटली आहे. पतिव्रतांचें म्हणून सांगितलेले सारे धर्म तिच्याकरतां आहेत. ते तिच्या आचरणांत जसे कमी जास्त येतील तसे तिच्या पदरी पुण्य पडेल. परंतु, कोणत्याही अवस्थेंत एकपुरुषाश्रय म्हणजे अर्थात विधियुक्त पाणिग्रहण केलेल्या पुरुषाचा आश्रय, एवढें एकच लक्षण तिला पतिव्रता या वर्गांत राहण्यास पुरेसें आहे. या व्यतिरिक्त कोणत्याही कारणानें केलेला अन्यपुरुषाश्रय हा धर्मशास्त्राच्या न्याय-निष्ठुर दृष्टीनें व्यभिचारच आहे. मनुष्यप्राणी स्वतःच्या संस्कृतीची केवढीही ऐट मिरवीत असला तरी अजून पुष्कळ बाबतीत पशु-अवस्थेंतच आहे. त्याला ही धर्मशास्त्राची न्याय-निष्ठुर दृष्टि कडकपणें लावल्यास तो उलट जास्तच बेफाम होण्याचा संभव आहे. हें जाणून शास्त्रकारांनी व्यवहारधर्मांच्या दृष्टीनें मुद्दाम थोडी सवलत करून दिली आहे. धार्मिक उच्च ध्येय एखाद्याला गांठतां आलें नाही म्हणून तेवढ्या-करतां, त्याला समाजांतून उठवून लावावें हें योग्य नाही, असें ओळखून शात्रकारांनी आचाराच्या बाबतीत, केवळ धर्म आणि केवळ व्यवहार अशा या दोन पायऱ्या करून दिल्या आणि या दोहींनाही न मानणाऱ्याला मात्र शिक्षापात्र ठरविलें. यांतील पुनर्भूसंबंधी म्हणजे शास्त्रांत पुनर्विवाह आहे किंवा नाही यासंबंधी, पुढें जास्त विचार करूं येथें एवढेंच लक्षांत ठेवणें

पुरें आहे की, कांहि विशेष प्रकारानें दुसरा पुरुष पाहणाऱ्या स्त्रीला पुनर्भू असें म्हटलें आहे. आणि तशा प्रकारानें दुसरा पुरुष न पाहतां विज्ञानेश्वरानें म्हटल्याप्रमाणें सवर्णतेसारखी कांहि व्यवस्था पाळून अन्य पुरुषाचा आश्रय करणारीला स्वैरिणी असें म्हटलें आहे. परंतु या दोघींनाहि शास्त्रानें दण्डास पात्र ठरविलेलें नसून अशी कोणतीहि व्यवस्था न पाळतां उघड अथवा चोरून परपुरुषाश्रय करणाऱ्या स्त्रीला व्यभिचारिणी म्हणून निंद्य किंवा शिक्षेस पात्र ठरविली आहे. यांत त्यांचा स्त्री-द्वेष दिसत नसून स्त्री-दाक्षिण्यच दिसून येतें. सकाम विवाहाच्या स्त्रियांना देखील विधिनिषेध पाळावे लागत होते यावरूनच, धर्मशास्त्राची उच्च कल्पना त्यांना आकलन करतां आली नाही तरी, त्यांनीं उन्नतीच्या मार्गात राहून स्वत:चें कल्याण करून घ्यावें अशीच इच्छा होती. त्यांना कायद्याच्या दृष्टीनें म्हणजे समाजाच्या दृष्टीनेंहि मान्यता ठेवली होती. गुरुतल्पाचें वर्णन करीत असतांना याज्ञवल्क्यानें सगोत्र विवाहाला गुरुतल्प म्हटलें आहे आणि हे सारे निर्बन्ध 'सकामाया: स्त्रिया अपि' म्हणजे कामत: केलेले अनुलोम, पौनर्भव आणि स्वैरिणी स्त्रियांच्या बाबतीतहि पाळले पाहिजेत असें सुचविलें आहे, तें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

## शास्त्रांची विशेष लेखनपद्धति

आमची शास्त्रें वाचीत असतां एक गोष्ट अवश्य लक्षांत ठेवावी लागते. ती ही की, त्यांनी विशेष प्रकारची लेखनपद्धति उपयोगांत आणली होती. पुष्कळवेळां ते केवळ सामान्य विधान करतात आणि समाजांतल्या निरनिराळ्या वर्गांनी आपआपल्या धोरणानें त्याचा उपयोग करावयाचा असतो. उदा. 'अरोगिणी भ्रातृमती असमानार्ष गोत्रजाम्' असें याज्ञवल्क्यानें म्हटलें आहे. या ठिकाणी, ब्राह्मणानें आपलें स्वत:चें गोत्र आणि क्षत्रिय-वैश्यानें पुरोहिताचें गोत्र घ्यावयाचें आहे. पण तसें याज्ञवल्क्यानें सांगितलें नाही. याचें कारण, ती व्यवस्था इतकी रूढ आहे की, त्याकरतां मुद्दाम निर्देश करण्याचें कारण नव्हतें. आम्हांला स्वत:चे गोत्र-प्रवर नाहीत तेव्हां, वैदिक कर्माकरितां घेतलेल्या पुरोहिताच्या गोत्र–प्रवराशी काय संबंध, असें म्हणण्याचें, त्यावेळी कोणाच्या मनांत येणें शक्यच नव्हतें.

विज्ञानेश्वरानें 'असपिण्डा च या मातुः असपिण्डा च या पितुः ।' असें एक मनु-वचन देऊन 'अनेक पितृश्वसृमातृश्वस्त्रादिदुहितृ निषेधः' असें सांगितलें आहे. त्यावरून अलीकडे, मनु फक्त सपिण्डविवाहाच्या विरुद्ध होता, सगोत्राच्या नव्हता असें म्हटलें जातें, तें कसें चूक आहे हें दिसून येईल. साविण्डयच नुसतें म्हटलें तरी शास्त्रीय कल्पनेप्रमाणें बापाच्या सगोत्री-याशी विवाह होणें शक्य नाही, हें पुढें गोत्र-प्रवराची उपपत्ति सांगावयाची आहे त्यावरून लक्षांत येईल. व्यवहारदृष्टचा अशक्य म्हणून आज जरी आम्ही श्राद्धादि कर्मांत कांही नियमित गोत्रजांनाच सपिण्ड म्हणून घेतों तरी वस्तुतः बापाचे सारे गोत्रज सपिण्डच असतात. आमचें कोणतेंही कर्म त्या गोत्रजांकरतां केलें जातें आणि त्याचें फलही त्या सर्वांना मिळतें. कर्मसमाप्तीचा आशिर्वाद 'अमुकगोत्राभिवृद्धिरस्तु' असाच असतो आणि प्रारंभही 'अमुक गोत्रांतला मी हें कर्म करतों' असाच असतो. अशाच रीतीनें बापाच्या सपिण्डाचा आणि गोत्रजांचा संबंध असल्यामुळें, म्हणजे सारे गोत्रपुरुष सपिण्डच असल्यामुळें, परंतु सारे सपिण्ड गोत्रज नसल्या-मुळें, गोत्रांत न पडणाऱ्या सपिण्डांचा निषेध सांगण्याकरतां मनूनें 'असपिण्डाच या पितुः' असें नुसतें म्हटलें तें रास्तच आहे. गोत्राचा पृथक् निषेध करण्याचें त्याला कारणच नव्हतें आणि विज्ञानेश्वारच्या डोक्यांतही विकल्प येण्याचा कांहीं संभव नव्हता.

असाच दुसरा विशेष असा आहे कीं, केवळ लौकिक व्यवहार आणि धार्मिक व्यवहार यांचा पुष्कळ ठिकाणी नीट भेद दाखविला नाही. उदा. 'सकृत्प्रदीयते कन्यां हरंस्तांम् चोरदण्डभाक् । दत्तामपि हरेत्पूर्वात् श्रेयांश्चेद्वरआव्रजेत् ।' हा श्लोक घ्या. विज्ञानेश्वरानें मुद्दाम 'एतच्च सप्तमपदात्प्राग् द्रष्टव्यम्' असें म्हटलें आहे. म्हणजे सप्तपदी होण्यापूर्वी हा नियम आहे असें सांगितलें आहे. पण सप्तपदी झाल्यावर कन्या परत घेतली जातच नाही. कारण तिचें कन्यात्वच नष्ट होतें. आणि सप्तपदीच्या पूर्वी परत घ्यावयाची म्हटलें तर त्याला चोर म्हणलें आहे, तेव्हां हें कसें? या ठिकाणी वस्तुतः, केवळ व्यवहारधर्म आहे. आणि आजच्या भाषेंत ज्याला contract चा कायदा म्हणतात त्याचा संबंध आहे. म्हणजे

एकदां कन्यां देतों असें म्हटल्यावर आजच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे consideraticn पुरें झालें व तो करार पुरा करण्यास तो मनुष्य बांधला गेला. तसें तो न करील तर चोर समजून त्याला राजानें शिक्षा करावी असा नियम ठरला. पण पुढें त्याला असा अपवाद सांगितला की, जास्त चांगला वर जर मिळाला अथवा पूर्वीच्या वराचे दुर्वर्तनादि कांही दोष लक्षांत आले तर मनुष्यानें आपला शब्द परत घेणें ही गोष्ट स्वाभाविक आहे. म्हणून त्याला करार मोडला तरी चोरदण्ड देऊं नये. अर्थात हा केवळ व्यवहार झाला. परंतु त्यामुळें असत्य भाषणाचें व वचन-भंगाचें जें पाप त्याला लागेल त्याची निवृत्ति होईल असें नाही. तो प्रश्न व्यक्ति-विषयक म्हणून सोडून द्यावा; राजशासनाच्या कक्षेंतला तो नाही. एवढेंच या श्लोकाचें तात्पर्य आहे. केवळ व्यवहार आणि व्यवहारधर्म हा फरक स्मृतिग्रंथांत पुष्कळ ठिकाणी लक्षांत ठेवावा लागतो. असो.

# प्रकरण ८ वें

लेखांक ७ मध्यें, लिङ्गनिश्चयाचें तत्त्व जीवाश्रित स्वयंभू असतें असें म्हटलें आहे, त्यावरून असें वाटतें की, स्त्री किंवा पुरुष जीव उत्पन्न होणे ही मनुष्यप्रयत्नापलीकडची गोष्ट आहे, अशी शास्त्रकारांची समजूत असावी. परंतु तें बरोबर नाही. उलट इच्छेप्रमाणें हव्या त्या लिंगाची संतति उत्पन्न करणें निदान, कांही प्रमाणांत तरी, मनुष्याच्या स्वाधीन आहे, अशी त्यांची समजूत आढळून येते. तशी ती इतर कोणत्या राष्ट्रांत फारशी आढळून येत नाही. लिङ्गनिश्चयाचें तत्त्व मनुष्याच्या हाती नसून स्वतंत्र आहे असें म्हटलें म्हणजे कांही अंशी तें माणसाच्या हाती आहे या कल्पनेशी तिचा मेळ बसत नाही. परंतु, त्या अशा विरोधी गोष्टी नाहीत. गर्भाधानापूर्वी स्त्री-पुरुषांनी कांही विशेष आचरण केलें असतां स्त्री अथवा पुरुष यापैकी हव्या त्या जातीचा पिण्ड उत्पन्न करतां येतो, अशी तर त्यांची समजूत आहेच. पण, गर्भाधानानंतरही, त्यांत पालट करतां येतो अशीही समजून आढळते. कांही खालच्या वर्गातल्या प्राण्यांवर केलेल्या यशस्वी प्रयोगामुळें असें करतां येणें शक्य आहे, असें आतां अर्वाचीन शास्त्रज्ञांनाही वाटूं लागलें आहे. परंतु या गोष्टीचा जीवाश्रित स्वयंभू तत्त्वाशी विरोध असण्याचें कारण नाही. आमच्या शास्त्रज्ञांच्या कल्पने-प्रमाणेंही, गर्भाची वाढ होईपर्यंत जीव हा कोणत्याही लिङ्गाचा अभिमान न घेतां सामान्यपणेंच तेथें असतो; इतकेंच नाही तर तेथें त्याला मागच्या कित्येक जन्मांचें दर्शन झाल्यामुळें लिङ्गाभिमानरहित असा साक्षीरूपानें असतो. अशा वेळीं त्याच्यावर संस्कार करून त्याला विशेष लिङ्गाचाच अभिमान उत्पन्न करणें अथवा त्याचा विशेष अभिमान नष्ट करणें हें शक्य

आहे. अर्वाचीन शास्त्रज्ञ ही गोष्ट, ज्या जड देहाच्या आश्रयानें जीव राहतो त्याच्यांत पालट करून घडवूं पाहतात. अजून त्यांचा जीवाशीं संबंध आला नाहीं. योगासारख्या शास्त्रावर विश्वास असणाऱ्या आमच्या लोकांना तशा कांहीं क्रियायोगानें दोनही तऱ्हेनें लिङ्ग-परिवर्तन करतां येईल असें वाटत होतें. असा विशेष उपद्याय न घडला तर, लिङ्गविनिश्चय जीवाश्रित स्वयंभू संकल्पानें होतो अशीच समजूत होती व त्याला अनुसरून त्यांनीं कांहीं नियमही बांधले होते.

## मनोवांच्छित संतति

अनुष्ठान व हवनें अशा प्रकारचे उपाय सोडून दिले तर, केवळ आधिभौतिक दृष्टीनें या बाबतींत त्यांचें असें मत दिसतें कीं लिङ्ग-निश्चय हा, समागमाचा काळ आणि समागमाची तऱ्हा यांच्यावर अवलंबून असतो. ऋतु-प्राप्तीनंतर विषम दिवशीं कन्यागर्भसंभव होतो आणि समदिवशीं पुरुषगर्भ-संभव होतो असें एक त्यांचें ठोकळ शास्त्र होतें. परंतु अर्वाचीन शास्त्र प्रयोगांनीं ही गोष्ट अद्याप सिद्ध झालेली नाहीं. कांहीं अनुभविक लोक असेंही सांगणारे निघाले कीं, असे आलटून पालटून दिवस घेण्यापेक्षां पहिल्या संततीनंतर, तिच्या तिच्या अनुरोधानें आलटून पालटून पाळ्या घेतल्या तर मनोवांच्छित संतति उत्पन्न होते. दुसरीही एक कल्पना आढळते. समागमाच्या वेळीं पुरुषाचें वीर्य आणि स्त्रीचें रज यापैकीं ज्याचें प्रमाण अधिक असेल, तशी संतति होते. शब्दशः ही कल्पना बरोबर असणें शक्य नाहीं. कारण, गर्भाच्या उत्पत्तीशी स्त्रीच्या शोणिताचा प्रत्यक्ष कांहींच संबंध नसतो, असें सिद्ध झालें आहे. परंतु या कल्पनेंतील मूलतत्व मात्र खरें असण्याचा संभव आहे. मागें सांगितल्याप्रमाणें, सारेच रसानन्द सविकल्प समाधिसारखे आहेत. जो एक संकल्प घेऊन मनुष्य सविकल्प समाधींत प्रवेश करतो, तोच व्युत्थानानंतर व्यक्त होतो, हेंच पतंजलीच्या सर्व संयमांचें तत्व आहे. त्याला धरून असें म्हणतां येतें कीं, समागमकालीं स्त्री जर स्वतःला पूर्णपणें विसरली तर, पुरुषाशीं तिच्या झालेल्या तादात्म्यामुळें आणि पुरुष स्वतःला तितका कधींच विसरूं शकत नसल्या-मुळें दोघांचीही खरी एकरसता होऊन पुरुष-पिण्ड उत्पन्न होणें शक्य

आहे. याच्या उलट, पुरुष जर स्वाधीनतेनें उपभोग घेत नसेल तर, स्त्रीचें तितकें तादात्म्य न झाल्यामुळें आणि पुरुषाच्याही मनावर स्त्रीच्या रूपाचाच संस्कार असल्यामुळें कन्यासंतति होणें शक्य आहे. अर्वाचीन शास्त्रज्ञांच्या शोधाप्रमाणें, गर्भ-धारणेचा आणि स्त्री-पुरुषांच्या मनोवृत्तीचा कांहीं संबंध नाहीं. इतकेंच नाहीं तर एकमेकांची ओळख देखील नसतां नुसत्या पुरुषवीर्याच्या पिचकारीनेंही गर्भधारणा करतां येते. परंतु, याचा वर सांगितलेल्या शक्यतेशीं विरोध असण्याचें कारण नाहीं. अशा परिस्थितींत, गर्भाच्या लिङगाचा निश्चय यदृच्छेनें होईल हें उघड आहे, आणि सामान्यत: जगरहाटींतील संतति ही बहुतकरून अशा यदृच्छेचीच असते. असो.

## दोन प्रकार : आठ विधि

अशा प्रकारें आपल्या विवाहसंस्थेचें ध्येय गांठण्याकरता शास्त्रकारांनीं बीजापासून काळजी घेतली आहे. त्यांतली प्रत्येक गोष्ट अर्वाचीन शास्त्राप्रमाणें कितपत सिद्ध होते, हा प्रश्न स्वतंत्र आहे. मुख्य मुद्दा एवढा आहे कीं, मागें सांगितल्याप्रमाणें, स्त्री आणि पुरुष ही एकमेकांस पूरक अशी स्वतंत्र तत्वें असून त्यांची वाढही एकमेकांस पूरक अशा रीतीनें स्वतंत्रपणेंच झाली पाहिजे असा त्यांचा सिद्धान्त आहे. एवढ्याकरतां, त्यांनीं मागें सांगितल्याप्रमाणें सावर्ण्य, असगोत्रता आणि असपिण्डता यांचे नियम करून त्यांच्यामुळें समाजावर पडणारा ताण दोन प्रकारच्या विवाहांनीं नाहींसा केला. सामान्यत: अशी कल्पना आहे कीं, विवाहाचे आठ प्रकार आहेत. पण ती बरोबर नाहीं. ब्राह्म, गांधर्व इत्यादि आठ प्रकार विवाहविधीचे आहेत, विवाहाचे नाहींत. विवाहाचे प्रकार मागें सांगितल्याप्रमाणें, धर्म्य आणि सकाम हे दोनच. यापैकीं प्रत्येक प्रकार शास्त्रसंमत अशा गंधर्वादि आठ विधींपैकीं सर्वांनीं अथवा कांहींनीं होऊं शकतो. आणि हे दोन्हीही प्रकार नसतां वरील आठपैकीं एकादा विधि केल्यानें विवाहबद्धता येत नाहीं. या दोन प्रकाराव्यतिरिक्त कोणताही स्त्रीपुरुषसंभोग हा व्यभिचार होय. या व्यभिचाराचेही त्यांनीं दोन भेद केले आहेत. एक नुसता निंद्य व दुसरा निंद्य आणि दण्डय. वेश्यासमागम

हा पहिला प्रकार होय आणि तद्व्यतिरिक्त झालेले कोणतेंही परस्त्री-गमन निंद्य व दण्डय आहे. इतका बारीक विचार शास्त्रकारांनीं केला आहे.

गोत्र आणि सापिण्डय यांविषयीं त्यांच्या कल्पनेंचाही थोडा परामर्ष घेतला पाहिजे. कारण, हल्लीं त्याविषयीं बरीच गैरसमजूत आढळून येते. कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, गोत्रविचारांत केवळ heredity आनुवंशिकतेचा विचार आहे. सापिण्डयाचेंही तत्व कांहींच्या मतानें तेच आहे याच्या उलट, असेंही म्हणणारे लोक आहेत कीं, गोत्र ही कांहीतरी गूढ कल्पना आहे व सापिण्डयाचा संबंध heradity शी नसून जो भाताचा पिण्ड श्राद्धकर्मांत मृताला दिला जातो, त्याच्याशी आहे. यापैकी गोत्र-प्रवरांचा विचार वधूवरसूचक मंडळानें प्रसिद्ध केलेल्या व श्री. सरजामे यांनी संपादिलेल्या गोत्र-प्रवर या चोपडयांत चांगला केला आहे. तो माझ्याशी विचार-विनिमय करूनच लिहिला असल्यामुळें त्याचाच थोडासा सारांश येथें देतों. माझ्या मतानें वरील दोन्हीही कल्पना बरोबर नाहीत. वस्तुस्थितीत त्या दोहींचें मिश्रण असलें पाहिजे. म्हणजे गोत्रांत heredity शिवाय कांही गूढताही आहे आणि सापिण्डयांत भाताच्या पिण्डाच्या गूढशास्त्राबरोबरच heredity चाही थोडा विचार आहे. गोत्र आणि प्रवर यांतून मूळ प्रवर-भेद आहे हें उघड आहे.

## गोत्र विचार

गोत्रप्रवरासंबंधीं मराठी भाषेंत म्हणण्यासारखें लिखाण नाहीं. कै. चिंतामणराव वैद्यांचे लेख, ज्ञानकोशकारांनीं तोडलेले तारे आणि विद्या-भूषण कृष्णशास्त्री घुले यांचे चित्रमयजगतांतील लेख जर सोडले तर, म्हणण्यासारखें लिखाण मराठींत नाहींच श्री. सरंजामे यांचा छोटेखानी लेख तर मी व त्यांनीं मिळूनच लिहिला, हें वर सांगितलेंच आहे. तो लेख वाचणाऱ्यांच्या सहज लक्षांत येईल कीं, वरील सर्व लिखाणांत श्री. घुलेशास्त्री यांचींच मतें मला बहुतांशीं मान्य आहेत. प्रवराची उपपत्ती काय आहे, याची स्थूल कल्पना त्यांनीं अशी मांडली आहे कीं, प्राचीन

काळीं यज्ञ करीत असतां यजमान अग्नीची प्रार्थना करून त्याच्याजवळ वैभव मागत असे. हें वैभव मागतांना, आपल्या कुलांत होऊन गेलेल्या वैभवसंपन्न अशा कांहीं पूर्वजांचें नांव घेऊन त्यांच्यासारखें वैभव मला दे, अशी तो प्रार्थना करी. कोठें अशा तीन पूर्वजांचें स्मरण करीत असत, तर कोठें पांच पूर्वजांचें करीत असत. पुढें, या ऋषींच्या सामान्य नांवावरून निरनिराळे गट पडले, तेच आजचे प्रवरसांप्रदाय आहेत. या प्रवर-सांप्रदायापासून पुढें जे विद्यावंश निघाले तीं हीं हल्लींचीं गोत्रें होत. गोत्रें हीं अनंत आहेत, परंतु प्रवर मात्र ठराविक आहेत. असें असण्याचें कारण हेंच आहे. महाभारतांत असें म्हटलें आहे कीं, मूळ गोत्रें चारच होतीं व पुढें त्यांचा विस्तार झाला. हेंहि म्हणणें सयुक्तिक आहे. श्री. कृष्णशास्त्री घुले यांची कल्पना मला सर्वस्वीं मान्य नसल्यामुळें गोत्रप्रवरांची आमची कल्पना काय आहे, तें आपण थोडक्यांत पाहूं. गोत्रप्रवरांचा संबंध वेदाध्ययनाशीं येतो हे उघड आहे. वेदांविषयीं प्राचीन धारणा अशी आहे कीं, ते मंत्रसमूह आहेत. म्हणजे अर्थासुद्धां अथवा अर्थाशिवाय ज्या शद्वोच्चारांचा उच्चार करून सृष्टींत कांहीं विशेष परिणाम घडवून आणतां येतो, अशा शद्वांचे ते समूह आहेत. शद्व ही, सामान्यतः समजली जाते त्यापेक्षां प्रत्यक्ष वेगळी वस्तू असून तिच्यामध्यें उत्पादनसामर्थ्य असतें, ही गोष्ट आतां शास्त्रज्ञांच्या थोडीथोडी लक्षांत येऊं लागली आहे आमच्याकडे तर सर्व धार्मिक आचारांच्या मुळाशीं हाच सिद्धांत आहे. शद्वाचा असा परिणाम कसा घडतो, हें शास्त्र स्वतंत्र असून विशाल आहे. त्याचा विचार मी माझ्या इतर लेखांत केला आहे. या लेखांत जास्त खोलांत जातां येणार नाहीं. त्याचा एक सिद्धान्त असा आहे कीं, हें जें शद्वापासून मनुष्य आपलें काम करून घेतो, तें करण्याकरतां त्याला आपल्या शरीरांतील चैतन्यशक्तीचीही जोड द्यावी लागते. ही चैतन्यशक्ति पुष्कळ वेळां पुरेशी नसल्यामुळें तिची वाढ करण्याची जरूरी उत्पन्न होते. ही वाढ कशी करावयाची याच्याकरतां अशी सोय करून ठेवली आहे कीं, मुक्तकोटीस पोचलेले, परंतु परककारुणिकतेने, मुक्त न होतां जीवांच्या कल्याणाकरतां कर्म करीत राहणारे असे अनेक श्रेष्ठ जीव आहेत. त्यांतील

कित्येक, निरनिराळ्या मंत्रांना सामर्थ्याचा पुरवठा करण्याकरतां तप करीत असतात. ते त्या मंत्रांचे ऋषि म्हणविले जातात. रघुवंशांत म्हटलें आहे त्याप्रमाणें 'प्रवर्तितो दीप इव प्रदीपात्' अशी ही व्यवस्था आहे. हल्लींच्या काळचा दृष्टान्त द्यावयाचा म्हणजे विजेच्या पॉवरहाउसचा आहे. गांवाबाहेर एक मोठें पॉवरहाउस केलेलें असतें व तेथून गांवांत सर्व ठिकाणी सोयीप्रमाणें आणि जरूरीप्रयाणे विद्युत्शक्तीचा पुरवठा केला जातो. आमची कल्पना अशी आहे कीं, श्री. घुलेशास्त्री म्हणतात त्याप्रमाणें प्राचीन काळीं यज्ञ करणारा ज्या 'आर्षेया'ची प्रार्थना करीत असे, तें 'आर्षेय' म्हणजे ऐहिक वैभव नसून वेदविद्येस लागणारें ऋषींचें अतींद्रिय सामर्थ्य हें होय. या सामर्थ्याच्या प्राप्तीवरूनच निरनिराळे प्रवरसांप्रदाय उत्पन्न झाले. अशी समजूत आहे कीं, हे ऋषी आजही कोणत्या तरी अवस्थेंत प्रत्यक्ष असून आपलें कार्य करीतच आहेत. म्हणून प्रवरसांप्रदाय-दृष्टया प्रवरांतील निरनिराळ्या जीवांचा व त्या ऋषींचा आजही प्रत्यक्ष संबंध असून ते जीव ऋषींची तेजोरूप प्रत्यक्ष संतति होत. असें असल्या-मुळेंच, श्री. घुलेशास्त्री म्हणतात त्याप्रमाणें, मनाची एक सुसंस्कृत धारणा म्हणूनच नव्हे तर, गूढशास्त्रांतील प्रत्यक्ष अनुभव म्हणूनहि, एका प्रवरांतील स्त्री-पुरुषांचा विवाह निषिद्ध मानला गेला आहे. आज महाराष्ट्रामध्यें श्रीज्ञानेश्वर, श्रीसमर्थ इत्यादिकांचे जे सांप्रदाय आहेत त्यांच्याही मुळाशीं हीच कल्पना आहे; हें तत्व मात्र त्यांत राखलें गेलें नाहीं. या सांप्रदायांतील अधिकारी व्यक्तीकडून उपदेश घेणारा मनुष्य, वस्तुतः, त्या तंत्राच्या योगानें मूळ उत्पादक जे श्रीज्ञानेश्वर अथवा श्रीसमर्थ त्यांच्याच रक्षणाखालीं येतो. उपदेश देणारी व्यक्ति ही केवळ निमित्तमात्र असते. म्हणून तिच्याशीं केवळ लौकिक व्यवहार मात्र राहतो. या प्रवारांपासूनच पुढें निरनिराळी गोत्रें बनलीं.

यावर कोणी असें म्हणेल कीं, गोत्रप्रवरासंबंधीं हें तुमचें म्हणणें, महाभारतामध्यें मूळ गोत्रें चारच होतीं असें सांगितलें आहे, त्याच्याशीं जुळत नाहीं. परंतु तसें वाटण्याचें कारण नाहीं. महाभारतांत चार गोत्रांचे ऋषि म्हणून जे मूळ सांगितले, ते प्रवर आणि गोत्र यासंबंधाची रहस्यमय

योजना सांगण्याकरतां नाहीं. प्रवरांतून गोत्रें कशीं उत्पन्न झालीं हें सांगण्याकरतां आहे त्याची शास्त्रीय कल्पना पाहिली म्हणजे मूळ गोत्रें चारच असावींत असें दिसतें. कालांतरानें त्यांचे अनेक भेद झाले. दुसऱ्या एका अशाच उदाहरणावरून ही गोष्ट लक्षांत येईल. वेदव्यासांनीं लोकांची धारणा अल्प झालेली पाहून एका वेदाच्या चार संहिता केल्या, त्या या तत्वाला धरूनच. त्या चार संहितांच्या, पुढें जशा निरनिराळ्या शाखा झाल्या, तशीं चार गोत्रांचीं पुढें अनेक गोत्रें बनलीं. हें समजण्यास थोडें खोलांत जाऊन विवेचन केलें पाहिजे. वैदिक धर्माची एकंदर रचना संघाच्या तत्वावर आहे. कोट्यवधि जीवांचा, या विश्वजीवनाचें ठराविक कार्य करणारा एक मोठा प्रचंड संघ (commune) म्हणजे वैदिक धर्म. हा चातुर्वर्ण्यविशिष्ट आहे हें सांगावयास नकोच. चातुर्वर्ण्याबाहेरचा मनुष्य चातुर्वर्ण्यांत येऊं शकत नाहीं, याचें कारण हेंच आहे. आपल्या पूर्वकर्माच्या दृष्टीनें, एकंदर संघांत, तें एक विजातीय द्रव्य होतें. संघ म्हटला कीं त्याची अशी कल्पना असते कीं, संघाचे घटक जरी निरनिराळी कामें करणारे असले, तरी जीवदृष्ट्या त्यांची योग्यता सारखीच असते. त्यांची कामें वेगवेगळीं असूनही योग्यता सारखीच असते, याचें कारण असें कीं, त्या सर्वांच्या कामांतून जें कांहीं सामान्य कर्म उत्पन्न होतें, त्याची वांटणी कोणताही भेदभाव न ठेवतां संघाच्या घटकांत सारखी होते. त्यामुळें, क्रिया निरनिराळी असूनही जीवदृष्ट्या सारेच सारख्या दर्जाचे असतात, आणि सर्वांच्या पदरांत श्रेयही सारखेंच पडतें. या चातुर्वर्ण्यविशिष्ट संघाचें अस्तित्व टिकविण्याकरतां ब्राह्मण ही संस्था वेगळी काढून ठेवली. ब्राह्मण आपलें नियत कर्म म्हणून जें वेदपठन करतो अथवा जे आचार करतो त्याचें फळ त्याला एकट्याला किंवा त्याच्या कुटुंबालाच मिळत नसून सर्व संघाला मिळतें. कर्मकर्त्याला उपाध्याय शेवटी जो आशीर्वाद देतो कीं 'अमुक गोत्राभिवृद्धिरस्तु,' यावरूनच त्यांतील तत्व लक्षांत येईल. तेंच तत्व व्यासांच्या वेदाच्या चार संहितामध्यें असल्यामुळें, आज हा वेद मोठा कीं तो वेद मोठा असे वाद चतु:शाखीय ब्राह्मण घालीत असतात, तें केवळ अज्ञानमूलक आहे. प्राण्यांच्या वाहनांत ज्याप्रमाणें, घोड्याची किंमत जास्त कीं गाडीची किंमत जास्त हा वाद खुळेपणाचा

आहे, घोडा आणि गाडी मिळून तें वाहन तयार होतें व दोघांचीही त्याला सारखीच गरज असते, हें आहे.

## चार वेदांचें तत्व

मनुष्य काय किंवा मनुष्याचा संघ काय त्याचें अस्तित्व जणुं काय तिपाईवरील एखाद्या घडयासारखें आहे. मनुष्य म्हणजे काय असा विचार करूं लागलें. तर, त्याच्या ठिकाणीं असणाऱ्या तीन शक्ति डोळयासमोर यतात. इच्छाशक्ति, क्रियाशक्ति व ज्ञानशक्ति या त्या तीन शक्ति होत यांतील कोणतीही एक शक्ति नसणें म्हणजे मनुष्याचें मनुष्यपण नसल्यासारखेंच आहे: या तीन शक्ति एकमेकांस पोषक अशा रीतीनें, जितक्या अधिक जोमदार आणि अधिक श्रेष्ठ दर्जाच्या, तितका तो मनुष्य जास्त उच्च प्रकारचा समजावा. समाजाचीही तीच गोष्ट आहे. अशा उच्च गुणांचीं माणसें समाजांत जितकीं अधिक तितका तो समाज वरच्या दर्जाचा, वैभवसंपन्न आणि प्रभावशाली. या तिन्ही गुणांचा प्रकर्ष एकाच व्यक्तीच्या ठिकाणीं समाजांत फार क्वचित आढळतो. पुष्कळशा कालानंतर, समाजांत, 'मनुष्याणां सहस्रेषु' अशा या व्यक्ति मधून मधून उत्पन्न होतात आणि अवतार, विभूति, अथवा Super-man म्हणविल्या जातात. समाजांत, अर्थात, हे गुण निरनिराळया व्यक्तींत विखुरलेले सांपडतात. वैदिक लोकांची श्रद्धा अशी आहे कीं, विशेष प्रकारच्या आचारपरंपरेंत शरीर ठेवून वेदांचें पठन केलें असतां व्यक्तीच्या व समाजाच्या या तिन्ही शक्तींना वाढवितां येतें, आणि उत्पन्न करतां येतें. वेदव्यासांनीं संहिता केल्या त्या या तत्वावर. ऋग्वेदाचा मूळ हेतु क्रियाशक्ति वाढविणें हा आहे. यजुर्वेदाचा हेतु इच्छाशक्ति वाढविण्याचा आहे आणि सामवेदाचा हेतु ज्ञानशक्ति वाढविण्याचा आहे. यातीन्ही शक्तींची समाजदृष्टया जोपासना करीत असतां, व्यक्तीची जीवनयात्रा निर्विघ्न आणि सुखकर करण्याकरतां अल्पप्रमाणावर केलेली सामान्य योजना म्हणजेच अथर्ववेद. म्हणूनच अथर्वाला स्वतंत्र वेद असें पुष्कळ ठिकाणीं म्हटलेलें नाहीं व ग्रंथांत बहुतकरून त्रैविद्यांचाच उल्लेख येतो. तात्पर्य, चार संहितांचें आद्य

तत्व हें असें आहे. म्हणूनच चतु:शाखीयांनी एकमेकांशी भांडणें उचित नाही. कारण, प्रत्येक शाखीयांनी केलेल्या वेदोच्चाराचें फळ सर्वांनाच सारखें मिळावयाचें आहे आणि सर्वांनाच त्याची सारखी गरजही पण आहे. त्याचें फलही, समाजांत, त्या त्या शाखेंतच उत्पन्न होईल असा नियम नाही, कोठेंतरी योग्य ठिकाणी होईल. तीनशें वर्षे, यवनाक्रांत झालेल्या महाराष्ट्रानें जें तप केलें तेंच जिजाईच्या पोटी शिवाजी महाराजांच्या रूपानें अवतीर्ण झालें. ऋवशाखीयांच्या वेदपठनानें एकंदर साऱ्या संघाच्या क्रियाशक्तीला साह्य झालें पाहिजे. मग, श्रेष्ट व कर्तृत्ववान व्यक्ति कोणत्याही वर्णांत अथवा जातीत उत्पन्न होवो. तशीच गोष्ट इतर शक्तीचीही आहे, कारणपरत्वें ग्रंथातरी, कित्येक ठिकाणीं, विशेष वेदाची प्रशंसा केली आहे, त्याला श्रेष्ठ म्हटलें आहे, अथवा त्याच्यापासून इतर वेद झाले असें म्हटलें आहे तें अर्थात, 'न निन्दा निन्दितुं अपि तु विधेयं स्तोतुम्,' या न्यायानें. कार्यवशात्, समाजांतल्याच कोणाला तरी आपण अध्यक्षाच्या खुर्चीवर बसवून त्याची प्रशंसा करतों, तसेंच हें आहे. तें शब्दश: खरें मानणें म्हणजे श्रीसमर्थांनी म्हटल्याप्रमाणें 'वेदें बोलिला पूर्वपक्ष, मूर्ख तेथेंची लावी लक्ष' असें करण्यासारखेंच आहे. तात्पर्य इतकेंच की, प्रवर आणि गोत्रासंबंधी आमची कल्पना अशी असल्यामुळें सगोत्र विवाहाचा निषेध होऊन आमची विवाहसंस्था Exogamous झाली. याच्या जोडीला सापिण्डच व्यवस्था आली. तिचेंही तत्व काय आहे तें आपण थोडक्यांत पाहूं.

## सापिंडच विचार

सपिण्डांतली कल्पना सगोत्राच्या कल्पनेंतूनच निघालेली आहे आणि म्हणून सगोत्राच्या निषेधाच्या मुळाशीं असलेल्या कल्पनाच सपिण्डाच्याही मुळाशीं आहेत. सगोत्रामध्यें ज्याप्रमाणें स्थूल वंशाची आणि आधिदैविक तेजाची अशा दोन्ही कल्पना प्रमुख आहेत, त्याप्रमाणेंच त्या सापिण्डयाच्या कल्पनेंतही आहेत. मनुष्य मेल्याबरोबर देहाचा नाश झाल्यामुळें व्यवहार-दृष्टया जीव जरी या पांचभौतिक जगाला पारखा झाला असला, तरी त्याचा संबंध एकदम तुटत नसतो. म्हणून, त्यासंबंधीं कांही कर्तव्य त्याच्या

संबंधी जनांचें उरतें व त्याच्याशी त्यांना दळणवळणही ठेवतां येतें, असा शास्त्रसिद्धान्त आहे. त्यांतूनच मृताला तिलांजलि व पिण्ड देण्याचा आचार उत्पन्न झाला आहे. सापिण्डच म्हटलें म्हणजे आज दोन कल्पना मनामध्यें उभ्या राहतात. एक कल्पना लग्नसंबंधांतून दिसून येते. लग्नाच्या आड सापिण्ड्य येत असल्यामुळें सापिण्डच शब्द सामान्य लोकांच्या कानावर असतों दुसरी कल्पना वकील लोकांच्या डोक्यांत जास्त आहे. कारण त्या कल्पनेचा संबंध दायभागाशी आहे. मनुष्य मेला म्हणजे त्याचें जें वडिलोपार्जित अथवा स्वकष्टार्जित धन मागें उरतें, त्याची वाट कशी लावावयाची, असा प्रश्न कायद्याच्या दृष्टीनें कोणत्याही समाजापुढें असतो. त्यासंबंधीचा आमच्या शास्त्रांचा ढोबळ नियम, ज्याला पिण्ड देण्याचा अधिकार आहे त्याला धनाचा वांटा घेण्याचा अधिकार आहे, असा आहे. यामुळें पिण्ड देण्याचा अधिकार कुणाकुणाला येतो असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. मागें सांगितलेंच आहे की, एक गोत्र म्हणजे आधिदैविक दृष्टचा एक कुटुंबच आहे. त्या दृष्टीनें, गोत्रांतील कोणाही माणसास सर्व गोत्रपुरुषांना पिण्ड देण्याचा अधिकार आहे आणि महालय करतांना 'ये के चास्मत्कुले जाताः' अशा रीतीनें सर्व गोत्रपुरुषांच्या नांवानें आपण तर्पण करतो अथवा पिण्ड देतोंच. असें असलें तरी, व्यवहारदृष्टचा याचीही कांही व्यवस्था असणें अवश्य होतें. ती व्यवस्था शास्त्रकारांनी ठरवून दिली आहे. त्या व्यवस्थेंत आनुवंशिकता आहे आणि आधिदैविकताही आहे. असें मिश्रण असल्या-मुळेंच सापिण्डचाचे नियम ठरविण्याची गरज भासली. लग्नविचार करतांना, सगोत्राचा निषेध करून फार झालें तर, आई अथवा वडीलांसारखीं ज्यांचीं नातीं वडील आहेत, त्यांच्याशीं विवाह करूं नये, असें म्हटलें असतें म्हणजे काम भागलें असतें. परंतु, तेवढचावर काम भागलें नाहीं याचें कारण हेंच कीं, आनुवंशिकतेची कल्पना त्यांत मिसळलेली आहे. लग्नाच्या सापिण्डचा-संबंधानें प्रश्न पडण्याचें कारण असें होतें कीं, जेथें कोठें संततीमध्यें मुलगी येऊन तिच्यासंबंधीं उत्पन्न झालेल्या नात्यांचा प्रश्न येतो अशावेळीं, आधिभौतिक म्हणा किंवा आधिदैविक म्हणा, दोन्ही दृष्टीनें एक अडचण उत्पन्न होते. आनुवंशिकतेच्या दृष्टीनें दोन सपिण्डांचा विवाहसंबंध

अशाकरतां निषिद्ध होतो कीं, दोघांच्यामध्यें एक रक्त खेळत असतें आणि गुणसंक्रान्तीच्या दृष्टीनें सरक्त संबंध अहितकारक ठरला आहे. याठिकाणीं, एक रक्त खेळतें म्हटलें म्हणून गोंधळण्याचें कारण नाहीं. 'We Europeans' या पुस्तकाच्या Julian Huxley प्रभृति लेखकांनीं या कल्पनेचा उपहास करून Aristotle (ॲरिस्टॉटल) च्या वेडगळ कल्पनेस दोष दिला आहे. (आम्ही युरोपीयन्स, ज्युलीयन हकसले.) आणि असें म्हटलें आहे कीं, गर्वधारणेमध्यें स्त्री अथवा पुरुष असा कोणत्याही रक्ताचा कांहींच संबंध नाही. ते खरे आहे असें धरलें तरी, प्रचलित समजुतीतील मूळ कल्पना चुकीची ठरत नाही. एवढेंच की, थोडेंसें मागे जावें लागतें. गर्भधारणेस अवश्य असलेले स्त्रीपुषपिण्ड तरी मनुष्याच्या रक्तापासूनच बनतात आणि म्हणून त्यांची सरक्तता नाहीशी होत नाही. असो. आनुवंशिकता शास्त्राप्रमाणें, रक्ताचे गुण जे प्रजेंत उतरावयाचे ते पुरुष परंरेंत उतरतात, याविषयी आतां कांही शंका राहिलेली नाही. परंतु, ते जसे पुरुषसंततीत उतरतात तसेच ते स्त्रीसंततीतही उतरतात. म्हणून, त्यांची परंपरा दुसऱ्या पुरुषबीजाशी मिळून उत्पन्न झालेल्या संततीत किती टिकते असा प्रश्न साहजिक आहे. त्याच्या कांही कल्पना आमच्या शास्त्रज्ञांनी बसविलेल्या आहेत. त्या कल्पनेप्रमाणें सरक्त ठरलेले जीव सपिण्ड समजले जाऊन विवाहास निषिद्ध ठरले गेले. अशाप्रकारची सगोत्रविवाह आणि सपिण्डविवाह यांच्या व्यवस्थेंतली मूळ कल्पना आहे. हें लक्षांत ठेवून आपण आपल्या मूळ विषयाकडे वळूं.

## लिंगपरिवर्तन

याप्रमाणें वंशशुद्धीची काळजी घेऊन नंतर शास्त्रकार इतर बाबींकडे वळले आहेत. चातुर्वण्यव्यवस्था कांहीं झालें तरी अबाधित टिकवली पाहिजे असें शास्त्रकारांचें धोरण असल्यामुळें, सवर्णविवाहच प्रत्येकानें करणें त्यांनीं प्रशस्त मानलें आहे, हें मागें सांगितलेंच आहे त्याबरोबरच त्यांचा दुसरा नियम असा ठरला कीं, विवाहित जोडप्यांत, धर्मविवाहांत तरी स्त्रीचें वयोमान पुरुषाहून अधिक असतां कामा नये. याला शरीरशास्त्राच्या दृष्टीनें कांहीं महत्त्व आहे, व कांहीं, आम्ही मागें प्रतिपादन केल्याप्रमाणें

स्त्रीच्या ठिकाणीं निसर्गसिद्ध असलेल्या दोन प्रवृत्तींपैकीं एक स्वत:ला कोणी तरी आपल्या बाहूंत कवळून घ्यावें त्या प्रवृत्तिमुळें आहे. या प्रवृत्तीसंबंधीं चर्चा मागील लेखांकांत सविस्तर केली आहे. पुरुषाचें वयोमान लहान असतांना विवाहसंबंध आनंदकारक होणार नाहीं असें नाहीं. पाश्चात्य देशांत व आपल्याही देशांत असे संबंध पुष्कळ घडतात. परंतु त्यांत स्त्रीच्या अन्त:करणाची ही प्रवृत्ति पूर्णपणें तृप्त होत नाहीं असें आढळून येतें. म्हणून स्त्रीचें वयोमान पुरुषाहून लहान असावें हा नियमही योग्यच ठरला. त्याचप्रमाणें, स्त्रीपुरुषजीवांची वाढ अगदीं गर्भधारणेपासूनच भिन्न दिशेनें व्हावी, म्हणजे त्यांच्या त्यांच्या योग्य दिशेनें व्हावी, यावरही त्यांचा कटाक्ष. लिंगविनिश्चय हा आजच्या स्थितींतही संशयास्पद आहे. परंतु, अशा प्रकारचा कांहीं निश्चय करतां येणें शक्य आहे, एवढी कल्पना अर्वाचीन शास्त्रज्ञांस आली आहे. आणि तशाप्रकारचे त्यांचे प्रयोगही सुरू आहेत. जन्म झाल्यानंतर लिंगपरिवर्तन घडवून आणण्याचेही कांहीं प्रयोग आहेत. आमच्या पुराणांत तर, जन्मल्यानंतर लिंगपरिवर्तन झाल्याच्या शिखण्डीच्या कथेसारख्या अनेक कथा आहेत. त्यांतील तात्पर्य कांहींही असो, भारतीयांनीं प्रजोत्पत्ति ही देखील एक पवित्र गोष्ट समजून त्यासंबंधींही बारीक नियम घालून दिले आहेत. आणि म्हणूनच या संबंधांत गर्भाधान संस्कार हा महत्त्वाचा ठरला गेला आहे.

अमुक प्रकारानें अथवा अमुक कर्म करून समागम केला असतां अमुक प्रकारची संतति होते, ही समजूत उपनिषदांसारख्या अत्यंत प्राचीन कालापासून आहे. बृहदारण्यकांत, सहाव्या ब्राह्मण्यांत यासंबंधीं स्वतंत्र अनुवाकच आहे. तो भाग थोडासा अश्लील, म्हणून भाष्यकारांनीं त्याचें महत्त्वदृष्टया विवरण केलेलें नाहीं. परंतु, बृहदारण्यकांतील कल्पना लक्षांत घेण्याजोगी आहे. बृहदारण्यकांत, प्रजोत्पत्तीच्या, आमच्या शास्त्रांतील तीन्ही कल्पना आल्या आहेत. मागील लढाईच्या वेळेला ज्या वेळेस स्फोटक द्रव्याचा तुटवडा पडला, त्यावेळीं ज्याप्रमाणें जर्मनीनें दुसऱ्या कोणत्याही पदार्थाचें साह्य न घेतां केवळ हवेपासूनच नायट्रिक ॲसिड तयार केलें, त्याप्रमाणें योगसामर्थ्यानें, सर्वत्र ओतप्रोत भरलेल्या मूल

द्रव्यावर परिणाम करून वस्तू अथवा जीव निर्माण करतां येतो, असा योगशास्त्राचा सिद्धान्त आहे (जात्यन्तरपरिणाम: प्रकृत्यापूरात् । योगसूत्र ४–२). हीच मानससृष्टि म्हणविली जाते. या मानससृष्टीची तर कल्पना बृहदारण्यकांत आहेच. पण अशीही कल्पना आहे की, मंत्रादिसामर्थ्यानें सृष्ट झालेल्या पदार्थापासूनच अन्य पदार्थाची उत्पत्ति करतां येते. बृहदारण्यकांत मंथविद्या म्हणून जी सांगितली आहे तिचा हेतु हाच आहे असें म्हटलें आहे की, ही विद्या सिद्ध झालेल्या माणसानें मंत्रोच्चार करून नुसतें पाणी शिपडलें तरी शुष्ककाष्टाला पल्लव फुटतात. त्याप्रमाणें महाभारतांत याज्ञवल्क्याची एक कथाही आहे. असें पाणी शिपडून शुष्क काष्टाचा वृक्ष श्रीगुरूंनी बनविल्याचें वर्णन अर्वाचीन ग्रंथांत, सरस्वती गंगाधरानें केलें आहे. कदाचित या साऱ्या समजुती अर्वाचीन दृष्टीनें भोळसटपणाच्याही असतील. मला कांही त्यांचें समर्थन करावयाचें नाहीं. विवाहसंस्था विशेष तऱ्हेनें रचण्यांत त्यांच्या काय कल्पना होत्या हें पहावयाचें आहे. तसें करीत असतांना त्यांच्या ज्या कांही समजुती वाङ्मयांत दिसून येतात त्यांचा तसाच उल्लेख करणें हें क्रमप्राप्तच आहे

या समजुती कशाही असल्या तरी त्यांत शास्त्रीयदृष्टया एक मात्र तत्व दिसून येतें. तें हें की, समागमकालीं स्त्री-पुरुषांची मनोवृत्ति नीरसपणाची नसावी व केवळ कामलोलुपही नसावी; जसा एकादा शास्त्रीय प्रयोग करण्यास विशेष मनोवृत्तीनें आपण प्रवृत्त होतों तशा प्रकारची मनोवृत्ति असावी. कारण, त्या मनोवृत्तीचा परिणाम लिंगनिश्चयावर होत नसला तरी जन्मास येणाऱ्या जीवाच्या मनोवृत्तींवर होतो असें पुष्कळ प्रमाणांत दिसून येतें. यालाच अलीकडील शास्त्रांत Telegony असें म्हटलें आहे. याचें उत्तम उदाहरण म्हणजे प्राचीन काळीं वळू घोड्यांची निपज करीत असत, त्याचें आहे. घोडीचे डोळे बांधून ठेवीत असत आणि ज्याप्रकारचा घोडा पाहिजे असेल त्या प्रकारचा हुबेहुब कृत्रिम अश्व तिच्यापुढें उभा करीत आणि मग घोड्यास सोडीत असत. समागम सुरू होऊन साधारण वीर्योत्सर्गाचा काल आला असें वाटतांच, डोळ्यावरील पडदा काढून घण्यांत येई. पुढें असलेला कृत्रिम अश्वच तिच्या नजरेंत

भरल्या कारणाने ती तात्पुरती तद्रूप होऊन उत्पन्न होणारी संततीहि हुबेहुब तशीच होई. जुन्या करारांत या प्रकारांचें एक उदाहरण आलें आहे तें प्रसिद्धच आहे.* मध्यंतरीच्या काळांत हें Telegony चें तत्व शास्त्रज्ञांनी अमान्य ठरविले होतें. पण आतां पुन्हां त्याकडे त्यांचा कल झुकूं लागला आहे. आमच्या वैद्यशास्त्राचा तर सिद्धांतच आहे की, "मातृजं चास्य हृदयं" म्हणजे संततीचे हृदयधर्म मातेच्या हृदयाची परंपरा चालवितात. अशी त्यांची समजूत असल्यामुळें त्यांनी आपापल्या परीनें समागमापासून खबरदारी घेतली आहे. त्याचा निदान एवढा तरी उपयोग होतो कीं, अगदीच अनियंत्रित समागमाला, मनावर अथवा शरीरावर ताण न पडतां चांगला आळा बसतो. आणि हा लाभ देखील कांही थोडा नाही, हें आज जी वैद्यांची ओरड चालली आहे कीं, अनियमित समागमानें तरुण पिढीचा ऱ्हास होत आहे, तिच्यावरून दिसून येतें.

## सापिंड्याचा वाद

आतां अर्धाच राहिलेल्या सापिंड्याच्या प्रश्नाचा विचार करून मूळ विषयाकडे वळूं. सपिण्डता एक प्रकारची का दोन प्रकारची, असा अलीकडे एक वाद उत्पन्न झाला आहे. आणि वि. भू. घुलेशास्त्री या सनातनी पंडितांनींच तो उत्पन्न केला असल्यामुळें त्याला जास्त महत्व आहे. इतकेंच नाहीं तर, सपिण्डता मानली पाहिजे असा विरोध त्यांना सुधारणावादी लोकांकडूनही होत आहे. सुधारणावादी लोकांचें सारें तत्व, त्यांच्या मतानें, केवळ पुरुष बुद्धीनें समाजास वाटणारी आवश्यकता आणि त्यांचें सर्व शास्त्र, विद्वान म्हणविणाऱ्या चारचौघांचें बहुमत व त्याला अनुकूल पडेल तेथें आणि अनुकूल पडेल तशा रीतीनें जुन्या ग्रंथांचे त्यांना वाटणारे आधार, हेंच असल्यामुळें, त्यांनीं जरी शास्त्रवचनें दिली असली तरी, त्यांत कांहीं जीव नाहीं. उद्यां, समाजाला सापिण्ड्याची आवश्यकता

---

* शिद्दी माणसाशी प्रथम समागम झाल्यानें गोऱ्या माणसापासूनहीं तशीच शिद्दी संतति झाल्याचें उदाहरण प्रसिद्ध आहे. विशेष सांडाशी समागम झाल्याने गाय पुढें दुध देते असाही अनुभव आहे.

वाटली नाहीं तर, याच वचनांचा अनादर करून सपिण्डता अशास्त्र आहे असें ते म्हणूं लागतील. म्हणून त्यांचा विचार न करतां आणि 'आर्थिक सपिण्डता' इत्यादि अद्भुत शब्दजालांत न शिरतां आपल्या विषयापुरतें तेंवढें पाहूं. (कारण, 'आर्थिक सपिंडता' अशी वैदिक धर्मांत स्वतंत्र वस्तूच नाहीं. तिच्यांत जो अर्थाचा संबंध येतो तो अलौकिक सपिण्डतेमुळें येतो. पितरांस पिण्ड मिळाला पाहिजे आणि पिण्ड देणाऱ्याची लोकयात्रा चालली पाहिजे म्हणून पिण्ड देणाऱ्यास पितृधन वांटलें जावें, अशी व्यवस्था आहे. 'अर्थ' हें त्या व्यवस्थेचें मूळ नाहीं, पिण्ड देण्याचा अधिकार हें आहे. 'पिण्ड दद्यात् धनं हरेत्' असें म्हटलें आहे. पिण्ड देतांना पित्रार्जित अगर स्वकष्टार्जित धनाचाच उपयोग केला पाहिजे, म्हणजे त्यांत दुसऱ्या कोणाचीही न्याय्य वासना गुंतलेली नसली पाहिजे. तशी ती गुंतली असल्यास पिण्डाचा अंश त्याच्याकडे जातो. तो पिण्ड पितरांच्या कामीं येत नाहीं, हें सांगण्याकरतां मनूनें 'गोत्ररिक्थानुगः पिण्डः' असें म्हटलें आहे. त्याचा अर्थ सापिण्ड्य व्यवस्था अर्थव्यवस्थेवर बसविली आहे असा होऊं शकत नाहीं; तसा करणें वेडगळपणाचें आहे. याच चरणांत मनूनें स्पष्ट सांगितलें आहे की, या श्लोकांत 'स्वधे' चा म्हणजे पिण्डामुळें पितरांस मिळणाऱ्या तृप्तीचा संबंध आहे; 'अर्था' चा अथवा रक्ताचा कोणत्याच प्रकारचा लौकिकसंबंध नाहीं. त्याचें उदाहरण म्हणून वरच्या ओळींत त्यानें दिलें आहे :— 'गोत्ररिक्थे जनयतुर्न हरेद्दत्रिमः क्वचित् । म्हणजे दत्तक दिलेल्या मुलानें आपल्या पहिल्या घरच्या गोत्राचा अथवा द्रव्याचा केव्हांही उपयोग करूं नये. तसें केलें असतां पिण्डापासून मिळणारी तृप्ति दत्तक घेणाऱ्या बापास न मिळतां मूळच्या बापास मिळते. म्हणजे दत्तक घेणाऱ्याचा हेतु विफळ होतो. सापिण्ड-व्यवस्था 'अर्थानुसार' नाहीं, उलट पैशाच्या वारसाची व्यवस्था सापिण्ड्याप्रमाणें आहे, ही गोष्ट इतकी सरळ आहे कीं, मुल्लाच्या 'Hindu Law' त दिलेलीं दाय-

भागाचीं कोष्टकें पाहिलीं तरी सहज लक्षांत येईल. * इतर कोणत्याही समाजांत वारसा हा क्रमानें पुढें पुढें ढकलला जात असतां असा पुढचा इसम टाकून पुनः तो मूळ पुरुषांच्याकडे वळला आहे, ही गोष्ट, फक्त वैदिक धर्मशास्त्रांतच आहे. आणि त्याचें कारण त्यांचा दायभाग अर्थावर बसविला नव्हता हें आहे.)

मुल्लानें आणखी कांहीं मतें दिलीं आहेतः पण सर्वांत एक गोष्ट सारखीच आहे. खालील सहा आंकडे झाल्यावर पणतूच्या मुलाला दाय न मिळता तो वर मूळपुरुषाच्या आईकडे वळला आहे. तो सापिण्ड्याच्या अलौकिक तत्वास धरून आहे. अर्थानुसारी सापिण्ड्य असतें तर दाय व पिंड सरळ पणतूच्या मुलाकडे उतरला असता.

## दोन प्रकारचें सापिंड्य

आमच्या धर्मशास्त्रांत सपिण्डता जी मानली आहे ती दोन प्रकारची आहे. सापिण्ड्याची व्याख्या अशी केली आहे कीं, 'यस्मै पिण्डः प्रदीयते ये च ददति दातुमर्हन्ति वा ते सर्वे सपत्नीकाः सहाधिकाराः सपिण्डाः' (सापिंड्य—भास्कर रश्मि १) या अर्थाप्रमाणें पाहिलें तर अशा तऱ्हेचा

---

*टीपः— (१७) पणजी — पणजी (१८)—त्यांचीं मुलें

(१२) आजी — आजा (१३)—त्यांचीं मुलें

( ७ ) आई — वडील ( ८ )—त्यांचीं मुलें

(४) पत्नी — मूळपुरुष

(५) मुलगी — (१) मुलगा

(२) मुलगा

(६) मुलगा — (३) मुलगा

ज्यांचा संबंध आहे त्या स्त्रीपुरुषांच्या विवाहासच फक्त निषेध असला पाहिजे. परंतु 'धर्मसिंधु' कारांनीं दिलेली विवाहसापिण्ड्याचीं कोष्टकें पाहिलीं तरी असें दिसून येतें कीं, त्यांत आनुवंशिकततेचा संबंध आहे.

एक लहानसें उदाहरण घेऊं म्हणजे हें समजेल. सापिंड्यनिवृत्ति मातृपितृद्वारा दोन्हीकडून व्हावी लागते हीच गोष्ट महत्वाची आहे.

विष्णु (मूळपुरुष)

| | |
|---|---|
| नारायण २ | गौरी २ |
| सुधी ३ | हर ३ |
| बुध ४ | मैत्र ४ |
| रति ५ | काम ५ |

यांत सपिंड म्हणून रति व काम यांत विवाह होऊं शकत नाहीं. पण यांतील काम हा रतिच्या कोणत्याही पूर्वजांना अथवा विष्णुलाही पिंड देणारा मुळींच अधिकारी नाहीं. म्हणून हें सापिण्ड रक्ताचें आहे.

या कोष्टकावरून सहज लक्षांत येईल कीं, यांत सपिण्ड म्हणून विवाहास निषिद्ध सांगितलेली स्त्री-पुरुषें, धर्मशास्त्रप्रमाणें, एकमेकांच्या वडीलांस श्राद्धद्वारा-पिण्ड देण्याचे अधिकारी नाहींत. असें असून त्यांना सपिण्ड म्हटलें आहे. याचाच अर्थ असा कीं, साक्षात रक्ताची पिण्डपरंपरा आहे. * कारण मागे सांगितल्याप्रमाणें आनुवंशिकताही

---

* विज्ञानेश्वरास हीच अडचण पडली; तो स्पष्ट म्हणतो कीं,
'निर्वाप्य पिंडान्वयेन तु सापिंड्ये मातृसंताने
भ्रातृपितृव्यादिषुच सापिण्ड्यं न स्यात् ।'

परंतु ज्या अर्थी तसें सापिंड्य आहे त्या अर्थी त्याचें तत्व कांही वेगळें असलें पाहिजे, अशी त्याची तर्कशुद्ध विचारसरणी आहे.

पुरुष-संततींतच उतरते आणि स्त्री-संततींत उतरत नाहीं असें थोडेंच आहे ? गोत्र-परंपरेंत अलौकिक संबंध आणि आनुवंशिकतेचें तत्व अशीं दोन्हीही आहेत. कन्या ही दुसऱ्या पुरुषाशीं संयुक्त होऊन नवीन गुण-परंपरा उत्पन्न करीत असली तरी, तिच्यांत आपल्या पित्याचा कांहीं अंश असतोच आणि तो दुसऱ्या पुरुष-बीजाशीं संयुक्त झाल्यानें एकदम अजिबात नष्ट होत नाही. त्याचीही कांहीं परंपरा चालते, म्हणूनच त्यासंबंधीं नियम करण्याची शास्त्रकारांस गरज वाटली. लग्नासंबंधीं सापिण्डयाची भानगड उत्पन्न होते तीच मुळीं, मध्ये कोठें तरी कन्या येऊन उत्पन्न होते हें लक्षांत घेण्याजोगें आहे.

## पितृसावर्ण्य

आमच्या शास्त्राप्रमाणें पाहिलें तर, स्त्री ही केवळ क्षेत्रासारखी आहे. तिच्यांत संततीचें बीज पुरुष-परंपरेंतून टाकलें जातें. त्याच्याशीं या म्हणण्याचा विरोध येतो असें वाटण्याचा संभव आहे. परंतु असें नाहीं. बीज-क्षेत्राचा दृष्टान्त घेतला तरी देखील एक गोष्ट उघड आहे. कीं, क्षेत्रांत धान्य जरी बीजाप्रमाणें उत्पन्न होत असलें तरी त्यावर क्षेत्र-गुणाचा परिणाम होत असतोच. निरनिराळ्या जमिनींत तेंच धान्य टाकलें तरी त्यापासून एकसारखें एकजात पीक येत नाहीं हें अनुभवसिद्ध आहे. परंतु, ही दृष्टि सोडली तरी, आमच्या शास्त्रज्ञांनीं याच्यासंबंधींही कांहीं विचार सांगून ठेवला आहे. मनुष्यजीव म्हटला म्हणजे ज्ञान, इच्छा आणि क्रिया या तीन शक्तींचें एक त्रिकूट आहे, हें म्हणणें कोणसही मान्य होईल. या तिन्हीही शक्ति शरीरांत प्रकट होत असतांना त्यांचीं स्थानें निरनिराळीं आहेत, असा योगाचा सिद्धान्त आहे. उपनिषदांत व इतर ग्रंथांमध्यें निरनिराळ्या कारणाकरतां शरीरांत कोठें 'हृदय' हें मुख्य आहे असें म्हटलें आहे. कोठें 'नाभी' ला महत्व दिलें आहे तर, कोठें मेंदू मुख्य मानला आहे. अर्वाचीन संशोधन लगेच, त्यांच्या आंधळ्या पद्धतीप्रमाणें या तीन अगदीं निराळ्या गोष्टी समजून वेगळेवेगळे काळ, वेगळ्या संस्कृति आणि वेगळ्यावेगळ्या व्याख्या कल्पूं लागते. तें अर्थात शास्त्रहीनतेचें लक्षण आहे. योगशास्त्राची व्यवस्था अशी आहे कीं,

शरीरांतील क्रियाशक्तीचें केंद्र नाभिस्थानीं आहे, इच्छाशक्तीचें हृदयांत आहे आणि ज्ञानशक्तीचें डोक्यांत आहे. पाश्चात्य पंडितांनाही आतां अशी कल्पना आली आहे कीं, मनुष्यशरीरांत ज्ञानतंतूंचें जें सुस्पष्ट जाळें आहे त्यापेक्षांही अत्यंत सूक्ष्म असे अनेक तंतु पसरलेले आहेत. जास्त सूक्ष्म साधनें मिळाल्याखेरीज शरीरांतील त्यांच्या कार्याचें ज्ञान होणें शक्य नाही. तसें तें ज्ञान झाल्याखेरीज आमच्या योगशास्त्रांतील सिद्धान्ताची सत्यता त्यांच्या लक्षांत येणार नाहीं. या तीन शक्तीपैकी इच्छाशक्तीच्या केन्द्रांतून जें काय यावयाचें, त्याचें दान त्याला विशेषतः आईकडून मिळतें व बाकीच्या दोघांच्या बाबतींत पुरुषाचा अंश जास्त असतो. 'मातृजं चास्य हृदयम्' म्हणून मागें जें सांगितलें त्याचा अर्थ हा आहे. अशी त्यांची व्यवस्था असल्यामुळें वंशदृष्ट्या, त्यांनीं पितृबीजाला महत्व देऊन पितृ-सावर्ण्य जास्त पसंत केलें, हें ठीकच आहे. (असें म्हणण्याचें कारण हें कीं, मधून मधून मातृसावर्ण्याचीं उदाहरणें आमच्या वाङ्मयांत आढळतात. या एकंदर गोष्टींचा शास्त्रकारांनीं किती सूक्ष्म विचार केला होता हें मी मागें सांगितलेंच आहे. त्याला अनुसरून कांहीं प्रसंगाकरतां, विशेषतः पुनः पुनः उत्पन्न होणाऱ्या धर्मग्लानीच्या काळांत समाजाची घडी सांभाळून धरतांना आणि प्रतिलोमाच्या बाबतींत, ही व्यवस्था त्यांना मान्य करावी लागली आहे, असें दिसतें.)

## विज्ञानेश्वरावरील आक्षेप

यावर असा एक आक्षेप येईल कीं, विज्ञानेश्वरानें सापिण्डच तेवढें रक्ताचेंच असा एकांगी पक्ष उचलल्यापासून उत्पन्न झालेल्या चुकीमुळें जे सापिण्डच–निबंध झाले, त्यांचाच निर्देश निर्णयसिंधु अथवा धर्मसिंधु यांत आहे. म्हणून त्यांच्या आधारानें हा प्रश्न सुटणार नाहीं. परंतु हें म्हणणें बरोबर नाहीं. विज्ञानेश्वरानें एकांगीच विचार केला हें खरें. परंतु, लग्नाच्या बाबतींतील सापिण्ड्याचा निषेध हा पूर्वीपासूनच आहे हें, कुमारिलभट्टानें मामाची मुलगी करण्याबद्दल दक्षिणी लोकांना दोष दिला आहे, त्यावरून दिसून येईल. आणि मनूनें 'असपिण्डाच या मातुः' असें म्हटलें आहे, तेंही हेंच दाखवितें. याचें कारण, त्यांत जर अलौकिक संबंध

असता तर 'असपिण्डयाच या मातुः' हा शब्दप्रयोगच व्यर्थ झाला असता. कारण, सापिण्ड्याची व्याख्या, मागें सांगितल्याप्रमाणें, ज्याला पिण्ड देण्याचें आपण अधिकारी आहोंत व आपल्याला पिण्ड देण्याचा जो अधिकारी आहे तो, अशी आहे. स्त्री ही अशा रीतीनें आमच्या शास्त्रांत केव्हांच अधिकारी नाहीं: म्हणून तर दत्तकादि पुत्रांची भानगड. तेव्हां 'असपिण्डा च या मातुः' या ठिकाणीं रक्ताचाच संबंध आहे हें उघड आहे. बरें, अलौकिक संबंध आहे असें म्हटलें तर, त्या संबंधाच्या दृष्टीनें आईचे जितके सपिण्ड होतील तितके सर्व विवाहास निषिद्ध पाहिजेत. परंतु लग्नाच्या सापिण्ड्य निषेधांत त्यांचा विचार नाहीं हें उघड आहे. म्हणून विज्ञानेश्वरानें उपपत्ति एकांगी दिलेली असली आणि निबंध-ग्रंथकारांनीं त्यालाच मानलें असलें तरी, सापिण्ड्यासंबंधीं नियम कांहीं त्यांनी नवे केले नाहींत, हेंही उघड आहे. त्यामुळें हा आक्षेप टिकत नाहीं.

## घटित व ज्योतिष

याप्रमाणें पिण्डाची काळजी घेऊन आनुवंशिक गुणांच्या दृष्टीनेंही त्यांनी वधू-परीक्षेचे प्रत्येक नियम घालून ठेविले आहेत. उदाहरणार्थ, ज्या मुलीच्या आईला मुलीच जास्त होत असतील तिला स्वतःलाही कन्या-संतति जास्त होण्याचा संभव आहे. अशा मुलीचा विवाहास निषेध केला आहे. विवाह-विचार करतांना कुल आणि शील यांना जितकें महत्व दिलें आहे तितकें इतर कशालाही नाहीं. 'स्त्रीरत्नं दुष्कुलादपि' असें म्हटलें हें खरें आहे. तें अर्थात, अपवादात्मकच आहे. तरी देखील धर्मविवाहाच्या बाबतींत तें प्रशस्त मानावें किंवा नाहीं हें संशयास्पदच आहे. त्यावेळच्या लोकांचा फलज्योतिषावर आणि सामुद्रिकावर विश्वास होता म्हणून त्या दृष्टीनेंहीं कांहीं नियम सांगितले आहेत. किंबहुना, आमचा विवाह म्हटला कीं, घटित आणि मुहुर्त याच गोष्टी डोळ्यापुढें उभ्या राहतात. अमुक नक्षत्रावर विवाह करावा, अमुक महिन्यात करावा, अमुक ग्रहबलावर करावा हे सारे मुहुर्तशास्त्र मोठे बारीक आहे. त्याचप्रमाणें जन्मनक्षत्राच्या चरणावरून नाडी, गण, वर्ण, वश्य, योनि, तारा, इत्यादिकांची कांहीं व्यवस्था ठरविली आहे. तिला 'अवकहडा–चक्र' असें आपल्या व्यवहारांत

म्हणतात. ह्या व्यवस्थेचा लौकिकदृष्टया व्यवहाराशीं कांही संबंध नाहीं. देवगणाचा मनुष्यही अत्यंत नीच आणि क्रूरकर्मा असूं शकेल आणि राक्षसगणाचा सुशील आणि दयाळु असूं शकेल. ही व्यवस्था, ज्या दोन जीवांचें त्रिविध*कर्म एक करावयाचें आहे, त्यांच्या सूक्ष्मदेहाची व्यवस्था आहे. म्हणून, दोन जीवांच्या एकीकरणाचें आणि त्यांच्या अंतर्जीवनाचें तत्व ज्यांना मान्य नाहीं आणि केवळ योगायोगावर भरवंसा ठेवून, शरच्चन्द्र चट्टोपाध्यायाची 'आशा राणी' ‡ शहाणपणाचा आव घालून शिकविते त्याप्रमाणें, मिळेल तेंवढें ऐहिक सुख एकमेकांपासून कणशः गोळा करावयाची ज्यांची तयारी आहे, त्यांनी लग्न करतांना हें घटित किंवा ज्योतिष पाहण्याची कांहींच आवश्यकता नाहीं. ज्योतिष आणि टिपण जे लग्नांत शिरले त्यांत धर्मशास्त्राचा संबंध फार थोडा आहे. चांगल्या वेळेवर कार्य केलें असतां देवता उपस्थित होऊन आशिर्वाद देतात, एवढीच त्यांतली धार्मिक कल्पना आहे. परंतु मुहूर्त आणि घटित न पाहिलेल्या लग्नाला देवता उपस्थित होतच नाहींत असेंही कोठें म्हटलेलें नाहीं. आणि या दोन्हीही शिवाय सप्तपदीपर्यंत विधि झालेलें लग्न अशास्त्र (invalid) असेंहीं पण नाहीं. म्हणून, मुहूर्त आणि घटित यांचा, या पुस्तकांत जास्त विचार करण्याचें कारण नाहीं. एवढें मात्र मी म्हणूं शकेन कीं, या बाबतींत आजकाल जो धेडगुजरीपणा करण्यांत येतो, तो मात्र अपायकारक आहे. या शास्त्रावर ज्यांचा विश्वास असेल त्यानीं त्याचें संपूर्ण पालन करावें हेंच उचित आहे. पंचांगांच्या वादांत हल्ली ज्याप्रमाणें कांहीं मंडळी करतात कीं, आपली निष्ठा एका पंचागांवर म्हणावयाची, अडलें किंवा सोईस पडलें म्हणजे तेवढ्या कामापुरतें मात्र चटकन दुसरें पंचांग घ्यावयाचें, हा प्रकार मात्र अत्यंत गर्ह्य आहे. त्यामुळें माणूस निष्ठाशून्य होऊन त्याचा तेजस्वीपणा नाहींसा होतो हें तर खरेंच, पण लबाडीपासून निरंतर दूर असलेल्या देवाचाही त्यांना आशिर्वाद मिळत नाही. शास्त्रावर विश्वास नसल्यामुळें अथवा शास्त्रच माहित नसल्यामुळें, गीतेंत म्हटल्याप्रमाणें 'यजन्ते श्रद्धयान्विताः', अशा

---

*संचित, प्रारब्ध आणि क्रियमाण. ‡ नवी क्षितिजे.

रीतीनें शास्त्रविरुद्ध कर्म करणाऱ्यालाही एकवेळ, परमेश्वराचा आशिर्वाद मिळू शकेल. कारण आंत लबाडी नसून, चुकीची कां होईना, पण शुद्ध निष्ठा आहे, हें परमेश्वर ओळखतो आणि दयाळुपणानें उलट जास्त कृपा करितो. म्हणूनच तुकाराम महाराजांनी म्हटलें आहे 'अकर्तव्य नीत होय त्यासी ।' (म्हणजे शुद्धचित्त माणसाला); पण, धरसोड करणारा मनुष्य आपल्या निष्ठाहीनतेने परमेश्वरापासून दूर जाऊन दोन्ही पक्षांना आंचवतो. तात्पर्य, घटित आणि मुहूर्त यांची व्यवस्था आपल्या श्रद्धेप्रमाणें हल्लीं घ्यावी, मात्र इतकेंच कीं कोणी कोणाचा उपहास करूं नये.

## प्रसूति

गर्भधारणा झाल्यानंतर गर्भाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें गर्भिणीच्या व्यवहारासंबंधी वैद्यशास्त्रानें सूक्ष्म विचार केलेला आहे. अर्वाचीन वैद्यकानें त्याच्यापुढें पाऊल टाकलें आहे असें कांही दिसत नाहीं. गर्भाचा परिणाम आईच्या मनावर आणि आईच्या मनाचा परिणाम गर्भावर होत असल्यामुळें गर्भिणीची मनोधारणा आनंदी, उत्साही आणि जशा तऱ्हेचा पिण्ड बाहेर यावयाचा त्याला सहाय्यक अशी असावी, विरुद्ध नसावी हें त्यांतलें तत्व आहे. तेवढ्याचकरितां आमच्याकडे डोहाळे व सीमान्तादि संस्कार सांगितले आहेत. त्यांचा विचार करण्याचें आपल्या विषयास कारण नाहीं. वैद्यशास्त्राप्रमाणें, पिण्ड जर प्रकृतिस्थ असेल व गर्भधारणेच्या कालांत नीट जोपासना झाली असेल तर, एका आडवें येण्याच्या अपवादाखेरीज, प्रसूति कष्टदायक होण्याचें कांहीं कारण नाहीं. इतर साऱ्या शरीरधर्माप्रमाणें तोही एक धर्म असल्यामुळें तितक्याच सुलभतेनें तो व्हावयास पाहिजे. आणि तशी कैक उदाहरणें पाहण्यांत येतातही. चाळीस वर्षांपूर्वी अशी स्थिति होती कीं, वरचा एक अपवाद टाकला तर प्रसूति ही बायकांना मोठी भयंकर आपत्ति वाटत नव्हती. आतां मात्र त्याच्या उलट स्थिति झाली असून प्रसूति हें दरवेळेस एक गंडांतरच होऊन बसलें आहे. आणि सुटका जरी सहज झाली तरी, मागाहून अशा भानगडी उत्पन्न होतात कीं, प्रसूतीचें नांव काढलें कीं, माणसाच्या अंगावर कांटा येतो. याचें कारण असें आहे कीं, पूर्वीच्या बायकांची वाढ

लहानपणापासून ज्या पद्धतीनें होत असें त्या पद्धतीनें आतां होत नाही आणि बाळंतपणेंही तशीं होत नाहीत. इतर सर्व बाबींप्रमाणें याही बाबींत कमालीचा घेडगुजरीपणा झाला आहे. मी अन्यत्र म्हटल्याप्रमाणें जुन्या सुईणी मरून गेल्या आणि नव्या सुईणी तयार नाहींत अशी अवस्था झाली आहे. आपली विवाहसंस्था परिपूर्ण करण्याकरितां पिण्डापासून काळजी घेणें जसें योग्य आहे त्याप्रमाणेंच पिण्ड गर्भावस्थेंत असतां त्याची काळजी घेणें आणि जन्मास आल्यावर तेथेपासून त्याची वाढ इष्ट त्या दिशेनें होण्याची काळजी घेणें, हें अवश्य आहे. याकरतां भारतीयांनीं काय केलें तें पुढील लेखांकांत पाहूं.

# प्रकरण ९ वें

*"Women seem to havc lost the knack of bearing"*

—Elinor Mordaunt (These Generations)

येथपर्यंत झालेल्या प्रतिपादनावरून वाचकांच्या लक्षांत एक गोष्ट येईल कीं, भारतीयांच्या विवाहशास्त्रांत आधिदैविकाचाही कांहीं संबंध आहे. ईश्वर आणि अतीन्द्रिय विश्व मानणाऱ्या कोणत्याही लोकांच्या विवाहांत तसा थोडाफार संबंध असतोच. परंतु, भारतीय कल्पनेंत आणि त्या लोकांच्या कल्पनेंत महदंतर आहे. त्या लोकांची मजल, फार झालें तर विवाहित दंपतींना ईश्वराचा आणि दिव्य विभूतींचा आशिर्वाद मिळणें आणि त्या योगानें त्यांचें वैवाहिक जीवन सुखमय होऊन सफल होणें, एवढीच आहे. आमच्या कल्पनेंत हें तर सर्व आहेच, पण यापेक्षांही आणखी कांही आहे. आणि, तें 'आणखी कांहीं' म्हणजे विशेष तऱ्हेची पिंडपरंपरा उत्पन्न करावयाची, तिचें सातत्य कायम ठेवावयाचें आणि तिचा आपल्या सांस्कृतिक ध्येयास उपयोग करून घ्यावयाचा. गोत्र आणि सापिण्डच यांच्या भारतीय कल्पना लक्षांत येण्याकरतां ही गोष्ट लक्षांत ठेवावी लागते. त्यांच्या या समजुती खऱ्या आहेत कीं खोटचा आहेत, हल्लींच्या नव्या मनूंतील नव्या शिपायाला रुचणाऱ्या आहेत किंवा नाहींत, हा अगदीं स्वतंत्र प्रश्न आहे. प्राचीनांच्या समजुती काय होत्या हें प्रामाणिकपणें समजून घ्यावयाचें म्हणजे त्या जशा वाङमयांत दिसून येतात तशाच प्रथम समजून घेतल्या पाहिजेत. माझा स्वतःचा त्या समजुतींवर विश्वास असला तरी या पुस्तकांत, मला त्यांचेंच समर्थन करावयाचें नाहीं, हें मी मागें सांगितलेंच आहे. वाङमयांत जें दिसतें तें तसेंच मला मांडावयाचें आहे.

## पिण्डाचें महत्व

पिंडपरंपरेसंबंधीं भारतीयांच्या अशा कांहीं समजुती होत्या हें एका लहानशा उदाहरणावरून उत्तम दिसून येईल. आमचे श्राद्ध आणि अंत्येष्टि संस्कार यांचा या कल्पनेशीं फार मोठा संबंध आहे. त्या शास्त्रांत आपणांस येथें शिरतां यावयाचें नाहीं. कारण, तो विषय या पुस्तकाच्या कक्षेबाहेरील आहे. म्हणून त्यांतील मुख्य कल्पना तेवढी घेऊं. श्राद्धांतील मुख्य कल्पना, मन्त्रसामर्थ्यानें सुसंस्कृत पिंडांत पितृदेवतांचें आवाहन करतां येणें ही आहे. अशा आवाहनाकरतां पवित्र आणि शुद्ध पिंड असेल तो जास्त योग्य. मनूनें असा एक प्रश्न उत्पन्न केला आहे कीं, एखादा ब्राम्हण स्वत: अतिशय विद्वान आहे पण त्याची मागची परंपरा श्रोत्रियत्वाची नाहीं आणि एखादा स्वत: अतिशय अविद्वान आहे परंतु त्याची मागची परंपरा, निदान त्याचा बाप उत्तम श्रोत्रीय अशी आहे, तर त्यांतून श्राद्धसंस्कारा-करतां कोणता ब्राम्हण जास्त योग्य आहे ? हल्लींच्या विचारसरणीप्रमाणें पाहिलें तर कोणीही चटकन असें म्हणेल कीं, यांत विचाराचा प्रश्नच नाहीं. 'विद्वान् सर्वत्र पूज्यते' हें स्वयंसिद्धच आहे. परंतु मनूनें मात्र सांगून ठेविलें आहे कीं, 'ज्यायांसमनयोर्विद्यात् यस्य स्यात् श्रोत्रिय: पिता । मन्त्र-संपूजनार्थं तु. . . ।' म्हणजे पितरांच्या आवाहनाकरतां यापैकीं स्वत: अविद्वान असून श्रोत्रीय परंपरेचा असेल तोच जास्त योग्य आहे. मनु भगवानाला विद्येची महती कळत नव्हती असें म्हणणेंही शक्य नाहीं. कारण त्यानें लगेच स्पष्ट म्हटलें आहे कीं 'सत्कारमिरोऽर्हति.' म्हणजे अश्रोत्रीय परंपरेंतील विद्वानाचा विद्वत्तेकरतां अवश्य सत्कार करावा. भारतीयांच्या कल्पनेंत अगदीं लहानसहान गोष्टीपासून आधिदैविक अंश कसा असतो, हें यावरून लक्षांत येईल. तसा तो गोत्र आणि सापिण्ड्य यांच्याही कल्पनेंत असावा हें साहजिकच आहे.

## भारतीय संततिनियमन

शेतकरी ज्याप्रमाणें उत्तम पीक येण्याकरितां बीज आणि क्षेत्र या दोघांचीही काळजी घेतो, तशीच काळजी या बाबतींत घेतलेली दिसून येते.

गोत्र-पिण्डाचा संबंध बीजाशीं आहे आणि क्षेत्राशींही आहे. परंतु, नुसतें बीज आणि क्षेत्र उत्तम असून भागत नाहीं, त्याला इतरही कित्येक गोष्टींची काळजी घ्यावी लागते. मागच्या लेखांकांत, बाळंतपण म्हणजे आजकाल एक गडांतर कां होऊन बसलें आहे, असा प्रश्न उपस्थित केला होता. त्याचें उत्तर हेंच आहे कीं, भारतीय लोक हळू हळू आपल्या कल्पनांना पारखे झाले. प्रजोत्पत्तीच्या बाबतींत भारतीयांनीं एक मूळ काळजी अशी घेतली आहे कीं, दोन संतानांत कांहीं नियमित अंतर राहिलें पाहिजे. तेवढ्याकरतां त्यांचा सामान्य नियम असा दिसतो कीं, निदान पांच वर्षांचें तरी अंतर मध्यें गेलें पाहिजे. असें अंतर मध्यें पडलें असतां सहसा बाळंतपण हें गंडांतरासारखें वाटणार नाहीं. मात्र, हें संततिनियमन आजच्या सारखें नसे. ते स्वतःच्या उच्च संस्कृतीच्या जोरावर उत्पन्न झालेल्या श्रेष्ठ मनोधैर्यानें आणि निष्ठेच्या बलानें करावयाचें असे. प्रत्येकानें पितृऋणांतून मुक्त झालें पाहिजे असा त्यांचा सामान्य नियम होता. आणि म्हणूनच, सामान्यतः, प्रत्येकानें विवाह करून प्रजा उत्पन्न केलीच पाहिजे, असा त्यांचा आदेश आहे. 'प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः' ही श्रुति सुप्रसिद्धच आहे. अशा रीतीनें, एक पुत्र होऊन पितृऋणांतून उत्तीर्ण होईपर्यंत 'ऋतौ ऋतौ अनुयुज्यात्' अशी त्यांची आज्ञा आहे. पण, पुढें मात्र, हा नियम कसोशीनें पाळला जात नसावा असें म्हणण्यास जागा आहे. मुलाचा व्रतबंध अगदीं लवकर म्हणजे पांचव्या वर्षीं करावा असें शास्त्र आहे. आजही क्वचित पांचवें वर्ष संपूर्ण होतांच व्रतबंध झाल्याचीं उदाहरणें आढळतात. व्रतबंधाच्या वेळीं, बापानें मुलाच्या हातावर स्वतः केलेल्या गायत्रीपुरश्चरणाचें उदक सोडावयाचें असतें. पूर्वींच्या सर्वच शास्त्रीय परंपरांची ज्याप्रमाणें आजकाल नक्कल होऊन गेली आहे आणि त्या नकलेच्या द्वारें कां होईना, त्या कल्पना जिवंत रहात आहेत, एवढीच त्यांत समाधानाची बाजू उरली आहे, तसाच प्रकार याही बाबतींत झाला आहे. उगीच क्वचित कोठें, पिता कांहीं पांचदहा हजार जप आधीं करण्याचे परिश्रम घेतो, नाहीं तर तेंही कार्य ब्राह्मणद्वारांच उरकण्यांत येतें. परंपरा उत्पन्न झाली तेव्हां तें अर्थातच असें नसावें. याचा अर्थ असा कीं, एकदां एक पुत्र झाला कीं, बापानें विधिपूर्वक पुरश्चरणास लागावयाचें

आणि त्या पुत्राचा व्रतबंध करून तो शक्तिसंचय त्याच्या स्वाधीन केल्या-वर मग पुन: स्त्रीकडे वळावयाचें, अशी मूळ कल्पना होती. कोणत्याही गोष्टीचा इतिहास म्हटला म्हणजे त्यांत परंपरेलाही महत्वाचें स्थान आहेच. मॅडम ब्लॅव्हॅटस्की तर म्हणते कीं त्यांत, अलीकडच्या काल्पनिक इतिहासापेक्षां परंपराच जास्त विश्वसनीय होय ! आणि खरें म्हटलें तर जनश्रुति ही आजच्या इतिहासाच्या नांवावर मोडणाऱ्या कल्पनातरंगापेक्षां जास्त भरोसेदार असते. (सीक्रेट डॉक्ट्रीन भाग १ पान २४१–४२ And if one accepts tradition, which is better history than the speculative fiction which now passes under the name: Secret Doctrine :–P. I. 241-242).

याच्या जोडीला मुहूर्तशास्त्राची जोड देऊन आणि व्रतवैकल्यांचें जाळें उत्पन्न करून त्यांनीं संततिनियमन, ताण न पडतां, आवश्यक केलें आणि त्याला समाईक कुटुंबाची, लज्जेची आणि मर्यादाविषयक कल्पनांची जोड मिळाल्यामुळें तें सुसह्य झालें. निदान, आजच्या संततिनियमनाचे जे घातुक परिणाम स्त्री-पुरुषांच्या शरीरावर होतात म्हणून आतां अनुभवानें सिद्ध होत आहे, त्यापेक्षां कितीतरी कमी दुष्परिणाम होतील एवढी सोय या सर्व प्रकारांनीं घडून आली. ते दुष्परिणाम टाळून जर दोन अपत्यां-मध्यें आजही पांच वर्षांचें अंतर पडलें तर बहुधा बाळंतपण हें आपत्ति वाटण्याचें कारण नाहीं. आणि ध्येयाची कल्पना सुस्पष्ट असून पहिल्या-पासूनच व्यक्तीची सारी वाट त्या वळणांतच झाली असल्यास ताण पडण्याचेंही कारण नाहीं. अशी सर्व प्रकारची काळजी घेतली गेली असल्यामुळें मानवजातीच्या इतिहासांत भारतीयांना कांहीं चमत्कार करून दाखवितां आले. भारतीय संस्कृतीचें ध्येय भोग नसून त्याग हें आहे, ही गोष्ट आतां एखाद्या लहान पोरासही समजण्याइतकी सर्वमान्य झालेली आहे. मनुष्याच्या शहाणपणाची म्हणजे अर्थातच, त्याच्या मोठेपणाची त्यांची व्याख्याच मुळीं 'वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता' म्हणजे ज्यानें इन्द्रियजय केला आहे तोच खरा शहाणा, अशी आहे. 'यस्यास्ति वित्तं स नर: कुलीन: । स पण्डित:स स श्रुतिमान् गुणज्ञ: ।'हा

मनुष्य स्वभाव आहे. हें कांहीं भारतीयांचें शास्त्र नव्हे. शास्त्र आणि मनुष्यस्वभाव यांचे संबंध, प्रारंभीं तरी, एका वर्तुळावर एकमेकांस पाठ लावून उभ्या राहिलेल्या व त्या वर्तुळावर प्रवास सुरू करणाऱ्या दोन प्रवाशांसारखेंच बहुधा असतात. शास्त्र हें जीवाला, हल्लीं मनुष्यस्वभाव म्हणून जो समजला जातो त्याच्या उलट नेण्याचा प्रयत्न करीत असतें. आणि म्हणूनच मनुष्यस्वभावालाच जीवनाचें सर्वस्व समजणाऱ्या लोकांना शास्त्र कधीं रुचत नाही. अशा लोकांना न रुचलें तरी भारतीय शास्त्र बाह्या उभारून हेंच सांगतें कीं, इन्द्रियजय हेच खरें शहाणपण आहे. ही गोष्ट लक्षांत न आल्यामुळें रिस्लेसारख्या अडाण्यांनीं विद्वत्तेचा डौल दाखवून आमच्या समाजपद्धतीची अवहेलना केली आहे, आणि त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेवून पुन: स्वतंत्रबुद्धीची ऐट मिरविणारे आमचे लोकही तसेंच करीत आहेत. प्रत्यक्ष या विषयाशीं संबंध नसला तरी आमच्या संस्थांचा अभ्यास करतांना कसा उथळपणा केला जातो, याचें उदाहरण म्हणून रिस्लेसाहेबांच्या म्हणण्याचा थोडा जास्त विचार करूं.

## रिस्लेची सदोष कल्पना

रिस्लेसाहेबांनीं आमच्या व जगांतील इतर समाजांच्या रचनांची तुलना करून असें दाखविलें आहे कीं, समाज तितका—मग तो कोणताही असो, पुरेसा मोठा असल्यास एक थराचा असणें शक्यच नाहीं. त्याच्यांत निरनिराळे थर म्हणजे वर्ग हे पडतातच. परतु, भारतीय समाज हा जणुं कांहीं एकमेकांवर रचलेल्या आडव्या थरांचा बनलेला आहे. याच्या उलट, इतर समाजांत पडलेले वर्ग उभ्या थरासारखे आहेत. उभ्या थरांमध्यें त्या थराच्या तळाशीं असलेल्या मनुष्यालाही आपल्या कर्तुत्वानें अगदी वर येण्यास पुरेशी सवड असते. आणि कर्तृत्वहीन बनल्यास अगदीं वरच्या मनुष्यालाही तळाशीं जावें लागतें. चारोही थरांना एकच पाया असल्यामुळें या व्यवस्थेंत असा परिणाम होतो कीं, समाज नेहमीं हालता राहतो आणि अगदीं तळाशीं जाऊन किंवा अगदीं वर येऊन कोणत्याही थरांतील व्यक्तीला दुसऱ्या थरांत जातां येतें. त्यामुळें समाज नेहमी जिवंत राहतो. भारतीयांच्या समाजरचनेंत ही सोय नाहीं. कारण त्यांचे थर

आडवे असल्यामुळें वर येणें आणि खालीं जाणें या दोन्हीही गोष्टी संभवतच नाहींत. हा दृष्टान्त कांहीं तितकासा निर्दोष नाहीं, तरी पण, 'दृष्टान्त तितुका एकदेशी' हें लक्षांत घेऊन दृष्टान्तदृष्टया त्याचें परीक्षण न करतां तत्वाच्या दृष्टीनें विचार करूं. वर येणें याचे अर्थ दोनच. एक तर जास्त वैभवसंपन्न होऊन जास्त सुख उपभोगणें आणि दुसरा, जगामध्यें जास्त सन्माननीय ठरणें. आज एक साधा मजूर असलेला मनुष्य-मॅक्डोनल्ड-सारखा–ब्रिटिश साम्राज्याचा पंतप्रधान बनून वैभव आणि मान हीं दोन्हींही मिळवितो. भारतीय समाजरचनेंत ही सोय नाहीं. आर्थिकदृष्टया भारतीयांची योजना जास्त समर्पक होती, हें आतां पुष्कळांना पटूं लागलें आहे. रशियांत हल्लीं निरनिराळया धंदेवाल्यांच्या ज्या युनियन्स स्थापन होत आहेत त्यांवरून ही गोष्ट समजून येईल. भारतांत, ज्या त्या वर्गाचा अर्थोत्पादक धंदा ठरलेला असल्यामुळें आणि त्यांत सजातीयाखेरीज दुसरा कोणीही प्रतिस्पर्धी नसल्यामुळें, त्या वर्गांतील कर्तृत्ववान माणसाला हवी तेवढी संपत्ति मिळवून ऐहिक सुखाची चंगळ अनुभविण्याची सोय होती. आज देखील महाराचे कर्जदार ब्राम्हण आढळतात. तेव्हां, रिस्लेच्या 'वर येणें' या म्हणण्याचा अर्थ मानास्पद होणें असा धरावा लागतो. युरोपांत मान मिळविण्याकरतांच श्रीमत होण्याची आवश्यकता असते, इतर रीतीनें तो मिळणें दुर्मिळ असतें. या स्वानुभवावरून रिस्लेनें आपलें मत बनविलें आहे. आमच्याकडे याच्या अगदीं उलट परिस्थिति होती. संपत्तीला आणि ऐहिक वैभवाला भारतीय मनुष्य अंतःकरणापासून कधींच मान वांकवीत नाहीं. 'यस्यास्ति वित्तं' या सुभाषितांतील उपरोधावरूनही हें लक्षांत येईल. आमच्याकडे खरा मान आणि खरी प्रतिष्ठा वर सांगितलेल्या शहाणपणास मिळत आली आहे. हें शहाणपण अंगीं आणण्यास वर्ण जाति, वर्ग, इत्यादि कांहींही आड येत नाहीं आणि हें अंगीं आल्यास यापैकी कशाचाही अडथळा न होतां तो मनुष्य सन्माननीय ठरतो; इतकेंच नव्हे तर सर्व वर्णांतील स्त्री-पुरुषांकडून तो खरोखरच पूजिला जातो. अशी सोय इतर समाजांत नाही म्हणून त्या लोकांना खंत वाटते. याचें उदाहरण मी स्वतःच्या अनुभवावरू 'वैदिक संस्कृतीच्या पुनर्घटनें'त दिलें आहे.

## खरी तुलना कोणती ?

परंतु, मुळांतच आधी, तुलनात्मक अभ्यास म्हणून ज्याला म्हणतात तोच मुळी सदोष आहे. दोन समाजांच्या घटनांचा तुलनात्मक विचार करीत असतां खरी महत्वाची गोष्ट, त्यांची रूपें एकमेकांशी किती जुळतात ही महत्वाची नसून त्यांच्यामुळें प्रत्यक्ष निष्पत्ति काय झाली आहे, ही आहे. मानवी समाजाला सुखी करण्याचें कार्य त्यापैकी कोणी किती केलें यावर त्यांची तुलना झाली पाहिजे. कित्येक विचारवंत पाश्चात्य अभ्यासकांनांही आता ही गोष्ट पटूं लागली आहे. मायकेल पिम या अमेरिकन लेखिकेनें म्हटलें आहे की, भारताचें हृदय समजून घ्यावयाचे तर मनुष्यानें भारतीय बनलें पाहिजे, भारतीय मनोवृत्तीनें राहून पाहिले पाहिजे. आणि नंतर भारतीय मूल्यांचे परिक्षण पाश्चात्याची प्रगति, आकांक्षा, वासना इत्यादिकांच्या साह्यानें न करता प्रत्यक्ष परिणामावरून केलें पाहिजे. (भारतांचीशक्ति-पा.९९ 'To understand India one musf live India, be India. Then try to estimate values not iu terms of comparlson with Western progress, Western desires, ideals, but in terms of concrete results.' * Power of India, P.99. एका शास्त्रीय दृष्टान्तावरून ही गोष्ट लक्षांत येईल. कांही वर्षापूर्वीपर्यंत युक्लीडची भूमितिच एक ठाऊक होती. त्यामुळें अशी ठाम समजूत झाली होती कीं, युक्लीडची गृहीतकृत्यें ही केवळ अढळ आहेत आतां शास्त्रज्ञांनी असें सिद्ध केलें आहे की, ही समजूत चुकीची आहे. दुसरी गृहीतकृत्यें घेऊनही भूमितिसंबंधाचे आपले प्रश्न सोडवितां येतात. म्हणजे भूमितीच्या अनेक पद्धति असूं शकतात. त्यांतील कोणती पद्धति स्वीकारावयाची हा प्रश्न स्वतंत्र राहतो व त्याचा उलगडा निराळया अनुभवावरून करावा लागतो. तशीच गोष्ट समाजाचीही आहे. समाजानें आपल्यापुढें ध्येय काय

---

* टीप:-हिंदुस्थानचें रहस्य समजण्याकरतां त्यांत राहून हिंदु बनलें पाहिजे. आणि मग, पाश्चात्यांच्या कल्पना, प्रगति, ध्येयें यांच्यावरून तुलना न करतां प्रत्यक्ष परिणामावरून तुलना केली पाहिजे.

ठेवलें आहे, त्या ध्येयाला अनुसरून सुख, कल्याण इत्यादि शब्दांच्या त्याच्या व्याख्या काय आहेत आणि त्याचा अनुभव कसा आहे यांच्या विचारावर मुख्य तुलना अवलंबून राहील. बाकीच्या साऱ्या सामाजिक श्रेणी त्या ध्येयाला आणि कल्पनांना सुसंगत असल्यास उत्तमच असतात. त्यांच्यांत स्वतंत्र तुलना होऊं शकत नाही. फक्त, त्यांतील कोणत्या ध्येयांनी जगास काय अनुभव दिला आहे, यांच्या तुलनेवर त्यांचें मूल्य अवलंबून राहील. ही गोष्ट लक्षां न आल्यामुळें एकाप्रांतील परंपरा दुसऱ्या प्रकारांतील परंपरांना जुलुमाच्या वाटतात किंवा त्यांचे फायदे लक्षांत येत नाहीत.

## दशास्यां पुत्रान् आधेहि

विवाहशास्त्रांतील भारतीयांचें धोरण मागे विशद करून सांगितलेंच आहे. मैथुनसंबंध हा त्यांनीं निंद्य किंवा गर्ह्य असा मानलेला नाहीं. उलट, त्यांच्या दृष्टीनें ती एक अतिशय पवित्र अशी गोष्ट आहे. तो एक यज्ञ आहे. परंतु त्यांनी त्या पावित्र्याच्या नांवावर त्याचें स्तोमही माजविलें नाहीं. पूर्वी सांगितल्याप्रमाणें दोन विरुद्ध-लिङ्गी जीवांच्या संपूर्ण एकी-करणास एक अवश्य असलेली पायरी म्हणूनच त्याचा स्वीकार केला आहे आणि 'वशे हि यस्येन्द्रियाणि' या आपल्या शहाणपणाच्या तो आड येणार नाहीं. अशी खबरदारी घेतली आहे. आणि म्हणूनच, दहा संतति झाल्यावर अंगांत शक्ति असूनही मैथुनसंबंधापासून निवृत्त व्हावें, असें वेदांचें धोरण आहे. पण त्याबरोबरच, ही निवृत्ति बळजबरीची नसून ध्येयप्राप्तीनें आलेली असली पाहिजे, असाही त्यांचा कटाक्ष आहे. म्हणूनच 'दशास्यां पुत्रानाधेहि पतिमेकादशं कृधि' म्हणजे 'हिला दहा पुत्र होऊं दे आणि नवरा हाच तिचा अकरावा पुत्र असूं दे' अशी विवाहाच्या वेळीं वधूकरतां प्रार्थना केली आहे. एका स्वयंसंभावित विद्वानानें याच्यावर अशी टवाळी केली कीं, हें मागावयास हवेंच कशाला ? दहा मुलें होई-पर्यंत मनुष्य आपोआप म्हातारा बनतोच आणि मरणाच्या दारींही पडतोच. तेव्हां तुम्ही या ऋचेचें मोठें स्तोम माजविलें तें कशाकरितां ? या विद्वानांनीं ही टवाळी करतांना दोन गोष्टी लक्षांत घेतलेल्या दिसत

नाहींत. भर्तृहरीचीं शतकें जरी त्यांनी वाचलीं असतीं तरी त्यांच्या ध्यानांत आलें असतें कीं, केस पांढरे होऊन गात्रें गलित झालीं तरी वासना जास्त तरुण होत असते आणि स्वस्त्रीच्या ठिकाणीं मातृभाव उत्पन्न होणें तर दूरच, परंतु उलट, 'आरोपितास्थिशकलं परिहृत्य यान्ति। चाण्डालकूपमिव दूरतरं तरुण्य:।'* असा खेद मात्र अंत:करणांत वाढत असतो. अशा स्थितींत, शेजेच्या कामिनीचा पुत्र होऊन राहणें ही गोष्ट सोपी नाहीं. दहा पुत्र उत्पन्न होत असतां त्याचा अभ्यास घडला तरच ती गोष्ट शक्य आहे.

दुसरीही एक गोष्ट आहे. तिचा मुद्दाम उल्लेख करण्याचें कारण हेच कीं, प्राचीन काळच्या अनेक गोष्टींची समजूत आजच्या आमच्या परिस्थितीवरून करण्याची जी पद्धति आहे. ती सर्वथा अयोग्य आहे. आतांच दिलेल्या हिशोबाप्रमाणें दहा संततीस लागणारा काळ सुमारें ५० वर्षांचा, आणि 'पूर्णषोडशवर्षा स्त्री पंचविंशेन संगता' या शास्त्रान्वयें २५ वर्षे अशीं पाऊणशें वर्षे होतात. हल्लींच्या काळीं मनुष्य पाऊणशें वर्षे सहसा पाहतच नाहीं. परंतु वैदिक काळीं अशी स्थिति नव्हती. त्याकाळीं पाऊणशें वर्षे हा आयुष्याचा मध्य असे. आणि म्हणून त्याकालीं त्या वयांत शरीराचा जोमही उत्कृष्ट असें. आजच्या लोकांना, वयाच्या पस्तीसाव्या वर्षी विषयपराङ्मुख होण्यास सांगण्याइतकीच त्याकाळीं पाऊणशेंच्या घरांतील माणसास ती गोष्ट सांगणें अवघड होतो. वैदिक काल तर दूर राहोच, परंतु, भारतकालांत देखील मनुष्याचें आयुर्मान सव्वाशें–दीडशें वर्षांचें सहज असे, हें कै. चिंतामणराव वैद्यांनी आपल्य भारताच्या उपसंहारांत दाखविलें आहे. आमच्या फलज्योतिषांतील दशा-पद्धतीचें सर्वांत मोठें चक्र जें विंशोत्तरी त्याचेंही मान १२० वर्षांचेंच आहे. जसजसा न्हास झाला तसतसें तें कमी होत गेलें व अष्टोत्तरीवर

---

टीप:—*चांडालांची विहीर आहे हें कळण्याकरतां पूर्वी तिच्यावर एक हाड टांगीत असत. त्या हाडास पाहून बायका जशा दुरूनच ती विहीर टाळतात त्याप्रमाणें पांढरे केस झालेले पाहून तरुण स्त्रिया दुरूनच कंटाळा करतात, याचाच म्हातारपणीं खेद होतो.

आलें. आज तर तें ऐशींवरच येऊन बसलें आहे कीं काय कोण जाणे ! असो.

## निसर्गाचा एक नियम

आतां आपल्या मूळ प्रश्नाकडे आपण वळूं. खरें पाहिलें तर बाळंतपण ही अगदीं नैसर्गिक क्रिया असल्यामुळें इतर नैसर्गिक गोष्टींप्रमाणेंच तीही अतिशय सहजपणें आणि सुलभपणें व्हावयास पाहिजे. आणि मनुष्येतर प्राण्यांत ती तशी होतांना दिसतेही. दैववशात् मूल आडवें येणें हा अपघात त्यांत केव्हां केव्हां होतो. आणि अशा वेळेस जनावराची देखील सुटका करण्यास माणसाची मध्यस्थी उपयोगी पडते. पण, तो एक अपघात सोडला तर बाळंतपण म्हणजे प्राणसंकट वाटण्याचें किंवा होण्याचें कांहीं कारण नाहीं, हें मागें सांगितलेंच आहे. या विषयाशीं संबंध असलेल्या लोकांचे अनुभव पाहिले तर असें दिसतें कीं, समाजांतील ज्यांना आपण वरचे वर्ग म्हणजे पांढरपेशे म्हणतों, त्या वर्गांतील स्त्रियांत बाळंतपणाच्या तक्रारी जास्त आणि खालच्या वर्गांतील स्त्रियांत बाळंतपण सुलभ जास्त व त्याचे दुष्परिणाम अधिक कमी. कामवासनेसंबंधीं असा एक नियम दिसून येतो कीं, जसजसा मनुष्य रानटी जास्त, तसतसा त्याचा वासनोद्भय तीव्रसंवेगाचा परंतु जास्त नियमित. आणि जसजसा मनुष्य जास्त नागर, तसतसा त्याचा वासनोद्भव अनियमित आणि म्हणूनच निरनिराळ्या संवेगांचा. वर सांगितलेल्या प्रसूतिविषयक नियमाशीं हा सामान्य नियमही जास्त जुळता आहे. याचा अर्थ असा कीं, मानवी शरीर, त्यांत यथाक्रमानें उत्पन्न होणारी वासना, तिच्या पूर्ततेस आवश्यक असणारी रतिक्रिया, त्या रतिक्रियेचा अवश्य परिणाम असलेली गर्भधारणा, तिचें फल म्हणून अपत्यप्रसूति आणि या सर्व क्रियांचा पुनः शरीरावर होणारा परिणाम या सर्व गोष्टी जरी निरनिराळ्या दिसल्या तरी हें सर्व मिळून वस्तुतः एकच क्रिया आहे. आणि म्हणून, ती या सर्व गोष्टींचा एकमेकांशीं अनुकूल संबंध राहील अशा एकसंधीपणानें झाली पाहिजे. आज जर बाळंतपण फार जड होऊन बसलें असेल तर त्याचें मुख्य कारण हेंच असूं शकेल की, त्याला आधारभूत असलेलें शरीर निसर्गापासून

दि:
नों: दि:

तितकें दूर गेलेलें आहे. निसर्गाशीं फारकत झालेल्या शरीराला निसर्गाचा खरा अनुभव कसा येईल ?

## ऋतुमान व संभोगेच्छा

निसर्गाशीं फारकत झालेल्या शरीरांच्या नैसर्गिक शक्ति किती क्षीण होत जातात हें कांहीं वर्णन करुन सांगितलें पाहिजे असें नाहीं. थोडे दिवस शेतावर किंवा जंगलांत जाऊन राहिल्यावर त्याची प्रतीति, थोडक्यांत, माणसाला पटते. इंग्रजीमध्यें स्टीव्हससनची 'रेफ्युजी' म्हणून जी कादंबरी आहे तिच्यांत त्यानें हें तत्त्व फार सुंदर रीतीनें दाखविलें आहे. मूळ युरोपांतूनच अमेरिकेच्या जंगलांत जाऊन दोनचार पिढ्या राहिल्याबरोबर मूळच्या फ्रान्सच्या रहिवाशी माणसांत आणि अमेरिकन माणसांत किती विलक्षण फरक पडला, हें त्यानें एका पात्राच्या द्वारें दाखविलें आहे. संस्कृत साहित्यशास्त्राचे संकेत सर्वच काल्पनिक वाटण्याइतके त्याच्यापासून आपण दूर झालों आहोंत याचेंही कारण हेंच आहे. उदाहरणार्थ, निरनिराळ्या ऋतूंत निरनिराळ्या वासांचे परिणाम उन्मादक होतात याची प्रतीति, हा संकेत आधीं माहित नसलेल्या हल्लींच्या किती नागरिकांना स्वतंत्रपणें येत असेल कोण जाणे ! राग-रागिण्यांचे परिणाम, विशिष्टकालीं विशिष्ट रसास पोषक होतात, याची प्रतीति मुंबई-पुण्यांत राहणाऱ्यांना, अथवा बगीच्यांत किंवा शेतांतही मुंबई-पुण्याच्या जीवनाचा धागा न सोडणाऱ्या लोकांना येणें कठीण आहे. निसर्गाशीं ज्याचें जास्त साधर्म्य आहे अशा शरीरावरच निसर्गाचे पूर्ण परिणाम घडतील हें उघड आहे. निसर्ग सारा नियमबद्ध आहे. त्याप्रमाणेंच, निसर्गांतूनच उद्भवणारी रतिक्रियेची इच्छा देखील नियमबद्धच आहे. हल्लींच्याही परिस्थितीत निसर्गाची शक्य तेवढी आठवण ठेवणाऱ्या संयमी जोडप्याची संभोगवासना, आपोआपच कांही क्रमांनीं नियमित होते, असा शास्त्रज्ञांचा अनुभव आहे. आमच्या साहित्याचार्यांनीं तर त्याचा खोल अभ्यास करून त्याचें एक शास्त्रच बनविलें होतें. संभोगाच्या इच्छेचा काल ऋतुपरत्वें निरनिराळा असतो असें त्यांचें शास्त्र आहे. म्हणजे, ऊष्णकालांत रात्रीपेक्षां माध्यान्हकालीं दिवसा, शीतकालांत रात्रीच्या वेळीं आणि वर्षाकालीं आकाशांत काळेकुट्ट

ढग आलेले असून गार वारा सुटलेला आहे अथवा बाहेर पाऊस पडत असून चांगलाच गारवा पसरला आहे अशा वेळीं, अशी कल्पना संस्कृत वाङ्मयांत दिसते. तिच्यांत पुष्कळ तथ्य असावें असे माझ्या कांहीं बुद्धिमान व रसिक मित्रांचे अनुभव आहेत. सायंकालचा काल हा कामोद्दीपक आहे असेंही म्हटलेलें आहे व श्रीमद्भागवतांत संध्येची उत्पत्ति दिलेली आहे तिच्यांतही तसेंच ध्वनित केलें आहे. तें खरें असलें तरी, प्रत्यक्ष संभोगेच्छेस प्रेरणा करणारा हा काल असावा असें वाटत नाही. हे सारे अनुभव शहरांत राहणाऱ्या अथवा स्त्रीसुखाची नित्यावळी घालणाऱ्या लोकांना येणें बहुतकरून कठीण. त्यांनाही, क्वचित्काळीं याचा भास होत नसेल असें नाही. परंतु तेवढ्यांत तो टिपून घेणारा सहृदय एखादाच आणि नागरिक जीवनक्रमांत त्याला लागणारा वेळही क्वचितच मिळणार.

या सर्वांचें तात्पर्य एवढेंच कीं, बाळंतपण हें जर आजकाल संकट झालें असेल तर त्याला कारण आमचीं शरीरेंच असलीं पाहिजेत. बाळंतपणाच्या बाबतीमध्यें हल्लीं ज्या कांहीं तक्रारी ऐकूं येतात त्यांत विशेषत: चार पांच फार प्रमुख आहेत. अकालीं गर्भपात होणें, पुरे दिवस घेतले असूनही आणि व्यवस्थित प्रसूति-लक्षणें (normal delivery) दिसत असूनही वेणा नसणें, प्रसूति झाल्यावर वार बाहेर पडण्यास त्रास होणें, प्रसूति चांगली होऊनही पांच सात दिवसांनंतर एकदम ताप येऊं लागणें, म्हणजे शरीर दूषित (septic) होणें आणि बाळंतपणानंतर शरीर एकदम उतरून जाणें, त्याचें सौंदर्य कमी होणें व त्याचा जोम नाहींसा होणें या तक्रारी जिकडेतिकडे विशेषत: ऐकूं येतात. त्यांचा थोडासा आपणांस विचार केला पाहिजे. म्हणजे शरीर वाढविण्यापासून भारतीयांनीं कशी काळजी घेतली होती हें लक्षांत येईल. वरील गोष्टींचीं मीमांसा करून जीं कारणें संभवतील तीच नेमकी, भारतीयांनी आपल्या स्त्री-पुरुषांची वाढ करतांना दूर ठेवली होती असें म्हटलें म्हणजे त्यांची पद्धत जास्त चांगली लक्षांत येईल.

## ऱ्हासाची मीमांसा

हिंदुस्थानाविषयींच्या ज्या कित्येक बाबतींत मुळींच मतभेद नाहीं अशा बाबतींतील एक प्रमुख बाब ही आहे कीं, इंग्रजांच्या राजवटींत

हिंदुस्थानचा शारीरिक ऱ्हास पराकाष्ठेचा झाला आहे. जगाच्या उपलब्ध असलेल्या इतिहासकालांत, कोणत्याही राष्ट्राचा एवढा शारीरिक ऱ्हास झालेला नाहीं, असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. प्राचीन परंपरा पाहिली तर भारतवर्षांतील लोक सुदृढ बांध्याचे, देखणे, निरोगी, साधे-सुधे, निरलस, उद्योगी आणि म्हणूनच दीर्घायु असे होते. पेशवाईंतच त्यांच्या शारीरिक ऱ्हासास सुरुवात झाली होती, असें मानण्यास जागा असली तरी, त्यांचा शारीरिक उत्कर्ष इंग्रजांची राजवट सुरू होईपर्यंत एकसारखा टिकून होता असेंच म्हणावें लागतें. या दृष्टीनें ह्युएन्त्संग, मार्कोपोलो इत्यादि प्राचीन लेखकांनीं दिलेले अभिप्राय आणि पेशवाईच्या अखेरीस मॅलेटसारख्यांनीं केलेलीं वर्णनें, यांच्यांत म्हणण्यासारखा कांहींच फरक नाहीं. राष्ट्राचा शारीरिक घात करणाऱ्या अनेक दुर्व्यसनांची छाया हिंदुस्थानावर अठराव्या शतकांतच पडूं लागली होती, हें नाना फडणिसांच्या आत्मचरित्रावरून दिसून येतें. आज हिंदुस्थानांत मधुपर्काचा मान पावलेला चहा नुकता त्यावेळेला सुरू झाला होता. रघुनाथराव पेशव्या-चहा पिण्याकरतां कपबशीचा संच होता हें इतिहासप्रसिद्ध आहे. अशाच इतरही अनेक गोष्टींचा निर्देश करतां येईल. गर्भाधान संस्काराशिवाय स्त्रीस्पर्श करावयाचा नाहीं, ही मर्यादा नाहींशी होऊन कोंवळ्या पोरी, ऋतु प्राप्त होण्यापूर्वींच, पुरुषाच्या अंगावर आचरटपणानें लोटल्या जात होत्या. धाकट्या बाजीरावची गोष्ट तर सुप्रसिद्धच आहे.* जी गोष्ट थोरामोठ्यांची तीच थोड्याबहुत फरकानें लहान माणसांची आणि जी महाराष्ट्राची स्थिति तीच प्रायः साऱ्या हिंदुस्थानची. मी अन्यत्र दाखविलें आहेच कीं, पेशवाईमध्यें लढाया व स्वाऱ्याशिकाऱ्या चलूं असल्या तरी, औरंगजेबाच्या मृत्यूनंतर हिंदुस्थानांत आणि स्वाराज्यामुळें विशेषतः

* रावबाजीचें वय केवळ १३–१४ असतांना आपल्या नऊ वर्षांच्या पत्नीशी समागम करण्याचा आचरटपणा त्यानें केला व त्या बद्दल भांडण होऊन आनंदीबाईनें त्याला झोडपून काढलें, ही हकीकत रा. भावे यांनीं 'पेशवेकालीन महाराष्ट्रां'त दिली आहे.

† वैदिकसंस्कृतीची पुनर्घटना, पृ. १०७–१५५.

महाराष्ट्रांत, एकंदर समाजाला अनिष्ट असें स्वास्थ्य एकदम मिळून जीवनांतील जोमदारपणा नाहींसा झाला. जोमदार परंपरेंतील व्यक्तीस किंवा वंशास असें एकदम स्वास्थ्य मिळणें हें फार घातुक असतें. पुष्कळ सुदृढ प्रकृतीचीं माणसेंही पेन्शन घेतल्यावर, एकदम मिळालेल्या स्वास्थ्यानें लवकर मृत्युमुखीं पडतात हा अनुभव सर्वांच्या परिचयाचा आहे. त्यांतच, 'ट्रान्सफर सीन' प्रमाणें एकदम इंग्रजांचा घटोत्कची बाजार सुरू झाला. त्याचा परिणाम, पूर्वपरंपरेच्या जोरामुळें, प्रारंभींच्या एकदोन पिढ्यांवर जरी दिसून आला नाहीं तरी हळू हळू पूर्णपणें घडून आला. आणि त्यामुळेंच उत्तरोत्तर पिढ्या अधिकाधिक निकस व विकलांग अशा निपजल्या. लोकांची राहणी, आचारविचार इत्यादिकांची हजारों वर्षांची परंपरा एकदम सुटल्याचा दुष्परिणामच याला बराचसा कारणीभूत झाला असावा असें वाटतें. हळू हळू आणि पचनी पडत पडत अशा रीतीनें जर पुष्कळ काळ लागून हें फिरंगीकरण झालें असतें, तर कदाचित, शारीरिकदृष्टया तें जाणवलें नसतें, असें मला स्वतःला वाटतें. फलज्योतिषाचा थोडासा नाद असल्यामुळें मी स्वतः गेल्या सुमारें ७५ वर्षांतील हजारों व्यक्तींच्या कुंडल्या पाहून व त्यांपैकीं अनेक लोकांशीं प्रत्यक्ष रुजवात करून या दृष्टीनें कांहीं अनुमानें बांधण्याचा प्रयत्न केला होता. त्यावरून माझें स्वतःचें मत असें झालें आहे कीं, बाह्य कारणांइतकींच अंतर्कारणेंही ह्या ऱ्हासास जबाबदार आहेत. ढोबळपणानें असें म्हणता येईल कीं, शके १७९५ पासून तों शके १८१९ पर्यंतच्या काळांत जन्मलेल्या बहुतेक कुंडल्यांत, मुष्टिमैथुन, अनैसर्गिक समागम, वेश्यागमन, परदारागमन आणि मद्यपानाची आवड यापैकीं कांहींना कांहीं तरी आढळून आलें आहे. त्या पिढ्या पूर्वींच्या पिढ्यांतून निघाल्यामुळें या व्यवसनांचे परिणाम प्रत्यक्ष त्यांच्यावर न होतां त्यांच्या संततीवर झाले. अलीकडे, कांहीं वर्षांपासून मात्र, मुष्टिमैथुनापलीकडे इतर व्यसनांचें प्रमाण, वरच्या वर्गांतील मुलांत पुष्कळच कमी झालेलें आढळतें. परंतु त्याबरोबरच, कमालीचा शारीरिक ऱ्हास व पराक्रमहानिही दिसून येते. तेव्हां हें कमी झालेलें व्यसनाचें प्रमाण नैतिक उन्नतीमुळें आहे, कां, हीं इतर व्यसनें करावयास देखील जी कांहीं

हिंमत लागते तिच्या अभावामुळें आहे, तें समजत नाहीं. विवाहाच्या वयाची मर्यादा अमर्याद वाढल्यामुळें मुष्टिमैथुन आणि त्याचा परिणाम म्हणून अथवा स्वतंत्रपणेंही स्वप्नावस्था वगैरेचे प्रमाण मात्र फार आढळतें. शाळा, कॉलेजें इत्यादि संस्थांतून आणि डॉक्टर-दवाखाने इत्यादिकांच्या बाबतींत असें आढळून येतें कीं, तरुण रोग्यांची चिकित्सा करतांनाही गोष्ट जवळजवळ विचारांत घेतलीच जात नाहीं. कांहीं कांहीं वर्गांच्या अल्पवयी तरुणांत उपदंशाचेंही अस्तित्व आढळतें. या सर्व गोष्टींचा प्रत्यक्ष विचार विशेषत: न करतां, पौष्टिक अन्न मिळत नाहीं हें एक अशक्ततेचें ठराविक कारण समजलें जातें, आणि त्यावर 'कुक्कुटाण्ड' 'बालकुक्कुटार्क' 'कॉडलिव्हर' 'ऑस्टेलिन' 'हेमोग्लोबिन' आणि अलीकडच्या शोधाप्रमाणें कोणत्या तरी स्वरूपांत 'कॅल्शियम' (कारण, डॉक्टरकडे कोणत्याही अशक्तपणाची तक्रार घेऊन जा, 'कॅल्शियम' कमी पडतो असेंच बहुधा तो म्हणेल. चांगल्या खात्यापित्या कुमारावस्थेंतील मुलाला अथवा तरुण-तरुणींना 'कॅलशियम' कमी पडावाच कां ? याचा विचार करण्याचें त्यांच्या कक्षेबाहेर आहे कीं काय कोण जाणे !) यांचा मारा त्याच्यावर केला जातो.* परंतु त्याचा इष्ट परिणाम इष्ट त्या प्रमाणांत फारच थोडा झालेला आढळून येतो. याचें कारण उघड आहे. वरच्या सारख्या कांहीं खोडी असलेल्या माणसांचें शरीर फार दुर्बल झालेले असतें. टॉनिक देऊं नये तर अशक्तपणा वाढतो; त्याचा प्रतिकार करण्याकरतां अंडें द्यावें तर थोडें मांस आल्यासारखें वाटतें, पण ती शक्ति सहन करण्याची ताकद नसल्यामुळें मनोविकार वाढून अनिष्ट परिणाम अनिच्छितपणानें घडतात; एकूण हिशोब मात्र, गणितशास्त्रांतील काम—काळ-वेगाच्या उदाहरणासारखा, एक हौद एका तासांत पंचवीस गॅलन पाणी घेतो आणि साडेपंचवीस गॅलन सोडून देतो, असा होतो. एका, सुमारें चौतीस-पस्तीस वर्षांच्या बाईचें, उदाहरण पाहिलें. तिला धुपणीचा फार त्रास होता, डॉक्टरकडे नेलें म्हणजे अशक्ततेनें असें होतें म्हणून त्यानें टॉनिक द्यावें. टॉनिक घेतलें

---

*वैद्याकडे गेल्यास क्वचित तो उघड बोलतो पण बहुधा वसंतासारखें कांहीं पौष्टिकच देतो.

म्हणजे कांहीं दिवस थोडा बरा परिणाम झाल्यासारखें वाटावें, परंतु थोड्या दिवसानंतर मनोविकार प्रबळ होऊन त्यामुळें त्रास व्हावा ! शेवटीं कांहीं विशेष प्रकारची राहणी आणि गाईच्या धारोष्ण दुधांतून होमिओपाथिक डोझप्रमाणें सातआठ वेढे सूतशेखर असें अल्प प्रमाणांत टॉनिक, असा उपचार केल्यानें तिला बरें वाटलें.

## स्त्रीच्या ऱ्हासाचीं सामान्य कारणें

जी गोष्ट पुरुषाची तीच कमी-अधिक प्रमाणानें स्त्रियांची; आणि जी उच्च वर्गाची तीच प्रमाणान्तरानें सर्व खालच्या वर्गाची. स्त्रियांच्या ठिकाणी गर्भाशय हा एक अतिशय नाजूक अवयव असल्यामुळें आणि त्याच्यावर कोणत्याही गोष्टीचा फार लवकर परिणाम होत असल्यामुळें त्यांचे आरोग्य तर पुरुषापेक्षांही जास्त बिघडलेलें आढळतें. गर्भाशयाचे सर्व प्रकारचे रोग अत्यंत मोठ्या प्रमाणांत वाढत आहेत. त्यांतील कित्येक तर तेरा वर्षांच्या वयापासूनच त्रास देत असलेले आढळतात. धुपणीचें प्रमाणही फार विस्मयकारक आहे. आणि अधिक दुर्दैव असें आहे कीं- स्वयंसंभोगाचेंही प्रमाण शिकणाऱ्या मुलींत आढळून येतें. आणि प्रत्यक्ष स्वयंसंभोग नसला तरी हल्लीच्या या स्त्रैण युगांत उत्पन्न झालेल्या वातावरणाचे धक्के बसून ज्ञानतंतूंना आलेला खिळखिळेपणा फार मोठ्या प्रमाणानें शरीराचा घात करतो. या तऱ्हेचे ज्ञानतंतूंवर झालेले आघात प्रत्यक्ष संभोगाहूनही जास्त दुर्बळपणा आणतात. इतकेंच नाही तर, प्रत्यक्ष संभोगाच्या इच्छेचाही, वेळेस, नाश करतात. नेहमी असें आढळून येतें की, जों जों अशा तऱ्हेच्या परिस्थितीच्या आहारी स्त्री किंवा पुरुष जास्त असतो तों तों या मानानें ती अथवा तो विवाहाचा कंटाळा करतांना अथवा त्या कल्पनेपासून हट्टानें दूर राहतांना आढळतो. याचें कारण हेंच आहे की, खरी इंद्रियाची भूक म्हणजे काय हें समजण्यास ते असमर्थ होतात. एक रोजचा विधि म्हणून ठराविक वेळेला अन्न पोटांत घालणाऱ्या माणसाला खरी भूक आणि अन्नाची खरी लज्जत ही जशी कळेनाशी होतात, तसेंच हें आहे. कोणत्याहि व्यसनाचें असेंच आहे. पुढें पुढें त्यांत मग त्याच्या सेवनाचें सुख मिळत नाहिसें होतें. सेवन न केलें तर

प्राण कासावीस होतो. ती कासावीस थांबविणें हेंच त्यांतलें सुख. भर्तृहरीनें तर, मनुष्याच्या सर्वच सुखासंबंधी, सुख म्हणून कांही वस्तु आहे असें नाहि, कासाविसी होते ती नाहिशी झाली म्हणजे त्यालाच लोक सुख असें म्हणतात, असें म्हटलें आहे. (प्रतीकारो व्याधेः सुखमिति विपर्यस्यति जनः). एका इंग्रज लेखकानें म्हटले आहे, खरे पाहिलें तर आजकाल संभोगेच्छेच्या गरजेपेक्षां लैंगिक विचारांच्या आणि चिंतनाच्याच वावटळीत जग जास्त सापडलेले दिसतें. लैंगिक विचारांचा मारा एकसारखा होत असतो आणि त्यामुळे हेहि कळेनासे होते की, संभोगाच्या नैसर्गिक आवश्यकतेमुळे आपण जर्जर होतो आहो कां सभोवतालच्या लैंगिक वावटळीत सापडल्याने तसे होतें आहे. लैंगिक प्रवृत्तिना अनिवारपणे खवळवून सोडण्याचि ही हीन पाशवी प्रवृत्तिहि तिच्या पशुपणाची मूर्तिमंत साक्ष आहे. "It is not sex as a vital inner urge that daminates people now-a-days so much as the thoughts and images of sex. You are being constantly attacked and you no longer know whether it is your own sex-urge or the sex-vibration prodoced artificially by life around you. This degrading emphatic appeal of our sex-instinct is one of the most beastly signs of our civilization." म्हणजे "इंद्रियांच्या भुकेपेक्षां हल्लीच्या पाशवी संस्कृतीची प्रत्येक गोष्ट, जी पुनः पुनः कामवासनेला धक्का देते, तिचा, आणि तिचा परिणाम म्हणून ज्यांचें चिंतन घडतें असे संभोगविषयक मूर्तिमंत विचार, यांचाच जास्त जाच होतो व त्यामुळें खरी इंद्रियाची भूक देखील कळेनाशी होते." दुसरीकडून, उपजत बुद्धीनें हें अयोग्य आहे अशी मनाला जाणीव होत असल्याकारणानें खरी स्थिति लपविण्याचाही एकसारखा अट्टाहास चाललेला असतो. 'रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन' असें तुकाराममहाराजांनी म्हटलें आहे, तसेंच थोडया वेगळया अर्थाने शब्दशः घडतें. ही कांचणी रात्रंदिवस अंतःकरणाला लागून या सर्वांची

युद्धभूमि जें शरीर तें जर्जर होऊन जातें. अथवा, असें कांहीं झालें नाही तरी ध्येयनिष्ठेच्या अथवा अशाच कांही तरी दुसऱ्या उच्च प्रेरणेच्या साह्याशिवाय निव्वळ हट्टानें दाबून टाकलेल्या स्फूर्ति विकृत स्वरूप धारण करून अनेक रीतीनें प्रकट होतात. विशेषत: फ्राईडनें पुढें आणलेल्या मनोविश्लेषणशास्त्रानें याचा चांगला विचार केला आहे.

## फ्राईडचें मत व त्याचें कारण

नैसर्गिक स्फूर्ति निग्रहानें दाबून टाकल्या असतां विकृत स्वरूप धारण करून दुसरीकडून अपाय करतात हें फ्राईडचें म्हणणें खरें आहे. * मात्र आपलें म्हणणें मांडतांना त्यानें कांही बाबतीत जो अतिरेक केला आहे तो मात्र खरा नाही उदाहरणार्थ, मनुष्याच्या सर्व प्रवृत्तीचें मूळ लैङ्गिक सुखाच्या वासनेंत असतें, इतकेंच तर काय पण, आई मुलाला पाजीत असते तेव्हांही त्याच सुखाचा अनुभव घेत असते आणि मुलगा स्तनपान करीत असतांनाही त्याच सुखाचा अनुभव घेत असतो हें सर्वस्वी खरें नाही. या मतांची सदोषता नंतर त्याला स्वत:लाच आढळून आली. परंतु, त्याला स्वत:ला असा भ्रम झाला याचेंहि कांही कारण आहे. मनुष्याचा बाह्य जगाशी जो प्रथम संबंध येतो तो स्पर्शेन्द्रियाच्या द्वारें येतो. म्हणजे त्याला सुख किंवा आनंदाची वृत्ति अनुभवाला येते ती प्रथम स्पर्शेन्द्रि-याच्या द्वारें कळते. आणि अगदी पहिल्यापासून त्याचा अभ्यास झाल्यामुळें इतर वृत्तींपेक्षां ती जास्त दृढ झालेली असते. स्पर्शाच्या इतर सर्व सारण्या जननेन्द्रियाच्या ठिकाणी केन्द्रीभूत झाल्या आहेत हें प्रसिद्ध आहे. हें केन्द्र इतर दुसऱ्या कोणत्याहि केन्द्रापेक्षां अनेक पटीनें उत्तेजनक्षम आहें हें निर्विवाद आहे. त्यामुळें असें होतें कीं, पुढें, त्याच्या सर्व इन्द्रियवृत्ति पृथकपणें प्रकट झाल्यावरहि आणि मन व बुद्धि यांची वाढ झाल्यावरहि, हें केन्द्र उत्तेजित झाल्यास त्याच्या मनांत असो नसो, त्याला सुखाची अनुभूति येते आणि शरीराच्या कणाकणांतही उत्साहाची स्फूर्ति उत्पन्न होते. याच्या उलट परिणाम असा होतो कीं, कामविषयक कोणतीही कल्पना मनांत नसतांनाही, इतर कोणत्याही रीतीनें सुखाचा अनुभव

* चरकसंहितेंत तरी 'न वेगं धारणीयं' असेच म्हटलें आहे.

त्याला आला किंवा त्याचा उत्साह वाढला म्हणजे त्याचा सहज परिणाम स्पर्शेन्द्रियावर होतो व शरीरांतील तत्संबंधींचीं केन्द्रें थोडी तरी उत्तेजित होतात. क्षीणवीर्य असलेल्या कित्येक लोकांचा असा अनुभव आहे कीं, स्त्रीविषयक कल्पनेचा अगदीं मागमूसही मनांत नसतां इतर कोणत्याही कारणानें जास्त हर्ष झाला अथवा उत्साहाची स्फूर्ति उत्पन्न झाली तरी त्यांच्या वीर्यकोषाला धक्का बसून आपोआपच थोडें फार स्खलन होतें. असा अन्योन्यसंबंध असल्यामुळें, फ्राईडला झाला असा भ्रम उत्पन्न होणें साहजिकच आहे. परंतु, मागें आपण स्त्री-हृदयाचें जें निरीक्षण केलें आहे, तें पाहिलें म्हणजे निदान, मुलाच्या बाबतींत तरी फ्राईडचें म्हणणें अजिबात चूक आहे असें लक्षांत येतें. आईला सुखानें पीत असतां हातानें मूल इन्द्रियाशीं कां खेळत असतें, याचें कारण वरील मीमांसेवरून समजून येईल. आईच्या मुलाला पाजण्यांत अथवा लाडविण्यांत देखील फ्राईड म्हणतो तशी कोणतीच वृत्ति नसते, त्याच्या पुढची वृत्ति असते. पुरुषाच्या समागमाची कल्पना मनांत आली म्हणजे स्त्रीचें सारें शरीर खवळून जातें. मन अस्थिर होतें आणि शरीरांतील शक्ति एकदम निघून गेल्यासारखी होऊन वेळेस, ती एक पाऊलही टाकण्यास असमर्थ होते, असा अनुभव संसारी लोक सांगतात. शरीराची उष्णताही वाढून शरीर तापून जातें, अपत्याची कल्पना मनांत आली अथवा त्यास जवळ घेतलें म्हणजे अगदी याच्या उलट परिणाम होतात. अपत्याचा स्पर्श स्तनाला झाल्याबरोबरट तापलेंलें शरीर उलट थंड होतें, मन ठिकाणावर येतें आणि शरीरांतही हर्षाची ऊर्मि खेळते. थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे पहिल्या सान्या लक्षणांचा संबंध स्त्रीच्या एका प्रवृत्तीशीं असतो आणि त्याप्रमाणें तिला जर कोणी कवळून घेतलें नाहीं तर नुसत्या दुसऱ्याला मिठ्यामारून ती प्रवृत्ति शांत कधीच होत नाहीं, असा कामशास्त्राचा अभिप्राय आहे. ती शांत झाल्यावर, दुसरी प्रवृत्ति, जी आपण कोणास तरी हृदयाशीं घ्यावें, तिचा उदय होतो. ती ही असते. अपत्य नसल्यास, पुरुषालाच अपत्याप्रमाणें जवळ घेऊनही ती शांत होऊं शकेल तात्पर्य या दोन प्रवृत्तीच वेगळ्या आहेत; माझ्या असेंही ऐकण्यांत आहे कीं, स्त्रीच्या स्तनप्रदेशावर कोठें-तरी अशी एक सूक्ष्म जागा आहे कीं, तिला नीट स्पर्श झाला असतां

केवढीही तीव्र संभोगेच्छा असली तरी ती क्षणांत नष्ट होऊन तिचें परिवर्तन वत्सलतेंत होतें.

## सहज प्रवृत्तींचें परिवर्तन हीच सुसंस्कृतता

मनुष्याच्या सर्व व्यवहाराच्या मुळाशीं कामवासना असते, असें म्हणणारा फ्राईड देखील हें म्हणणे मान्य करतोच कीं, त्या कामावासनेचें रूपान्तर विकृतींत न होतां दुसऱ्या कांहीं चांगल्या उदात्त भावांत करता येतें यालाच तो 'sublimation' म्हणतो. स्त्री-पुरुषांच्या बाबतींत भारतीयांनीं हें तत्त्व ओळखलें होतें. आणि म्हणून त्यांनीं, आपल्या सर्व परंपरा कामवासनेचें sublimation होईल असा धोरणानें रचण्याची पराकाष्ठा केली होती. त्यांतल्या कित्येक उत्तम चाली आज नष्ट झाल्या-मुळें देखील जास्त दुष्परिणाम घडून येतात. उदाहरणार्थ, मुलाचा आणि आईचा निकट संबंध, मुलगा तारुण्यांत येऊन स्त्रीसमागमाचा अनुभव येईपर्यंतही रहावा आणि अशीच स्थिति मुलीसंबंधीं बापाची असावी ही गोष्ट, एका प्रकारें, वाढल्या वयाच्या मुलामुलींच्या आरोग्याच्या दृष्टीनें फार हितावह आहे. सोळा–सतरा वर्षांच्या मुलाला मोठ्या प्रेमानें पुढ्यांत घेऊन आई निजली आहे, हा भारवीच्या काळचा देखावा, आज जवळजवळ, अशक्यच झाला आहे. त्याच्याच बरोबर, 'येनैवालिंगिता कान्ता तेनैवा-लिंगिता सुता' म्हणून वेदान्त ज्या वृत्तीचें उदाहरण देतो, त्या वृत्तीनें कन्येला आपल्या निकट सहवासांत वागविणारे पुरुषही थोडे. अशा आयांच्या मुलांना स्वप्नावस्थेसारखे कोणतेही रोग होण्याचें बहुधा कधीं कारण पडणार नाहीं. (कोणत्याही उपायानें न थांबणारी स्वप्नावस्था या साध्या उपायानें हटकून बरी झाल्याचे अनुभव आहेत. मात्र तसें होण्यास, आई आणि मुलगा यांची वाढ पहिल्यापासून थोडीबहुत त्या तऱ्हेनें झाली पाहिजे व हा मुद्दाम उपाय आपण करतों आहोंत अशी सूचना निदान आईस तरी नसली पाहिजे. तिच्या निखळ एक जात एक अशा मातृ-भावांतच ती राहिली पाहिजे ) हल्लींच्या काळीं भराभर मुलें झाल्यानें अथवा अन्य कारणांनीं, मुलगा आईपासून फार लवकर तुटतो. ही त्याची एका बाजूनें हानि होतें आणि दुसऱ्या बाजूनें, ज्या गोष्टी, आपल्या समाजांत तरी आई-बाप मुलासमोर कांहीं केल्या करणार नाहींत त्यांचें

प्रत्यक्ष दर्शन रुपेरी पडद्यावर आईबाप स्वतःच त्याला घडवून देत असल्यानें, तशा साऱ्याच गोष्टींनीं कामचक्रास धक्का बसण्याचें (sex-vibration produced artficially) त्याला इतक्या अल्प वयापासून ज्ञान होऊं लागतें. इतकेच नव्हे तर, अनुभव येऊं लागतो. मग, कितीही व्याख्यानें दिलीं तरी sublimation शक्य कसें होणार ? अशी अवस्था झाली म्हणजे समाज-स्वास्थ्याच्या नांवाखालीं, लग्नाचें खूळ नको, स्वैरसमागम असावा, इतकेंच तर काय पण, स्वयंसंभोगही करावा पण इन्द्रियाची भूक हट्टानें दाबून रोगी बनूं नये, असली मतें प्रतिपादन केलीं गेलीं तर त्यांत कांहीं नवल नाहीं ! या असल्या उपायांनीं कांहीं थोडा लाभ होणार नाहीं असें नाहीं. पण तो लाभ. मागें एका लेखांकांत सांगितल्याप्रमाणें सर्वच समाजानें, कामवासनेचा प्रभाव कमी करण्याकरतां आपली संस्कृति सोडून पुनश्च पशुसारखें नग्न राहण्यासारखा आहे; हिंदींत म्हण आहे 'ले गये पूत तो खो आये खसम' म्हणजे मुलगा मागावयास गेली आणि नवरा गमावून आली, तशा प्रकारचा आहे ! संस्कृतिसंपन्न कुलीन स्त्रीचा मोठेपणा मुलगा व नवरा हे दोन्हीही राखण्यांत आहे !

## निराकार नवनीति

जी गोष्ट पुरुषाची तीच स्त्रियांची. नदीच्या वाहत्या ओघांत वाढणारे लव्हाळे ज्याप्रमाणें एकसारखे थरथरत असतात त्याप्रमाणें या नाहीं त्या रीतीनें, एकसारखी लैंगिक विषयाचीच सूचना मिळत गेल्यानें, मनुष्याचें तन्तुमय शरीर सारखें हादरत राहतें; आणि नाहीं म्हटलें तरी, त्याचींच पुटें चढत असतात. यावर कोणी असा आक्षेप घेईल कीं, शिमग्यासारख्या सणांत बीभत्सपणाची कमाल करून वाटेल तशी बोंब केली जाते आणि पांच पांच वर्षांची लहान मुलेंही त्यांत मिसळतात, तेव्हां नाहीं वाटतें अनिष्ट परिणाम होत ! त्याचें उत्तर असें आहे कीं, तो प्रकार निंद्य आणि अनिष्टच आहे. परंतु त्याचा विशेषता वाईट परिणाम होत नाहीं. कारण वर्षांतून फार झालें तर दोन तीन दिवस त्यांत जातात, स्त्रीसमाज आणि संभावित पुरुषवर्ग एक किळसवाणा प्रकार म्हणूनच त्याकडे दुर्लक्ष

करतात आणि जे त्यांत पडतात त्यांच्याही ठिकाणीं, त्या वेळेला, वास्तविक वृत्ति हुल्लडबाजीची असल्यामुळें त्यांच्या अंतःकरणाचा खरा स्थायीभाव 'रति' हा नसतो. तरीपण तो प्रकार तिरस्करणीय आहे असेंच, हल्लीं तरी या स्थितीत, मी म्हणेन. संस्कृत कवींनी, इतकेंच तर काय, पण पुराण-ग्रंथांनीही शृंगाराचाच नव्हे तर, अश्लीलपणाचाही शेणसडा काय कमी घातला आहे व त्याचें समर्थन 'रूढ नीतिवादी' (वास्तविक या शब्दाचें प्रयोजनच नाही. कारण रूढ नीतिला शिव्या देणारे लोकही दुसरी कांही. शास्त्रीय नीतिकल्पना कधीच मांडीत नाहीत. त्यामुळें नवीन नीति, ही निराकार वस्तु आहे.' आज तरी तिची व्याख्या रूढ म्हणून जिला म्हणतात ती नीति सोडून वागणें, परंतु तसें करीत असतांना साऱ्याच समाजाचा रोष आपणांवर ओढवणार नाहीं अशी काळजी घेणें, यापेक्षां दुसरी नाही. म्हणून 'रूढनीति' आणि 'नवनीति' या शब्दांचे खरे अर्थ 'नीति मानणें' आणि 'नीति झुगारून देणें' एवढेच आहेत! ) कसें करतात, म्हणून प्रश्न विचारला जातो. त्याचें उत्तर दिलेलेंच आहे. संस्कृत वाङ्मय आणि पुराणें हीं संस्कृत भाषेत होतीं, बहुजनसमाजाशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध कधीच नसे, म्हणून त्यांचे दुष्परिणामही होत नसत. आजची स्थिति तशी नाही. रस्त्यानें चालतांना दिसणारा एखादा कागदाचा तुकडा सहज उचलला तरी, त्यांत चटकन, 'या गालाचा मुका घेतला तर तो गाल पुढे कर' असें कांही तरी वाक्य, नाही तर संभोगशृंगाराची सूचना देणारें एकादे चित्र आढळतें. आणि त्यांचा अनिष्ट परिणामही, विशेषतः मुलींवर मोठ्या तीव्रपणानें होतो.

## दोन उदाहरणें

भोंवतालच्या परिस्थितींतून अशी कांही सूचना मिळण्याची, म्हणजे थोड्या प्रमाणांत तशी वृत्ति प्रत्यक्ष उठून मन चंचल होण्याची अथवा कांही तरी 'गोड अस्वस्थता' वाटण्याची मुलींची तयारी, सामान्यतः वाटते त्यापेक्षां, फार लवकर होते. पूर्वीच्या काळची, अशी तयारी झाल्यावरही, मनाच्या द्वारें शरीरास मिळालेल्या त्या धक्क्याचा आणि त्या गोड अस्वस्थतेचा अर्थ न समजल्यामुळें, त्याचा फारसा अनिष्ट परिणाम गडूं न देणारी मुग्धावस्था तर आतां, अशक्यच झाली आहे. पूर्वीची

स्थिति 'प्रगल्भ व्यापारः स्फुरति हृदि मुग्धश्च वपुषि' अशी होती. आतां घासलेटी वाङमय आणि रुपेरी पडद्यावरील विद्यालयें अप्रगल्भ शरीर असतांना 'प्रगल्भ व्यापारः स्फुरति वपुषि प्रोल्लसति च' अशी स्थिति करतात. एकदां माझ्या असें लक्षांत आलें कीं, अकरा वर्षें वयाची एक मुलगी, तिचे रोजचे सारे व्यवहार करीत असतां, उगीचच मधून मधून, क्षणभर विमनस्क व तटस्थ होऊन जाई. अशा वेळीं, तिच्या चर्येतही एक प्रकारचा सूक्ष्म पालट घडून येत असे. त्यावर मी तिला एकदम म्हटलें 'तुझें चित्त ठिकाणावर कां नाहीं ?' तिनें अर्थातच, ती गोष्ट साफ नाकबूल केली. मी तिला, तिच्या मनांत पुनः पुनः कोणती गोष्ट येते, हें अगदीं उघड शब्दांत सांगितल्यावर मात्र, आश्चर्यचकित होऊन तिनें ती गोष्ट कबूल केली व 'तुम्हांला हें कसें समजलें ?' म्हणूनही विचारलें. तिला हे कोडे पडण्याजोगेंच तिचें वय होतें. परंतु नुकताच दोन तीन दिवसापूर्वी तिनें कोणता सिनेमा पाहिला हें मला माहित होतें. त्याचा तो परिणाम होता. अशा स्मरणाच्या अनुवृत्तीच्या वेळीं, त्या प्रसंगांतील कोणत्या तरी पात्राच्या ठिकाणी आपली स्वतःची कल्पना करून त्या प्रसंगाची गोडी अनुभविण्याचा मन प्रयत्न करीत असतें. असा प्रकार वारंवार घडल्यास त्याचा ज्ञानतंतूंवर होणार संस्कार बहुशः अनिष्टच असतो.*

रुपेरी पडद्यावरून हें शिक्षण किती झपाट्यानें मिळतें, याचाही एक अनुभव सांगतों. जन्मापासून माझ्या अंगावर वाढलेली माझ्या मित्राची एक मुलगी, तिच्या इथें मी गेलों म्हणजे गोष्टी सांगण्याचा

---

* हर हिटलरनें या विषयीं मोठे कळवळयाचे उद्गार काढले आहेत ? "शरीर कमावण्याच्या उद्योगाबरोबरच मानसिक विकृति उत्पन्न करणाऱ्या सर्व गोष्टींचा प्रतिकार केला पाहिजे. आजची स्थिति अशी आहे की, सर्व समाज म्हणजे, लैंगिक विकार आणि मनोवृत्ति मोठ्या सायासाने उत्पन्न करण्याचें आतपगृहच तो बनला आहे, आमचे सिनेमा आमची क्रिडास्थाने आणि नाट्यमंदिरें ह्यांच्याकडे नुसती नजर टाकली तरी लक्षांत येईल की विशेषतः तरुणांना जे नको तेंच तेथे मिळते.

फार आग्रह करीत असे. ती नऊदहा वर्षांची असतांना एकदां, गोष्ट सांगतांना चुकून माझ्या तोंडांतून 'नायकाचें प्रेम एका वेश्येवर बसलें' असें शब्द निघून गेले. त्याबरोबर, त्या मुलीनें चटकन मला अडविलें कीं, 'वेश्या म्हणजे काय ? आणि तिच्यावर प्रेम कां बसतें ?' मी कांहीतरी सांगून माझी सुटका करून घेतली. सुमारें सहाच महिन्यांनी तिची माझी

---

जाहीराती आणि सामुदायिक प्रदर्शने ही जणु काहि एकमताने अतिशय लाजिरवाण्या रीतीने समाजावर अशा वृत्तींचा मारा करीत असतात आणि यौवनाची ओळख न विसरलेल्या कोणाच्याहि लक्षांत सहज येईल की याचे दुःष्परिणाम फार भयंकर होत असतील. ज्या कोवळ्या वयांत असल्या विचारांची छायाहि त्यांच्यावर पडू नये त्याच वयांत त्यांचे अन्तःकरण मलीन होऊन जाते." (माईन कॅम्फ भाग एक प्र. १०)

The fight against pollution of the mind must be waged simultaneously with the training of the body. Today the whole of our public may be compared to a hot house for the forced growth of sexual notions and incitements. A glance at the bill of fare providad by our cinemas, playhouses and theatres, suffices to prove that this is not the right food, especially for young people. Hoardings and advertisement kiosks combine to acttract the public in the most vulgar manner. Anyone who has not altogether lost contact with adolescent yearning will realise that all this must have very grave consequences. This seductive and senseous atmosphere puts notions into the heads of our youth which at their age, ought still to be unknown to them

*Mein Kampf, Vol. I, Ch. X.*

पुनः गाठ पडली. त्यावेळेला, तिच्यांत एक फार मोठा फरक झालेला मला आढळून आला. माझी फार लाडकी असल्यामुळें उठल्यासुटल्या तिचा मुका घेण्याचें मला वेडच होतें. तिलाहि त्यांत कांही विशेष वाटण्याचें कारण नव्हतें. त्यामुळें, केव्हांही ती चटकन गाल पुढें करीत असे आणि मग, त्यावेळच्या आमच्या लहरीप्रमाणें, कोणता गाल कडू आणि कोणता गोड याचा वाद होई. या खेपेस मी असें पाहिलें कीं, असा मुका घेतलेला तिला फार आवडे; परंतु तो घेतलेला कोणी पाहूं नये असें तिला वाटे. हा फरक पाहून मी विस्मयचकित झालों. जेव्हां, तिनें मला त्या खेपेसच, न्यू थिएटर्सच्या 'देवदास' सिनेमाचें संविधानक अगदी सविस्तरपणें सांगितलें आणि एका वेश्येची त्याच्यावर कशी प्रीति बसली इत्यादि वर्णन सांगून तो पहावयाची शिफारस केली, तेव्हां मला समजून आलें कीं मधल्या काळांत, तिनें प्रथमच पांच सात चित्रपट पाहिले होते; तिच्या लक्षांत पुरतें आलें होतें कीं, स्त्री-पुरुषांचा कांहीं वेगळ्या तऱ्हेचा संबंध असूं शकतो आणि स्त्रियांचे मुके कांहीं वेगळ्या तऱ्हेनें घेतले जातात. त्याची आठवण मनांत उभी राहून तिला कसेंसेंच वाटे. तेव्हां, 'तूं आतां मोठी झालीस' असें म्हणून तिचा मुका घेणें मला सोडून द्यावें लागलें.

## न्या. लिंडसेचा अनुभव

न्या. लिंडसे यानें अनेक साक्षीदारांच्या जबानींवरून असा अनुभव सांगितला आहे कीं, स्त्रीच्या अधःपाताची खरी सुरुवात अकराव्या वर्षीच सुरू होते.* मी जें थोडेंबहुत निरीक्षण केलें आहे, त्यावरून, लिंडसेचा अनुभव अत्यंत खरा आहे, असें माझें मत झालें आहे. अमेरिकेंत फक्त आर्थिक दृष्टयाच मनुष्यसमाजाची वर्गवारी आहे; म्हणून, लिंडसेचें म्हणणें सिद्ध करणारा पुरावा सर्व वर्गांत सारख्याच प्रमाणांत मिळूं शकतो.

---

* The age of eleven is the most dangerous rock that founders the ship of chastity in the ocean of life.

*Justice B. B. Lindsay.*

आमच्याकडे हें प्रमाण वर्ण व जातिपरत्वें आणि विशेषत: इंग्रजी शिक्षण व संस्कृति यांचा कमीजास्ती परिणाम, यांच्या मानानें थोडे वेगवेगळें आढळेल इतकेंच. आतां एकदोन बारीक शंकांचा विचार करून हा लेखांक संपवूं. कारण, बाह्य परिस्थितीचे परिणाम अंत:करणावर आणि शरीरावर कसकसे घडतात व किती प्रकारांचे घडतात, हे पाहणें अतिशय मनोरंजक असलें तरी तें आपल्या विषयाच्या मर्यादेबाहेर आहे. तो मानसशास्त्राचा आणि मनोविश्लेषणाचा विषय आहे. तेव्हां त्यांत जास्त न शिरतां, असे परिणाम होतात एवढेंच लक्षांत ठेवून आपल्याला, आपला मूळ विषय जो, प्रसूति ही आजकाल एक प्राणसंकट कशी होऊन बसली आहे आणि त्याच्या अनुसंगानें या लेखांकांतील प्रतिपादनानें उत्पन्न होणारा प्रश्न जो पाश्चात्यांच्या अनुकरणाचा 'ट्रान्सफर सीन' सारखा परिणाम कां व्हावा, त्याकडे वळणें प्राप्त आहे.

## दोन शंका

एक शंका अशी येते की, ज्या पाश्चात्य गोष्टींच्या अनुकरणाचे दुष्परिणाम झाले असें तुम्ही म्हणतां, त्यांचे तसे परिणाम, खुद्द पाश्चात्य समाजावर कां झाले नाहीत ? आणि दुसरी अशी की, युरोपियन समाजामध्यें पिता व कन्या आणि माता व पुत्र यांचे तुम्ही म्हणतां तसे निकट

---

जर्मनीचा रावण हर हिटलर असेच उद्गार काढतो :

The law courts from time to time throw a distressing light on the spiritual life of our 14 and 15 years-old children, who therefore will be surprised to learn that veneral disease claims its victim at this age. And is it not a frightful shame to see the number of physically weak and intellectually spoiled young men who have been introduced to the mysteries of marriage by the whores of the big cities ?

*Mein Kampf, Vol. I, Ch. X.*

संबंध आढळून येतात; त्यांचें अनुकरण जर कोणी करूं लागला तर तुम्ही त्याचा निषेध करतां व निदान 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं। नाकरणीयं नादरणीयम्' एवढें तरी ऐकवितां, तें कां ? पहिली शंका जी घेतली जाते ती पाश्चात्य समाज आणि आमचा समाज यांच्या तुलनात्मक देखाव्यावरून घेतली जाते. पारतंत्र्याचें दुर्दैव आमच्याप्रमाणें त्यांच्या मागें नसल्यामुळें त्यांच्यात व आमच्यांत शरीरदृष्टचा जमीन-अस्मानाचा फरक आहे हें खरें आहे. पण त्याचा अर्थ असा नाही की, उपरोक्त सर्व गोष्टींचा अनिष्ट परिणाम त्यांच्यावर घडलेला नाही. त्यांच्यांत देखील या गोष्टी मूळच्या नव्हत्या. संपत्ति आणि सत्ता यांच्या अतिरेकाचा अवश्य परिणाम म्हणून अलीकडेच त्या उत्पन्न झाल्या आणि आमच्याप्रमाणेंच, त्यांच्यावरही त्यांचे दुष्परिणाम होत आहेतच. पाश्चात्य देशांतील प्रज्ञावन्त त्याविरुद्ध हांकाटी करीत आहेतच. किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं, इतर सर्व गोष्टींप्रमाणें, याही बाबतींत, त्यांची हांकाटी ऐकूनच तर आम्ही सावध होऊं लागलों आहोंत. सारांश, ही तुलनाच मुळी बरोबर नाही. त्यांच्या त्यांच्यांतच निरनिराळ्या पिढ्यांची तुलना करून हिशोब पाहिला पाहिजे. तसा हिशोब त्यांच्यांतल्या कित्येक शहाण्यांनीं केला आहे आणि त्याचाच परिणाम, जपानसारख्या राष्ट्रांत सहशिक्षण नसणें आणि जर्मनीनें बायकांना पुन: चूल आणि मूल यांच्या मर्यादेंत विराजमान करणें, इत्यादि उदाहरणांत दिसून येतो. वरून ऐटींत ताठ चालणारी युरोपियन स्त्री देखील आंतून गर्भाशयाच्या अनेक रोगांनीं पीडलेली असते अशी युरोपियन डॉक्टरांची साक्ष आहे. दुसऱ्या शंकेसंबंधानें एवढेंच म्हणतां येईल कीं, युरोपियन लोकांत, स्त्री-पुरुषसंबंधांत, स्पर्शाचें महत्त्व अजून पुरेंसें न कळल्यामुळें सर्वच स्त्री-पुरुषांत जास्त मोकळा व्यवहार असतो. बाप आणि मुलगी, आई अथवा मुलगा, हे कोणत्याही वयांत एकमेकांस आलिंगन देऊं शकतात अथवा चुंबन घेऊं शकतात, हें खरें आहे. परंतु, त्याला जें एक औपचारिकपणाचें स्वरूप आलें आहे आणि त्या ज्या सार्वजनिक चालीरीतीसारख्या प्रतिष्ठित गोष्टी होऊन बसल्या आहेत, त्यामुळेंच, त्यांतील मूलतत्त्व नाहींसें होऊन अनिष्टाकडेच त्या झुकल्या आहेत. म्हणून नुसतें त्यांचें अंधानुकरण आमच्या समाजानें करणें हें अहितकारक आहे.

॥ श्री ॥

# वैदिक संस्कृतिमाला, नागपूर.

## श्रीअप्रबुद्ध वाङ्मयाचा विचारवन्तांनी केलेला गुणगौरव

I. "..........It challenges our attention, and deservingly takes its place amongst the modern seientifie studies on Yoga philosophy. It is a thought-provoking publication in simple, easy and readable style, pointing out the meaning and significaoce of Yoga. Aprabudha's exposiıion of Yoga is that of an ardent and sincere aspirant, but at the same time critical and scien tific.

*Prabuadha Bharat, Mayavati*

2. "But if Yoga is to exist in its proper right and sphere its misunderstanding and consequent misuse must be prevented at all costs and this can only be done if the right type of literature from serious-minded authorities appears in increasing volume. In this context the "Science of Yoga" (Vol. 1) by Aprabuedha is to be welcomed."

*The Times of India*
*(IIlustrated Weekly)*

3. "The book is distinctly an addition to the lore of Yoga literature."

*Theosophical Magazine*

4. "An inspired treatise on Yoga which contains a very useful commentary of the Yoga Sutras."

*Prof. L. Renou, Paris*

५. **साहित्य-सम्राट श्री तात्यासाहेब केळकर म्हणतात**–"एक गोष्ट दिसून आली व ती कोणालाहि मान्य करावी लागेल की तुम्ही ऋग्वेदाचें संशोधन केलें तें खोल बुद्धि चालवून केलें आहे; आणि युरोपीयच काय पण स्वदेशीय वैदिक पंडिताशीहि निर्भयपणे झुंजण्यास तयार झाला आहां.... आपल्या चिचित्यक बुद्धीचें व परिश्रमाचें कौतुक वाटतें...."

६. **श्रुतिबोधकार श्री. रा. वि. पटवर्धन**–"संशोधन पद्धति तर्कशुद्ध व निर्भीड आहे आणि युरोपियनांच्या थोतांडी दबकावणीपुढे न वाकण्या-इतका कणखरपणाहि आहे. वैदिक संस्कृतीचा यथातथ्य आदर्श श्री. अप्रबुद्ध यांनी आज महाराष्ट्रीय जिज्ञासूंपुढे ठेवला आहे, त्याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे."

७. **वेदमूर्ति पं सातवळेकर**–"आपण जो विचारसरणी प्रतिपादन केली आहे ती सर्व धर्मविचारकांस नव्या दृष्टीनें विचार करावयास लावील. युरोपियन विचारकांचीं मतें आपण त्यांच्याच दृष्टीने खोडून काढलीं आहेत, हा भाग माझ्या दृष्टीने महत्वाचा आहे."

८. **समर्थसेवक श्री. शंकर श्रीकृष्ण देव**–"कांहीशा प्रतिकूल मनोवृत्तींत वाचण्यास सुरुवात केली, पण कळविण्यास आनंद वाटतो की वाचनाचा शेवट अनुकूल मनोवृत्तींत झाला."

९. **श्रीमान् दादासाहेब खादर्डे**–"यांच्या ग्रंथांची वर्णनशैली व भाषा.... राष्ट्राच्या प्रचलित स्थितिविषयी अंतःकरण तुटून बाहेर आली असल्यामुळे भेदक, उद्बोधक व सूचक अशी झाली आहे; आणि त्यामुळे कृत्रिमतेचा तिला गंध नसल्यामुळे 'कृताभ्यंगस्नानाकनकमणिभूषाविरहिता' अशा उग्रतेज पतिव्रतेच्या पवित्र साध्यासुध्या सौंदर्याप्रमाणे तिच्यांत एक प्रकारची मोहकता आली आहे."

## अप्रबुद्धांची उपलब्ध पुस्तके

१. **श्री. अण्णासाहेब पटवर्धन यांचें चरित्र**–हें त्यांचें पहिलें पुस्तक. यांत त्यांनी आपल्या सर्व विचारसरणीचा सूत्ररुपाने परिचय करून दिला आहे. (पानें सुमारे ४५०)

२. **वैदिक संस्कृतीची पुनर्घटना**–भारतीयासमोर असलेल्या आजच्या जळजळीत प्रश्नांचें यथार्थ स्वरूप काय आहे व त्यांचा विचार सांस्कृतिक मूलतत्वांस धरून कसा करावा व तदनुसार राष्ट्रीय व सांस्कृतिक जीवनाची पुन्हा विभवसुंदर मांडणी कशी करावी, यांचें स्पष्ट व निर्भीड विवेचन यांत पाहावयास मिळेल.
पृष्ठें २५०) (किंमत रु. ४

३. **ऋग्वेदाचा संदेश**–साहित्य–सम्राट केळकर, श्रुतिबोधकार बाबासाहेब पटवर्धन, पं. सातवळेकर यांनी या पुस्तकाची मुक्त कंठाने स्तुति केली आहे. पाश्चात्य पंडित व त्यांचे मानसपुत्र भारतीय विद्वान यांनी जें इतिहाससंशोधनाचें शास्त्र उत्पन्न केलें आहे तें निरर्गल कसें आहे, त्याने संशोधन क्षेत्रांत अवास्तवता व गोंधळ कसा माजविला, हें या ग्रंथांत पाहावयास मिळेल. आमचें संशोधन–शास्त्र आम्हींच कसें बनविलें पाहिजे, त्याची दिशाहि यांत पाहावयास मिळेल.
पृष्ठें सुमारें ४००) (किंमत रु. ४.५० न. पै.)

४. **वेदांचें अपौरुषेयत्व**–पं. सातवळेकरांच्या 'वैदिक धर्म' मासिकाकरिता लिहिलेल्या लेखाचें मराठीकरण. वेदांच्या स्वयंभूतेची अपौरुषेयतेची आणि सृजन शक्तीची भारतीयांची कल्पना ही एक वेडगळ कल्पना नसून, आजच्या वाढत्या पदार्थविज्ञानशास्त्रास धरूनच आहे, हें यांत समजावून सांगितलें आहे. वेद हें एक वाङ्मय आहे. तसेंच तें एक अर्वाचीन पदार्थ-विज्ञानाने सिद्ध होणारें शास्त्रीय सत्यहि आहे, म्हणून वाङ्मय व शास्त्रीय तत्व या दोनहि दृष्टींनी त्याचा आज अभ्यास झाला पाहिजे, ही गोष्ट या निबंधांत प्रतिपादिली असून अभ्यासाची दिशाहि दाखविली आहे.

५. **दोन साम्यवाद**–पूर्वी येथील 'आदेश' पत्रांत लिहिलेल्या वीस लेखांचा यांत संग्रह आहे वस्तुत: साम्यवाद हेंच रशियन आणि भारतीय संस्कृतीचें ध्येय असून त्यांच्या कल्पना मात्र विसदृश कशा कशा झाल्या आहेत, शास्त्रीय दृष्ट्या पाहिलें तर रशियन साम्यवाद हा लंगडा कोढे

पडतो, भारतीय साम्यवाद हाच खरा साम्यवाद कसा आहे इ. विषयांची चर्चा यांत आहे, किंमत रु. ४.०० न. पै.

६. **लाल गुंडगिरी**–भाई डांगे यांच्या India from primitve communism to slavery' या पुस्तकाचें निर्भीड आणि तर्कशुद्ध खंडन. (किंमत रु. ०.७५ न. पै)

७. **ब्राम्हण: एक राष्ट्रीय प्रश्न**–यांत ब्राह्मणासंबंधींच्या सर्व प्रश्नांचा राष्ट्रीय दृष्टचा निर्भय विचार करून, अजूनहि राष्ट्राला ब्राह्मणांची आवश्यकता कशी आहे याची चर्चा असून ब्रह्मद्वेषाच्या या आगींतहि राष्ट्रांकरिताच ब्राह्मणांनी ब्राह्मण म्हणून जगण्याची आवश्यकता कशी आहे, तें विशद केलें आहे. (किंमत रु. ४.००)

८. **पातंजलयोगसूत्र** ( प्रथम पाद )–पातंजल सूत्राच्या पहिल्या पादावर, आजची विज्ञान शास्त्रें लक्षांत घेऊन केलेलें प्रतिपादन आहे. विशेषत: केवळ शास्त्रजिज्ञासूपेक्षा अभ्यास करूं म्हणणाऱ्याला उपयोगी पडावें, असें त्याचें धोरण आहे. (किंमत रु. २.००)

९. **शिक्षणाचा खेळखंडोबा**–नागपूर–काँग्रेसच्या वेळेला मुद्दाम प्रसिद्ध केलेलें पुस्तक. शिक्षणक्षेत्रांतील आजच्या दुरवस्थेचें स्वरूप, तिची पूर्वपीठिका आणि कारणें यांचें साधार विवेचन यांत आहे. (किंमत रु. १.२५ न. पै)

१०. **शिक्षा के साथ खिलवाड़**–वरील पुस्तकाचा येथील बिज्ञाणी नगर महाविद्यालयांतील प्रा. श्री. गोपाळ गुप्ता यांनी केलेला हिंदी अनुवाद. (किंमत रु. १)

११. The Science of Yoga Vol. 1. Vol. 11 अर्वाचीन शास्त्रदृष्टचा योगाची अशी स्वतंत्र मांडली इतर कोठेहि पाहावयास सापडत नाही. भारतीय संस्कृति; अर्वाचीन प्रगति विज्ञान शास्त्राप्रमाणेच शास्त्रशुद्ध अशा आठ मूलतत्वांवर कशी आधारलेली आहे, तिच्या अनेक

परंपरा कशा शास्त्रीय आहेत, त्या या अर्वाचीन युगांतहि टिकणें कसें आवश्यक आहे, इत्यादि गोष्टींचें सुबोध प्रतिपादन यांत असून, योगशास्त्रा-विषयींच्या अनेक दुराग्रहांचे निरसन करून आज अपेक्षित असलेला मानव धर्म योगशास्त्रावरच कसा रचला जाईल, तें समजावून सांगितलें आहे. योगावरील प्राचीन व अर्वाचीन टीकांचाहि निर्भीडपणे समाचार या इंग्रजी पुस्तकांत घेतला असून तदनुषंगाने इतरहि अनेक महत्वाच्या विषयांचें विवेचन आहे; विशेषत: भारतीयांच्या विश्वकोषाविषयीच्या कल्पना सांगणारी परिशिष्टें मौलिक आहेत. याच्या दुसऱ्या भागाला पुणें विद्यापीठाकडून साडे सातशे रुपयांचें अनुदान मिळालें आहे.

(प्रत्येकी किमत रुपये ११.५० न. पै.)

१२. Marsixm X' rayed–"लाल गुंडगिरी" चें इंग्रजी भाषांतर. (किमत रु. १.५० न. पै)

१३. Immanence of Vedas–वेदांच्या अपौरुषेयत्वाचें इंग्रजी भाषांतर. (किमत रु. १.५० न. पै.)

१४. Brahmarhi's Gospel–ब्रह्मर्षि श्रीअण्णासाहेब पटवर्धन यांच्या हिंदु कायद्याबाबतच्या इंग्रजी पुस्तकाचें संपादन व प्रकाशन.

(किमत रु. ४.००)

पुस्तकें मिळण्याचा पत्ता–
प्र. दे. कोलते
एम्. ए, बी. टी.
व्यवस्थापक–वैदिक संस्कृतिमाला
'यमुना-निवास' दक्षिणामूर्ति पथ
स. नं. ६, महाल, नागपूर २
(महाराष्ट्र)

११५५५
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम...2396... दि: ...31.10.59

REFBK-0011561